
खुल्या
व्यवस्थेकडे
खुल्या
मनाने
शरद जोशी

# खुल्या व्यवस्थेकडे
# खुल्या मनाने

(मुक्त अर्थव्यवस्था, गॅट करार विषयक लेख)

शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ

# खुल्या व्यवस्थेकडे खुल्या मनाने

## शरद जोशी

**अक्षर जुळणी**
गणेश मुद्रा
६९२, बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२.

**मुखपृष्ठ**
सरदार -९८६०५१६०३८

**मुद्रक**
राजमुद्रा, औरंगाबाद

**मूल्य**
१९०/- रु.

**प्रकाशक**
जनशक्ती बुक्स ॲण्ड पब्लिकेशन प्रा. लि.
जनशक्ती वाचक चळवळ,
'पिनाक', २४४, समर्थनगर,
औरंगाबाद. ४३१ ००१.
☎: (०२४०) ६९९ २०५०

© शरद जोशी

**प्रथमावृत्ती**
८ नोव्हेंबर २००३

**द्वितीयावृत्ती**
३ सप्टेंबर २००८

# प्रकाशकाची भूमिका

शरद जोशींचे विचार शेतकरी संघटनेच्या चौकटीबाहेरील सामान्य वाचकांपर्यंत पोचावेत हा या पुस्तकामागचा मूळ हेतू. यापूर्वी 'स्वातंत्र्य का नासले?' या नावाने त्यांचा लेखसंग्रह आम्ही प्रकाशित केला होता. त्यांच्या लेखांची संकलनं प्रसिद्ध करण्याचा प्रकल्प आमच्या प्रकाशनाने हाती घेतला असून त्या मालिकेतील हे दुसरे पुस्तक.

१९९१ पासून मुक्त अर्थव्यवस्थेची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू झाली. आणि १९९५ मध्ये भारत या करारात सहभागी झाला. बहुतांश लोकांची या व्यवस्थेकडे बघण्याची दृष्टी संशयाची होती. शरद जोशींनी मात्र सुरुवातीपासून जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्थेच्या पुरस्काराची ठाम भूमिका घेतली. त्यांच्या विचारांचं द्रष्टेपण आज जाणवत आहे. 'शेतकरी संघटक' या पाक्षिकातून त्यांनी याविषयी सातत्याने लिखाण केले. १९९१ पासून ते १९९८ पर्यंत त्यांनी लिहिलेल्या अर्थविषयक, जागतिक व्यापारविषयक लेखांचा समावेश या संकलनात केला आहे. या लिखाणाला पूरक अशी 'स्वतंत्रतेची मूल्ये' ही लेखमालिका परिशिष्टात देण्यात आली आहे.

'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश' या लेखसंग्रहात शरद जोशींनी नेहरुवादी आर्थिक नीतीच्या दारुण अपयशाचा समाचार घेतला होता आणि लोकशाही समाजवादाच्या नावाने सरकारने राबवलेल्या शेतकरी-उद्योजक विरोधी धोरणाचे पितळ उघडे पाडले होते. त्यानंतर येणारा हा लेखसंग्रह २१ व्या शतकातील जागतिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप खुलेपणाने मांडून भावी काळात उत्पादक-उद्योजक यांना उपलब्ध होणाऱ्या उत्कर्षाच्या वाटा अधोरेखित करतो.

'शेतकरी संघटक'चे संपादक श्री. सुरेशचंद्र म्हात्रे, विनय हर्डीकर व अनंत उमरीकर या ज्येष्ठांची मदत या पुस्तकासाठी मोलाची ठरली आहे. या लेखांच्या निवडीचे श्रेय डॉ. शाम अष्टेकर व अजित नरदे या मित्रांना जाते.

**– श्रीकांत उमरीकर**

# अनुक्रमणिका


प्रकाशकाची भूमिका .......................................... ३

१. नाणे निधी – एक शेवग्याचे झाड .......................................... ५

२. बळीराज्याची दिशा .......................................... १३

३. खतांच्या अनुदानाचे रहस्य .......................................... २४

४. बुद्धिसंपदेच्या चाच्यांचा कांगावा .......................................... ३०

५. नेहरूनीती विरुद्ध खुली अर्थव्यवस्था आणि शेतकरी आंदोलन ..... ४९

६. डंकेल, उद्यमी शेतकरी आणि बांडगूळ बिगर शेतकरी ............ ६२

७. डंकेल : शेतकऱ्यांचा दृष्टिकोन - भारतीय व फ्रेंच ................ ८४

८. तीन तोंडाचे अंदाजपत्रक .......................................... ८९

९. खुली व्यवस्था आणि संप .......................................... ९६

१०. सौख्याचे अर्थशास्त्र .......................................... १०१

११. शेवगा तोडा, पाय नको .......................................... १०६

१२. प्रचलित अर्थव्यवस्था व शेतकऱ्यांचे भवितव्य ................. १२१

१३. गावगाड्याची व्यापार व्यवस्था .......................................... १३९

१४. WTO च्या धर्मक्षेत्री, कुरुक्षेत्री .......................................... १५४

१५. खिडकीला दिशा दोन .......................................... १६५

१६. असाध्य ते साध्य करिता सायास .......................................... १७१

१७. शुभकार्य! सावधान! .......................................... १८५

परिशिष्ट-१ : स्वतंत्रतेची मूल्ये - लेखांक १ .......................................... १८९

परिशिष्ट २ : व्यक्तिविकास इदम् न अलम्? .......................................... २१९

# १. नाणे निधी – एक शेवग्याचे झाड

नेहरू अर्थशास्त्राचा पाडाव झाला आहे, याची कबुली लाजत लाजत लपूनछपून दिली जात आहे. देशाची प्रगती व्हायची असेल तर जुन्या व्यवस्थेत आमूलाग्र बदल व्हायला पाहिजे हे मान्य केले जाते. अर्थव्यवस्था अधिकाधिक मुक्त व्हावी, लायसेन्स-परमीटचे राज्य जावे, सूट सबसीडींचे खेळ बंद करावे, रोजगार व्यवसायास महत्त्व द्यावे, हे सगळे म्हटले जाते. पण, हे म्हटले जात असताना नेहरूंचे नाव घेऊन त्यांनी सांगितलेल्या अर्थशास्त्राचा पाडाव झाला आहे असे कुणी म्हणत नाही.

नेहरूवादाचा पाडाव हा अपरिहार्यच होता. शेतकरी आंदोलनाची आर्थिक भूमिका हीच मुळात नेहरूवादाविरुद्ध होती. स्टॅलिनने रणगाड्याने केले ते नेहरूंनी जास्त सभ्य मार्गाने केले, एरव्ही फरक काही नाही, हे संघटनेने आवर्जून सांगितले. स्टॅलिनने शेतकऱ्यांवर रणगाडे पाठवले त्याच दिवशी सोव्हियेट युनियनमधील कम्युनिझमचा पाडाव झाला होता. त्यानंतर जीवाच्या आकांताने प्रयत्न झाले ते कम्युनिझमची अवस्था कशीबशी सांभाळून नेण्यासाठी. कम्युनिस्ट अर्थव्यवस्थेच्या श्रेष्ठतेच्या वल्गना झाल्या, पण तिचा पाडाव झाला आहे हे सोवियेट संघातील धुरिणांनासुद्धा पक्के उमजले होते. ख्रुश्चेवने काही प्रमाणात मुक्त अर्थव्यवस्था आणण्याची सुरुवात केली. पण तो प्रयत्न यशस्वी झाला नाही. त्यानंतर तीन दशके उलटून गेल्यानंतर मुक्त व्यवस्थेची खुलेआम घोषणा करणारा गोर्बाचेव अवतरला. नेहरूवादाचा खुलेआम धिक्कार करणारा भारतीय गोर्बाचेव प्रकट व्हायला किती वर्षे लागतील कुणास ठाऊक? नेहरू महात्मा गांधींचे राजकीय वारस होते, पण आर्थिक प्रश्नांवरील दोघांच्या विचारात सापमुंगसाचे वैर होते. नेहरूंच्या औद्योगिक धोरणाविरुद्ध आपणास लढा द्यावा लागेल आणि प्रसंगी नेहरूराजवटीच्या तुरुंगात जावे लागेल असे गांधींनी स्पष्ट नमूद केले होते. गांधीनेहरू हा द्वंद्वसमास वेदोपनिषद या समासासारखा आहे. आर्थिक प्रश्नांवर तरी नेहरू आणि गांधी उलटी टोके होती.

नेहरू-अर्थशास्त्र म्हणजे काय? या अर्थशास्त्राची दोन प्रमुख सूत्रे

आहेत.

(१) औद्योगिकीकरण म्हणजे प्रगती आणि औद्योगिकीकरण जास्तीत जास्त वेगाने घडवून आणले पाहिजे.

(२) औद्योगिकीकरण झपाट्याने घडवून आणण्यासाठी शासन आणि सार्वजनिक क्षेत्र यांच्यावर प्रमुख जबाबदारी राहील.

औद्योगिकीकरण म्हणजे प्रगती असे मानण्यात नेहरूविचारावरील पाश्चिमात्य पगडा स्पष्ट होतो. पश्चिमी विज्ञान, तंत्रज्ञान आणि वैभव यांनी नेहरू इतके भारून गेले होते की, असेच उद्योगधंदे हिंदुस्थानात उभे झाले म्हणजे प्रगती अशी त्यांनी कल्पना झाली. पाश्चिमात्य देशात उद्योजकांचा एक प्रचंड समाज आहे. तो भारतात उपलब्ध नाही. मग उद्योजकाची भूमिका शासनास पार पाडावी लागेल. नेहरुंच्या समाजवादाचे खरे सूत्र एवढेच होते.

औद्योगिकीकरण म्हणजे प्रगती नव्हे, औद्योगिकीकरण हे प्रगतीचे एक लक्षण आहे. प्रगती विविध शैलींची असू शकते. स्वित्झर्लंड हे जगातील सर्वांत श्रीमंत राष्ट- आहे. त्या देशावर पाश्चिमात्य देशांचा मोठा प्रभाव आहे पण तरीही त्यांची एक वेगळी जीवनशैली आहे. विकासाचा काही एक बांधीव ठेका नाही, की एका ठिकाणी अमूक मार्गाने विकास झाला म्हणजे तोच मार्ग अवलंबला की दुसरीकडे आपोआप विकास सिद्ध होईल अशी काही प्रक्रिया नाही. विकास घडवून आणणे म्हणजे शाडूच्या मूर्ती तयार करणे नाही. विकास ही मोठी जिवंत प्रक्रिया आहे. प्रत्येक प्रदेशात, प्रत्येक समाजात इतिहासभूगोलाप्रमाणे विकास नवा मार्ग घेतो. गांधींचे अर्थशास्त्र मागासलेपणाचे नव्हते. गांधीजींच्या काळात आणि त्या नंतरच्याही ५०-१०० वर्षात समग्र देशाला अधिकाधिक वेगाने संकलित विकासाकडे घेऊन जाण्याचा तो शास्त्रशुद्ध आराखडा होता. औद्योगिकीकरण म्हणजे प्रगती नाही. समग्र समाजाच्या आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्यकक्षा रुंदावण्याची प्रक्रिया म्हणजे विकास. औद्योगिकीकरण म्हणजे स्वातंत्र्याच्या कक्षा वाढवण्याचे प्रमुख साधन आहे हे खरे, पण साध्य नव्हे.

गांधीजींच्या सतत सान्निध्यात असलेल्या नेहरूंना हे समजण्यात अडचण का यावी? कारण नेहरू आणि ते प्रतिनिधीत्व करत असलेला समाज औद्योगिकीकरणाकरिता उतावळा झाला होता. गोरे गेल्यानंतर त्याची

जागा पकडण्याची घाई त्या समाजाला झाली होती. नेहरूंच्या औद्योगिकीकरणाच्या संकल्पनेला पूर्वी एकदा मी ''चैत्रगौरी'' औद्योगिकीकरण असे नाव दिले आहे. चैत्रात शहरातील विशेषत:, ब्राह्मण समाजातील गृहिणी घरी हळदीकुंकवाचा समारंभ करतात. आलेल्या सुवासिनींना कैरीचे पन्हे आणि कैरीची डाळ हे दोनच पदार्थ द्यायचे असतात, घर श्रीमंताचे असो की गरिबाचे असो. मग अहमहमिका लागते ती गौरीच्या सजावटीची. गौर मखरात बसवली म्हणजे तिच्या भोवती सजावटीला काहीही ठेवले तरी चालते. घरात जे जे म्हणून दाखवण्यासारखे असेल, अगदी पोरांची खेळणीसुद्धा तेथे ठेवली जातात. शेजाऱ्यापाजाऱ्याकडून उसनवारी करूनसुद्धा शोभेच्या वस्तु गौर सजवण्यासाठी आणल्या जातात. वेगवेगळे उद्योगधंदे बाहेरून भारतात आणून इथली ''चैत्रगौर'' सजवण्याचा घाट नेहरूंनी घातला. पण गौर सजली म्हणजे काही घरात लक्ष्मी येते असे नाही.

शेतकऱ्यांच्या लुटीतून भांडवल निर्माण करावे. त्यातून परदेशी तंत्रज्ञान आणि यंत्रसामुग्री यांची आयात करावी. कोट्यावधी लोक बेरोजगार असताना मोठ्या भांडवली खर्चाचे व थोडे रोजगार देणारे उद्योगधंदे काढावे, या कारखान्यांनी तयार केलेला माल विकत घेण्याची देशातील बहुसंख्य हीनदीनांची ताकदच नसल्यामुळे कारखानेही संकटात यावेत, मग बळेच रडतराउतांना घोड्यावर बसवावे, त्यांनी केलेल्या मालाची निर्यात करायचा प्रयत्न करावा, म्हणजे परदेशातून आणलेल्या उधार-उसनवारांची थोडी तरी फेड करता येईल. एवढ्याने भागले नाही तर, नोटा छापून आणि परकीय कर्जे घेऊन का होईना, देशातील उद्योगधंदे वाढवण्याची शर्थ नेहरूव्यवस्थेने केली. ही अशी अजागळ व्यवस्था निदान पन्नास वर्षे टिकलीच कशी हे एक मोठे आश्चर्यच आहे. याची तीन चार महत्त्वाची कारणे आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर विकसित राष्ट-ांमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात होत होती. ग्र्रहकोपयोगी वस्तू तयार करून खपवण्यापेक्षा ग्राहकोपयोगी वस्तू तयार करण्याचे कारखाने विकण्यात त्यांना जास्त स्वारस्य तयार झाले होते. औद्योगिकीकरणाच्या नावाने जिभल्या काढीत आलेल्या तिसऱ्या जगातील राष्ट-ांना हे जुने तंत्रज्ञान देऊन टाकण्यात त्यांची सोयच होती. जगातील शीतयुद्धाच्या तणावाने

तिसऱ्या जगातील ‘‘नेहरू’’ची स्थिती आणखी बळकट झाली. दोन महासत्तांमध्ये जीवघेणी स्पर्धा असल्याचा फायदा घेऊन भारतासारख्या देशांनी त्यांना असंतुष्ट करणे मोठे कठीण करून ठेवले. भारतात पेट-ोलजन्य पदार्थांचे साठे सापडत गेले याचा काही फायदा झालाच. लक्षावधी उच्चविद्याविभूषित आणि तंत्रकुशल भारतीय परदेशात गेले. खरे म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेवर हा मोठा आघात मानला गेला पाहिजे. पण या परदेशस्थ अनिवासी भारतीयांनी घरखर्चासाठी पाठवलेल्या पैशातूनही भारताची गंगाजळी बरीच सावरली. १९८० साली आर्थिक संकट आलेच होते. पण पेट-ोलचे उत्पादन वाढल्यामुळे आणि मध्यपूर्वेतील अनिवासी भारतीयांनी पाठवलेल्या रकमांमुळे गंगाजळीची परिस्थिती चांगलीच सुधारली. परिस्थिती सुधारण्याची ही जुजबी कारणे कुणी लक्षात घेतली नाहीत. भारताच्या प्रगतीचे डंके वाजवले जाऊ लागले. परकीय चलनाची आपल्याला काही चिंताच नाही अशा थाटात कृत्रिम धागे आणि इलेक्ट-ॉनिक्स इत्यादी क्षेत्रात खुलेआम आयातीची धोरणे आखली गेली.

पण हा फुगा फुटणार होताच. फक्त वेळ यायची होती. या फुग्याला टाचणी लावायचे काम आखाती युद्धाने केले. आखाती युद्धामुळे पेट-ोलियम पुरवठ्यावर झालेला परिणाम आणि त्याबरोबर निवासी भारतीयांच्या धनादेशांवर झालेला परिणाम यामुळे आर्थिक संकट हा हा म्हणता समोर येऊन ठेपले. गेल्या दोन तीन वर्षात संकटाचे ढग भरून आले हे खरे. पण त्यांचा संबंध जनता दलाच्या शासनाशी नाही. संकट १९८० सालीच आले होते. त्याचवेळी इंदिरा गांधींना आंतरराष्ट-ीय नाणे निधीकडे धाव घ्यावी लागली होती. त्यावेळी जे आधार मिळाले ते आखाती युद्धाने निष्ठूरपणे काढून घेतले. शीतयुद्ध संपुष्टात आल्याने आता तिसऱ्या जगातील याचकांची मर्जी सांभाळण्याचे विकसित देशांना महत्त्वाचे वाटत नाही. पन्नास वर्षांनी का होईना, ‘‘नेहरू अर्थशास्त्र’’ आज नागडे पडले आहे.

अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल व्हायला पाहिजेत असे पंतप्रधान सांगतात, याकरिता उपाययोजना करावी लागेल अशी घोषणा करतात. आणि हे सर्व बोलताना हे संकट म्हणजे काही सर्व राष्ट-ावर आलेले संकट आहे असे भासवतात. ते ज्यांना पूज्य मानतात त्या नेहरूंच्या पापांचे हे फलित आहे हे

ते स्पष्ट करीत नाही.

त्यांचा नवा कार्यक्रम कोणता? पर्यायी अर्थशास्त्र शोधण्याकरिता त्यांना आंतरराष्ट-ीय नाणे निधीकडे पाहण्याची गरज नव्हती. शेतकरी आंदोलनाचे साहित्य त्यांनी चाळले असते तरी त्यांना पर्याय स्पष्ट दिसला असता. तो दिसला नाही. आज आंतरराष्ट-ीय नाणेनिधी नोकरशाहीवरील खर्च कमी करा म्हणून सांगतो, सूट सबसिड्या कमी करा म्हणून सांगतो, रुपयाचे अवमूल्यन करा म्हणून सांगतो, त्याला निदान मान तुकविण्याची तयारी दिसते. रुपयाचे अवमूल्यन झाले, नाही नाही म्हणत झाले. अर्थव्यवस्थेत मूलगामी बदल घडवून आणण्याचे जाहीर झाले आहे. पण यामागे काही मागील चुकांची जाणीव नाही. पश्चात्ताप तर नाहीच नाही. देशात परकीय चलनाचा तुटवडा झाला आहे, तर केवढा गहजब माजला आहे. कर्जाच्या व्याजाची रक्कम आणि भांडवलाची परतफेड एखादे वर्षी झाली नाही तर भारताची आंतरराष्ट-ीय प्रतिष्ठा कमी होईल असे गंभीर चेहरे करून म्हटले जाते. पण ही प्रतिष्ठा कमी झाल्यामुळे कोट्यावधी जनसामान्यांच्या आयुष्यात तिनकही फरक पडणार नाही. पण, प्रश्न राष्ट-ीय प्रतिष्ठेचा नाही, काही थोड्यांच्या सोयीचा आहे हे उघड आहे.

देशात जवळ जवळ चार कोटी लोक बेकार म्हणून नोंदणी झालेले आहेत. निरक्षरांची संख्या वाढत आहे. उच्चशिक्षित परदेशात निघून जाताहेत. शेतीची एकूण अवस्था अशी की, तमाम शेतकरी कर्जात बुडून चालला आहे. दरवर्षी ५० हजार कोटी रुपयांचा काळा पैसा तयार होतो याबद्दल कुणी जीवाच्या आकांताने बोलले नाही. ५ कोटी लोकांची बेकारी यांना गंभीर वाटली नाही. अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याची भाषा ज्यांनी बेकारी हटवण्याकरिता वापरली नाही तेच ही भाषा गंगाजळीची समस्या तयार झाल्यावर वापरतात यातच खरी ‘‘ग्यानबाची मेख’’ आहे.

‘‘इंडिया’’वाद्यांना पश्चात्तापही झालेला नाही. कोणताही आमूलाग्र बदल करण्याची त्यांची इच्छा नाही. आजचे गंगाजळीचे संकट टाळायला दुसरा मार्ग नाही म्हणून ते आज काहीही कबूल करायला तयार आहेत. आताची वेळ कशीबशी मारून नेली म्हणजे उद्या आपण पुन्हा मनमानी करायला मोकळे होऊन जाऊ हाच त्यांच्या मनातला विचार आहे.

आर्थिक ढाचा मुळापासून बदलला पाहिजे अशी भाषा आज कोण करतो आहे? असे बोलणारा प्रत्येक अर्थशास्त्री नेहरू-अर्थव्यवस्थेला हातभार लावणारा होता. आज त्याना उपरती झाली कोठून? हे अर्थशास्त्रज्ञ इंग्रजी पुस्तके वाचून शिकलेले, देशाच्या बटाट्याच्या बाजारपेठेचीसुद्धा माहिती नसलेले. बहुतेक सगळे पगारी चाकर. त्यामुळे शेतीच्या लुटीत सर्वांनाच स्वारस्य. त्याकरिता आवश्यक तो सगळा बौद्धिक अप्रामाणिकपणासुद्धा करण्याची तयारी. नेहरूअर्थव्यवस्थेवर त्यांचे विशेष प्रेम. कारण त्या अर्थव्यवस्थेने अर्थशास्त्रातील पदवीधरांना नोकऱ्यांची मोठी संधी उपलब्ध करून दिली. यातलीच काही मंडळी आता अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या कामास लागली आहे. हे दृश्य पाहूनसुद्धा, त्याचे परिणाम भयानक नसते तर, हसू आले असते.

आजच्या परिस्थितीत खरेखुरे अर्थशास्त्र सांगणारा पंडीत मला कुणी दिसत नाही. प्रसिद्ध हिंदी साहित्यकार प्रेमचंद आज आपल्यात नाहीत. माझ्या हाती असते तर प्रेमचंदांना अर्थमंत्री बनवले असते. प्रेमचंदांची एक गोष्ट आहे. एक जुने खानदानी घराणे बाप मेल्यावर अगदी रसातळाला जाते. मागे राहिलेल्या भावाभावांना काम करणे ही कल्पना सहन न होण्यासारखी. मग त्यांनी जगावे कसे? परसदारात एक शेवग्याचे झाड होते. खूप शेंगा देणारे. त्याच्या शेंगा काढून दिवस उजाडायच्या आत गुपचूप बाजारात पाठवायच्या आणि आलेल्या पैशावर कसेबसे दिवस काढायचे. हे असे काही काळ चालले. एक दिवस वडिलांचे एक जुने मित्र पाहुणे म्हणून आले. त्यांचे आदरातिथ्य भावांनी कसोशीने केले, पण या पाहुण्याच्या लक्षात आले की, ह्या शेवग्याच्या झाडाच्या आधाराने सगळे कुटुंब अपंग बनले आहे. जाण्यापूर्वी पहाटेच्या अंधारात त्याने शेवग्याचे झाड तोडून टाकले व तो गुपचूप निघून गेला. सकाळी झाड पडलेले पाहून सर्व भावांनी पाहुण्यास खूप शिव्या दिल्या. काही दिवस उपास काढले, आणि शेवटी काहीच इलाज चालेना तेव्हा काम धंद्यास लागले. त्यांची लवकरच भरभराट झाली आणि मग त्यांच्या लक्षात आले की, शेवग्याचे झाड पाडणाऱ्या त्या निर्दयी पाहुण्याने त्यांच्यावर खरोखर खूप मोठे उपकार केले होते.

आंतरराष्ट-ीय नाणेनिधी आणि इतर धनी संस्था आमची शेवग्याची झाडे

झाली आहेत. कोणत्याही अटीवर कितीही कर्ज घेतले, अगदी बिनव्याज जरी कर्ज मिळाले तरी भारत कर्जमुक्त होऊ शकत नाही कारण आमच्या अर्थव्यवस्थेचा सगळा भर आडगिऱ्हाईकी तंत्रज्ञानाने चालणाऱ्या उद्योगधंद्यांवर आहे. हे कारखानदार कसली निर्यात करणार? अर्थव्यवस्थेचा ढाचा संपूर्ण बदलल्याखेरीज निर्यात वाढणार नाही. आणि निर्यात ताबडतोब मोठ्या प्रमाणावर दीर्घकाळ वाढत राहीली नाही तर कर्ज फिटण्याची काहीही शक्यता नाही. नाणेनिधीकडून कर्ज घ्यायचे असेल तर अवश्य घ्या पण, कर्ज घेतल्यामुळे प्रश्न सुटेल ही कल्पना खोटी.

अर्थव्यवस्थेमध्ये परिपूर्ण बदल घडवून आणायचा आहे, कठोर उपाययोजना करावी लागेल असे बोलणारी नेतेमंडळी आणि अर्थशास्त्री शेवग्याच्याच झाडाला शेंगा जास्त कशा येतील याचीच उपाययोजना सांगणार आहेत. कुणी त्याला खतपाणी करा म्हणेल. त्यासाठी पोटाला चिमटा घेण्याची गरज आहे असे सांगेल. कुणी झाडाची छाटणी करायला पाहिजे म्हणजे उद्या भरपूर शेंगा येतील, पण पुन्हा फुटवे येईपर्यंत पोट आवळले पाहिजे असे म्हणेल. नेहरू-पठडीतले नेते आणि नेहरूतबेल्यातील अर्थशास्त्री या पलिकडे जाऊ शकणार नाहीत. या शेवग्याच्या झाडाच्या मोहातून सुटून बाहेर पडण्याइतकी मानसिक ताकद आज कोणातच राहिलेला दिसत नाही. कुणी उदारबुद्धी निर्दयपणे आता या व्यवस्थेपासून तोडून काढेल तर त्याचे मोठे उपकार होतील.

आजची परिस्थिती पाहून मला माझ्या एका जुन्या अनुभवाची आठवण येते. मी प्रशासकीय सेवेत असताना माझ्या हाताखाली एक चतुर्थ श्रेणीचा कामगार होता. काम चांगले करायचा. इतर काही वाईट व्यसने नाहीत. वागणुकीने सुजन. त्याच्यात फक्त एक दोष होता. दर शनिवारी महालक्ष्मीला जाऊन घोड्याच्या शर्यतीवर पैसे लावल्याखेरीज त्याला राहवत नसे. त्याची खात्री होती की, कितीही काबाडकष्ट केले तरी त्याची परिस्थिती सुधारणार नाही. घोड्याच्या शर्यतीवर एखादेवेळेस चांगले पैसे लागले तरच काही आशा आहे. त्याची बायको बिचारी मोलमजुरी करून संसार चालवी. घोड्यावर लावण्याकरिता तो तिचेही पैसे काढून घेई. उसनवारी करी. बोलायला गोड असल्यामुळे त्याला उसने पैसे मिळतही सहज. अगदी ''बुकी''सुद्धा त्याचे

खाते चालू ठेवीत. त्याची बायको बिचारी सगळ्या देणेदारांकडे जाऊन विनवणी करी की माझ्या नवऱ्याला नवे कर्ज देऊ नका आणि जुने कर्ज परत मिळण्यासाठी तगादा लावा. तिचे कृत्य तसे पतीद्रोही, पण हळूहळू त्यामुळे तिच्या नवऱ्याला कर्ज मिळायचे थांबून गेले. सुदैवाने तो काही पैसे मिळवण्यासाठी वाईट मार्गाला लागला नाही आणि त्यांची परिस्थिती थोडीफार सुधारली. मला शक्यता असती तर मीही आंतरराष्ट-ीय नाणे निधी आणि इतर धनकोंना जाऊन हात जोडून विनंती केली असती की नवे कर्ज देऊ नका आणि जुन्या कर्जांचा तगादा लावा. म्हणजे बांडगुळांचे अर्थकारण आपोआप संपेल. आणि उत्पादकांची शान वाढेल. पण असे काही होणार नाही. ''इंडिया'' वाल्यांना कर्जाची जितकी आवश्यकता आहे, तितकीच धनकोंना भारतातील ''नेहरूवादी'' व्यवस्था जरूरीची आहे. त्या अवस्थेत बदल घडवून आणण्याचा त्यांचा आग्रह काही, देशाच्या हिताच्या तळमळीपोटी आहे असे नाही. पण एवढे नक्की की शेवग्याचे झाड तोडायचे काम कुणाला तरी करावे लागणार आहे.

(२१ जुलै १९९१)

# २. बळीराज्याची दिशा

## आर्थिक आजार किती लपविणार?

कोणाही सुबुद्ध माणसास गोंधळात टाकील असे दोन परस्परविरोधी विचार वर्तमानपत्रांत वाचायला मिळतात. पहिला, म्हटले तर विचार आहे, म्हटले तर वस्तुस्थिती आहे. नवीन औद्योगिक धोरण, रुपयाचे अवमूल्यन आणि शासनाने उचललेली अंदाजपत्रकीय आणि व्यापारी धोरणाची पाऊले यांचा अर्थव्यवस्थेवर काहीही परिणाम झालेला दिसत नाही. परदेशातील कोणी, भांडवल किंवा तंत्रज्ञान घेऊन हिंदुस्थानात धावत धावत आलेले नाही. परदेशी व्यापाराच्या परिस्थितीतही काही फरक पडलेला नाही. महागाईच्या भडकत्या ज्वाळा काही शमतांना दिसत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे आणि जवळपास, डॉ. मनमोहन सिंग सोडता, सगळे अर्थशास्त्रज्ञ यापेक्षा काही वेगळे घडू शकले असते असे मानत नाहीत.

डॉ. मनमोहन सिंग मात्र देशावरचे संकट आता टळले आहे, नवीन शासनाने काही मोठा चमत्कार घडवून आणून देश संकटाच्या खाईत पडण्यापासून वाचवला आहे असे दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

दोनचार हजार कोटी रुपयांचे सोने बाहेर विकले गेले आणि पाचसहा हजार कोटी रुपयाचे नाणेनिधीचे कर्ज मिळाले यामुळे परकीय चलनाची तंगीची परिस्थिती थोडी सुधारून काहीशी सुसह्य झाली हे खरे, पण सलाईन लावल्याने तरतरी आली म्हणजे काही रोग बरा झाला असे नाही. नाणेनिधीचे हे कर्ज संपल्यानंतर कदाचित् आणखी एक दोन नवीन कर्जेसुद्धा मिळतील. पण कधीतरी अतिदक्षता-विभागातून हिंदुस्थानची अर्थव्यवस्था बाहेर काढावीच लागेल. आजाऱ्याची आज तरी अशी काही आशादायक लक्षणे दिसत नाहीत.

कितीही सोयीसवलती दिल्या तरी हिंदुस्थानातील कारखानदारी तिचा माल पदेशात काही मोठ्या प्रमाणावर निर्यात करू लागेल अशी शक्यता नाही. अत्यंत पुढारलेल्या देशांपैकी कोणता देश उत्साहाने भारताकडून माल आयात करू पाहील? अगदी उत्तम बनावटीचा माल कोणा प्रामाणिक कारखानदाराने सचोटीने तयार केला तरी त्याला परदेशी गिऱ्हाईक मिळण्याची शक्यता

कमीच. प्रगत देशातील तंत्रज्ञान, त्यांचीच यंत्रसामुग्री आणि तीदेखील बहुतांशी कालबाह्य झालेली आम्ही वापरणार. भारतीय कामगारही काही कौशल्याकरता किंवा कष्टाळूपणाकरिता प्रसिद्ध नाहीत. भरीत भर म्हणून शासकीय लायसन्स-परमिट राज्याचा जाच. अशा परिस्थितीत कारखानदारीतून निर्यात ती किती होणार?

आणि, सचोटीने आपल्या मालाची गुणवत्ता सातत्याने राखणारे कारखानदारही दुर्मिळच. अगदी तिसऱ्या जगातल्या देशांमधूनही कोणा एकाच्या मालाची खरेदी करायची असे म्हटले तरी हिंदुस्थानला प्राधान्य मिळण्याची शक्यता कमी.

प्रगत देश सोडले तर निर्यात करण्याची शक्यता एकतर जुन्या समाजवादी देशांत किंवा आशिया, आफ्रिका या खंडांतील मागासलेल्या देशात. समाजवादी देशांशी आपला व्यापार मोठा आहे, पण तो सारा आतबट्ट्याचा व्यवहार आहे. आपण कारखानदारी माल आणि सुटे भाग प्रगत देशांकडून दुर्मिळ परकीय चलन खर्च करून आयात करायचे, त्यांची जोडाजोड करून माल बनवायचा आणि तो समाजवादी देशांकडून थातूरमातूर चलने घेऊन त्यांना विकायचा, तेदेखील त्यांनी आपल्या मर्जीने ठरविलेल्या अफलातून चलनाच्या दराने. समाजवादी देशांबरोबरचा व्यापार म्हणजे अक्षरश: 'अव्यापारेषु व्यापार' आहे. आशिया-आफ्रिकेतील काही मागासलेले देश हिन्दुस्थानचा कारखानदारी माल घ्यायला तयार असतात एवढेच नव्हे तर आपल्या मदतीने त्यांच्या देशात कारखानेसुद्धा उभारू पाहतात. पण हे देश म्हणजे बहुतांशी मागासलेल्यातील विपन्न देश. ज्यांना प्रगत देशातील आडगिऱ्हाईकी तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री किंवा माल घेणे परवडत नाही अशी मंडळी भंगारबाजारात आल्याप्रमाणे हिंदुस्थानकडे येतात. त्यांच्याकडून लभ्यांश तो कितीसा असायचा?

दुष्काळात तेरावा महिना म्हणून आणखी तीन संकटे निर्यात व्यापारावर येऊन कोसळली आहेत. समाजवादी देशातील अर्थव्यवस्था कोसळल्यामुळे त्यांच्याशी होणारा 'अव्यापारेषु व्यापार'सुद्धा थिजू लागला आहे. समाजवादी साम्राज्य कोसळल्यामुळे आणखी एक आफत ओढवली आहे. हिन्दुस्थानसारख्या तिसऱ्या जगातील देशांना आता दोन महासत्तांच्या झुंजीचा

लाभ करून घेणे दिवसेंदिवस कठीण होत जाणार आहे. हिंदुस्थानातील व्यापारावरील नियंत्रणाबाबत अमेरिकेने घेतलेली कडक भूमिका, आंतरराष्ट-ीय नाणेनिधीने हिंदुस्थानच्या लष्करी खर्चावरील घेतलेले आक्षेप आणि बौद्धिक मालमत्तेच्या हक्कांसंबंधी (Intellectual Patent Rights) अमेरिकेने घेतलेली ताठर भूमिका यावरून एवढे तर स्पष्ट होते की येणाऱ्या एककेंद्री जगात हिंदुस्थानची स्थिती मोठी केविलवाणी होणार आहे. तिसरे संकट म्हणजे, भारतातील धावत्या भेटीसाठी येणेसुद्धा परदेशातील, विशेषत: उच्चपदस्थांना धोक्याचे वाटते. काश्मिरमध्ये इस्रायली प्रवाशांवरील हल्ला आणि त्यांचे अपहरण, आसामामधील रशियन तंत्रज्ञाची हत्या आणि आता रूमानियाच्या राजदूताचे अपहरण यांचा हिंदुस्थानच्या परदेशी व्यापारावर गंभीर परिणाम होणार आहे.

थोडक्यात, आर्थिक आजार आता बळावला आहे, उपाययोजना काही केवळ आर्थिक राहिलेली नाही. आंतरराष्ट-ीय अर्थव्यवस्थेचा एक भाग म्हणून राहायचे असेल तर अंतर्गत अर्थव्यवस्था मजबूत केली पाहिजे, एवढेच नव्हे तर राजकीय व्यवस्था सुदृढ, कायद्याच्या आणि शांततेच्या राज्याची शाश्वती देणारी हवी.

असे होत नाही तोपर्यंत वाढवून वाढवून निर्यात किती वाढणार? परवा श्री. चिदंबरम् यांनी पुण्यातील एका कंपनीला त्यांच्या निर्यातीसंबंधी कामगिरीबद्दल मोठे प्रशस्तीपत्रक दिले. काय कामगिरी बजावतात असले कारखानदार? ही मुळातली कारखानदारीच परदेशी सहाय्याने उभी झालेली आहे. मूळ पाश्चिमात्य कंपनीला जो माल तयार करणे परवडत नाही त्या मालाचे उत्पादन हिंदुस्थानसारख्या देशातून ते करून घेतात. पुष्कळ वेळा त्यासाठी लागणारे सर्व सुटे भाग तेथूनच पाठविले जातात आणि इथे फक्त जोडले जातात. मूळ आराखड्यानुसार जोडणी झाली की तयार मालाची निर्यात झाली असे कागदोपत्री दाखविण्यात येते आणि अशी निर्यात करण्यासाठी सुट्या भागांची आयात करण्याची अनुमतीही त्यांना मिळते. असला हा अद्भूत खेळ आहे.

निर्यात वाढविणे तर जरूर आहे. त्याशिवाय परकीय चलन मिळत नाही. कारखानदारी मालाची निर्यात करणे तर शक्य नाही. तेव्हा

हिंदुस्थानातील मोठे मोठे नामवंत कारखानदार आता निर्यातसंस्था काढत आहेत. निर्यात कशाची करतात? तर, प्रामुख्याने कच्च्या मालाची. किर्लोस्कर चामड्याच्या वस्तू निर्यात करू पाहातात. टाटा हळदीच्या आणि मसाल्याच्या भुकटी आणि गुलाबाची फुले परदेशात पाठवू पाहातात. कल्याणींसारखे उद्योजक ग्रामीण उद्धाराचा उद्‌घोष करीत आंबे आणि फळांच्या कापा निर्यात करण्याचा घाट घालतात.

या प्रयत्नांत काही चुकीचे आहे असे नाही. दुसरा काही मार्गही त्यांच्यासमोर नाही. अशांच्या प्रयत्नाने शेतीमालाच्या निर्यातीस थोडा वाव मिळाला तर ते चांगलेच कलम म्हणावे लागेल. पण, जून महिन्यापासून ते सप्टेंबर महिन्यापर्यंत आर्थिक संकट टळण्यासारखे काही घडले असे कोणी म्हणू लागले तर ते राज्यकारण होईल, राजकारण नाही आणि अर्थकारणही नाही. शेतकऱ्याचा मुलगा मंत्री झाला म्हणजे तो नुसता मंत्रीच राहतो, त्याची शेतीशी नाळ तुटते हे जितके खरे तितकेच हेही खरे की डॉ. मनमोहन सिंग यांच्यासारखा अर्थशास्त्री मंत्री झाला म्हणजे तो मंत्रीच उरतो, अर्थशास्त्री रहात नाही.

संकट टळलेले नाही, संकट टळण्याची काही शक्यताही दिसत नाही. दरीत पाय घसरून पडायचे आतापुरते टळले आहे. पण यापुढची वाट आणखीच कठीण, निसरडी होत चालली आहे.

**'चैत्रगौरी' कारखाने वर येऊ शकत नाहीत**

देशावरील संकट टळण्याची लक्षणे दिसत नाहीत हा मुद्दा मुद्दाम आग्रहाने अशाकरिता मांडला की या बाबतीत कोणताही भ्रम राहू नये. संकटाच्या कराल स्वरूपाची पूर्ण जाणीव असणे संकटास सामोरे जाण्याकरिता जास्त उपयोगी आहे. भाबडी आशा, या उलट, अगदी घातक ठरू शकते. नेहरू-प्रणीत अर्थव्यवस्थेचा अंत:काल झाला आहे, शेतीच्या शोषणाच्या आणि परकीय तंत्रज्ञानाच्या आधाराने नोकरशाहीच्या अधिपत्याखाली 'चैत्रगौरी'प्रमाणे कारखाने सजविण्याची नेहरूपद्धती आता पुन्हा वर येऊ शकत नाही. यापुढे नोकरशाहीचे आधिपत्य मान्य होण्यासारखे नाही. 'चैत्रगौरी'सारखे सजविले तरी कारखाने काही प्रसन्न होऊन वर देऊ शकत नाहीत. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आयातनिर्यातीची ढवळाढवळ करून

शेतीमालाचे भाव पाडण्याचा उद्योग करण्याची ताकद शासनात राहिलेली नाही आणि तशी ताकद परत येण्याची फारशी शक्यताही दिसत नाही. ओंगळ नेहरू-व्यवस्था संपलीच पण त्याबरोबर शासनाची काही मंगल भूमिकाही संपुष्टात आली. कल्याणकारी राज्याची संकल्पनाही झपाट्याने पुसट होत जाणार आहे. शोषून चिपाड झालेल्या शेतकऱ्याच्या मदतीच्या देखाव्यासाठीसुद्धा आधारभूत किंमतीची अंमलबजावणी करणे कठीण होणार आहे. थोडक्यात, आर्थिक शासनसंस्थेचा अंत होत आहे. गेल्या दोन तीन शतकांत शासन अधिकाधिक व्यापक बनत चालले होते. संरक्षण, कायदा आणि सुव्यवस्था ही शासनाची मूळची कामे. त्याबरोबर, कल्याणकारी शासन, अर्थव्यवस्थेवर देखरेख ठेवणारे शासन आणि शेवटी प्रत्यक्ष अर्थव्यवस्था चालविणारे शासन असा हा फुगा फुगत चालला होता त्याला टाचणी लागली आहे. कायदा आणि सुव्यवस्था टिकवण्याचा आणि देश अभंग ठेवण्याचा प्रयत्न करणारे एवढ्यापुरतीच शासनाची भूमिका मर्यादित राहाणार आहे. ही काही केवळ हिंदुस्थानात घडणारी गोष्ट आहे असे नव्हे. हा नव्या कुंपणविरहित क्रांतीचा भाग आहे.

**बुडाला 'इंडिया' पापी**

शेतकऱ्याचे मरण असे धोरण असणारे शासन बदलून शेतकऱ्यांच्या हिताचा यथायोग्य मुलाहिजा ठेवणारे सरकार येईल हे काही आता शक्य नाही. शेतकऱ्याला गुलामीत ठेवणाऱ्या जुलमी सत्ताधाऱ्यांचा पराभव करण्याचा आनंद कष्टकरी शेतकरी समाजाला मिळणार नाही. दुर्योधनाचे रक्त पिण्याचा आणि त्याच्या रक्ताने माखलेल्या हाताने द्रौपदीची वेणी बांधण्याचे समाधान एखाद्या बलभीमालाच मिळते. तेवढे अपले सामर्थ्यही नव्हते आणि पुण्याईही नव्हती. शेतकरी आंदोलनाची स्थिती हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्यासारखीच झाली आहे. इंग्रज हटले पण त्यांचा पराभव काही आमच्या या हातांनी केला नाही; कोणा हुकुमशहाशी लढता लढता साम्राज्यशहा इंग्रज इतका कमजोर झाला की तो हिंदुस्थान सोडून निघून गेला. 'भारता'वर सत्ता गाजवणाऱ्या जुलुमशहांचा पराभव आमच्या हाताने झाला म्हणणे कठीण आहे. स्वत:च्या सामर्थ्याच्या मस्तीत आपल्याच शिरावर आपलाच हात ठेवून राख झालेल्या भस्मासुराप्रमाणे त्यांचा अंत होतो आहे. आमच्या तुरुंगांच्या दारांवरील कुलुपे

गळून पडली आहेत, कड्या निखळल्या आहेत, कोणी पहारेकरीही राहिलेला नाही. अगदी कैदेतून बाहेर काढण्याकरीतासुद्धा कुणी नाही. आपल्याच हातांनी दरवाजा ढकलून, आवश्यक तर निखळवून बाहेर पडायचे काम करायचे आहे.

छत्रपतींच्या स्वराज्यस्थापने-नंतरच्या रामदासांच्या वचनांत सांगायचे तर

बुडाला 'इंडिया' पापी
दुष्ट-संहार होतसे
बळिराज्य येतसे आता
आनंदवनभुवनी

बळिराज्य म्हणजे काही शेतकऱ्यांचे स्वर्गराज्य नाही. जेथे कोणताच अन्याय नाही, शोषण नाही अशी आदर्श समाजव्यवस्था, चिरंतन टिकणारी, कधी पृथ्वीवर अवतरेल हे असंभवच नव्हे तर अशक्य आहे. बळिराज्य ही कल्पना दिशेच्या संकल्पनेसारखी आहे. आपण 'पूर्वेकडे' असे म्हणतो. पण पूर्व म्हणजे काही एका कोणा विवक्षित ठिकाणी ठेवलेली नाही. ती दिशा आहे. तसेच 'बळिराज्य' ही दिशा आहे; व्यवस्था नाही. बळिराज्याची दिशा कोणती? निसर्ग आणि त्यातील ऊर्जास्रोत यांतून मनुष्यप्राण्याच्या श्रमाने जगण्याकरिता आवश्यक ती साधनसामुग्री तयार करावी. उत्पादन असे करावे की कालच्यापेक्षा आज जास्त पिकावे पण त्यासाठी उद्याच्या सृष्टीवर विपरीत परिणाम घडू नये. वाढत्या उत्पादनातून माणसास वेगवेगळी साधनसामुग्री आणि समाजव्यवस्था अशी जोडता यावी की त्याच्या स्वातंत्र्याच्या कक्षा सतत चढत्या राहतील. ही बळीराज्याची दिशा आहे. आजपर्यंत उत्पादन वाढविण्याचे भरकस प्रयत्न झाले, उत्पादन वाढलेही. अगदी निसर्गाशी शत्रुत्व साधूनसुद्धा उत्पादन वाढवले गेले. पण वाढत्या उत्पादनाचा लाभ काही थोड्या देशांच्या आणि प्रत्येक देशातील मूठभर लोकांना झाला. आता हे लोभी दूर झाले असे धरले तर आपण ज्या दिशेने फरफटत चाललो होतो ती दिशा सोडून बळीराज्याची दिशा नेमकी पकडायची कशी?

शेती पराकोटीच्या कार्यक्षमतेने करणे म्हणजे काटकसरीने करून अधिकाधिक उत्पादन घेणे. असे करतांना निसर्ग हा आपण आपल्या

मुलांनातवांकडून उसना घेतला आहे याची पूर्ण जाणीव ठेवून त्याचा विनाश होऊ न देणे हा एक भाग.

तयार झालेल्या मालाच्या साठवणुकीची, प्रक्रियेची आणि विक्रीची अशी व्यवस्था करणे की ज्यामुळे शेतीत अधिकाधिक भांडवलनिर्मिती होऊ शकेल हा दुसरा भाग.

या दोनही भागांपेक्षा एक तिसरा भाग फार महत्त्वाचा आहे. उत्पादन तर नेहरू-राज्यातही वाढले. भले, निसर्गाचा विनाश करून का होईना, देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. नेहरूकाळात साखरेचे कारखाने निघाले, सूतगिरण्या निघाल्या, इतर प्रक्रियेचे कारखानेही निघाले. पतपुरवठ्याची व्यवस्थाही झाली. पण, या सर्वांचा परिणाम समग्र शेतीसमाजाची उन्नती होण्यात झाला नाही, तर शेतीसमाजातला एक वरचा थर यामुळे संपन्न बनला, सामर्थ्यशाली बनला आणि सत्तेमध्ये सहभागीही झाला. बळिराज्याच्या दिशेची वाटचाल ही उत्पादन, साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया आणि विक्री अशा तऱ्हेने करेल की त्याच्या लाभातून कोणताही समाज वगळला जाणार नाही.

सर्वांनाच हा लाभ मिळेल अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे. किंबहुना, सर्वांपर्यंत लाभ पोहोचविण्याची कल्याणकारी कल्पना मूलभूत कार्यक्षमतेला हानीकारक ठरण्याचा धोका आहे. कोणी आळशी, अजागळ स्वत:लाही लाभ झाला पाहिजे म्हणू लागला तर कार्यक्षम अर्थव्यवस्थेत अशा मागणीला थारा देता येणार नाही. करूणेपोटी, दयेपोटी, दानधर्म म्हणून त्याच्या उदरनिर्वाहाची सोय समाज करेल पण तो व्यवहार धर्मव्यवस्थेचा, अर्थव्यवस्थेचा नाही.

पण कोणीएक माणूस केवळ अमक्या जातीचा आहे, अमूक एका वर्गाचा आहे, स्त्री आहे, पुरुष आहे, शेतकरी आहे, मजूर आहे म्हणून आर्थिक विकासाच्या लाभापासून वंचित राहाता कामा नये.

**प्रक्रियाउद्योगही लोकोपयोगी झाले नाहीत**

साखर कारखान्यांच्या परिसरात काय दिसते? उसाचे उत्पादन वाढावे म्हणून कारखाने पाणीयोजना राबवतात आणि उत्पादनासाठी सुधारित जाती इत्यादींना उत्तेजन देतात. उसाच्या पिकासाठी पीककर्ज सुलभतेने मिळते. या एवढ्या गोष्टींचाच फायदा काय तो सर्वसामान्य ऊसशेतकऱ्यांपर्यंत पोहोचतो.

बाकी कारखानदारीचा फायदा यंत्रसामुग्री तयार करणारे कारखानदार, तंत्रज्ञ, कारखान्यातील अधिकारीवर्ग, कारखान्यातील कामगार, वाहतुकीची कामे मिळविणारे आणि सर्वात अधिक म्हणजे संचालक मंडळ यांनाच काय तो मिळतो. एका काळी ऊसतोडणी कामगारांची मोठी हालाखी होती. आज त्यांची स्थितीसुद्धा ऊसशेतकऱ्यापेक्षा जास्त चांगली झाली आहे. कारखानदारीचा लाभ ज्यांना मिळाला त्या समाजांचा थर शेतकरी समाजापासून अलग पडला. शेतकऱ्याच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाविषयी त्यांना तळमळ नाही एवढेच नव्हे तर बहुधा ही मंडळी शेतकऱ्याच्या विरोधात उभी ठाकतात. थोडक्यात, साखर कारखानदारीने 'भारता'तील एक भाग 'इंडिया'त सामावून घेतला. 'भारत' जसाच्या तसाच राहिला.

दुसरे एक मोठे चमत्कारिक उदाहरण दूधप्रक्रियेच्या उद्योगधंदासंबंधी आहे. डॉ. कूरियन यांनी परदेशातून दुधाची भुकटी आणि चरबी वर्षानुवर्षे फुकट मिळवून ती हिंदुस्थानातल्या बाजारात ओतली आणि दुधाचे भाव पाडले. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांवर विपरीत परिणाम झाला. पण दुधाची साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया यांकरिता लागणारी संरचना त्यांनी मिळालेल्या भांडवलातून उभी केली. काही परदेशी कंपन्या दुधापासून लहान बालकांचे अन्न, चीज, लोणी इत्यादी पदार्थ भारतात बनवू इच्छितात, पण अशा योजनांना डॉ. कूरियन यांचा विरोध आहे. त्यांचे म्हणणे असे की दुग्धजन्य पदार्थांचा व्यवहार फायद्याचा आहे आणि शहरांना पेय दूध पुरविणे हा धंदा तोट्याचा आहे. त्यामुळे परदेशी कंपन्या फक्त फायद्याचे लोणी लाटू इच्छितात आणि दूधपुरवठ्याचा तोट्याचा धंदा मात्र सहकारी आणि सरकारी व्यवस्थांच्या डोक्यावर पडतो.

युक्तिवाद दिसायला रास्त वाटतो, पण गंमत अशी की हिंदुस्थानात शेतकऱ्यांच्या दुधाला सर्वात जास्त भाव कोणी देत असेल तर सूरत येथील 'सुमूल' ही सहकारी संस्था. आज ती ६ टक्के स्निग्धांशाच्या दुधास शेतकऱ्यांना ७ रु. प्रतीलिटर किंमत देते. अगदी गुजरातमधीलसुद्धा कोणतीही संस्था शेतकऱ्यांना एवढी किंमत देऊ शकत नाही. सुमूल डेअरीला हे कसे काय जमते? सुमूलच्या अध्यक्षांचे म्हणणे आहे की ते फक्त पेय दुधांचाच व्यवहार करतात, दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याच्या भानगडीतच पडत नाहीत

त्यामुळे त्यांना जास्त किंमत देता येते. दुग्धजन्य पदार्थ बाजारात खूप चांगली किंमत मिळवितात हे खरे पण ते पदार्थ तयार करण्याचा खर्च त्याहीपेक्षा जास्त येतो आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था तोट्यात जातात.

हे असे आहे तर मग परदेशी कंपन्यांना हा धंदा करणे फायद्याचे कसे काय वाटते? चीज तयार केल्याने सुमूलचा तोटा होतो पण नेस्लेला अफाट फायदा होतो हे कसे काय? या रहस्यातच एक मोठी मख्खी आहे. कोणताही प्रक्रियेचा कारखाना, मग तो साखरेचा असो, का चीजचा असो का अगदी शॅम्पेनसुद्धा तयार करण्याचा असो तो, हिंदुस्थानात काढणे यात कठीण काहीच नाही. खिशात पैसा असला तर पोटातले पाणीसुद्धा न हलवता कारखाना सुसज्ज तयार मिळू शकतो. असे कारखाने उभारून देण्याची कंत्राटे घेणाऱ्या अनेक कंपन्या हिंदुस्थानात आहेत. वारणेला श्रीखंड करायचे झाले किंवा आणंदला चीज तयार करायचे झाले तर या कंपन्यांशी बोलणी करून त्यांना कंत्राटे देणे यापलिकडे फारसे काही करायचे राहात नाही. पण ही भांडवली गुंतवणूक इतकी अवाढव्य होते की यंत्राच्या आयुष्यकाळात त्यावरील व्याज आणि घसारा काढणेसुद्धा अशक्य व्हावे. नेस्लेसारख्या कंपन्यांना ही अडचण नसते. आवश्यक ती यंत्रसामुग्री ते स्वतःच्या साधनांतून त्या मानाने किरकोळ खर्चात तयार करतात आणि त्यामुळेच त्यांना या धंद्यात फायदा काढता येतो.

भारतात प्रक्रियेचे कारखाने काढायचे म्हटले म्हणजे या कंत्राटदारांचाच आश्रय घेणे अपरिहार्यच होऊन जाते, शेतीमालावरील प्रक्रिया हे तसे मोठे उंचीचे तंत्रज्ञान आहे. पदार्थांचा मूळचा स्वाद कुठेही बदलू न देता निर्जंतुक पद्धतीने त्यावर प्रक्रिया करून सोयीस्कर रीतीने त्यांना डबाबंद करून ग्राहकापर्यंत पोहाचविणे हा सगळा कार्यक्रम तसा मोठा कठीण आहे.

तरीदेखील, पैसे टाकून का होईल असा सुसज्ज कारखाना उभा राहिला म्हणजे संबंधितांना त्याचे मोठे कौतुक वाटते. फायदा होवो न होवो आपण काही कामगिरी बजावली असा एक अभिमानही त्यांना साहजिकच वाटतो. या सगळ्या कोऱ्या करकरीत यंत्रसामुग्रीची बटणे कधी आणि कशी दाबायची हे ठीकठाक कळू लागेपर्यंत आणखी सुधारित तंत्रज्ञानाची यंत्रसामुग्रही पुढे येते आणि बाजारातील स्पर्धेत टिकून राहण्याकरिता ती खरीदणे आवश्यक होऊन

बसते. जुन्या तंत्रज्ञानाचा वास लागून तो आत्मसात होण्याआधीच नवीन तंत्रज्ञान पुढे येते आणि भारत व विलायतेतील तंत्रज्ञानाची दरी अधिकाधिक रुंदावत जाते. या असल्या 'चैत्रगौरी' कारखानदारीमुळेच तर हिंदुस्थानवरील आजचे आर्थिक अरिष्ट ओढवले आहे.

**स्त्रियांवर विपरीत परिणाम**

या कारखानदारीने झालेल्या मर्यादित आर्थिक विकासाचा एक अगदी विपरीत परिणाम स्त्रियांवर होतांना दिसतो. परिसरांतील विकास जितका पुढे जावा तितके स्त्रियांच्या आयुष्याची गुणवत्ता आणि त्यांच्या स्वातंत्र्याच्या कक्षा उतरतात. उदाहरणांवरून हे समजणे जास्त सोपे जाईल.

एखादा कारखाना उभा राहिला आणि आसमंतात जरा पैसा खेळू लागला की पहिल्यांदा जागोजाग दारूची दुकाने दिसू लागतात, हातभट्टीची चलती होते. एक बकालीपणा तयार होतो. ज्या प्रदेशात स्त्रिया अगदी अंधार झाल्यावरसुद्धा बिनधास्त, मोकळेपणे फिरू शकत असत तेथे संध्याकाळ झाल्यानंतर, अंधार पडल्यावर त्यांना घराबाहेर पडणेसुद्धा मोठे दुरापास्त होऊन जाते. घर ते शेत आणि शेत ते घर असे कुंपण त्यांच्या हालचालींवर पडते. पंजाबसारख्या राज्यात तर स्त्रियांची कुचंबणा याहूनही अधिक होते. इतर राज्यांतील शेतमजूर तेथे मुबलक मिळू लागले आणि असुरक्षिततेचे वातावरण वाढले तसे स्त्रियांना शेतावर जाण्याचीसुद्धा शक्यता कमी होऊ लागली. त्या घरातच बंदिस्त झाल्या. निदान मोकळ्या हवेत काम करण्याचे स्वातंत्र्य जाऊन अंधाऱ्या घरात सर्वांकरिता रोट्या बनविण्याचे काम त्यांच्या कपाळी आले.

यंत्रांची मदत मिळू लागली म्हणजे आणखीही मोठा विचित्र प्रकार घडतो. डोक्यावर भारी पाटी घेऊन बाजारात जायचे असले की ते काम बाईचे, पण मालकाने ट्रॅक्टर घेतला की माल भरलेला ट्रॅक्टर बाजारात डौलात घेऊन जाण्याचे काम पुरुषांचे. अवजड अडकित्त्याने कडब्याची कुट्टी करायचे काम बाईचे, पण कुट्टी यंत्र आले तर त्याची बटणे दाबायचे काम पुरुषांकडे जाते.

बळिराज्याकडे वाटचाल करतांना आपण आपल्याच पावलाखाली बळिराजाला पुन्हा एकदा नव्याने तुडवत नाही ना याची दक्षता घेणे आवश्यक आहे. आधुनिकीकरण करायचे तर आहे. कारखानदारी वाढवायची आहे, औद्योगिकरण करायचे आहे, शेतीवरील माणसे बिगरशेती कामाकडे न्यायची

आहेत. पण हे सगळे काम गर्भाच्या वाढीसारखे आहे. त्यात घिसाडघाईला जागा नाही. कोणी गर्भकाल आखूड करायचा प्रयत्न करू लागला तर त्यात फक्त गर्भाचा जीवच धोक्यात येतो. बळिराज्यातली सर्व व्यवस्था निसर्गनियमाने आणि सहजपणे बहरून आली पाहिजे. पहिल्या पावसानंतर सगळे आसमंत हिरवेगार दिसू लागते तसाच हा चमत्कार घडून येऊ शकतो. स्वार्थापोटी काही भानगडी मंडळींनी काही ढवळाढवळ केली नाही तर हे होणार आहे. हा चमत्कार 'याची देही, याची डोळा' पाहाण्याचे भाग्य आपल्याला लाभणार आहे – आपण ठरवले तर.

(२१ ऑक्टोबर १९९१)

# ३. खतांच्या अनुदानाचे रहस्य

रासायनिक खतांवरील अनुदाने बंद करून खतांच्या किंमतीत वाढ करण्यात यावी अशी चर्चा बऱ्याच काळापासून वारंवार करण्यात आली आहे. १९८१ सालापासून खतांच्या किंमती स्थिर राहिल्या असून दरम्यानच्या काळात खतांचा वापर मात्र दुप्पटीहून जास्त वाढून सध्या तो १२० लाख टनांपर्यंत पोहोचला आहे; आणि खत अनुदानाचा बोजा ५०० कोटी रुपयांवरून ४५०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे खतअनुदाने बंद करण्यासंबंधी आग्रही चर्चेला शरण जाण्यासारखीच परिस्थिती आहे. खतांवरील अनुदाने रद्द झाली म्हणजे त्यामुळे खतांच्या किंमतीत वाढ होण्याची आवश्यकता नाही पण या गोष्टीकडे मात्र संपूर्ण दुर्लक्ष केले जाते.

केवळ आशिया खंडात नव्हे तर अख्ख्या जगामध्ये रासायनिक खतांच्या किंमतींबाबत भारत पार वरच्या क्रमांकावर आहे. रासायनिक खतांच्या भारतातील किंमती चढ्या आहेत. प्रत्यक्षात, रासायनिक खतांच्या माध्यमातून एक किलो पोषणद्रव्या (नत्र, पालाश, स्फुरद)ची किंमत भात किंवा गहू या शेतीमालांच्या हिशोबात इतर बऱ्याच देशांच्या तुलनेत जास्त आहे. (सोबतच तक्ता पाहा) म्हणजे आजपर्यंत दिलेल्या खतअनुदानानांने खतांच्या किंमती काही उतरल्या नाहीत, दुसऱ्याच कोणत्यातरी क्षेत्राला अर्थसाहाय्य लाभण्यातच या अनुदानांचा परिणाम झाला.

शेतीमालाची आधारभूत किंमत ठरवितांना हिशोबात रासायनिक खतांच्या किंमती खतांवरील अनुदानाची रक्कम वजा करूनच धरल्या जातात आणि अशा काटकसरीच्या किंमतीसुद्धा शेतकऱ्यांना शेतीमालाच्या भावातून भरून मिळत नाहीत. शेतीमालाच्या आयातनिर्यातीसंबंधी निर्णय घेतानाही किंमत घटकांचे संदर्भात खतांच्या किंमती अनुदान वजा करूनच विचारात घेतल्या जातात. म्हणजे, खतअनुदाने ही शासनाच्या हिशोबातील केवळ अंतर्गत नोंद असते आणि त्या नावाने पीक कर्जाची रक्कम कमीत कमी मर्यादेत ठेवता येते व शेतकऱ्यांवर उपकाराची भावना लादून त्यांना उपहासाचा विषय बनविता येते इतकाच काय तो या अनुदानांचा शेतकऱ्यांशी संबंध. डेव्हिड कॉपर फिल्ड नावाचा मुलगा भुकेल्या पोटी शाळेत जात असतांना एक माणून

त्याच्या समोर भरपूर खाद्यपदार्थ ठेवतो आणि खा म्हणतो. डेव्हिड खाण्यास सुरुवात करणार इतक्यात तो माणूसच ते खाद्य पदार्थ फस्त करतो आणि डेव्हीडनेच सर्व पदार्थ आधाशीपणे खाल्ले असे ओरडून लोकांना सांगत सुटतो. अशी एक प्रसिद्ध गोष्ट आहे. खतअनुदानाच्या बाबतीत शेतकऱ्याची अवस्था, अक्षरश: डेव्हिड कॉपरफिल्डसारखी झाली आहे.

खतअनुदानासंबंधी या गुंतागुंतीच्या आणि जुनाट समस्येमध्ये किंमत हा तुलनेने फार कमी महत्त्वाचा मुद्दा आहे. अर्थमंत्र्यांनी या समस्येच्या उपयायोजनेच्या नावाने फक्त वरवरची मलमपट्टी करून ती समस्या तशीच सडत ठेवली आहे. खतांचा शेतीतील वापर व शेतीमालाचे उत्पादन यांवर काय परिणाम होईल याचा विचार न करता खतअनुदान रद्द करून वाचविलेले २८०० कोटी रुपये शेवटी खतकारखानदारीतील दोष आणि अकार्यक्षमता चालू ठेवण्यासाठीच वापरले जाणार आहेत.

मी नेहमीच सर्व प्रकारची अनुदाने रद्द करण्याचाच आग्रह धरला आहे. किंबहुना, अनुदाने रद्द करण्याबरोबरच, हैड-ोकार्बन तंत्रज्ञानापासून शेतीक्षेत्राला परावृत्त करण्याच्या उद्देशाने आणि केवळ त्याच उद्देशाने असेल तर खतांच्या किंमतीत वाढ करण्यातही काही अर्थ आहे. खतांच्या किंमती ५ टक्क्यांनी एक रकमी वाढविल्या तर त्यावर काही गंभीर प्रतिक्रिया उठणार नाहीत आणि खतांच्या वापरातही काही लक्षणीय घट होणार नाही असा सल्ला तज्ज्ञांनी शासनाला दिला होता. शासनाला जर का रासायनिक खतांचा वापर कमी करून शेतकऱ्यांना अधिक जैविक उत्पादनपद्धतीकडे वळण्यास प्रोत्साहित करावयाचे असेल तर खतांच्या किंमतीत १० टक्क्यांनी वाढ करणे समजू शकले असते. पण यापेक्षा अधिक एकरकमी वाढीला काही समर्थन असू शकत नाही. त्याचबरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की वापरल्या जाणाऱ्या रासायनिक खताचा मोठा हिस्सा धान्यपिकांसाठी वापरला जात असल्याने खतांच्या किंमतीतील वाढीचा धान्यउत्पादनावर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे. शासन खतासंबंधीच्या आपल्या प्रस्तावाला चिकटून राहील याबद्दल थोडी शंका आहे; पण हा प्रस्ताव शासनाने पुढे रेटलाच तर त्या रेट्याने शेतकऱ्याला प्रामुख्याने अन्नधान्यांच्या शेतीतून बाहेर पडणे भाग पडेल आणि हरितक्रांतीच्या अपायकारक तंत्रज्ञानापासूनही तो दूर होईल. खतांच्या

किंमतीतील वाढीचे तत्कालीक परिणाम काहीही असले तरी त्याचे काही दूरगामी चांगले परिणामही निश्चित आहेत.

खतअनुदानासंबंधी मूलभूत वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. मुळात ही अनुदाने खतांच्या कारखानदारांना दिली जातात. अनुदानाची रक्कम खतांची विक्रीची निर्धारित किंमत आणि प्रतिधारण किंमत म्हणजे खतनिर्मितीपासून विक्रीसाठी कारखान्याच्या गोदामातून ते बाहेर काढीपर्यंत कारखान्याला आलेला खर्च (उत्पादनखर्च + साठवणूक + व्याज वगैरे) यांच्यातील फरकाइतकी असते. या प्रतिधारण किंमती कारखान्यांना खतांच्या सर्व तपशीलांचा अंतर्भाव करून काढलेल्या उत्पादनखर्चावर कर वजा जाता १२ टक्के फायदा होईल या हिशोबाने खताच्या प्रकारानुसार आणि कारखान्यानुसार ठरविल्या जातात. याशिवाय खतकारखानदारांना कारखान्यांपासून प्रत्यक्ष वापराच्या ठिकाणापर्यंत खत नेण्यासाठी होणाऱ्या वाहतूक खर्चापोटीही अनुदान दिले जाते.

खतकारखाने उभे करतांना त्यांची संख्या, आकार, ठिकाणे आणि तंत्रज्ञान, कच्चामाल, यंत्रसामुग्री (जे बहुधा दलालामार्फत आणावयाचे असतात) यासंबंधीचे निर्णय शासन घेते आणि मग संभाव्य उद्योजकांकडून त्या निर्णयांच्या अनुषंगाने अर्ज मागविते. शासनाचे निर्णय बहुधा तांत्रिक आणि आर्थिक मुद्द्यांऐवजी इतर बाबींच्या विचारांच्या प्रभावाखाली होतात. महाराष्ट-ात जसे सहकारी साखर कारखाने तसे आंतरराष्ट-ीय राजकारणांत या खतकारखान्यांचे गौडबंगाल आहे. वरच्या पातळीवरील राजकारण, जुगारी चढाओढ, मुबलक देणे घेणे या खतकारखान्यांच्या बाबतीतही घडतात. कारखान्याच्या अधिकाऱ्यांना कारखान्याच्या कार्यक्षमतेसंबंधी सर्व घटकांवर नियंत्रण ठेवण्याच्या संधीपासून अगदी सुरुवातीपासूनच वंचित ठेवले जाते आणि अखेरी राजकारणात खेचले जाते. खतांच्या प्रतिधारण किंमतीची ही व्यवस्था वर्तमान खतकारखान्यांच्या तंत्रज्ञानाच्या विकासासाठी आणि अधिक गुंतवणुकीसाठी निरुपयोगी ठरली आहे. उलट, ही व्यवस्था नवीन कारखान्यांच्या उभारणीच्यावेळीं भांडवली गुंतवणुकीचा खर्च भ्रष्ट मार्गांनी फुगविण्यास उत्तेजन देते. गेल्या वीस वर्षांत नवीन कारखान्यांच्या या भांडवली गुंतवणुकीच्या खर्चात जी बारा पटींनी वाढ झाली आहे ती काही केवळ

आर्थिक कारणांनी नाही. खतांचा उत्पादनखर्च हा कारखानानिहाय मोठ्या प्रमाणावर वेगवेगळा असतो. कारण हिशोब करतांना कारखान्याचे वय, कच्चा माल व यंत्रसामुग्रीच्या कारखान्याच्या ठिकाणापर्यंत वाहतुकीचा खर्च, कारखान्याची कार्यक्षमता या सगळ्या बाबींचा वेगवेगळा विचार केला जातो. कच्च्यामालाच्या किंमती सातत्याने वाढतच आहेत आणि अनुदानाच्या ६६ टक्के वाढीमुळे साहजिकपणे अंतर्गत घटकांच्या खर्चात वाढ होते, ज्याचा मोठा हिस्सा करांच्या रूपाने पुन्हा सरकारजमा होतो.

एकीकडे, शासनाला खतकारखान्यांबाबतचे आपले हे धोरण क्लेशदायक वाटत असले तरी स्वत:च्या काही कमजोरीमुळे चालू ठेवावे लागत आहे तर दुसरीकडे, शेतकऱ्यांच्या संरक्षणाच्या नावाखाली खतांच्या किंमती कमी करून त्यांना खते वापरण्याच्या मोहात पाडून अन्नधान्याचे उत्पादन वाढवून घ्यावे लागत आहे. आज १९९१-९२ मध्ये अशी वेळ येऊन ठेपली आहे की हे चालू ठेवायचे म्हटले तर खतकारखान्यांना जवळजवळ ७००० कोटी रुपयांचे अनुदान द्यावे लागेल आणि गंमत अशी आहे की सरकारने जर शेतीला लागणारे सगळेच्या सगळे खत परदेशातून आयात केले आणि शेतकऱ्यांना चालू किंमतीत विकले तर या व्यवस्थेत सरकारवर पडणारा बोजा फक्त ३००० कोटी रुपयांचा असेल!!

कशी विचित्र गुंतागुंतीची परिस्थिती आहे! ही समस्या खरेतर सर्वांगीण विचार करूनच हाताळली पाहिजे. उपाययोजनेचे ठळक स्वरूप पुढीलप्रमाणे असायला हवे.

– खतांच्या किंमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमतींपेक्षा जास्त असता कामा नये. म्हणजे मग, शेतकऱ्यांची (शेतीक्षेत्राची) निर्यातक्षमता शाबूत राहील.

– खत कारखान्यांच्या जागा राजकीय सोयींनी ठरत असतात. खतउत्पादनासाठी लागणाऱ्या सामुग्रीची किंमत सर्व कारखान्यांसाठी सारखीच ठेवावी (वाहतुकीचा खर्च त्यात धरू नये).

– अनुदानाची रक्कम कारखान्यांच्या आर्थिक उलाढालीशी संबंधित असावी आणि येत्या पाच वर्षांत क्रमाक्रमाने कमी करीत ती शून्यावर आणावी.

या ऐवजी, अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंगांनी आपल्या अंदाजपत्रकी प्रस्तावाने काय साधले आहे?

– खतनिर्मिती व खतवाटप या दोन्ही यंत्रणांतील उधळपट्टी व अकार्यक्षमता, भ्रष्टाचार व गैरकारभार यांना जीवदान मिळाले आहे.

– शेतीक्षेत्रातील उत्पादनखर्चात वाढ होणार असून त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ होईल आणि शेतीक्षेत्राची निर्यातक्षमताही घटेल.

इतर उद्योगक्षेत्रासंबंधी डॉ. सिंग जी मांडणी करतात त्यावर ते जर गंभीर विश्वास ठेवीत असतील तर खतउद्योगाच्या बाबतीतसुद्धा त्यांनी परवानापद्धती रद्द करायला पाहिजे आणि मुक्त बाजारपेठेने खतांच्या किंमती समतोल पातळीवर येण्यास वाव दिला पाहिजे. एवढे धाडस करणे शक्य वाटत नसेल तर वर सुचविलेल्या उपाययोजनेत, आवश्यक वाटल्यास, थोडा फार बदल करून ती अंमलात आणण्याचा प्रयत्न करावा. त्यांनी अंदाजपत्रकात जो काही प्रस्ताव मांडला आहे त्यामुळे 'गाढवही गेले आणि ब्रह्मचर्यही गेले' अशी त्यांची अवस्था झाली आहे!

पुढे, लाजिरवाण्या माघारीचे बिगुल वाजविताच खतअनुदानासंबंधी अर्थमंत्र्यांनी आरंभी घेतलेल्या भूमिकेमुळे त्यांचा जो काही दबदबा निर्माण झाला होता त्यातली हवा निघून गेली. त्यांनी आपल्या अंदाजपत्रकी प्रस्तावात बदल करून खतांच्या किंमतीत जी ४० टक्क्यांची वाढ सुचविली होती ती ३० टक्क्यांपर्यंत खाली आणली आणि या वाढीतूनही अल्पभूधारक व लहान शेतकऱ्यांना संपूर्ण सूट देण्याची घोषणा केली. त्यामुळे निर्माण झालेल्या दुहेरी किंमतव्यवस्थेमुळे तर गोंधळ आणखीनच वाढणार आहे आणि समस्या अधिक बिकट होणार आहे. रासायनिक खतांच्या किंमतविषयक धोरणासंबंधी श्री. जी. व्ही. के. राव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तज्ज्ञ-समितीने तर खतांच्या दुहेरी किंमतपद्धतीच्या विरोधातील आपले मत स्पष्टपणे नोंदविलेले आहे. ९ कोटी जमीन-खातेदारांपैकी सुमारे ७६ टक्के खातेदारांची जमीनधारणा २ हेक्टरपेक्षा कमी आहे. या सुमारे ७ कोटी खातेदारांना दीड लाख सेवाकेंद्रांमार्फत सवलतीच्या दरातील खताचे वितरण खात्रीशीरपणे करणे हे भरमसाठ खर्चिक तर आहेच पण प्रशासकीयदृष्ट्या जवळजवळ अशक्य

आहे. दोन हेक्टर्सचे जमीनधारक खातेदार आणि त्याहून जास्त जमीन असलेले खातेदार अशी फारकत करणे हे अन्याय्य व अनुचित तर आहेच पण शासनाने निदान 'अल्पभूधारक व लहान' शेतकरी ठरविण्याचे आपले निकष आर्थिक दर्जाचे निर्देशांक म्हणून योग्य आहेत काय हे तरी तपासून पाहायला हवे होते. खातेदारांच्या जमीनधारणेचा आकार हा बहुधा कौटुंबिक नातेसंबंधांच्या परिस्थितीवर अवलंबून असतो. ज्या एकत्र कुटुंबातील ज्या व्यक्ती भांडणे करून विभक्त होतात त्या भांडखोर व्यक्ती व्यक्तिगतरीत्या लहान शेतकरी बनतात; पण गुण्यागोविंदाने एकत्र राहाणारे भाऊभाऊ मात्र श्रीमंत शेतकरी म्हणून गणले जातात!

या सर्व अनुदानपुराणातून, शेतीक्षेत्रासंबंधी विचार करायचा म्हटले म्हणजे आपल्या कृषिप्रधान भारत देशाच्या विद्वान अर्थमंत्र्यांच्यासुद्धा बुद्धीचा कसा गोंधळ उडतो हेच दिसून येते. रासायनिक खतांच्या समस्येसंबंधातील निर्णय हा केवळ अनुदान रद्द करण्यासंदर्भातच घेण्याऐवजी आधी शास्त्रशुद्ध सर्वंकष कृषिनीती ठरवून त्याअंतर्गत या समस्येवर तोडगा काढला पाहिजे.

(मूळ इंग्रजीवरून अनुवादित)

(२१ ऑगस्ट १९९१)

# ४. बुद्धिसंपदेच्या चाच्यांचा कांगावा

### मनुष्याची गुणात्मक उत्क्रांती

हजारो हजारो वर्षांपूर्वी पृथ्वीच्या पाठीवर आजच्या माणसाशी काहीही सारखेपणा नसलेला माणसाचा पूर्वज दोन पायांवर उभे राहून कमरेत थोडा वाकलेला डुलत डुलत चालू लागला. त्या अवस्थेपासून आजच्या मनुष्याची उत्क्रांती होण्यास प्रचंड कालावधी लागला. या काळात माणसापेक्षा खूपच प्रचंड, म्हणजे अगदी पर्वतप्राय आकाराचे प्राणी नष्ट झाले. सहजतेने या झाडावरून त्या झाडावर छलांगे मारण्याची दैवी देणगी असलेले प्राणीही बाजूस पडले. एका उड्डाणात कित्येक कोस, दऱ्याखोरी, नद्या-सरोवरे ओलांडून जाण्याइतकी पंखांची ताकद असलेले पक्षीही बाजूला पडले. या सर्वांशी तुलना करता ज्याच्या अंगी फारशी ताकद नाही, कोणती विशेष करामत नाही असा माणूसप्राणी टिकून राहिला, एवढेच नव्हे तर, त्याने सगळ्या पृथ्वीवर आणि आकाशातही आपली निरंकुश सत्ता प्रस्थापित केली.

इतर प्राण्यांप्रमाणे, निसर्गात तयार मिळणारे अन्न गोळा करून किंवा शिकार करून मिळविण्याचे त्याने केव्हाच मागे टाकले. शेती केली. शहरे वसवली. पंचमहाभूतांवर ताबा मिळविला. विजेलासुद्धा वेसण घातली. जमिनीवरून, पाण्यावरून अगदी हवेतूनसुद्धा प्रवास करण्याचे कसब संपादले. सोयीप्रमाणे वेगवेगळ्या आकाराच्या, उंचीच्या इमारती बांधल्या. वेगवेगळ्या क्लृप्त्यांचे कारखाने बनविले.

सामान्य पशुपक्ष्यांप्रमाणे पाण्याच्या प्रवाहात तोंड घालून मिळेल तसल्या पाण्याने तहान भागविण्याने त्याची तहान भागेना. म्हणून वेगवेगळ्या भगीरथ प्रयत्नांनी त्याने पाणी हवे तिथे, हवे तसे हजर होईल अशी किमया साधली. कोणत्याही मोसमास मनाला भावेल ते मनसोक्त विविध रसांचे, स्वादांचे अन्न चुटकीसरशी समोर येईल अशी व्यवस्था केली. जी गोष्ट पाण्याची आणि अन्नाची तीच हवेची, निवाऱ्याची, वस्त्रप्रावरणांची; तीच गोष्ट इतर सगळ्या गरजांची आणि हौसमौजांची. अमुक एक गोष्ट असू शकते ना, मग ती आपल्या पदरी असलीच पाहिजे अशा हव्यासाने मनुष्यप्राणी स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावत गेला.

**माणसाचे वेगळेपण : प्रयोगशीलता**

माणसाच्या या करामतीमागे त्याच्या स्नायूंची ताकद किंवा लवचिकता तर आहेच, पण ही असली ताकद माणसापेक्षासुद्धा उदंड प्रमाणात असणारे कितीतरी प्राणी पृथ्वीतलावर आजही मौजूद आहेत. माणसाचा पूर्वज ज्या दिवशी दोन पायांवर उभा राहिला तेव्हा तर असे प्राणी आजच्यापेक्षाही फार मोठ्या संख्येने असले पाहिजेत. पण, त्या प्राण्यांना जे जमले नाही ते माणसाने करून दाखविले. आहारनिद्राभयमैथुनाच्या समाधानात थोडीशी जिज्ञासा, थोडीशी नकलेगिरी, थोडीशी हिम्मत, तेच तेच काम त्याच त्याच पद्धतीने करण्याचा कंटाळा या आणि अशा इतर प्रवृत्तीतून माणसाच्या बुद्धीचीही उत्क्रांती होत गेली.

वणव्यात तयार मिळणारा अग्नी घरात संगोपून ठेवण्याचे कसब जमायलाच हजारो वर्षे गेली. चाकाचा शोध लागला. हत्यारे समजली. स्वत:च्या ताकदीला पशूंच्या ताकदीची जोड मिळाली. शेती सुरू झाली. आणि त्यानंतर वाढत्या गतीने एक एक नवे नवे कसब, एक एक नवे नवे रहस्य, शोध, सिद्धांत प्रस्थापित झाले. मनुष्यजातीच्या इतिहासात माणसाचे सामर्थ्य आणि वैशिष्ट्य त्याच्या शोधक बुद्धीत आणि प्रयोगशीलतेत आहे. त्याच्या इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांत स्वत:चा गुणाकार करणाऱ्या जनावरांच्या मदतीने त्याला एक टप्पा गाठता आला. मनुष्यप्राण्याचाच गुणाकार करणाऱ्या मानुषींनी शेतीचा शोध लावून दुसरा टप्पा साध्य केला. शेतीतील गुणाकाराने संघटना आणि साधनांची मुबलक उपलब्धी सिद्ध झाली. आणि त्यानंतरच्या टप्प्यात शास्त्रज्ञ, वैज्ञानिक, तंत्रज्ञ आणि संशोधक यांनी ऊर्जेच्या गुणाकारांच्या हजार युक्त्या संपादन केल्या. या सगळ्या इतिहासात पशु, स्त्रिया आणि शेतकरी यांची धडगत काही बरी लागली नाही. गीतेने तर त्यांना स्वर्गाचा हक्कसुद्धा मोठ्या मिनतवारीने दिला. गुणकशक्तीचे मालक गुलाम होतात असा आजवरचा इतिहास आहे. संशोधकांचीही तीच गत होते, का आपल्या बुद्धीच्या ताकदीवर संशोधक स्वत:चे शोषण टाळू शकतात, हे अजून पाहावयाचे आहे.

**ज्ञान लपविण्याच्या परंपरेचा देश**

जळणारी काठी हातात घेऊन तिचा वापर जनावरांना

भिवविण्याकरिता, शेकोटी करता, उजेडाकरिता किंवा कच्चे मास भाजण्याकरिता कोणी केला असेल त्या आपल्या महापूर्वजाचे नाव अज्ञात आहे. निश्चितच, थोड्याफार अंतराने वेगवेगळ्या प्रदेशात अनेक मानवांना हा शोध स्वतंत्रपणे लागला असेल. आणि मग त्याचा वापर मोठ्या झपाट्याने पसरला असावा. त्याच्या प्रसारावर नियंत्रण ते कसे ठेवणार? पण ही असंभाव्य वाटणारी गोष्टही अर्यावर्तात प्रत्यक्ष घडली. अग्नी सहजसिद्ध करण्याचे अजून जमलेले नव्हते आणि जंगलातील वणवा काही सगळ्या हंगामात लागत नाही. अशा काळात अग्नी जतन करण्याचे आणि त्याबरोबरच अग्नीवर मक्तेदारी ठेवण्याचे जे जगात कोठे जमले नाही ते अग्निहोत्राने सिद्ध झाले. आपल्या देशाची ही एक परंपराच आहे. वंशपरंपरेने मिळालेले असो, अपघाताने जमलेले असो का प्रयासाने साध्य केलेले असो – जे काही विशेष ज्ञान किंवा सिद्धी असेल ती गुप्त ठेवायची आणि त्या मक्तेदारीच्या आधारावर स्वतःचे, कुटुंबाचे, समाजाचे वर्चस्व बसवायचे. कोणा गुरुला काही विद्या संपादन झाली की त्याने मोठ्या मुश्किलीने, दिली तर, एखाद्या पट्टशिष्याला देऊ करायची. नाही तर, गुरुबरोबरच ती विद्याही लयाला जायची. तंत्रमंत्र, जारणमारण, जादूटोणा, जडीबुटी आणि कविकल्पना यांच्या वावदूक वल्गना सोडल्यास आमच्याकडे संशोधन असे फारसे झालेच नाही. वर्षानुवर्षांच्या अनुभवाने जे काही थोडेफार समजले ते लपवून ठेवण्यात शक्ती खर्च केली. अगदी आजदेखील अशा प्रकारांच्या कथा ऐकायला मिळतात. 'कोणा एका कातोड्याला विष उतरविण्याची हमखास विद्या येत होती, पण आता तो मेला आणि त्याबरोबर त्याची विद्याही गेली.' अशा आणि अशासारख्या गोष्टी हरहमेशा कानी पडतात. सिद्धी मर्यादित ठेवून फायदा मिळविण्याची बुद्धी किती, सिद्धी इतरेजनांस दिल्यास नष्ट होते या विश्वासाचा परिणाम किती आणि झाकली मूठ सव्वा लाखाची, बंदच बरी अशा कावेबाजपणाचा भाग किती हे सांगणे कठीण आहे; पण पिढ्यान् पिढ्या जे हाती येईल ते धन आणि विद्याकण लपवून ठेवण्याची आमची परंपरा आहे. जातिव्यवस्थेने ही पद्धती चालूही शकली.

विद्या दिल्याने वाढते, साठवून ठेवण्याने संपून जाते असे एक संस्कृत सुभाषित आहे. एका लहानशा जातीची ज्ञानावर संपूर्ण मक्तेदारी आणि त्या

जातीतही घरोघर आणि माणसोमाणशी ते गुदमरवून टाकण्याची प्रवृत्ती याचा साहजिक परिणाम असा झाला की सगळा देश मागासलेला राहिला आणि बाबराच्या तोफांनी आणि युरोपियनांच्या शिडांच्या गलबतांनी त्याला गुलाम बनविले.

**'पेटंट' चा जन्म**

भारताखेरीज इतर देशांत, विशेषत: पाश्चिमात्य देशांत संशोधन लपविण्याची प्रवृत्ती नव्हती असे नाही. पण, व्यापार आणि उद्योगधंदे यांच्या विकासानंतर अशी रहस्ये राखणे शक्य राहिले नाही. कोण एक नवा शोध लागला तर तो कारखान्यात आणि व्यापारात सिद्ध झाला तरच त्याचा उपयोग. शोधवस्तू एकदा सर्वसामान्य ग्राहकाच्या हाती गेली की त्यातील युक्ति, क्लृप्ती जगजाहीर होण्यास कितीसा वेगळ लागणार? पण म्हणजे, एकाच समाजातील एका संशोधकाने जे सिद्ध केले तेच करण्यासाठी इतरांनीही कष्ट, काळ आणि साधने व्यर्थ दवडायची? त्याशिवाय, संशोधित वस्तू तयार करण्याची काही खास कसबे, पद्धती, युक्त्या, रहस्ये असणारच. संशोधनाचा फायदा संशोधकाला मिळाला पाहिजे, उद्योगजकाला मिळाला पाहिजे पण त्याबरोबर संशोधनातील सिद्धांत आणि तंत्रज्ञान बंदिस्त तर होता कामा नये; या हेतूने वेगवेगळ्या देशांत नियम आणि कायदे करण्यात आले. संशोधकाला शोधाच्या जनकत्वाने काही विशेष हक्क मिळाले पाहिजेत हे खरे, पण जन्मदात्या आईबापांचासुद्धा अगदी पुरुषोत्तम पुत्रावरसुद्धा हक्क बालपणपुरताच मर्यादित असतो. संशोधनाचे श्रेय आणि त्यातून मानवजातीच्या होणाऱ्या लाभाचा एक अंश संशोधकाला मिळाला पाहिजे. पण त्याकरिता अट अशी की त्याचे सगळे संशोधन, सिद्धी, युक्त्या, क्लृप्त्या, रहस्ये त्याने तपशीलवार लेखी समाजाकडे नोंदविली पाहिजे. तेव्हा त्याला विशेष हक्क मिळेल आणि तो हक्क अमर्याद काळापर्यंत असणार नाही. संशोधनाच्या वकुबाप्रमाणेच काही पाचदहावीस वर्षांपुरताच मर्यादित असेल.

खास हक्क म्हणजे पेटंट हा काही सिद्धांत आणि सिद्धी गुलदस्तात ठेवण्याचा मार्ग नाही. समाजाला ते ज्ञान उपलब्ध करून देण्याबद्दल समाजाने संशोधकाला मर्यादित काळापर्यंत दिलेला तो उपभोगाचा अधिकार आहे.

पण म्हणजे काही, सर्व शोधांचे पेटंट घेतले जातात असे नाही.

आजही काही विशेष उपयुक्ततेचे क्रांतीकारी दूरदर्शी संशोधन शक्य असेल तर गुप्त ठेवलेच जाते. संशोधकांना, त्यापेक्षाही उद्योजकांना जेव्हा पेटंटच्या मर्यादित अवधीच्या संरक्षणापेक्षा संशोधनातील जटीलताच अधिक काळ संरक्षण देईल असे वाटते तेव्हा पेटंट घेतले जात नाही. काही वेळा हा अंदाज बरोबर ठरतो, काही वेळा चुकतो.

**संशोधकांच्या प्रेरणा कोणत्या?**

संशोधकांना त्यांच्या सिद्धींवर विशेष हक्क किंवा आर्थिक लाभ उपलब्ध करून दिल्यामुळे संशोधनाला उत्तेजन मिळते असे कोणी म्हटले तर त्यावर मोठा वाद होण्याची शक्यता आहे. संशोधकांच्या प्रेरणा कोणत्या? पदवी, सन्मान किंवा अर्थलाभ याकरिता संशोधन होत नाही असे नाही. पण, कोपर्निकस किंवा न्यूटन यांच्यासारख्या सैद्धांतिकांची आयुष्यभरची तपस्या काही लाभान्वेषी नव्हती. एडीसन, मार्कोनी, बेल यांच्यासारख्या, सर्व मनुष्यजातीला उद्धरणाऱ्या संशोधकांच्या मनात काही द्रव्यापेक्षा होती असे दिसत नाही. किंबहुना, दुसऱ्या महायुद्धापर्यंत तरी बहुतेक मोठमोठे शोध हे तुटपुंज्या साधनसामुग्रीने आणि संशोधकाला धड पोटभर खाण्याची ददात अशा अवस्थेत लागलेले आहेत. मोठ्या शोधांशी ज्यांची नावे निगडीत आहेत अशांच्या जीवनचरित्रांवरून त्यांच्यावर धन आणि मानाच्या आमिषाचा काही मोठा प्रभाव होता असे दिसत नाही. गरज ही शोधाची जननी आहे असे म्हटले जाते. मोठी विचित्र गोष्टी अशी की शांततेच्या काळात जीवन सुखद करणारे अनेक शोध युद्धातील धुमश्चक्रीच्या गरजेमुळे लागले आहेत. एखादा मोठा क्रांतीकारी शोध लागला म्हणजे एक नवे दालन खोलले जाते. आणि त्या दालनाचा अंदाज घेण्याकरिता संशोधन कार्याची एक मोठी लाट उसळी घेऊन येते. अगदी नोकरमान्या व्यावसायिक शास्त्रज्ञांनी पगारापोटी, पदवीसाठी लावलेले सगळेच शोध काही थातुरमातुर असत नाहीत. त्यातही काही सज्जड उपलब्धी आहेत.

पण, हे सगळे गृहीत धरूनही एक गोष्ट स्पष्ट आहे की जेथे संशोधनाला वाव आहे, उत्तेजन आहे आणि संशोधकांचा मान आहे तेथे नवनवीन संशोधनाची लयलूट चालते. समाजवादी साम्राज्याच्या ऱ्हासाची आर्थिक, सामाजिक, राजकीय अनेक कारणे आहेत; पण एक महत्त्वाचे

कारण हे की तथाकथित कामगारांच्या हुकुमशाहीत संशोधनाचे बी रुजले नाही, अंकुर फुटले नाहीत, रोपे तरारली नाहीत, पीक निसवले नाही. अवकाशसंशोधनासारखा अपवाद सोडला तर औद्योगिक हेरगिरीवर मदार ठेवणे समाजवादी सत्तेला भाग पडले. थोडक्यात, प्रत्यक्ष यशस्वी होणाऱ्या संशोधकांच्या व्यक्तिगत प्रेरणा कोणत्याही असोत, ऐहिक प्रेरणांनी संशोधनाला बहर येतो हे निश्चित.

**संशोधनाचा वाढता वेग**

आगीचा शोध लागावयास एखादे युग गेले असेल, पण आज संशोधन इतक्या वेगाने पुढे जात आहे की वर्षावर्षाला, एवढेच नव्हे तर दिवसादिवसाला आणि तासातासाला शास्त्र आणि विज्ञान मोठमोठे टप्पे गाठत आहे.

**भारतात परभृततेचे पीक**

**भारतातली स्थिती काय?**

काही शतकांच्या अंदाधुंदी आणि अस्थिरतेच्या काळानंतर इंग्रज आले. इंग्रजांच्या एकूण सर्व संस्कृतीनेच भल्याभल्यांना दिपविले. इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर राजकीय बंडखोरी उसळत राहिली तरी इंग्रजांची आर्थिक, सामाजिक आणि शास्त्रीय श्रेष्ठता सर्वमान्य होती. जाती आणि धर्मभेदांनी छिन्नभिन्न झालेल्या भारतातील प्रतिक्रिया काही विशेष होती.

जपानमध्ये ॲडमिरल पेरीने प्रवेश करून जपानी अहंकाराला धक्का दिला. जपानची प्रतिक्रिया अशी की आम्ही हरलो, कमी पडलो हे खरे आहे; पराजय नाकारण्यात काहीही तथ्य नाही. पण, हा पाश्चिमात्य शास्त्र आणि तंत्रज्ञानाच्या सामर्थ्यावर बळजोरी करतो काय? मग, शास्त्र आणि तंज्ञज्ञान आम्हीही आत्मसात करू आणि असे आत्मसात करू की पश्चिमी जगावरही मात करून दाखवू. जपानने त्याप्रमाणे पाश्चिमात्य शास्त्र आत्मसात करण्याचा यज्ञ आरंभला आणि पुढे जे घडले तो इतिहास सर्वांना ठाऊक आहे.

भारतातील प्रतिक्रिया याहून नेमकी उलटी. काही लोकहितवादी सोडल्यास एतद्देशियांचा पराभव हा दैवदुर्विलास किंवा चिपळुणकरी चक्रनेमिक्रमाचा आविष्कार आहे असे बहुतेक उच्चभ्रू आणि सर्वण मानत होते. इंग्रजांचा पराजय काय तो राजकीय क्षेत्रात करायचा आहे, त्याकरिता

इतर समाजव्यवस्था आणि संस्कृती बदलण्याचे काहीच प्रयोजन नाही अशीही प्रतिक्रिया होती. पण, राजकीय मंचांवरील भाषा काहीही असो, इंग्रजांचे राज्य ही उच्चवर्णीयांची मुसलमानी आमदानीत खिळखिळी झालेली पकड पुन्हा एकदा मजबूत करण्याची संधी आहे अशी सवर्णांची कल्पना होती. इंग्रजी वाघिणीचे दूध, त्याचा थोडासा रतीब लावला तरी नोकरशाहीत महत्त्वाचे स्थान मिळते हे जुन्या कारकुनी पेशाच्या ब्राह्मणांनी ओळखले. लेखककवींना इंग्रजी साहित्याच्या भांडारावर हात मारता मारता नकोसे झाले. तसेच, इंग्रजी शास्त्र, तंत्रज्ञान आणि कारखानदारी याचा थोडा, अगदी जुनापुराणा अंश मिळाला तरी तेवढ्या आधाराने कोट्यवधी एतद्देशियांकडून अफाट फायदा मिळवू शकतो हे व्यापारी जनांनी ओळखले. भारतातील ज्ञानाच्या मक्तेदारीमुळे वैराण झालेल्या भूमीवर इंग्रजी व्यवस्थेचे सावट असे आले की सर्वांत मोठे पीक आले ते परभृततेचे. या परभृततेच्या भूताने आमचा पिच्छा अजून सोडलेला नाही.

आमच्याकडचा विद्वान तो की जो अद्ययावत इंग्रजी, अमेरिकी किंवा इतर पाश्चिमात्य देशात प्रसिद्ध झालेल्या प्रकाशनांशी परिचय दाखवतो! आमचे संशोधक ते की जे बाहेरदेशी झालेल्या संशोधनाची सहीसही नक्कल उठवतात! कोणत्याही क्षेत्रात भारतातील दिग्गज विद्वान, शास्त्रज्ञ म्हणजे पाश्चिमात्य विद्वत्तेच्या आणि शास्त्राच्या सावटाखाली आलेले रोपटे. आचार्य अत्र्यांनी त्यांच्या एका व्यंगकाव्यात तत्कालीन चोरकवींचे वर्णन –

पुढे कवन लेखनी कुशल चोर तो जाहला
स्वतंत्र कृतीचा कवी म्हणुनी मान्यता पावला

असे केले आहे. आमच्यातील बहुतेक स्वयंप्रज्ञ, प्रतिभासूर्य शास्त्रज्ञ-संशोधकांची अवस्था ही अशीच आहे!

### ‘पेटंट’ पद्धती आणि भारत

इंग्रजी अमलाखाली आडगिऱ्हाईकी तंत्रज्ञान आणि यंत्रसामुग्री आयात करण्यात फारशी अडचण येत नसे. आणि असे आणलेले तंत्र आणि यंत्र देशातले कोणी चोरून वापरेल अशी शक्यता फारशी नसल्याने पेटंट संबंधीची नियमप्रणाली १९७० सालापर्यंत अगदीच जुजबी राहिली आणि सध्याचा तद्विषयक कायदा १९७० साली अमलात आला.

आंतरराष्ट-ीय क्षेत्रातील प्रत्येक संस्थेत आणि प्रत्येक क्षेत्रात आपल्या देशाचे प्रतिनिधी मोठ्या जोरजोराने भाग घेतात. फक्त, पेटंटसंबंधी जागतिक बुद्धिसंपदा हक्क संघटना WIPO (World Intellectual Property Right Organisation) या संघटनेशी मात्र भारताने काडीमात्रही संबंध ठेवलेला नाही. या संघटनेने तयार केलेल्या पॅरिस करारनाम्यातील अटी तशा काही जाचक नाहीत. प्रत्येक देशाने स्वदेशी शास्त्रज्ञांइतकेच विदेशी शास्त्रज्ञांनाही संरक्षण आणि हक्क दिले पाहिजेत एवढे थोडक्यात पॅरिस करारनाम्याचे सूत्र आहे. पण, आजपावेतो भारताने या करारनाम्यावर सही केलेली नाही, एवढी भारतातील परभृत शास्त्रज्ञ आणि उद्योजक यांची शामत आहे.

**नेहरूंच्या आशीर्वादाने**

स्वातंत्र्यानंतरची नेहरूप्रणीत अर्थव्यवस्था म्हणजे या परभृतांचा सुवर्णकाळ. इंग्रजांच्या आमदानीत तंत्र आणि यंत्र यांच्या आयातीसाठी खाजगी प्रयत्न करावे लागत, नेहरूव्यवस्थेने या आयातीसाठी, निवडक मंडळींची का होईना, राजरोस सोय लावून दिली. लायसन्स-परमिट व्यवस्थेत परदेशी संशोधनाचा आणि तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन देशात जवळजवळ मक्तेदारीची सत्ता उपभोगणारे लबाडलुच्चे उद्योजक म्हणून मिरवू लागले.

नेहरूव्यवस्थेत नागरी उच्चभ्रूंचा वर्ग संख्येने आणि सामर्थ्याने वाढत गेला आणि त्यामुळे त्यांच्या अपेक्षाही वाढत गेल्या. पूर्वी पंचवीसपन्नास वर्षांच्या जुन्या तंत्रज्ञानाने भारतीय कारखानदार खूश होत. नेहरूव्यवस्थेतील भद्र लोकांना हे अपुरे वाटते. परदेशातील अत्याधुनिक, अद्ययावत तंत्रज्ञान आपल्याला उपलब्ध झाले पाहिजे, एवढेच नव्हे तर, असे तंत्रज्ञान वापरावयास मिळणे हा आपला हक्कच आहे अशी त्यांची धारणा आणि भाषा आहे!

**आयत्या बिळात –**

या मंडळींची कार्यपद्धती समजून घेण्यासाठी शेतीच्याच क्षेत्रातील एक उदाहरण पुरेसे होईल. विदेशात कीटकनाशके, बुरशीनाशके, तणनाशके यांवर प्रचंड आणि खर्चिक संशोधन सातत्याने चालू असते. या संशोधनाचे फळ म्हणून एखादे उत्पादन निघते. तिकडच्या बाजारात ते आले की काही दिवसांतच किंवा काही तासातच ते भारतात येऊन पोहोचावे अशी व्यवस्था असते. भारतातील कोणत्याही प्रयोगशाळेकडून या उत्पादनाच्या नमुन्याच्या

आधाराने निर्मिती प्रक्रियेचा तपशील मिळू शकतो. म्हणजे, ज्या संशोधनासाठी प्रचंड तपस्या आणि खर्च करावा लागतो ते संशोधन इंडियातील ऐतोबांच्या हाती पाचशे-हजार रुपयांत पडते. परदेशी उत्पादनाची किंमत संशोधनाच्या खर्चामुळे साहजिकच चढी असते. संशोधनाचा खर्च देशी उत्पादनावर तर काही बसत नाही. मग, या चौर्यकर्मविशारदांनी निदान आपले उत्पादन रास्त मुनाफा ठेवून स्वस्तात स्वस्त दराने शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे किंवा नाही? पण, हे लबाड, परदेशी शास्त्रज्ञांच्या बुद्धिभांडवलावर डल्ला मारतात, एवढेच नाही तर, ग्राहक शेतकऱ्यालासुद्धा परदेशी मालाच्या तुलनेने थोडीफार कमी किंमत लावून लुबाडतात.

अशाच तऱ्हेची परिस्थिती वैद्यकीय क्षेत्रातील औषधांबाबतही आहे.

**चाचेगिरीच्या बंदोबस्तासाठी –**

बौद्धिक संपदेची ही लूटमार आटोक्यात आणणे आजपर्यंत फारसे शक्य नव्हते. कारण सोव्हिएट यूनियनसारखी महासत्ताच बुद्धिसंपदा हक्काचा भांडवलशाही कल्पना म्हणून उपहास करीत होती. आणि रशियाच्या पदराआड लपून तिसऱ्या जगातील बहुसंख्य 'काळ्या इंग्रजां'ना आपला ठगीचा व्यवसाय बिनबोभाट निर्धास्तपणे चालवता येत होता.

समाजवादी महासत्ता कोसळली आणि तिसऱ्या जगातील बहुसंख्य देश आंतरराष्ट्-रीय कर्जात गळ्यापर्यंत अडकलेले अशा परिस्थितीत साहजिकच पाश्चिमात्य देश त्यांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या काही संकल्पनांना जगमान्यता मिळविण्याचा निश्चय करून पुढे येत आहेत. अणुशस्त्रांच्या प्रसाराविषयींचा आंतरराष्ट्-रीय करार ही त्यातली एक बाब. डझनभर देशांच्या हाती अणुशस्त्रांची मक्तेदारी आहे. पण, अणुशस्त्रांविषयीचे ज्ञान त्यांच्या नजरेत लुंग्यासुंग्या असणाऱ्या देशांकडे जाऊ नये अशी त्यांची धारणा आहे. हे देश स्वत:च्या पायावर उभे राहून संशोधन करायला निघाले असते तर अणुंचा विस्फोट आणि अण्वस्त्रांची वाहतूक या टप्प्यापर्यंत येणे अजून पाचपन्नासवर्षे तरी त्यांना शक्य नव्हते. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आर्थिक विकासासाठी दिलेल्या साहाय्याचा अप्रस्तुत वापर केल्यामुळे भारत, पाकिस्तानसारखे देश अणुस्फोटाचे सामर्थ्य असल्याची मिजास मारू शकतात. एरवी चौपदरी हाती घेऊन 'भिक्षां देहि' करणाऱ्या देशांनी आपल्या लोकांच्या गरीबीचा प्रश्न

सोडवावा, शस्त्रास्त्रांवर आणि अण्वस्त्रांवर पैसे खर्चू नये अशी अपेक्षा पाश्चिमात्य देश, घमेंडीत का होईना, बाळगत असतील तर त्यांना दोष देणे मोठे कठीण आहे.

मानवी हक्क संरक्षणासंबधीचे कायदे आणि व्यवस्था याबद्दलही पाश्चिमात्य देश आग्रह धरून आहेत. खुल्या निवडणुका असाव्यात, विरोधी पक्षांची गळचेपी होऊ नये, राजकीय विरोधकांचा छळ होऊ नये, पोलिसी दडपशाही, वंशोच्छेद आणि व्यक्तिस्वातंत्र्यावरील बंधने संपली पाहिजेत असा, साहजिकच, आग्रह ते धरणार. कारण, त्यांच्या पद्धतीच्या अर्थव्यवस्थेसाठी किमान मानवी हक्क आणि स्वातंत्र्य ही गृहीततत्त्वे आहेत. याचा अर्थ त्यांच्या स्वतःच्या देशात ही तत्त्वे सर्वत्र पाळली जातात असे नाही. पण, शुद्ध चारित्र्याचा उपदेश करण्यासाठी स्वतः शुद्ध चारित्र्याचे असणे धनीसावकारांना आवश्यक नसतेच!

**पाश्चिमात्यांचे वर्चस्व**

समाजवादी साम्राज्याचा अंत आणि तिसऱ्या जगातील देशांच्या व्यवस्थांचे दिवाळे हा योगच असा काही जुळून आला आहे की पाश्चिमात्य राष्ट्रे, विशेषतः अमेरिका, प्रत्यक्षपणे किंवा जागतिक बँक आणि नाणेनिधी यांच्या मार्फत त्यांच्या तोंडवळ्याची अर्थव्यवस्था भारतासारख्या तिसऱ्या जगातील देशांवर लादू पाहात आहेत.

**दिवाळखोर तिसऱ्या जगापुढे पर्याय नाही**

अशा परिस्थितीत तिसऱ्या जगातील देशांना म्हणजे त्यांतील सत्ताधारी समाजांना काही लांबरुंद पर्याय आहेत असे नाही. त्यांच्या अर्थव्यवस्थेला त्यांच्या देशांतीलच बहुसंख्यांचा विरोध आहे. आम्ही तुमच्या अटी मानत नाही म्हणावे तर नवीन कर्जे तर सोडाच, पण जुन्या कर्जावरील व्याजभरणा करण्याइतकासुद्धा पतपुरवठा व्हायचा नाही. आपला निर्यात व्यापार वाढवून आजपर्यंत घेतलेल्या कर्जाची फेड करू म्हणावे तर ही ताकद त्यांची मुळातच नाही. कर्ज तडफदारपणे नाकारावे तर देशातील पाश्चिमात्य संस्कृतीच्या शहरी उच्चभ्रूंचे जीवनच परकीय आयात आणि संबंध यांखेरीज अशक्य होईल आणि लष्करी उठाव पाश्चिमात्य देशांच्या चुटकीची वाटसुद्धा न पाहाता होऊ लागतील.

## कठीण पर्याय

या परिस्थितीत पर्याय आहे. पण तो बिकट आहे. माझ्या 'नाणेनिधी : शेवग्याचे झाड' या लेखात (लेख क्र. १) मी त्याविषयी बोललो आहे. देशातील सत्तर टक्के लोक आज जसे जगत आहेत तसे बाकीच्या तीस टक्क्यांनी, विशेषत: सर्वोच्च पाच टक्क्यांनी जगायचे असे ठरवले तर जगापासून थोडे अलग होऊन एक 'खादीचा पडदा' उभारून स्वयंभूपणे औद्योगीकरणाची वाट आपण चालू शकतो. पण त्याकरिता लागणारे जाज्ज्वल्य नेतृत्व प्रसवेल असा आजचा समाजही नाही आणि परिस्थितीही नाही.

त्यामुळे, ज्या काही अटी लादल्या जातील त्या थोड्याफार फरकाने मान्य करणे हे आपल्याला अपरिहार्यच आहे.

## सुपर-३०१ चा बडगा

या संबंधात बौद्धिकसंपदा हक्काचा प्रश्न वेगवेगळ्या मार्गांनी पुढे आला आहे. जागतिक बुद्धिसंपदासंघटना WIPO हिंदुस्थानने पॅरिस करारनाम्यावर सही करावी व संघटनेचे सदस्य बनावे या दृष्टीने कित्येक वर्षे मवाळपणे प्रयत्न करीत आहे. परिस्थिती निकरावर आली तर अमेरिकेच्या निर्वाणीच्या इशाऱ्याने १९९१ च्या अखेरीस अमेरिकेने पेटंट हक्कांचा भंग खुले आम करणारे देश म्हणून चीन आणि हिंदुस्थान यांची नावे जाहीर केली आणि परिस्थितीत तीन महिन्यांच्या आत सुधारणा झाली नाही तर या देशांवर व्यापारी निर्बंध सुपर-३०१ व्यवस्थेखाली लावण्यात येतील असे जाहीर केले. हिंदुस्थानातील अर्थव्यवस्था खुली करण्याच्या दृष्टीने नरसिंहराव सरकार जे प्रयत्न करीत आहे ते लक्षात घेता सध्यातरी भारताविरुद्धची कारवाई स्थगित ठेवण्यात आली आहे. चीन अमेरिकेबरोबरच्या व्यापाराला फारसे महत्त्व देत नसल्यामुळे त्यांनी अमेरिकन धमकीस फारसा धूप घातला नाही.

जवळजवळ त्याचवेळी व्यापारसंबंधी जागतिक संस्था GATT चे डायरेक्टर जनरल श्री. आर्थर डंकेल यांच्या एका मसुद्याने मोठा हलकल्लोळ उडवून दिला आहे.

## अर्धवटांचा कांगावा

पुरा ४२६ पानांचा डंकेल मसुदा कोठेही प्रकाशित झालेला नाही. त्याचा एक वेडाबागडा सारांश देशातील २९ निवडक लोकांना देण्यात आला. त्याखेरीज, वर्तमानपत्रांत मधूनमधून आलेले त्रोटक वृत्तांत यांवरच प्रामुख्याने चर्चेचा झंझावात आधारलेला आहे. हा मसुदा मान्य झाला तर देशाचे आर्थिक सार्वभौमत्व संपुष्टात येईल, शेतकऱ्यांना कोणत्याही तऱ्हेचे विशेष साहाय्य करणे अशक्य होईल आणि त्यापलिकडे, बुद्धिसंपदेच्या संरक्षणासंबंधित तरतुदी अमलात आल्या तर देशातील सर्व संशोधन बंद पडेल, औषधे महाग होतील, शेतकरी बहुराष्ट-ीय कंपन्यांच्या तंत्रज्ञानाचे गुलाम होतील असा कांगावा सुरू आहे.

## डंकेल मसुद्याची पार्श्वभूमी

या चर्चेचा अर्थ समजण्याआधी डंकेल मसुदा हे काय प्रकरण आहे, हे समजून घेतले पाहिजे. पहिल्या महायुद्धानंतर जागतिक खुला व्यापार जवळजवळ बंद पडला. जो तो देश किंवा देशांचा समूह आपापल्या स्वार्थाच्या दृष्टीने बाहेरून येणाऱ्या आयातीवर वेगवेगळे निर्बंध घालू लागला आणि त्याबरोबरच, आपली निर्यातमात्र वाढावी अशा कोशिशीस लागला. दुसऱ्या महायुद्धानंतर परिस्थिती आणखीच बिकट झाली आणि जगभरचा खुला व्यापार पुन्हा एकदा चालू व्हावा याकरिता काही भगीरथ प्रयत्नही सुरू झाले. या प्रयत्नांतील पहिले पाऊल म्हणून जगभरचा व्यापार खुला होण्याआधी निदान काही राष्ट-समूहांतील अंतर्गत व्यापार खुला व्हावा या दृष्टीने प्रयत्न चालू झाले. यूरोपातील सामूहिक व्यवस्था हे त्याचे एक उदाहरण आहे. त्याही पलीकडे जाऊन, पृथ्वीवरील सर्व देशांनी आपला व्यापार खुला करावा यासाठी GATT ही संस्था प्रयत्न करीत आहे. पण हे काम सोपे नाही. प्रत्येक देशातील गुंतलेले स्वार्थ अशा तऱ्हेच्या खुल्या व्यापाराला जागोजागी आणि मुद्द्यामुद्द्यावर विरोध करतात.

आंतरराष्ट-ीय व्यापार खऱ्या अर्थाने खुला व्हायचा असेल तर राष्ट-राष्ट-ातील अंतर्गत अर्थव्यवस्थासुद्धा खुली व्हायला पाहिजे. यूरोप, अमेरिका इत्यादी देशांत शेतकऱ्यांना प्रचंड सबसिडी देण्याचे धोरण कित्येक वर्षे चालले आहे. हिंदुस्थानसारख्या देशात शेतकऱ्यांना सबसिडी तर नाहीच

पण त्यांची लूट आहे. यूरोप आणि हिंदुस्थान यांतील व्यापार खुला झाला तर यूरोपीय शेती सबसिडीच्या आधाराने भरभराटीत ठेवण्याची व्यवस्था कोसळून जाईल. ही गोष्ट यूरोपातील शेतकरी आणि तेथील शासने या दोघांनाही मान्य होण्यासारखी नाही. आंतरराष्ट-ीय खुल्या व्यापारासाठी देशादेशातील उत्पादन आणि किंमत यांमधील शासनांची ढवळाढवळ संपली पाहिजे.

खुला व्यापार केवळ उपभोगांच्या वस्तूंपुरता मर्यादित असून चालणार नाही. काही देशांची नैसर्गिक परिस्थितीच अशी आहे की दैनंदिन गरजेच्या वस्तूंकरता त्यांना इतर देशांवर अवलंबून राहावे लागते. त्या मोबदल्यात ते जगाला भांडवली वस्तूंचा पुरवठा करू शकतात. उपभोगांच्या वस्तूंबरोबर भांडवलाच्या देवाण-घेवाणीवरील निर्बंधही संपणे आवश्यक आहे.

**बुद्धिसंपदा हक्काचे संरक्षण**

या संबंधाने तिसरा एक मुद्दा उपस्थित होतो, तो बौद्धिक संपदेच्या हक्कांचा. तसे म्हटले तर, आंतरराष्ट-ीय संस्थांचे एकमेकांतील कामाचे जे वाटप आहे त्याप्रमाणे हा विषय WIPO या संस्थेचा आहे, GATTचा नाही. पण, खुल्या व्यापारपेठेची चर्चा या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावल्याखेरीज समाधानकारकरित्या होणे शक्यच नाही. म्हणून हा प्रश्न GATTच्या चर्चासत्रातही प्रामुख्याने येतो. विकसित देशांत मजुरी चढी असते. अविकसित देशांत श्रमशक्ती स्वस्त असते. विकसित देशांची मोठी गुंतवणूक त्यांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानविषयक संशोधनात असते. या गुंतवणुकीचा फायदा त्यांना मिळाला नाही तर जागतिक व्यापारातील त्यांची परिस्थिती कठीण होईल अशी त्यांना धास्ती वाटते. हे तंत्रज्ञान मिळविण्याची आस अविकसित देशांनाच असते असे नाही तर, विकसित देशांनाही एकमेकांचे तंत्रज्ञान मिळाल्यास उचलायचेच असते. हा चोरापोरीचा कारभार संपून काही शिस्त प्रस्थापित झाल्याखेरीज खऱ्या अर्थाने जागतिक खुली बाजारपेठ तयार होण्याची शक्यता नाही. या प्रश्नांवर वर्षानुवर्षे चर्चांचे गुऱ्हाळ चालू आहे. उरुग्वे बैठकीत सुरू झालेली बोलणी गेली पाच वर्षे चालू आहेत. कोणीच पडते घ्यायला तयार नाही आणि तडजोड करायला तयार नाही. पण, आता जागतिक परिस्थिती बदलली आहे. समाजवादी व्यवस्था कोसळली आहे,

नियोजन ही कल्पना दूर टाकून खुल्या अर्थव्यवस्थेकडे तिसऱ्या जगातील देशही सरकू लागले आहेत किंवा असे सरकणे त्यांना भाग पडत आहे. या संधीचा फायदा घेऊन खुल्या जागतिक व्यापाराचे पुनरुत्थान करण्यासाठी मोठी झेप घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. चर्चांचे गुऱ्हाळ पाच वर्षे चालल्यानंतर GATT संस्थेच्या महानिदेशकांनी या चर्चेच्या आधाराने महत्तम साधारण विभाजक मुद्दे काढून मसुदा तयार केला आणि हा मसुदा स्वीकारा किंवा GATT मधून बाहेर पडा असा निर्वाणीचा इशारा दिला.

**प्रस्ताव स्वीकारण्याचा पर्याय फायद्याचा**

डंकेल प्रस्ताव अव्हेरला म्हणजे प्रश्न सुटला असे नाही. जागतिक बाजारपेठेपासून दूर राहून कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था चालू शकत नाही. हा प्रस्ताव नाकारला तरी जागतिक बँका, नाणेनिधी अशा संस्था खुली अर्थव्यवस्था, खुली बाजारपेठ आणि भांडवलाची खुली ये जा यांचा आग्रह धरणारच आहेत. शास्त्रीय संशोधन मोठ्या प्रमाणावर अमेरिकेत होते. बौद्धिक संपदेचा हक्क नाकारणे WIPO किंवा GATT यांच्यापासून दूर राहून जमणार आहे असे नाही. अमेरिकेन शासन सुपर-३०१ यासारख्या व्यवस्था लादून बौद्धिक संपदेचे हक्क मान्य करावयास हिंदुस्थानसारख्या देशांना भाग पाडू शकते. दहाबारा अतिविकसित देश सोडले तर इतरांपुढे, खरे म्हटले तर, दोनच पर्याय आहेत. नवीन अर्थव्यवस्थेची सूत्रे, नियंत्रण, लवाद इत्यादी GATT सारख्या बहुराष्ट-ीय संस्थांच्या कार्यकारी मंडळाकडे असावीत का अमेरिकन सीनेटच्या हाती असावीत? GATT सारख्या संस्थांच्या कार्यकारी मंडळात भारताला आपला आवाज उठवता येतो. आणि प्रत्यक्षात तेथील भारतीय प्रतिनिधी मंडळ प्रभावीपणे काम करते हे लक्षात घेतले तर नवीन व्यवस्थेचे सूत्रचालन अशा बहुराष्ट-ीय संस्थांकडे असण्यातच आपले हित आहे.

डंकेल मसुद्याच्या एकेका अंगाकडे लक्ष देऊन वाद घालणे योग्य होणार नाही. त्यासाठी डंकेल प्रस्तावांची एकूण रचना लक्षांत घेतली पाहिजे.

**अविकसित देशांना आवाज कोठे?**

उरुग्वेतील बोलणी सुरू झाल्यापासून पंचेचाळीस देशांनी आपले व्यापार धोरण सुधारले आहे. भारतासारख्या, तिसऱ्या जगातील देशांचे या

एकूण प्रकरणात काही फारसे महत्त्व आहे असे नाही. भारताचा सगळा आंतरराष्ट-ीय व्यापार जागतिक व्यापाराच्या अर्धा टक्कासुद्धा नाही. त्यामुळे, ही सर्व योजना भारतासारख्या देशांना कुचलण्याची आहे हे काही खरे नाही. हे प्रस्ताव मान्य करण्यात सगळ्यात मोठ्या हरकती अमेरिका, यूरोप आणि जपान उठवीत आहेत. आणि या तीन देशांचा निम्म्या जागतिक व्यापारावर ताबा आहे. जपानच्या वाढत्या आर्थिक आणि व्यापारी ताकदीची अमेरिकेस दहशत आहे. जपानी मालाचा लोंढा अमेरिकन बाजारात चालला असून त्याला आवर कसा घालावा हा अमेरिकन शासनापुढील यक्षप्रश्न आहे. यूरोपातील शेतकऱ्यांचे कोडकौतुक वर्षानुवर्षे चालले आहे. त्यात काहीही बदल करणे राजकीय दृष्ट्या मुश्किल आहे.

**शेतीसंबंधी प्रस्ताव**

शेतीसंबंधी डंकेल मसुद्यातील ठळक प्रस्ताव असे आहेत.

१) प्रत्येक देशाने आयातीवर घातलेले निर्बंध उठविण्याचे वेळापत्रक जाहीर करावे.

२) ज्या अविकसित देशांत शेतकऱ्यांना उत्पादनखर्चाच्या वर दहा टक्के सबसिडी दिली जाते तेथे ती येत्या दहा वर्षांत १०.३ टक्क्यांनी कमी करावी.

३) इतर देशात शेतीकरता देण्यात येणाऱ्या सूटसबसिडीत १९९९ पर्यंत खालीलप्रमाणे कपाती करण्यात याव्या.
उत्पादन सबसिडी : २० ते ३६ टक्के
निर्यात सबसिडी : ३६ टक्के

४) सबसिडीच्या आधाने होणारी निर्यात २४ टक्क्यांनी घटली पाहिजे.

५) शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारची सक्तीची लेव्ही असू नये.

**भारतीय शेतकऱ्यांच्या हिताचे**

शेतीसंबंधीचे हे प्रस्ताव पाहिले तर ते भारतीय शेतकऱ्यांच्या अत्यंत फायद्याचे आहेत हे उघड आहे. एवढेच नव्हे तर, सबसिडी देऊन निर्यात करण्यावर डंकेल साहेबांनी जशी बंधने सुचविली आहेत तशीच बंधने सबसिडी देऊन महागड्या शेतीमालाची आयात करण्यावरही लादली असती तर भारतीय शेतकऱ्यांना मोठा आनंद झाला असता. त्याचबरोबर, निर्यात-

बंदीसारख्या हत्यारावरही काही नियंत्रण पाहिजे. पण जे पी. व्ही. नरसिंहराव करत नाहीत ते डंकेलनी करावे अशी अपेक्षा ठेवणे रास्त नाही. भारतातील शेतकऱ्यांना GATT च्या नियमानुसार कोणतीही सबसिडी मिळत नाही. त्यामुळे, या प्रस्तावाच्या अंमलबजावणीत भारतीय शेतकऱ्याचे काहीही नुकसान होण्याची शक्यता नाही. या उलट, भारताच्या सध्याच्या परदेशी बाजारपेठात (उदा. यूरोप) दिल्या जाणाऱ्या सबसिडी कमी होणार असल्यामुळे आंतरराष्ट-ीय बाजारपेठेतील भारतीय शेतीमालाची परिस्थिती आणखी सुधारणार आहे. रुपयाच्या अवमूल्यनानंतर भारतातील बहुतेक शेतीमाल आंतरराष्ट-ीय स्पर्धेत टिकेल अशा स्थितीत आहे. रुपयाची किंमत अजूनही वास्तवाशी जुळणारी करण्यात आली आणि डंकेल प्रस्ताव अमलात आले तरी अमेरिकन यादवी युद्धानंतर पहिल्यांदा भारतीय शेतकरी जागतिक बाजारपठेत प्रतिष्ठेचे स्थान मिळवील.

ही एकच बाब लक्षात घेतली तरी डंकेल प्रस्ताव मान्य व्हावेत याकरिता भारताने उत्साहाने पुढाकार घेतला पाहिजे. दुर्दैवाने, या वाटाघाटीत इंडियाचे शासन परभृत कारखानदारांची तळी उचलीत आहे. डंकेल प्रस्तावांना विरोध करण्याकरिता बौद्धिक संपदेच्या हक्कांचा प्रश्न मोठ्या हिरीरीने मांडला जात आहे. या विषयावरील डंकेल मसुद्यातील प्रस्ताव मानले तर (१) पेटंट हक्क अन्न, रसायने, औषधे, आणि सूक्ष्मजिवाणूशास्त्र यांनाही लागू करावे लागेल, (२) पेटंट संरक्षणाची मुदत सर्व बाबतीत वीस वर्षांची करावी लागेल.

या तरतुदी लागू करण्याकरिता भारतासारख्या देशांना २००३ सालापर्यंत सवलत दिली जाईल.

**चाच्यांच्या विरोधाची तऱ्हा**

हे प्रस्ताव म्हणजे परकीय संशोधनाच्या चोरट्या आयातीवर चंगळ करणाऱ्या भारतीय बुद्धिजीवी आणि उद्योजक यांच्या मुळावरच घाव. हे प्रस्ताव मान्य होऊ नयेत म्हणून त्यांनी जीवाचा आकांत चालवला आहे. पण, या मूठभर लोकांचे ऐकणार कोण? म्हणून, ज्यांची सगळी हयात सर्वसामान्य भारतीयांना आणि शेतकऱ्यांना लुटण्यात गेली ती ही मंडळी आता शेतकऱ्यांची सहानुभूती संपादण्यात गुंतली आहेत. भारतीय

शेतकऱ्याला नव्या संशोधनाचे महागडे पेटंट बियाणे विकत घेणे भाग पडेल कारण बाजारात दुसरे काही बियाणे मिळणारच नाही, बियाण्याच्या वाणातून नव्या वर्षाकरिता बियाणे शिल्लक ठेवण्याची बंदी येईल, पेटंट हक्काचा भंग होतो आहे किंवा काय हे बघण्याकरिता गावोगाव बहुराष्ट्-ीय कंपन्यांच्या हेरांच्या टोळ्या फिरू लागतील आणि वनस्पतीसृष्टीतील सगळी विविधताच नष्ट होऊन जाईल; शिवाय, या पेटंट हक्कांमुळे भारतातील संशोधन ठप्प होऊन जाईल असे बागुलबुवा शेतकऱ्यांना दाखविण्याचा प्रयत्न होत आहे.

**खरे काय ते शेतकरी जाणतो**

खरे म्हणजे, या सगळ्या आक्षेपांत काहीही तथ्य नाही. संकरित बियाणी शेतकऱ्यांनी वापरलेली आहेत. त्यांचे फायदे तोटे त्यांना चांगले माहीत आहेत. दुसऱ्या पिढीचे संकरित वाण वापरल्यामुळे पिकाच्या उत्पादनात आणि गुणवत्तेतही फरक पडतो हे त्यांना चांगले ठाऊक आहे. कापसाचा धागा योग्य गुणवत्तेचा हवा असेल तर ४६८ वाणाची फेरलागवड करू नये असे पंजाबराव कृषिविद्यापीठसुद्धा सांगते. त्यात शेतकऱ्याचा फायदा आहे आणि शेतीउद्योगाचा फायदा आहे हे शेतकरी चांगले जाणतो. गुणवत्ता टिकविण्यासाठी अशा शिफारशी मानण्यात त्याला काही अडचण वाटणार नाही. यापुढे जाऊन, दुसऱ्या पिढीचे बियाणे वापरू नये असे बंधन कुणी घातले तर त्यातही शेतकऱ्याला काही मोठी अडचण वाटणार नाही.

वनस्पतीविश्वातील विविधता कमी होणे किंवा संपुष्टात येणे हे एकूण पृथ्वीवरील जीवसृष्टीकरिता धोक्याचे आहे. विविधता टिकविण्याकरिता जे काही प्रयत्न करावयाचे ते सर्व समाजाने केले पाहिजे, शेतीउद्योगावर पोट भरणाऱ्या शेतकऱ्याचीच केवळ, ती जबाबदारी होऊ शकत नाही.

**शेतकरी फुकटे नाहीत**

परकीय तंत्रज्ञानाची तस्करी करणाऱ्यांनी आजपर्यंत शेतकऱ्यांना काही लाभ मिळवून दिलेला नाही आणि गेल्या तीस वर्षांत शेतीचा जो विकास झाला, निदान जी उत्पादनवाढ झाली त्याचे श्रेय परदेशी संशोधनाला आणि शास्त्रज्ञांना आहे. परदेशातील अद्ययावत संशोधन भारतीय शेतकऱ्यांना पैसे टाकून वापरायला, तातडीने वापरायला मिळाले तरी त्याचे समाधान आहे. किंबहुना, परदेशी शास्त्रज्ञांच्या कष्टांचा फुकट फायदा घ्यावा ही शेतकऱ्यांची

प्रवृत्तीच नाही. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात हिंदुस्थान शेकडो वर्षे मागे आहे. केवळ वीस वर्षांच्या अवधीत परदेशी तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, औषधे विनाखर्च वापरायला मिळाली तर परदेशी शास्त्रज्ञांविषयी सर्वसामान्य जनांच्या मनात कृतज्ञताभावच असेल.

## 'सीताशेती'तील संशोधनालाही संरक्षण

या पलीकडे जाऊन संशोधन ही एकतर्फी वाहतूक आहे अशी शेतकऱ्यांची भावना नाही. परदेशी संशोधन भारतात येईल त्याप्रमाणेच भारतातील शोध परदेशात जातील असा शेतकऱ्यांचा आत्मविश्वास आहे. हे संशोधन संशोधनशाळेत होणार नाही, कृषिविद्यापीठात होणार नाही, भारतीय उद्योजक तर त्या दिशेने प्रयत्नही करणार नाहीत; पण भारतीय शेतकरी संशोधनात पुढाकार घेऊ शकतो. महाराष्ट-ातील द्राक्ष शेतकऱ्यांनी याचा सज्जड पुरावा पुढे ठेवला आहे. तेव्हा बौद्धिकसंपदेचा हक्क म्हणजे केवळ बोजा नसून ते आज ना उद्या फायद्याचे कलमही ठरेल, असा शेतकऱ्यांचा विश्वास आहे. या बाबतीत त्यांची परिस्थिती इंडियातील परभृत बुद्धिजीवींपेक्षा फार वेगळी आहे.

पण, सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा वेगळाच आहे. सूक्ष्म जिवाणू आणि संबंधित शास्त्रांमधून शेतीच्या नव्या प्रगतीचा रस्ता जातो ही कल्पना शंकास्पद आहे. शास्त्रज्ञांनी नवीन नवीन तंत्रांनी, नवीन नवीन वाणे तयार केली म्हणजे ती स्वीकारण्यापलीकडे शेतकऱ्यांना गत्यंतरच राहाणार नाही ही कल्पनाही भ्रामक आहे. शेती कारखानदारी पद्धतीने करण्याची पाश्चिमात्य आणि समाजवादी देशांतील कल्पना दिवसेंदिवस अनाकर्षक होत आहे. त्याऐवजी, निखळ विज्ञानावर आधारलेली नवीन शेती हळू हळू अंकुरत आहे. अशा शेतीच्या उत्पादनाला एक वेगळी आणि किफायतशीर बाजारपेठ तयार होत आहे. 'सीताशेती' हा या दिशेने सुरू केला एक प्रयोग आहे.

## शेतकरी खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्वागतास सज्ज

शेतकऱ्यांना बागुलबुवा दाखवून बुद्धिसंपदेची तस्करी करण्याचा कार्यक्रम चालविणे यापुढे शक्य होणार नाही. शेतकरी दोन्ही हात उभारून नव्या खुल्या अर्थव्यवस्थेचे स्वागत करायला सिद्ध झाला आहे. या खुल्या व्यवस्थेत काळ्या इंग्रजांनी आजपर्यंत वापरलेली सर्व शस्त्रे मोडून पडणार

आहे. त्यात आयातनिर्यातीवर बंधने नसतील. भांडवल खुले खेळेल आणि खऱ्याखुऱ्या बुद्धिमंतांच्या बुद्धिसंपदेवर डाका घालण्याची संधीही कुणाला मिळणार नाही.

**आता ठगगिरी चालणार नाही**

नव्या भगव्या 'स्वदेशी'चे पुरस्कर्ते खुल्या व्यापारावर बंधने आणू पाहातात; पण, बौद्धिक संपदेच्या चोरी-तस्करीवर मात्र कोणताही अडथळा येता कामा नये असे गुरकावून सांगतात. १९६८ साली सर्व यूरोपात अमेरिकन तंत्रज्ञानाचे रंगीत दूरदर्शनसंच येत होते. अशाही वेळी फ्रान्समध्ये रंगीत टीव्ही आला तर तो फ्रेंच तंत्रज्ञानानेच येईल असा आग्रह फ्रेंच राष्ट-ध्यक्ष जनरल द गॉल यांनी धरला. या आग्रहामागे एक स्वदेशप्रेम आणि स्वदेशनिष्ठा होती. भगव्या स्वदेशीमागे आणि डंकेल प्रस्तावाच्या विरोधकांमध्ये स्वदेशप्रेम नाही, स्वदेशियांच्या व्यापक आर्थिक हितसंबंधांची चिंताही नाही; त्यांचे उद्दिष्ट आहे, इंडियातील काळ्या इंग्रजांच्या ठगगिरीचे समर्थन.

(२१ ऑगस्ट १९९२)

# ५. नेहरूनीती विरुद्ध खुली अर्थव्यवस्था आणि शेतकरी आंदोलन

## कोणत्या आयातीला विरोध

फ्रान्समध्ये एकदा बीफ (गोमांस) महाग झाल्याने व इंग्लंडमधून बीफ स्वस्त किंमतीने आयात केले तेव्हा तेथील शेतकऱ्यांच्या मनात चीड उत्पन्न झाली. इंग्लंडमधील शेतकरी आपल्या हातातील बाजारपेठ हिसकावून घेताहेत म्हणून त्यांनी इंग्लंडहून आलेल्या बीफच्या ट-क फ्रान्सच्या रस्त्यांवर त्यांची टायर्स् पंक्चर करून बंद करून टाकल्या व त्यातील गोमांस सडू दिले. परदेशातून येणारा गहू थांबविण्यासाठी फ्रान्सच्या शेतकऱ्यांइतकी अतिरेकी भूमिकासुद्धा आम्ही घेत नाही आहोत. जर का आम्हाला हरभऱ्याची डाळ बनवायला किलोला १२ रु. खर्च येत असेल आणि ऑस्ट-ेलियाचे शेतकरी जर का ती डाळ ७/८ रुपयांमध्ये आम्हाला पुरवत असतील तर त्याची आयात झाली पाहिजे, कारण त्यात भारताच्या ग्राहकाचं कल्याण आहे. आम्हाला जर का डाळ नीट पिकविता येत नसेल, काही का कारणाने असो, तर मग डाळी-ऐवजी आम्ही दुसरं काही तरी पिकवू. म्हणजे, दुसऱ्या देशापेक्षा कमी खर्चात पिकवून कमी किंमतीत विकू शकू असं पीक घेऊ आणि डाळ पिकवणं बंद करू. खुल्या बाजारपेठेचा अर्थच मुळी असा आहे. आयातीला विरोध करतांना आपण डाळीच्या आयातीविषयी काही बोलत नाही, त्याचं कारण असं आहे की आम्ही भाकरी पिठलं खाणारे, डाळरोटी खाणारे पण आमच्याकरता डाळ पिकविण्याचं काम प्रामुख्यानं ऑस्ट-ेलियामध्येच होतं. नुकतेच ऑस्ट-ेलियाच्या राजदूतांनी दिल्लीमध्ये मोठा समारंभ घडवून आणला. हरभऱ्याच्या डाळीसाठी, 'हेडले' हा प्रसिद्ध क्रिकेटिअर होऊन गेला त्याच्या नावाने एक हरभऱ्याची जात त्यांनी हिंदुस्थानाकरिता मुद्दाम तयार केली. आणि ती डाळ तिथे बनवून हिंदुस्थानात निर्यात करण्याची त्यांची तयारी झाली आहे. तुम्ही आम्ही जे पिठलं खातो ते प्रामुख्याने ऑस्ट-ेलियातल्या डाळीचचं आहे. गेल्या वर्षीही तेच होतं, त्याच्या गेल्या वर्षीही तेच होतं. तेव्हा अशा तऱ्हेच्या आयातीला विरोध करण्याकरिता शेतकरी संघटना उभी नाही.

आम्ही कोणत्या आयातीला विरोध करतो? गव्हाच्या आयातीला. देशातील किंमत ठरवतांना सरकारने दर क्विंटलला २८० रुपये ठरवली. खुल्या

बाजारात त्याची किंमत तीनशे साडेतीनशे रुपये आहे. पण, परदेशातून खरेदी करतांना अमेरिकन शेतकऱ्याला दिलेली सबसिडी लक्षात घेऊनसुद्धा दर क्विंटलला ५८० रुपये देऊन गहू खरेदी केला जात असेल तर हे चुकीचे आहे. कारण हे खुल्या बाजारपेठेच्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे. अमेरिकेनं जर असं ठरवलं की हिंदुस्थानचे शेतकरी २८० रुपयात गहू विकतात तर आम्ही त्यांना दीडशे रुपयांत पाहिजे तितका गहू पिकवून देतो, तर आम्ही त्याचं स्वागत करू. कारण, या देशातल्या गरीबाचं त्यात कल्याण होईल. तुम्ही गहू पिकवायला लागा आम्ही गव्हाऐवजी द्राक्षं पिकवू. इस्रायलच्या शेतकऱ्यांचं उदाहरण असंच आहे. ते संत्री पिकवतात, द्राक्षं पिकवतात, फळफळावळ पिकवतात, सगळं काही पिकवतात पण गहू पिकवीत नाहीत. त्यांचं म्हणणं असं की आम्ही द्राक्षं पिकवू, संत्री पिकवू आणि निर्यात करून आलेल्या पैशातून गहू विकत घेऊन खाऊ. ते आम्हाला जास्त परवडतं. खरं सांगायचं तर हिंदुस्थानातल्या जमिनीचे जे तुकडे झालेत ते पाहाता अगदी पंजाबमध्येसुद्धा धान्य पिकवणे व्यवहार्य नाही. तेव्हा हिंदुस्थानला कुणी आमच्यापेक्षा कमी भावाने धान्य विकायला तयार असला तर आम्ही त्याचा विरोध करणार नाही.

आम्ही १९८० सालापासून हे मांडत आलो आहोत. मी त्यावेळी अमेरिकेतून आयात होणाऱ्या गव्हाला विरोध करीत होतो, पाकिस्तानातून येणाऱ्या कपाशीला विरोध करीत होतो. का करीत होतो? ''सीआयए म्हणजे अमेरिका, आपला शत्रू असे मानता ना? मग आमच्या पंजाबमधल्या देशभक्त शेतकऱ्यांनी, ज्यांनी पाकिस्तानापासून लढाईत देश तीनतीनदा वाचवला त्यांनी पिकविलेल्या गव्हाला जितका भाव देता त्याच्या दुपटीहूनही जास्त भाव या शत्रूच्या गव्हाला का देता? पाकिस्तान आमचा शत्रू ना? मग विदर्भाच्या शेतकऱ्याच्या कपाशीला जितका भाव देता त्याच्या दुप्पट भाव तुम्ही शत्रूच्या कपाशीला का देता? जर का तो आपल्यापेक्षा स्वस्त भावाने द्यायला तयार असेल तर मी त्याला खुल्या बाजारपेठेच्या तत्त्वज्ञानातून विरोध करणार नाही. तुम्ही या देशातल्या शेतकऱ्यांच्या कातडीच्या रंगाचे म्हणून त्यांनी पिकविलेला महाग माल खावा असे मी कधी म्हणणार नाही.'' खुल्या बाजारपेठेचा हा एक अर्थ स्पष्ट असावा म्हणून हा मुद्दा मी येथे मांडला.

**शेतकऱ्यांचे मित्र कोण? शत्रू कोण?**

खुल्या बाजारपेठेच्या व्यवस्थेत शेतकऱ्यांचे मित्र कोण? व्यापारी हे शतकऱ्यांचे मित्र की शत्रू? याही विषयावर शेतकरी संघटनेने ८० सालापासून निश्चित भूमिका घेतलेली आहे. त्यावेळी सगळे डावे लोक म्हणत असत की, 'शेतकऱ्याला भाव मिळत नाही याचं कारण व्यापारी. शेतकऱ्याला भाव मिळत नाही, ग्राहकाला फार किंमत मोजावी लागते याचं कारण, व्यापारी दोघांनाही लुटतो.' डाव्यांची ही भूमिका असली तरी ८० सालापासून आम्ही हे स्पष्ट केलेलं आहे की, व्यापारी हा शेतीमालाला भाव न मिळण्याचं कारण नाही. शेतकरी संघटनेच्या विचारसरणीत व्यापारी हा कुठं शत्रू नव्हताच. आजपर्यंतची शेतकरी आंदोलनाची सर्व प्रकाशनं तपासून पाहिली तर हे लक्षात येईल. एवढंच नव्हे तर, शेतीमालाला भाव मिळाल्यावर शेतकऱ्यांच्या हातात क्रयशक्ती येते आणि विकासाच्या चक्राला गती मिळते, व्यापाऱ्यांचा फायदा होतो हे जाणून गावोगावचे व्यापारी शेतकरी आंदोलनाच्या बाजूने उभे रहातात हे आम्ही अनुभवलं आहे.

पूर्वी मला अनेकदा लोकांनी म्हटलं आहे की, 'तुम्ही शेतकऱ्यांची बाजू मांडता पण त्याचबरोबर इतरांचेही प्रश्न मांडावेत. छोट्या उद्योजकांची फार वाईट स्थिती आहे, कारखानदारांचीही मोठी अडचण आहे, एक कारखाना काढायचा झाला तर दिल्लीला किती जणांसमोर जाऊन नाकं घासायला लागतात.' अगदी अलीकडे अलीकडे, शंतनुराव किर्लोस्करांसारखा मनुष्य म्हणाला की, ''खुली बाजारपेठ, खुली बाजार पेठ असा शासनाने डांगोरा पिटायला सुरुवात केली आहे; पण त्यांची खुली बाजारपेठ म्हणजे काय आहे? पूर्वी आम्हाला कारखाना काढतांना पंचवीस ठिकाणी जाऊन अर्ज करायला लागत होते, त्याच्या ऐवजी आता बावीस ठिकाणी अर्ज करायला लागतात. एवढाच फरक झाला.'' ८० साली सगळ्या लोकांना मी म्हणत होतो की, ''मला मान्य आहे की तुमचाही लढा व्हायला पाहिजे. माणसाला स्वतंत्र व्हायचं असेल तर त्याचा लढा फार व्यापक आहे. पण माझी धारणा अशी आहे की स्वातंत्र्याचा हा लढा लढवायचं काम आज शेतकरी करणार आहे. तुम्ही करणार नाही. कारण 'इंडिया'तला तुम्हाला जो काही थोडाफार मलिदा मिळतो त्याच्या मोहाने तुम्ही 'इंडिया' कडे झुकलेले राहाणार आहात.

खुल्या बाजारपेठेकरिता लढा लढविण्याची कळकळ, हितसंबंध हा शेतकऱ्याकडे असतो. म्हणून मी शेतकऱ्याला या स्वातंत्र्यलढ्याचा सैनिक मानतो.'' त्यामुळे कारखानदार काय किंवा छोटे उद्योजक काय, त्यावेळी या लढ्याचे सैनिक होऊ शकत नव्हते.

दुसरी एक महत्त्वाची गोष्ट समाजाला किमान शासन असावं. जितकं शासन जास्त तितका भ्रष्टाचार जास्त. Power corrupts, absolute power corrupts absolutely हे तत्त्वज्ञान शहरातल्या लोकांनी मांडलं पण त्याची खरी ओळख ही शेतकऱ्यांनाच होते. कशी? शेतकरी या तत्त्वज्ञानाच्या धगीत होरपळत आले आहेत. आर्थिक दुरवस्थेत ठेवल्या गेलेल्या शेतकऱ्याला सातबाराच्या उताऱ्यापासून ते बँकेचे कर्ज मिळविण्यापर्यंत, उसाच्या तोडीपासून ते बिलाची रक्कम हातात मिळेपर्यंत अशा अनेक प्रसंगी या शासनाच्या भ्रष्टाचाराने पूर्ण नागवून टाकले. सरकारी पकड कमी व्हावी आणि स्वतंत्रपणे जगायला मिळावं याच्यामध्ये व्यापारी हाच शेतकऱ्याचा खरा पाठीराखा आहे. ८४ साली विश्वनाथ प्रताप सिंगांनी राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली एका तऱ्हेने खुल्या बाजारपेठेच्या व्यवस्थेला सुरुवात केली. त्यावेळी आम्ही त्यांना सांगितले की, 'ही खुली व्यवस्था कारखानदारांपुढे कशाला टाकताय? गाढवापुढे गूळ टाकून फायदा काय? ज्या कारखानदारांपुढे तुम्ही हा गूळ ठेवता आहात त्यांना त्याची चव नाही; त्यांना लायसन्स-परमीट व्यवस्थेतून मिळणाऱ्या फायद्याची फक्त चव आहे. खुल्या बाजरपेठेप्रमाणे जर का उत्पादकाला प्रोत्साहन दिलं, उत्तेजन दिलं तर तो काय चमत्कार करून दाखवतो हे पहायचं असेल तर ते शेतकऱ्याला देऊन पाहा आणि तीन वर्षांत देशात चमत्कार होतो किंवा नाही ते पहा.'

हे आम्ही पहिल्यापासून मांडलं. त्याबरोबर हेही म्हटलं होतं की, ''आज व्यापारी आमच्या बाजूने उभे राहातील असं दिसत नाही म्हणून मी शेतकऱ्याच्या पोटी न जन्मलेला, स्वित्झर्लंडहून आलेला शेतकऱ्यांच्या बाजूने उभा राहिलो. याचं कारण ही जी क्रांती व्हायची आहे या क्रांतीचा प्रणेता शेतकरीच असू शकतो याची मला खात्री आहे.''

**व्यापक लढ्याची आवश्यकता**

आणि १९९० साली शेतकऱ्यांनी जो लढा एकट्याने लढवायचा तो

कालखंड संपला आहे. आता तो एकटा लढवायला जाईल तर ते जमणार नाही, अशी जाणीव झाल्यानंतर त्या लढ्याचं जास्त व्यापक स्वरूप होणं भाग आहे. हे स्वरूप आम्ही कधी लपविलेलं नव्हतं, पहिल्यापासून ते मांडत आलो होतो. फक्त सुरुवातीला इतकंच म्हटलं की, ''कार्यक्रम हा शेतकऱ्याला मनुष्य म्हणून जगण्याचा आहे पण, त्याचा आता कार्यक्रम काय, तर शेतीमालाला भाव. तुम्ही आमच्या शेतीमालाच्या भावामध्ये हात घालू नका, मग आम्ही तुमच्याकडे काहीच मागायला येणार नाही; दुष्काळात उपाशी मेलो तरी मागायला येणार नाही.'' ही शेतकरी संघटनेची भूमिका होती. हे खुल्या अर्थव्यवस्थेचे तत्त्वज्ञान आहे.

**परिस्थितीनुसार डावपेच**

फक्त याच्यात एक डावपेच आम्ही लढवला. ८० साली जेव्हा आम्ही प्रचार करीत फिरायचो तेव्हा वेगवेगळे मार्क्सवादी, कुणी सीताबर्डीचा माऊ त्से तुंग तर कोणी मोदी बागेतला लेनीन असे सगळे म्हणत की, 'शेतकरी संघटनेचे नेते हे सगळे मोठ्या जमीनदारांचे पुढारी आहेत. ते कसलं शेतकऱ्याचं काम करणार?' तेव्हा आम्ही युक्तिवाद त्यावेळी असा केला की, ''तुम्हाला नियोजनाची व्यवस्था पाहिजे का खुल्या बाजारपेठेची व्यवस्था पाहिजे ते तुमचं तुम्ही निवडा. पण, नियोजनाची व्यवस्था करायची असेल तर पुरं नियोजन करा. मग, दुष्काळाच्या काळात आम्ही तुम्हाला लेव्ही घालू आणि मुबलकतेच्या काळात तुम्ही आम्हाला भाव बांधून द्या. नाही तर, खुली व्यवस्था द्या. दुष्काळात आम्हाला मरू द्या आणि जेव्हा जास्त पिकेल तेव्हा आमची आम्हाला काय मजा करायची असेल ती करू द्या. कोणती तरी एक व्यवस्था करा.''

फक्त एवढा दुट्टपीपणा आम्ही ८० साली केला. एरवी, आमच्या साहित्यातून सरकारी व्यवस्थेचा निषेध हा पहिल्यापासून सातत्याने सापडेल. आणि जो जो उद्योजक आहे त्या त्या उद्योजकाचा आणि आम्हा शेतकऱ्यांचा काही तरी आतड्याचा संबंध आहे हेसुद्धा आम्ही स्पष्ट केलं आहे. त्यामुळे, व्यापारी म्हणून कुणाला दूर ठेवण्याची आम्हाला आवश्यकता नाही. एवढंच नव्हे तर, उद्योजक म्हणून कुणाला दूर ठेवण्याचं कारण नाही.

**नेहरूनीतीविरोधाची परंपरा**

शेतकरी संघटनेची ही जशी खुल्या बाजारपेठेच्या पुरस्काराची परंपरा आहे तशीच नेहरूवादाला विरोधाचीही एक परंपरा आहे.

एक गोष्ट खरी आहे. एके काळी पंडित नेहरू, त्यांचं ते दिसणं, त्याचं ते रूप आणि त्यांचा तो गुलाब असं पाहिल्यानंतर त्यांच्यावर लट्टू झालेली जी तरूण पिढी होती त्या तरूण पिढीचा मीही एक सदस्य होतो. आज मला हे कबूल करतांना शरम वाटते. कारण, ज्यावेळी नेहरूव्यवस्थेवर टीका झाली आणि असं पहिल्यांदा म्हटलं गेलं की हे नियोजन नाही, ही लायसन्स-परमीट व्यवस्था आहे, तुम्ही नोकरशाही तयार करता आहात तेव्हा असं म्हणणारांना आम्ही मूर्खात काढत होतो. बोलणारी माणसं काही साधीसुधी नव्हती. त्यांच्यात, त्यागच मोजायचा झाला तर नेहरूंपेक्षा कित्येक पटीने त्याग केलेला चक्रवर्ती राजगोपालाचारीसारखा मनुष्य होता. मला आज वाईट वाटतं आहे की, त्यावेळी आम्ही असं समजलो की चक्रवर्ती राजगोपालाचारी म्हणजे भांडवलदारांचे हस्तक आहेत; ए. डी. गोरवाला हे तर भांडवलदारांचेच, का तर, आय्. सी. एस्. मधून रिटायर झालेले, कन्हैयालाल मुन्शी हे तर उजव्या बाजूचे; प्रा. रंगा हे काही शेतकऱ्यांचे नेते नाहीतच; मिनू मसानी - समजावादावर पुस्तक लिहून प्रसिद्ध झालेले - पण, ज्या अर्थी टाटांच्या नोकरीत होते त्याअर्थी ते लोकांचं कल्याण करणारे असूच शकत नाहीत. म्हणून आम्ही, ही मंडळी नेहरूंचं चुकतं आहे असं ठासून मांडत असतांनासुद्धा नेहरू आणि त्यांच्या समाजवादाचा जयजयकार केला.

पण, ही गतकालातील चूक, कुठंतरी सुधारायला सुरुवात केली पाहिजे की नाही? चूक होऊन गेली, ती कबूलही करतो आम्ही. पण, नेहरूवादाला विरोध करणारा पहिला झेंडा, लायसन्स-परमिट राज्याला विरोध करण्याचा पहिला झेंडा हा चक्रवर्ती राजगोपालाचारींच्या नेतृत्वाखाली 'स्वतंत्र पक्ष' या नावाने उभारला गेला. त्याला यश मिळालं नाही. कारण, सगळ्यांनी या प्रयत्नाला मूर्खपणाचे नाव दिले. 'स्वतंत्र पक्षा'चे कागदपत्र तपासून पाहिले तर असे दिसून येते की जेव्हां पंडित नेहरू जमिनीच्या वाटपाचे कार्यक्रम मांडत होते, सीलिंग ॲक्टच्या गोष्टी करीत होते, सामूहिक शेतीचा प्रयोग मांडत होते त्यावेळी 'स्वतंत्र पक्षा'चे लोक कळवळून सांगत होते की, ''हा प्रश्न

जमीनवाटपाचा नाही. जमीनवाटप करून हा प्रश्न सुटणार नाही. सामूहिक शेतीकरून कुणाचं कल्याण झालं नाही. भारतातला शेतकरी कष्टाळू आहे. त्याला चांगलं जगण्याची थोडी आशा दाखवा मग तो शेती चांगली करून दाखवेल.' पण, असं म्हणणाऱ्या लोकांना आम्ही लोकविरोधी समजलो आणि केवळ छातीवर गुलाब लावतात म्हणून आणि गोरेपान दिसतात म्हणून काही राजबिंड्याचं कौतुक केलं.

चूक उमगल्यावर ती आम्ही लपवून ठेवली नाही. उलट, उघड उघड नेहरूवादाचा विरोध केला. आम्ही काही नेहरूवादाचा विरोध आज सुरू केला नाही. माझ्या ८०/८५ सालांतील लेखांमध्ये नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्यावर टीका करतांना राजबिंडे हा शब्द वापरलेला आढळेल. फक्त, मी टीका करतांना संयम वापरला. त्यांच्यावर टीका करतांना कधी, इतर मंडळी त्यांच्या वैयक्तिक चारित्र्याविषयी चर्चा करतात तशी चर्चा केली नाही. आपलं हे आंदोलन चालू झाल्यानंतर काहींनी मला त्यांच्या वैयक्तिक चारित्र्याविषयी माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला. पण, आम्ही जो काही विरोध करतो आहोत ते नेहरूंच्या सार्वजनिक धोरणांना करतो आहोत. त्यामुळे, ते वैयक्तिक बाबतीत कसे होते याची चर्चा करण्याचा प्रश्नच येत नाही. हा लढा धोरणाचा आहे. नेहरूंचे पुतळे जे उभे आहेत ते नेहरू काही एखाद्या सिनेनटापेक्षा चांगले दिसतात म्हणून उभे नाहीत, नेहरूंचे पुतळे उभे आहेत ते त्यांच्या धोरणाचं प्रतिक म्हणून उभे आहेत.

**नेहरूनीतीला विरोध करणार कोण?**

मग, या विरोधाला टोक आणयचं असेल तर काय करायला पाहिजे? एका बाजूला देशाचं दिवाळं वाजलं आहे. देशाला बाहेरची कर्जं फेडता येत नाहीत, देशातली कर्ज फेडता येत नाहीत. सर्वजण मान्य करतात की नेहरूवादी नियोजनामुळे हे झालं. अगदी, पी. व्ही. नरसिंह राव, मनमोहनसिंग म्हणतात की गेल्या चाळीस वर्षांतली दिशा आपल्याला बदलायला पाहिजे. टग्यांचे निगरगट्ट पुढारीसुद्धा म्हणू लागले आहेत की चाळीस वर्षं आमची चूक झाली. पण, कुणी असं म्हणायला तयार नाही की ही चूक झाली ती नेहरूंच्या धोरणाची. याचं कारण काय? नेहरू घराण्याचा दबदबा इतका आहे की दिल्लीतल्या '१०, जनपथ' मध्ये नेहरू घराण्याच्या वारसांनी जरा खूण केली

तरी चारपाच काँग्रेसवाले असे गदारोळ करतील की पी. व्ही. नरसिंहरावना तिथं खुर्चीवर बसणं अशक्य होईल.

मग, नेहरूनियोजनाला तात्त्विक विरोध करणाऱ्या माणसांची तो विरोध जाहीरपणे मांडण्याची जबाबदारी रहाते. नेहरूंनी गांधीविचाराला - ग्रामअधिष्ठित अर्थव्यवस्थेला लेखी विरोध केलेला आहे. त्यांनी तो अंमलात आणून दाखवला आहे. आणि तो अंमलात आणून दाखवितांना जो नांगर चालवला तो शेतकऱ्यांच्या घरावर चालला. त्या धोरणाचे शेतकरी बळी ठरले. चीड कशाची यायची आणि कशाची येऊ द्यायची नाही? आपल्या देशातल्या समाजवाद्यांची नेहरूविषयीच्या कौतुकामागची भावना वेगळी आहे. शेतकऱ्यांचे दु:ख ज्याच्या आतड्यापर्यंत पोहाचलं आहे त्याला नेहरूंच्या गुलाबाचं कौतुक वाटता कामा नये. ज्यांना नेहरू धोरणाला विरोध करणे अजूनही रास्त वाटत नाही त्यांच्या आतड्यापर्यंत हे दु:ख पोहोचलं आहे किंवा नाही ही शंका आहे. दहा वर्षे आम्ही लढाई केली आणि नेहरूंच्या आर्थिक नियोजनाच्या पद्धतीमुळे देशाचं वाटोळं झालं हे सिद्ध केलं. आणि तरीसुद्धा नेहरूघराणेशाहीमुळे भीती वाटून, चूक झाली ती नेहरूधोरणाची झाली हे म्हणण्याइतकी बौद्धिक प्रामाणिकता जर सुशिक्षितांकडे नसेल तर सुशिक्षितांना बौद्धिक प्रामाणिकपणा शिकविण्याचं काम अशिक्षित, अडाणी शेतकऱ्यांना करायला पाहिजे.

नेहरूवादाचा किंवा नेहरूंचा विरोध हा काही शेतकरी संघटनेने पहिल्यांदा मांडलेला मुद्दा नाही. आजपर्यंत जे काही आम्ही लिहिलं आहे ते वाचलं किंवा आजपर्यंत बोललेलं ऐकल्याचं आठवलं तरी हे लक्षात येईल. आणि आता जर का नेहरूवादाच्या विरोधाला टोक आणण्याचं काम केलं नाही तर काय दहा वर्षांनी करायचं?

दहा वर्षांनी या गतीने सर्व संपलेलं असेल. या विरोधाला जर टोक आणायचं असेल, नेहरूवादी पद्धती का खुली बाजारपेठ याचा निकाल लावायचा असेल, तर ती वेळ आज आहे. रशियन तथाकथित समाजवादी साम्राज्य कोलमडलं आहे. आणि त्या आधाराआधाराने राहाणारे तिसऱ्या जगातील टिनपाट नियोजक, हौशी नियोजक - रशियातल्या लोकांनी व्यावसायिकरित्या शास्त्रशुद्ध पद्धतीने नियोजन करण्याचा प्रयत्न तरी केला –

हे तर हौशेगवशेनवशे नियोजक. रशियातला नियोजनाचा जनक गेल्यावर जर तुम्ही या नियोजनाची पाळंमुळं हिंदुस्थानातून उखडून काढली नाही तर तुम्हाला पुन्हा कधी तसा मोका मिळणार नाही.

ही मांडणी लेखांमधून केल्यानंतर शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी ३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर १९९२ या काळात या मांडणीच्या कच्च्या अभ्यासावर नेहरूनीती पुतळ्याच्या दहनाचा कार्यक्रम, काहीसा हात राखून केला याच्याबद्दल माझ्या मनात काही राग नाही. उलट, ही प्राथमिक परीक्षा झाली. जसं, एखादं इंजेक्शन एखाद्या रोग्याला दिल्यावर त्याला ते सोसेल की नाही हे पडताळण्यासाठी डॉक्टर त्या इंजेक्शनचा आधी बारीकसा डोस देऊन पाहातात तसं हे पहिलं बारीकसं इंजेक्शन झालं. आता दुसरं इंजेक्शन द्यायचं किंवा नाही हे बघा. पण, नेहरूवाद संपला आहे, आता नेहरूवादाचं भूत गाडून टाकायला पाहिजे अशा आशयाचा तो लेख लिहिल्यानंतर माझ्या मनात आशा वाटली होती की शेतकरी संघटनेच्या गेल्या दहा वर्षातील नेहरूवादाविरोधाच्या परंपरेचा परिणाम म्हणून शेतकऱ्याचं एखादं तरी पोरगं उठेल आणि 'पागल' पणा करून दाखवेल. माझी आशा फोल ठरली.

आता प्रश्न उरतो तो म्हणजे नेहरूवादाच्या विरोधात राजकीय आघाडी उभी करायची का आणखी काय करायचे? आघाडी उभी करायची तरी कशी करणार? एक धडा आपल्याला, सुरुवातीला 'स्वतंत्र पक्षा' ने जो प्रयत्न केला त्यापासून मिळतो. खुल्याबाजारपेठेच्या बाजूने कोण आहे, विरुद्ध कोण आहे?

**प्रशासन : झारीतील शुक्राचार्य**

हिंदुस्थानामध्ये नेहरूवादाने खरं कौतुक आणि कल्याण कोणाचं केलं असेल तर ते नोकरदाराचं. आज पी. व्ही. नरसिंहराव सरकार समोर सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न कोणता आहे? तुम्ही खुल्या बाजारपेठेविषयी बोला खूप, निर्यातीविषयी बोला खूप, पण हिंदुस्थानला निर्यात करणं शक्य नाही. याचं कारण कारखानदारांची अकार्यक्षमता तर आहेच, पण सगळ्यात अडथळा कोणता असेल तर तो देशाच्या प्रशासनाचा आहे. कोणत्याही कारखानदाराला विचारलं तर तो म्हणेल की निर्यातीआड सगळ्यात मोठी डोकेदुखी प्रशासन हलविण्यात आहे. प्रशासनाचं जोपर्यंत विसर्जन होत नाही तोपर्यंत या देशातले

उद्योजक हे कार्यक्षम होऊ शकत नाहीत. मी एक वाक्य नेहमी वापरलं आहे की देशामध्ये नवा एखादा पंतप्रधान आला आणि तो देशाचं कल्याण करेल किंवा नाही असा प्रश्न पडला तर त्यासाठी एक फूटपट्टी तयार आहे. जो पंतप्रधान पंतप्रधान झाल्यानंतर सरकारी नोकरशाहीची चौकट मोडू शकत नाही, एकदा नोकरीला लागलं की कसंही काम करा, पंचावन्नाव्या वर्षी निवृत्त होईपर्यंत नोकरीला धक्का नाही ही व्यवस्था मोडू शकत नाही, तो या देशाचं कल्याण करू शकत नाही. नोकरदारांना घ्यायचं असेल तर पाच वर्षाच्या बोलीने लावून घ्या. पाच वर्षांनंतर त्याला पुन्हा नोकरीवर ठेवायचं किंवा नाही हे त्याने पाच वर्षात केलेल्या कामावर ठरेल आणि त्याप्रमाणे त्याचा पुढचा पगार ठरेल. कोणत्यातरी कमिशनने सांगितलं म्हणून तीन हजार पाचशे ते नऊ हजार आठशे आणि इन्क्रिमेंट इतकी ठरलेली, आणि त्यावर महागाई भत्ता आणि निवृत्तीनंतर पेन्शन इतकी, अशी व्यवस्था आहे तोपर्यंत देशाचं भलं होऊ शकत नाही. हे नोकरदार शेतकऱ्यांच्या बाजूने येणे शक्य नाही. आणि त्यांचीच आज सरकारला सगळ्यात मोठी धास्ती आहे. म्हणजे, पी. व्ही. नरसिंह राव सरकारला जर त्यांच्या मनामध्ये खुल्या बाजारपेठेकडे जायचे असेल तर अडथळे कोणते? एक, दहा जनपथमधील नेहरूघराणेशाही. दुसरी अडचण, नोकरदार. जर का खुल्या बाजारपेठेची व्यवस्था राबवायला सुरुवात केली तर मंत्रालयातली एक फाईल इकडची तिकडे हलणार नाही. पुन्हा, या मंत्र्यांनी जी काही प्रकरणे पूर्वी केली असतील त्यांचे पुरावे या नोकरदारांच्या हाती आहेत, त्यामुळे त्यांना नाराज करण्याचं धारिष्ट्य या सरकारकडे नाही. त्यामुळे, एका बाजूने नोकरदारांचा दबाव, दुसऱ्या बाजूला राजकीय दबाव आणि त्याबरोबरच उलट्या बाजूला आंतरराष्ट-ीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेचा दबाव आणि त्यात भर टाकण्याकरिता आणखी एखादा दबाव तयार झाला तर तिथे कुणी पंतप्रधानाच्या जागेवर जाऊन येत्या दहा वर्षात काही बदल होईल हे शक्य वाटत नाही. तरीही जे कोणी त्या जागेवर येतील त्यांना इकडं तिकडं वाकवता कसं येईल हे पाहिलं पाहिजे.

**संधी हुकता नये**

हे करण्यासाठी 'स्वतंत्र पक्षा'च्या पद्धतीची एक आघाडी उघडली जाऊ शकते. स्वतंत्र पक्ष अपयशी झाला याचं एक फार महत्त्वाचं कारण

आहे. त्यांची मांडणी बरोबर होती, त्यांचं लिखाण बरोबर होतं, त्यांचा कार्यक्रम बरोबर होता, त्यांचं तत्त्वज्ञान बरोबर होतं पण त्यांच्यासमोर अडथळा होता तो नेहरूघराण्याच्या भक्तीचा आणि त्यातून निर्माण झालेल्या लायसेन्सूपरमीट नेहरूधोरणाचा. त्यामुळे तो प्रयोग फसला. या जुन्या प्रयोगाचा पुरस्कार करायचा असला तर करा किंवा नका करू, पण उद्योजकांना आपली मागणी पुढे मांडण्याची संधी मिळालेली आहे. आणि ही जर संधी साधली गेली तर मग शेतकऱ्याची बदलेली जी भूमिका आहे तिचा सन्मान झाला असं होईल. आम्ही इतके दिवस डाव्यांच्या बरोबर जात होतो. कारण ते लढायला तयार होते. व्यापारी लढायला तयार नव्हते. आणि लोकांना आम्ही त्यावेळी काय म्हणत होतो? शेतकरी आणि मजूर यांत काय फरक आहे? शेतकऱ्यांकडे फक्त जमीन आहे एवढंच की नाही? पण, आम्हाला वेतनसुद्धा पुरसं मिळत नाही.

**शेतकरी : स्वनियुक्त उद्योजक**

शेगावपासून आम्ही ही भूमिका सोडून देतो आहोत. शेगावपासून शेतकरी हा उद्योजक आहे, स्वनियुक्त (Self employeed). त्याची निश्चित पगाराची मागणी नाही. तर, स्पर्धा करून, बाजारात उतरून स्वतंत्रपणे क्षणाक्षणाने, कणाकणाने जगण्याची इच्छा असलेला असा हा उद्योजक शेतकरी आहे. असे जे जे उद्योजक असतील ते ते आमचे मित्र आहेत. आणि सकाळी १० वाजल्यापासून ५ वाजेपर्यंत टेबलापाशी बसून चौदा कप चहा पिऊन एक तारखेला पगार मिळाला पाहिजे, त्यानंतर महागाईभत्ता मिळाला पाहिजे, दर सुट्टीमध्ये घरी किंवा ट-ीपला जायला प्रवासभत्ता मिळाला पाहिजे आणि निवृत्त झाल्यानंतर पेन्शन मिळायला पाहिजे असं म्हणणारा मनुष्य आमचाच नव्हे तर देशाचा शत्रू आहे. ही भूमिका मांडण्याचं नेतृत्व तुम्ही शेतकरी कार्यकर्ते घेत असाल तर शेतकरी आंदोलनाची भूमिका तुम्ही खऱ्या अर्थाने बजावता आहात असं म्हणता येईल.

नाही तर काय होईल? डॉन क्विग्झोट सारखं किंवा ऐतिहासिक बहुरूप्यांसारखं होईल. जुनी इतिहासातली पुस्तकं वाचायची किंवा शिवाजीवरची पुस्तकं वाचायची आणि शौर्य गाजवायला निघायचं म्हणजे शिवाजीसारखं चिलखत आणि जिरेटोप घालून घोड्यावरून निघायचं आणि

समजायचं की आता आपण इतिहास घडवतो. शिवाजी दोन वेळा त्याच वेशात कधी पृथ्वीवर येत नाही. प्रत्येक वेळी येतो, त्यावेळी त्याचा वेश नवा असतो. या नव्या वेशामध्ये यायची जर का तुमची तयारी असली तर शेतकरी संघटनेची भूमिका तुम्ही पार पाडू शकाल.

**आंदोलन कशासाठी**

खुल्या बाजारपेठेच्या पुरस्काराची मांडणी करीत असतानाच शेतकरी संघटना आंदोलनात्मक कार्यक्रमाचे दोन निर्णय घेत आहे. पण, हे निर्णय या भूमिकेशी विसंगत नाहीत हे स्पष्ट करणे आवश्यक आहे.

ज्या लोकांनी शेतकरी आंदोलनाला नेहमी विरोध केला, ज्या लोकांनी शेतकरी आंदोलनाचा द्वेष केला, ज्या लोकांनी एस्. आर. पी. ला वायरलेसवरून आंदोलक शेतकऱ्यांच्या हालचालींची माहिती पुरवली ती मंडळी आता झेंडे घेऊन खत भाववाढ रद्द झालीच पाहिजे, विजेची दरवाढ बंद झालीच पाहिजे अशा घोषणा देतात. एवढंच नव्हे तर, शेतकऱ्यांचे नेते शरद जोशी कुठे गेले आहेत अशी भाषणं देत आहेत. ही मंडळी कोण आहेत? ही मंडळी प्रामुख्याने कॉँग्रेसमधली आहेत. कोण्या एका कृषि उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष, फलाण्या खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष ही सगळी मंडळी आता बाहेर पडली आहेत. कारण, मनमोहनसिंगाना जरी समजलं नाही की हा शेतकऱ्यांचा चाप त्यांना कुठं बसतो आहे, तरी या मंडळींना हा चाप कळायला लागला आहे. नेहरूव्यवस्थेमध्ये शेतीमालाला भाव नसतांनासुद्धा ज्या पुढाऱ्यांनी आपलं भलं करून घेतलं त्या पुढाऱ्यांना आता भलं करून घेता येणं शक्य राहिलं नाही. या दुःखानं ती मंडळी ओरडायला लागली आहेत. ही गावगन्ना कृषिउत्पन्न बाजार समिती आणि खरेदी विक्रीसंघाची माणसं ओरडायला लागली आहेत कारण, खुल्या बाजारपेठेचा चाप त्यांना बसायला लागला आहे. परवा पंतप्रधानांना शेतकऱ्यांचं एक शिष्टमंडळ भेटायला गेलं होतं. त्यातल्या लोकांची नावंसुद्धा याआधी कधी ऐकायला मिळाली नव्हती. पण, पंतप्रधानांनी त्यांना भेट दिली, मुलाखतीचं दृष्य टेलिव्हिजनवर तीनतीनदा दाखवलं. आणि वर प्रत्येकाला दोन हजार रुपयांची दक्षिणा देऊन त्यांना पंतप्रधानांनी पाठविलं. याचं कारण असं की शेतकऱ्यांच्या नावाने एक पर्यायी शक्ती उभी करण्याचा प्रयत्न होऊ लागला

आहे. जसं, जॉर्ज फर्नांडिस आता शेतमजुरांच्या कळवळ्यानं बोलू लागले आहेत तसं शेतकऱ्यांचा कधीही कळवळा नसलेली मंडळी ही आता अशा तऱ्हेचे प्रश्न घेऊन उठून उभे राहायला लागलेली आहेत.

आपण आता बोलायला पाहिजे की, खताचा भाव वाढला हे खरं तर चांगलं झालं. मी त्याच्यापुढं जाऊन असंही म्हणतो की गेल्यावेळी तीसच टक्के वाढला, यावेळी आणखी तीस टक्के वाढायला पाहिजे होता. पण, आपण बोलत काही नाही. फक्त लेख लिहितो. पत्रकारांनासुद्धा आपली भूमिका कळत नाही. पण आम्ही या विषयावर बोलत नाही म्हणून आमंच अस्तित्वच नाही असा कुणाचा गैरसमज होऊ नये. म्हणून, आंदोलन करायची आवश्यकता आहे. म्हणून ते करायचं. देशात गव्हाचं उत्पादन मुबलक झाले हे मलाही माहीत आहे. पण, यंदा गहू आणतील. पुढच्या वषी गहू आणायला पैसे कोठून आणतील? पुढच्या वर्षी सरकार कोंडीत सापडेलच ना? पण, शेतकरी संघटनेने गहू उतरविणाऱ्या बंदराच्या नाकेबंदीचा आणि मंत्र्यांना गावबंदीचा कार्यक्रम जो जाहीर केला आहे त्यात सूट-सबसिडीचा शोध घेण्याऱ्या शेतकऱ्यांची नाही, तर खुल्या व्यवस्थेमध्ये मनुष्य म्हणून सन्मानाने जगू इच्छिणाऱ्या उद्योजक शेतकऱ्यांची संघटना काय मागते हे स्पष्ट होण्याकरिता आपल्याला ही आंदोलनं घेणं आवश्यक आहे.

गावबंदीचा कार्यक्रम तर सोपाच आहे. मंत्र्याला झेंडे दाखवायला शेतकरी आनंदाने तयार होतील. आणि नाकेबंदीमागची भूमिका शेतकऱ्यांच्या पुढे मांडा, ते गव्हाचा दाणा बंदरात उतरू देणार नाहीत.

(२१ ऑक्टोबर १९९२)

# ६. डंकेल, उद्यमी शेतकरी आणि  बांडगूळ बिगर शेतकरी

**सर्वदूर बंदिस्त व्यवस्था**

खुल्या अर्थव्यवस्थेकडे देश चालला आहे की नाही ते जसं आपण पाहातो तसंच आपल्याला जग खुल्या अर्थव्यवस्थेकडे चाललंय की नाही हे पाहिले पाहिजे.

नेहरूव्यवस्थेने देशाचे छोटे छोटे कप्पे चाळीसपन्नास वर्षांपूर्वी केले. सगळ्या जगाचे कप्पे पहिल्या महायुद्धापासून पडलेले आहेत. प्रत्येक देशाने खुला व्यापार करायच्या ऐवजी आपापल्या देशातल्या लोकांचं संरक्षण करण्याकरिता आयातीवर निर्बंध घालायचे आणि निर्यातीना उत्तेजन द्यायचं अशा तऱ्हेची धोरणं आखल्यामुळे गेल्या पन्नास वर्षांमध्ये खुला व्यापार, खुली अर्थव्यवस्था किंवा बळीराज्य नावाची गोष्ट सगळ्या जगातच संपून गेली. दुसऱ्या महायुद्धानंतरही ती कुठे नव्हती. जेव्हा संयुक्त राष्ट-संघ (युनो) तयार झाला त्यावेळी एक कल्पना अशी होती की आता युद्ध संपलं, मग पन्नास वर्षांपूर्वी जगात जसा खुला व्यापार चालू होता तसा पुन्हा एकदा सुरू व्हावा. अशी अनेक देशांची इच्छा होती. यूनोच्या स्थापनेच्या वेळी खरी कल्पना अशी होती की आंतरराष्ट-ीय व्यापार संघ नावाची एक मोठी संस्था स्थापावी आणि त्याने सगळ्या जगामध्ये खुला व्यापार चालेल अशी व्यवस्था करावी. International Trade Organisation असं त्या संस्थेचं नाव ठेवायचं होतं, पण त्या संस्थेचं बारसं व्हायच्या आधीच ती मृत झाली. कोणत्याही देशाची खुल्या व्यापाराकडे जाण्याची निदान त्यावेळी तरी मन:स्थिती नव्हती. ज्या त्या देशामध्ये लोकांना सरकारकडून संरक्षण घेऊन आपला कामधंदा, व्यवसाय चालविण्याची सवय झालेली होती. आज हिदुस्थानातले कारखानदार जसं, आम्हाला असलेलं संरक्षण तुम्ही कमी करू नका म्हणतात, फ्रान्समधले शेतकरीसुद्धा आज असंच म्हणतात तसंच त्यावेळी ज्यांना ज्यांना संरक्षणाची सवय झालेली होती ते काही संरक्षण सोडून द्यायला तयार नव्हते. तेव्हा, अशा प्रकारचा खुला व्यापार जगामध्ये लवकर सुरू होईल असं काही वाटत नव्हतं. मग, संयुक्त राष्ट-संघाचं कामच मुळी असं ठरलं की जिथे समझोता होण्याची शक्यता नसते तिथे सर्व संबंधित लोकांना बोलवायचे, त्यांची मनधरणी करून एकत्र बसवायचं आणि जे बोलायला तयार नाहीत त्यांना एकमेकांशी बोलायला

लावून काहीतरी तह घडवून आणायचा.

**बंदिस्तांच्या वाटाघाटी**

गेली चाळीसपंचेचाळीस वर्षे GATTच्या माध्यमातून, खुला व्यापार चालू व्हावा या करिता अशा तऱ्हेची बोलणी चालू होती. फारसं यश काही त्याला आलं नाही. १९८६ सालापासून उरुग्वे नावाच्या दक्षिण अमेरिकेतल्या देशामध्ये पुन्हा एकदा बोलणी चालू झाली. सहाव्यांदा बोलणी चालू झाली. आणि ही वाटाघाटीची सहावी फेरी गेली सात वर्षे चालू आहे. या वाटाघाटीमध्ये साधारणत: काय होतं? या वाटाघाटींमध्ये एकशे आठ देशांचे प्रतिनिधी असतात. ते बोलतात, सात वेगवेगळ्या भाषांमध्ये, त्यांची भाषांतरं करून एकमेकांना सांगावी लागतात. प्रत्येकजण भाषणाच्या सुरूवातीला सगळ्या जगामध्ये खुली अर्थव्यवस्था तयार व्हायला पाहिजे, अशा तऱ्हेच्या खुल्या अर्थव्यवस्थेला आमच्या देशाचा पाठिंबा, त्याकरिता काय वाटेल ते प्रयत्न करायला आम्ही तयार आहोत वगैरे वगैरे बोलतात. आणि नंतर 'पण....' असं म्हणून आपापल्या देशाच्या ज्या काही अडचणी आहेत त्या सांगायला सुरुवात करतात. हिंदुस्थानसारखा देश असं म्हणतो की, ''खुली अर्थव्यवस्था यायला पाहिजे हे आम्हाला मान्य आहे. पण, गरीब देश जे स्वत:चा विकास करू पाहातात त्यांच्या सार्वभौम हक्काला काही बाधा येणार नाही अशी व्यवस्था पाहिजे.'' म्हणजे खुली अर्थव्यवस्था म्हणा पण त्या नावाखाली संपूर्ण बंदिस्त व्यवस्था चालू ठेवण्याची मुभा आम्हाला द्या. प्रत्येक देशाला असं वाटतं की सगळ्या देशामध्ये एक तह तर व्हावा पण त्या तहाने आपल्या देशामध्ये जी परिस्थिती आहे ती सगळ्यांनी मान्य करावी. जसं, समान नागरी कायद्याबद्दल आपल्या देशातील सर्व धर्मियांना वाटतं की आपल्या धर्मातील कायदा हा सगळ्यांना लागू झाला तर तो समान नागरी कायदा, तसं या जागतिक तहासंबंधी सर्व देशांची भूमिका आहे. आमच्या देशातील आहे ती परिस्थिती सगळ्यांनी मान्य करावी असा १०८ जणांनी हट्ट धरला तर शेवटी तडजोड व्हायची कशी? मग, संयुक्त राष्ट- संघात एक पद्धत अशी आहे की लोकांना बोलबोल बोलू देतात. सगळ्यांचं बोलून झालं की तिथला जो मोठा बाबू म्हणजे सेक्रेटरी जनरल, त्याला सांगतात, सर्वसाधारणपणे सर्वांना मान्य होईल असा काही तरी एक मसुदा तयार करा - तो लोकांपुढे ठेवू. कसा काय दिसतो बघू. आणि जर लोक अगदीच ऐकायला तयार नसले तर मग तो मसूदा लोकांसमोर

ठेवतांना थोडासा बडगा दाखवला जातो की, 'या वाटाघाटीतून यापेक्षा जास्त काही निघण्यासारखं नाही. आम्हाला असं दिसतं की हे सर्वसाधारण सगळ्यांना मान्य व्हावं, आता कुणीही आपल्या मताचा आग्रह धरू नका. या मसुद्यात आत काही फरक होण्याची शक्यता नाही.' मग पुन्हा सगळ्या देशांत खळबळ माजते. 'आता काय करावं? यांनी तर अटीतटीचीच भाषा सुरू केली. मान्य करावं तर आपल्याला काही तरी बदल करावा लागतो. मान्य न करावं तर आपला सगळा व्यापारच बंद पडेल.' मग करायचं काय? मग पुन्हा एकएक देश हळू हळू पुढे येतो. म्हणतो, 'आम्ही सही करतो, पण मसुद्याच्या शेवटी लिहून देतो की .........' उदाहरणार्थ, 'हिंदुस्थान खुल्या व्यापाराचा पुरस्कार करतो पण पाकिस्तानचे हिंदुस्थानाशी असलेले शत्रुत्व लक्षात घेता पाकिस्तानकडून येणाऱ्या मालावर नियंत्रण ठेवण्याची आम्हाला मोकळीक असली पाहिजे.' मग पाकिस्तानच्या डोक्यात अशी कल्पना नसली तरी पाकिस्तानाचा प्रतिनिधी हे वाक्य वाचून त्यांच्या देशाच्या वतीनं असंच वाक्य घालतो. म्हणजे, सगळ्यांचा काही समझोता झालेला नसतो, पण समझोत्यावर सही करण्यापूर्वी काही देश अशा घोषणा एकतर्फी करू शकतात, त्या तिथं लिहिल्या जातात आणि सगळेजण शेवटी सह्या करतात.

**शेतीतील व्यापाराविषयी वाटाघाटी**

१९८६ साली उरुग्वेमध्ये जी काही वाटाघाटींची फेरी सुरू झाली ती पाच वर्षे चालली आणि त्यातूनही फारसं काही निघालं नाही. या वाटाघाटींमधला सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा कोणता होता? या आधी वाटाघाटींच्या पाच फेऱ्या झाल्या. या पाच फेऱ्यांत प्रामुख्याने कारखानदारी माल आणि त्यांचा व्यापार यासंबंधी चर्चा झाली. काही प्रगती झाली नाही. पण, कारखानदारी मालाच्या व्यापाराबद्दल फारशा अडचणी नाहीत. खऱ्या अडचणी शेतीमालाच्या व्यापाराबद्दल आहेत. आणि या उरूग्वे वाटाघाटींच्या फेरीमधील सगळ्यात महत्त्वाचा विषय शेतीमालाचा व्यापार हा होता.

हिंदुस्थानामध्ये शेतकरी संघटनेने शेतीमालाच्या किंमती आणि शेतीमालाचा व्यापार हा विषय महत्त्वाचा केला. पण, हा मुद्दा जेव्हा आपण पहिल्यांदा मांडायला लागलो तेव्हा मोठी मोठी माणसं म्हणायची, ''शेतीमालाची किंमत ती काय, त्याची बाजारपेठ ती काय? त्याला इतकं

महत्त्व देऊन कशाला बोलायला हवं? आणि शेतीमालाला भाव दिला म्हणजे देशाची गरीबी हटेल असं काहीही बोलावं?'' अशी शेतीमालाच्या भावाविषयी, त्याच्या बाजारपेठेविषयी हिंदुस्थानसारख्या देशात काहीशी उपेक्षेची, क्षुद्रपणाची भावना आहे. पण, सगळ्या जागतिक व्यवस्थेमध्ये शेतीमालाचा भाव आणि त्याची बाजारपेठ याला किती महत्त्व आहे? इतकं की, सबंध जगाचा व्यापार खुला करतांना चर्चेची एक संपूर्ण फेरी प्रामुख्याने या विषयाकरिता केली गेली.

कारखानदारी मालाबद्दल थोडी तरी तडजोड झाली. पण शेतीमालाबद्दल अजिबात तडजोड व्हायला काही जागा नाही. कारण यूरोप, अमेरिका, जपान यांच्यासारख्या सुधारलेल्या देशांमधील शेतकऱ्यांची लोकसंख्या अगदी कमी. अमेरिकेत एक ते दीड टक्का, यूरोपमध्ये साधारणपणे सात ते आठ टक्के आणि जपानमध्ये त्याच्या आसपास. शेतकरी म्हणून काम करायलाच तिथं कुणी तयार नाही. शेतीच्या बाहेर पडून इतर उद्योगधंद्यांकडे जाण्याचा जास्तीत जास्त लोकांचा कल. शेतीत लोकांनी यावे व राहावे म्हणून त्यासाठी शेती आकर्षक झाली पाहिजे. सगळ्यात प्रथम कोणती गोष्ट घडायला हवी? तर, शेती ही फायद्याची झाली पाहिजे. हिंदुस्थानासारख्या देशामध्ये लोक शेतीमधून बिगरशेतीत जावे म्हणून कारखानदारी चालू करावी लागते, उद्योगधंदे चालू करावे लागतात. सुधारलेल्या देशातील लोकांची स्थिती अशी आहे की शेतीतले लोक शेतीत राहातील कसे आणि आवश्यक असेल तर बिगरशेतीतील लोक शेतीवर येतील कसे याची त्यांना चिंता करावी लागते. याकरिता सुधारलेल्या या सगळ्या देशांमध्ये शेतकऱ्यांना फार प्रचंड प्रमाणावर सबसिडी (अनुदान) दिली जाते. रोख सबसिडी दिली जाते. गहू पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना एकरी ठराविक रक्कम काही देशांमध्ये दिली जाते. अमेरिकेसारख्या शेतकऱ्यांनी पिकविलेला गहू विकत घेऊन त्याला बाजारपेठ मिळविणे कठीण आहे असं सरकारला वाटलं तर शेतकऱ्यांना गहू न पिकविण्याकरतासुद्धा सबसिडी दिली जाते. सुरुवातीला सरकार गहू विकत घेत असे, लोकांनी भरमसाठ गहू उत्पादित केला. मग आपल्या कांद्याची जशी परिस्थिती झाली की आता कांद्याचं काय करायचं, तशी त्यांची गव्हाबाबत परिस्थिती झाली. मग तो विकत घेतलेला गहू समुद्रात

ढकलायचा किंवा खताच्या खड्ड्यात टाकायचा. पिकवू द्यायचं, विकत घ्यायचं आणि मग विकत नाही म्हणून समुद्रात किंवा खड्ड्यात टाकायचं यापेक्षा शेतकऱ्यांना पिकवूच द्यायचं नाही म्हणून जमीन पड ठेवण्याकरिता तिथं सबसिडी दिली जाते. त्याचबरोबर, त्यांच्या मालाला स्पर्धा करणारा माल परदेशातून येऊ नये याकरिता शेतीमालाच्या आयातीवर प्रचंड, भरभक्कम आयातकर लावला जातो आणि शेतकऱ्यांना निर्यात करायची असेल तर त्यांना किंमतीच्या साठसाठ टक्क्यांपर्यंत निर्यात सबसिडी दिली जाते. ही सबसिडी किती दिली जाते? शेतकरी संघटना गेली दहा वर्षे म्हणते आहे की हिंदुस्थानातल्या शेतकऱ्याला सबसिडी दिली जात नाही; खताची सबसिडी, पाण्याची सबसिडी, विजेची सबसिडी असे आपण फक्त शब्द वापरतो, पण हिंदुस्थानातल्या शेतकऱ्याला प्रत्यक्षात सबसिडी दिली जात नाही. हे संघटनेने आतापर्यंत ठामपणे मांडलं आहे.

**सबसिडीचे अर्थकारण**

आता हिंदुस्थानच्या पातळीवर आणि आंतरराष्ट्-ीय पातळीवर काही अभ्यास झालेले आहेत. आणि या अभ्यासातून निघालेला निष्कर्ष असा आहे की जपानमधल्या शेतकऱ्याला साधारपणे त्याच्या एकरी उत्पादनाच्या ९० टक्के रक्कम सबसिडी मिळते. यूरोपमधल्या शेतकऱ्यांना साधारणपणे ६४ टक्के रक्कम सबसिडी म्हणून मिळते, अमेरिकेमध्ये ३० ते ३५ टक्के रक्कम सबसिडी मिळते आणि हिंदुस्थानातल्या शेतकऱ्याला उणे १५ ते १२ टक्के सबसिडी मिळते. ही आकडेवारी 'इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ' या संस्थेने केलेल्या अभ्यासातून काढलेली आकडेवारी आहे. हिंदुस्थान गव्हाला जास्तीत जास्त म्हणजे उणे १.६ टक्के सबसिडी आहे. आणि ज्यूटला कमीत कमी म्हणजे उणे २६ सबसिडी आहे. एकूण सगळ्या मिळून शेतकऱ्यांना नकारात्मक सबसिडी आहे; म्हणजे खरं तर टॅक्स आहे.

फ्रान्समधले शेतकरी हे आपल्या सबसिडी कमी करू द्यायला तयार नाहीत. कारण खुल्या बाजारपेठेत जर का फ्रान्सचा शेतीमाल विकावा लागला तर शेतकऱ्यांना जे काही मिळेल ते शहरातल्या माणसाला जे काही मिळतं त्याच्यापेक्षा थोडं कमी असणार आहे; शेतावर राहायला कुणी तयार होणार नाही. आणि उरूग्वेमध्ये जी काही मंडळी चर्चेला बसली होती, त्यांचं

म्हणणं असं की तुम्ही तुमच्या शेतकऱ्यांना सबसिडी दिली तर खुला व्यापार याला काही अर्थ नाही, कारण ही खोटी स्पर्धा झाली; तुम्ही शेतकऱ्यांना सबसिडी दिली, हिंदुस्थानात ती नाही अशा परिस्थितीत व्यापार खुला म्हणता येणार नाही. तेव्हा जे देश शेतकऱ्यांना सबसिडी देतात त्यांनी सबसिडी कमी केली पाहिजे, एकदम संपवायची नाही थोडी थोडी कमी करायची. जे देश शेतीमालाच्या आयातीवर बंधनं घालतात त्यांनी ती आयातीवरची बंधनं कमी केली पाहिजेत, आयात कर कमी केला पाहिजे. सबसिडी देऊन देशाची निर्यात वाढवतात ते खुल्या व्यापारात अडथळा आणतात. जर का सरकारने सबसिडी दिली नसती तर त्यांची निर्यात इतर देशांत होऊ शकली नसती. तेव्हा, खुल्या व्यापारात ढवळाढवळ करणारे हे सगळे प्रकार बंद झाले पाहिजेत आणि खुल्या व्यापारामध्ये 'सूट सबसिडीचे नाही काम' ही शेतकरी संघटनेची घोषणा लागू पडते. पण कुणीच ऐकायला तयार नाही. अमेरिकन शेतकरी ऐकायला तयार नाहीत, जपानी शेतकरी ऐकायला तयार नाहीत आणि यूरोपियन शेतकरीही ऐकायला तयार नाहीत. मग शेवटी काय केलं? १९९० साली या सगळ्या चर्चा करणाऱ्या १०८ देशाच्या प्रतिनिधींनी ठरवलं की ज्या संस्थेने ही चर्चा चालवली त्या या यूनोच्याच संस्थेच्या सेक्रेटरी जनरलने चर्चेवर आधारून सर्वमान्य होईल असा मसुदा तयार करावा. सेक्रेटरी जनरल आर्थर डंकेल यांच्या नावाने मग हा मसुदा 'डंकेल प्रस्तावाचा मसुदा' म्हणून ओळखला जाऊ लागला.

### डंकेल प्रस्तावाचा मसुदा

हा प्रस्ताव डंकेलच्या नावाने आलेला असला तरी ती काही डंकेलने लिहिलेली कादंबरी नाही. १०८ देशांच्या प्रतिनिधींनी केलेल्या चर्चेतून केलेले हे संकलन आहे. त्यामुळे, त्या मसुद्यातील काही मुद्द्यांना विरोध असला तर डंकेलच्या नावाने शिव्या देण्याचे कारण नाही, तो दोष त्या १०८ देशांच्या प्रतिनिधींकडे गेला पाहिजे.

### सर्वांचा शेतकरी केंद्रबिंदू

हा मसुदा सगळ्या देशांना वाटण्यात आला. पण कुणी सहजासहजी त्यावर सही करायला तयार होईनात. फ्रान्समधील शेतकऱ्यांनी या प्रश्नावर दंगे केले. अमेरिकेने मात्र असा आग्रह धरला आहे की, 'आम्ही शेतकऱ्यांना फक्त

३५ टक्केच सबसिडी देतो, यूरोप आणि जपान ९० टक्के आणि ६५% देतात आणि त्यामुळे त्यांच्या बरोबर व्यापारात स्पर्धा करणं आम्हाला शक्य होत नाही. तेव्हा जपानने पहिल्यांदा त्यांची सबसिडी कमी करावी. त्यांनी जर सबसिडी कमी केली नाही तर आम्ही त्यांच्याशी व्यापार करणं बंद करू.' कारण अमेरिकेला मोठी चिंता पडलेली आहे. एका बाजूला यूरोप, विशेषत: जर्मनी आणि दुसऱ्या बाजूला जपान यांनी अमेरिकेवर व्यापारी आक्रमण इतक्या मोठ्या प्रमाणावर चालू केलं आहे की जर्मनी आणि जपानची चलनं सतत वधारत आहेत आणि डॉलर सतत घसरतो. हे जर बदलायचं असेल तर यूरोप आणि जपानमधून अमेरिकेत आयात कमी झाली पाहिजे आणि अमेरिकेची त्या देशांतील निर्यात जास्त झाली पाहिजे. पण जर का ही सरकारे अशा प्रकारे ९० टक्के आणि ६५ टक्के सबसिडी द्यायला लागली तर शेतीच्या बाबतीत तरी कसं काय जमायचं? मग अमेरिकेने दमदाटी चालू केली. यूरोपमधील जी सामूहिक व्यवस्था आहे ती काही ऐकायला तयार नाही असे दिसताच एक दिवस अमेरिकेने जाहीर केलं की आम्ही संपूर्ण यूरोपमधून होणाऱ्या आयातीवर १०० टक्के आयात कर लावणार. मग पुन्हा बोलणी सुरू झाली. साधारणपणे या विषयावर समझोता होईल असं दिसतं.

जपानमध्ये १९२१ सालापासून तेथील सरकार त्यांच्या शेतकऱ्याला भातासाठी आतंरराष्ट्-ीय किंमतीच्या तिप्पट किंमत देत आहे. सध्या ती पाचपट आहे. जपानमध्ये तांदुळाचा एक दाणाही आयात होणार नाही असा कायदा आहे. अमेरिकेने जपानलासुद्धा दटावणी दिली की तुम्ही तांदुळावरील ही आयातबंदी थोडी तरी शिथील करा. बऱ्याच बोलण्यानंतर जपानने जाहीर केलं की आम्ही तांदुळावरील आयातबंदी मागे घेत आहोत, पण आयात होणाऱ्या तांदुळावर १००० टक्के (हजार टक्के) कस्टम कर भरावा लागेल.

**कृषिप्रधान भारतात उलटे**

फरक पाहा. हिंदुस्थानसारखा देश देशातील गव्हाला क्विंटलला २८० रु. भाव देतो आणि परदेशातून ५३० रु. खर्चून गहू इथं आणून टाकतो. आणि जपानसारखा देश जो शेतकऱ्यांना आंतरराष्ट्-ीय किंमतीच्या पाचपट किंमत देतो तो आयात होणाऱ्या तांदुळावर १००० टक्के कर लावण्याची घोषणा करतो.

आपण गव्हाबद्दल म्हणतो की हिंदुस्थानात तुम्ही गव्हाला २८० रुपये भाव देत असला आणि तुम्हाला परदेशातून तुम्हाला २७९ रुपयांनी जरी गहू आणता येत असेल तर आमची काही हरकत असणार नाही. हिंदुस्थानातल्या ग्राहकाला इथल्यापेक्षा स्वस्तात गहू मिळणार असेल तर त्याला आमचा विरोध नाही. ते खुल्या बाजारपेठेच्या तत्त्वातच बसते. पण, फ्रान्समधले शेतकरी असं म्हणायला तयार नाहीत. फ्रान्समध्ये तयार होणारं गोमांस हे साधारणपणे ८४ फ्रँक प्रति किलो पडतं; पण इंग्लंडमधून येणारं गोमांस प्रति किलो ६८ फ्रँकला म्हणजे १६ फ्रँकनी स्वस्त पडतं. म्हणजे इंग्लंडमधून गोमांस आणलं तर फ्रान्समधील नागरिकांना १६ फ्रँकने कमी किंमतीत ते मिळू शकेल. फ्रान्सच्या शेतकऱ्यांनी आंदोलन केलं. त्यांचं म्हणणं दुसऱ्या देशातील वस्तू स्वस्तसुद्धा येता कामा नये.

जगामध्ये डंकेल प्रस्तावावर अशी चर्चा आणि प्रतिक्रिया चालू आहे. या प्रस्तावावर हिंदुस्थानात काही मंडळी खूपच लिहितात, आणि डंकेल हा कुणीतरी मोठा खलपुरुष आहे, त्याने देशाचं अगदी वाटोळं करायचा, देशाला गुलाम करून टाकण्याचा डाव टाकला आहे अशी हाकाटी करताहेत.

**डंकेल प्रस्तावातील ठळक विशेष**

आता मी फक्त व्यापाराच्या बाबतीत सांगणार आहे. खुला व्यापार हा काही फक्त वस्तूंच्या संबंधातच विचार करण्याचा मुद्दा नाही. व्यापार हा काही फक्त वस्तूंच्या संबंधातच नसतो. डंकेल प्रस्तावाच्या मसुद्याचे मुख्यत: चार विभाग आहेत. पहिला विभाग, वस्तूंचा व्यापार. दुसरा, सेवांची देवघेव. म्हणजे एखादी बँक उघडणे, कर्ज देणे, तंत्रज्ञानाची देवघेव इत्यादी. तिसरा, भांडवली गुंतवणुकी संबंधी. कारखानदारी, यंत्रसामुग्री, इत्यादी स्वरूपातील भांडवली गुंतवणुकीवरसुद्धा बंधनं असता कामा नये. आणि चौथा भाग, व्यापारसंबंधी बौद्धिक संपदा.

**शेतीमालाच्या व्यापारासंबंधी प्रस्ताव**

यातील सध्या आपण, शेतकरी म्हणून, वस्तूंच्या व्यापारासंबंधी पाहू. शेतीमालाच्या व्यापारासंबंधी आणि व्यवस्थेसंबंधी डंकेल मसुद्यात जे काही प्रस्ताव आहेत, ते असे.

पहिला एक प्रस्ताव आहे की शेतकऱ्यांवर लेव्ही किंवा अशा

स्वरूपाची सक्तीची वसूलीची पद्धत असता कामा नये. सरकारला रेशन व्यवस्था चालवायची असेल, त्याकरिता अन्नधान्य मिळवायचं असेल तर ते त्यांनी खुल्या बाजारात विकत घ्यावं, शेतकऱ्यांकडून कमी भावाने आणि सक्तीने वसूल करू नये.

या प्रस्तावात कोणाला काही शेतकरीविरोधी वाटावं असं नाही. शेतकरी संघटनेची ही गेल्या दहा वर्षांची मागणी आहे. डंकेल कधीकाळी भेटले तर त्यांना शेतकरी संघटनेचा बिल्ला जरूर लावायला पाहिजे.

दुसरा प्रस्ताव असा आहे - एकूण अर्थव्यवस्था अशी ठेवण्यात आली पाहिजे की त्यामुळे गरीब देशांतील शेतीवरचा लोकसंख्येचा दबाव कमी होत जाईल; शेतीत जास्त माणसं राहाता कामा नये.

तिसरा प्रस्ताव आहे निर्यातीबद्दल. शेतीमालाच्या निर्यातीवर बंदी असता कामा नये. एखाद्यावर्षी देशामध्ये उत्पादन कमी झालं तर त्यावर्षीसुद्धा निर्यातीवर बंदी असता कामा नये. आवश्यक असेल तर त्या मालाची त्या वर्षापुरती आयात करू शकता.

जे देश शेतकऱ्यांना सबसिडी देतात त्यांनी लवकरात लवकर आपली सबसिडी दहा टक्क्यापर्यंत खाली उतरवावी. असा आणखी एक प्रस्ताव आहे. हिंदुस्थानातला शेतकऱ्यांचा या प्रस्तावाशी संबंधच नाही कारण येथील शेतकऱ्यांना मिळणारी सबसिडी उणे पंचवीस टक्के आहे. म्हणजे खरं तर हिंदुस्थानातील शेतकऱ्याला डंकेल प्रस्तावानुसार अजून ३५ टक्के सबसिडी दिली तरी काही हरकत असणार नाही. सबसिडी १० टक्क्यांपर्यंत कशी कमी करायची? त्याचे वेळापत्रक आखून दिले आहे. येत्या पाच वर्षांमध्ये शेतकऱ्यांना दिली जाणारी सबसिडी २४ टक्क्यांनी कमी करावी. म्हणजे जपानमध्ये ९० टक्क्यांमधून सुमारे साडेबावीस टक्के, यूरोपमधील ६५ टक्क्यांमधून सुमारे सतरा टक्के आणि अमेरिकेत ३६ टक्क्यांतून सुमारे ९ टक्के सबसिडी कमी होईल. मग हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना यूरोपमध्ये किंवा जपानमध्ये किंवा अमेरिकेत निर्यात करायला वाव तयार होईल. कारण तिथला शेतीमालाचा उत्पादन खर्च वाढणार आहे. आज इथे दहा रुपयांना मिळणारी द्राक्षं लंडनमध्ये ९० रुपयांना विकू शकत असलो तर उद्या, तेथील सबसिडीत कपात झाल्यावर त्याच द्राक्षांना ११२ रुपयांपर्यंत किंमत मिळू

शकेल. तिकडची सबसिडी कमी केल्यामुळे हिंदुस्थानातील शेतकऱ्यांचा फायदा होणार आहे.

**सावत्र आई जेऊ घालीना?**

**बाहेर वाव आहे –**

तेव्हा, ज्या डंकेल प्रस्तावावर वाद होत आहेत त्यातील मुद्दे हिंदुस्थानातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत फायद्याचे आहेत.

असं असतांना डंकेल प्रस्तावाला हिंदुस्थानात विरोध का होत आहे? आपण हिंदुस्थानातील शेतकरी खुल्या अर्थव्यवस्थेकडे जाऊ पाहात आहोत. सरकारी बंधनं नसती तर आपली परिस्थिती बरी असती असं आपल्याला वाटतं आहे. जर का खुली अर्थव्यवस्था आली, जगामधील कोणत्याही देशात आमचा माल आम्ही पाठवू शकतो अशी परिस्थिती जर तयार झाली तर तो पाठवून आम्ही अधिक किंमत मिळवू शकू. आज आपल्याकडे गव्हाला २८० रु. मिळतात, परदेशात ४३० रु. मिळतात. आजसुद्धा आम्ही दहा रुपयांची द्राक्षं नव्वद रुपयांना पाठवतो आहोत. एकूण जागतिक व्यापारातल्या १४ महत्त्वाच्या वस्तूंबाबत हिंदुस्थानातला शेतकरी जगामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे.

**सबसिडी? बोलाचीच कढी –**

या संपूर्ण विषयात दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एक, हिंदुस्थानातल्या शेतकऱ्यांना उणे सबसिडी आहे. त्यामुळे सबसिडी रद्द करण्याच्या डंकेलच्या प्रस्तावाचा हिंदुस्थानातल्या शेतकऱ्यांना धोका नाही. एखादं चांगलं सरकार आलं आणि त्यांनी हिंदुस्थानातल्या शेतकऱ्यांना आणखी सबसिडी वाढवून द्यायचं ठरवलं तरी सुद्धा डंकेल प्रस्तावाचा त्याला विरोध असणार नाही.

**स्पर्धेला समर्थ**

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आमच्या जमिनीचे तुकडे झाले आहेत. आमच्याकडे भांडवल नाही, आमचा शेतकरी अडाणी आहे, शेतीवरील लोकसंख्येचा भार प्रचंड आहे आणि तरी देखील अमेरिका, जपान, यूरोप येथील शेतकऱ्यांशी स्पर्धा करायला तो समर्थ आहे.

ज्याला स्पर्धा करण्याची ताकद असते तो म्हणतो बाजारपेठ खुली

असू द्या. आणि ज्याला स्पर्धा करण्याची ताकद नसते तो म्हणतो मला संरक्षण द्या, माझं संरक्षण काढून घेऊ नका. इंग्लंडमध्ये एका काळी संरक्षणाची व्यवस्था होती. तीनचारशे वर्षांपूर्वी. कारण त्यावेळी जर्मनी औद्योगिकीकरणाच्या बाबतीत पुढे होता. आणि जर्मन माल इंग्लंडमध्ये येत होता. तेव्हा इंग्लंडमध्ये व्यापारी, कारखानदार, अर्थशास्त्रज्ञ असा माल जर्मनीतून येऊ देऊ नये अशी मागणी करायचे. पण नंतर औद्योगिक क्रांतीने इग्लंड देश इतरांच्या पुढे गेला आणि तेच कारखानदार आणि अर्थशास्त्रज्ञ म्हणू लागले की हा संरक्षण वाद खोटा आहे. इतर देशांनी आमचा माल त्यांच्याकडे मुक्तपणे येऊ दिला पाहिजे.

तेव्हा खुल्या बाजारपेठेचं तत्त्वज्ञान हे स्पर्धा करण्याची ताकद असणारांनाच मानवू शकतं. आणि शेतकरी संघटना खुल्या अर्थव्यवस्थेची मागणी करते आहे ती याच आत्मविश्वासाने की हिंदुस्थानातील शेतकरी हे आंतरराष्ट-ीय व्यापाराच्या स्पर्धेमध्ये वरचढ ठरू शकतील. हिंदुस्थानातील कारखानदार खुल्या अर्थव्यवस्थेची मागणी करीत नाहीत. कारण हिंदुस्थानातील कारखानदार लायसन्स-परमीट व्यवस्थेमुळे जिवंत आहेत. आणि परदेशातील यंत्रसामुग्री घेऊन, परदेशातूनच कच्चा माल आयात करून बनवलेल्या वस्तूंनी ते परदेशाशी स्पर्धा करू शकत नाहीत. आपल्याकडे नेहमीच विनोदानं म्हटलं जातं की, 'हिंदुस्थानात तयार झालेल्या गाडीचा हॉर्न फक्त वाजत नाही, बाकी सगळे पार्ट वाजतात !' परदेशातून यंत्रसामुग्री आणून परदेशी डिझाईनच्या वस्तू तयार केल्या तर परदेशात त्यांना कोण विचारणार? तेव्हा, ते स्पर्धेला तोंड देणे नको म्हणतात.

पण, हिंदुस्थानातील शेतकरी खुल्या अर्थव्यवस्थेचे स्वागत करतो. कारण त्याच्या अनुभवात सरकार नावाची गोष्ट ही कायम त्याच्या विरोधात असणारीच आहे. इतिहासाचार्य राजवाड्यांनीसुद्धा म्हटलं आहे की, ''हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची गेल्या दोन तीन हजार वर्षांच्या अनुभवाने अशी खात्री पटली आहे की सरकार म्हणून जे असते ते शेतकऱ्यांना लुटण्यासाठीच असते.''

### शेतकरी आणि खुली अर्थव्यवस्था

मग हिंदुस्थानातल्या शेतकऱ्यांचा निहित स्वार्थ कोणता? खुली

अर्थव्यवस्था हे तत्त्वज्ञान म्हणून माना की शेतकऱ्यांच्या दृष्टीने स्वार्थाचा भाग म्हणून माना, जो जो या व्यवस्थेच्या बाजूला आहे तो तो शेतकऱ्यांच्या बाजूने आहे आणि खुल्या अर्थव्यवस्थेला बाधा आणून सरकारने आणखी काही संरक्षणात्मक करावे असे जो जो मागेल तो तो शेतकऱ्याचा शत्रू आहे. ही साधी फूटपट्टी वापरायला हवी. यात काही येती दहा पंधरा वर्षे बदल होणार नाही. अशा तऱ्हेची शेतकऱ्यांच्या बाजूची मांडणी डंकेल प्रस्तावात असतांना त्या प्रस्तावाला हिंदुस्थानातील काही लोक विरोध करायला का तयार झाले आहेत? आपल्या असं लक्षात येईल की डंकेल प्रस्तावाला विरोध करणारी माणसं या शेतीमालाच्या व्यापाराच्या अटींबद्दल बोलत नाहीत.

प्रा. मधु दंडवते हे विरोधी पक्षाचे त्यातल्या त्यात अभ्यासू गृहस्थ. डंकेल प्रस्तावामध्ये जसे निर्यातीबद्दल प्रस्ताव आहे तसेच काही आयातीबद्दलही आहेत. देशाने आपली निर्यात सबसिडीशिवाय चालू ठेवावी तसंच दुसऱ्या देशातून होणारी आयातसुद्धा कृत्रिमरीत्या भिंती बांधून बंद करू नयेत असा खुल्या अर्थव्यवस्थेत साहजिकपणे बसणाराही एक प्रस्ताव आहे. त्यात अशी अट घातली आहे की कोणत्याही देशाने आयातीवर अशा अटी घालू नयेत की ज्यामुळे एखाद्या वस्तूची परदेशातून आयात देशातील एकूण उत्पादनाच्या ३.३ टक्क्यापेक्षा कमी होईल. म्हणजे समजा, एखाद्या देशात १०,००० रुपयांचा कांदा तयार होत असेल तर कांद्याची आयात ३३० रूपयांपेक्षा कमी होईल असा कायदा त्या देशाने करू नये, अशी व्यवस्था करू नये. याचा अर्थ आयात व्हायलाच पाहिजे असे नाही. उदाहरणार्थ, हिंदुस्थानात कांदा इतका स्वस्त आहे तर कोठलाही देश इथं त्यांच्याकडचा कांदा निर्यात करणारच नाही. पण जर का एखादा माल येत असेल तर ती आयात देशाच्या एकूण उत्पादनाच्या ३.३ टक्क्याहून कमी होईल अशी व्यवस्था करता कामा नये. मधु दंडवत्यांसारख्यानी बहुधा याचा अर्थ असा लावला असावा की प्रत्येक देशाने ३.३ टक्के आयात करायलाच पाहिजे! आणि मग त्यांनी लगेच पुढची उडी मारली की गव्हाची जी आयात सरकारने केली आहे ती डंकेल प्रस्तावामुळेच केली आहे. डंकेल प्रस्ताव अजून मान्य व्हायचा आहे; अंमलबजावणीचा मुद्दा दूरच राहिला. ती होईल

किंवा नाही याचीही निश्चिती नाही. अशा या अनिर्णित प्रस्तावामुळे ही गव्हाची आयात झाली असं मधु दंडवत्यांनी म्हटलं, आणि त्यांनी म्हटलं म्हणून व्ही. पी. सिंगानी म्हटलं आणि मग लोकसभेतही बरेच लोक तसेच म्हणाले. आता याला काय म्हणावे? खुली अर्थव्यवस्था म्हटलं की आपला माल परदेशांत ढकलता कामा नये आणि परदेशातला माल अडवता कामा नये असे साहजिकच असायला हवे.

**बौद्धिक संपदेचा हक्क**

पण प्रामुख्याने डंकेल प्रस्तावावर टीका होते आहे ती बौद्धिक संपदेच्या हक्क Intellectual Property Right बद्दल. काय आहे या प्रस्तावात.

तुकडे तुकडे झालेल्या जगातल्या मोडक्या तोडक्या व्यापाराला सांधायचा प्रयत्न गॅट करीत आहे आणि त्यामध्ये एकदम बौद्धिक संपदेचा प्रश्न आला कुठे? बौद्धिक संपदा हा विषय गॅटचा नाही. याकरिता (World Intellectual Property Right Organisation) जागतिक बुद्धिसंपदा हक्क संघटना या नावाची एक वेगळी संघटना आहे. त्यानी पूर्वीच याबद्दल एक जागतिक करार केलेला आहे. त्या करारामध्ये असं म्हटलं आहे की प्रत्येक देशाने इतर देशांतील शास्त्रज्ञांना स्वत:च्या देशातल्या शास्त्रज्ञांइतकंच संरक्षण द्यावं. म्हणजे आपल्या देशातील शास्त्रज्ञाला त्याच्या संशोधनाबद्दल जो काही मोबदला मिळण्याचं संरक्षण दिलं जाईल त्यात इतर देशातील शास्त्रज्ञांबद्दल काही कमी होता कामा नये. हिंदुस्थान एरवी सगळ्या आंतरराष्ट्-ीय करारांच्या वेळी सर्वांत पुढे असतो पण दोन करार असे आहेत की ज्या करारांवर हिंदुस्थानने सही करायला नकार दिलेला आहे. पहिला, अणुबाँब तयार न करण्यासंबंधी. यावर लवकरच सही होण्याची शक्यता आहे. कदाचित्, आम्ही अणुबाँब तयार करणार नाही अशी सहमती होण्याची लौकर शक्यता आहे, पण बौद्धिक संपदेचा सन्मान करण्यासंबंधी पॅरिसमध्ये जो काही आंतरराष्ट्-ीय करार १९६५ साली झालेला आहे त्यावर हिंदुस्थानाने आजपर्यंत सही केलेली नाही.

मुळात बौद्धिक संपदा हा विषय गॅटचा नाही आणि तरी देखील डंकेल प्रस्तावामध्ये मोठा अध्याय या बौद्धिक संपदेवर आहे एवढंच नव्हे तर तो अध्यायच सगळ्यात मोठा वादविवादाचा विषय झाला आहे.

गॅट ने बौद्धिक संपदा हक्क संघटनेच्या क्षेत्रात हात का घातला? याचं उत्तर डंकेल प्रस्तावाच्या या अध्यायाच्या नावातच आहे. अध्यायाचं नाव आहे Trade Related Intellectual Property Right म्हणजे व्यापाराशी संबंधित बौद्धिक संपदेचा हक्क. याचा संक्षेपाने उल्लेख नेहमी (टि-प्स) असा होतो. व्यापार हे गॅटचं क्षेत्र, बौद्धिक संपदा हे WIPO चं क्षेत्र. पण व्यापारसंबंधी बौद्धिक संपदा हे गॅटचं क्षेत्र आहे असं गॅटचं म्हणणं आहे आणि त्याबद्दल या दोन संस्थांमध्ये फारसे वाद नाहीत.

**परिस्थितीतील बदल**

उरूग्वेमधील वाटाघाटींची फेरी १९८६ साली सुरू झाली. त्यावेळी सगळ्या जगातली परिस्थिती थोडी बिघडलेली होती. ९० सालापर्यंत, या वाटाघाटी इतक्या यशस्वी होतील असं काही वाटलं नव्हतं. पण ८६ सालानंतर जागतिक परिस्थिती इतकी बदलली की ९०-९१ साली जगामध्ये खऱ्या अर्थाने खुली अर्थव्यवस्था सुरू होईल अशी आशा वाटायला लागली. प्रामुख्याने, याची तीन कारणं आहेत.

पहिलं कारण म्हणजे समाजवादी साम्राज्य कोसळलं. खुल्या अर्थव्यवस्थेचा पक्का अडसर दूर झाला. खुल्या बाजारपेठेला न मानणारे लोक संपले. दुसरी गोष्ट अशी झाली की खुली अर्थव्यवस्था तत्त्वत: मानणाऱ्या लोकांमध्ये एकमेकांमधे फार भयानक व्यापारी स्पर्धा सुरू झाली. इतके दिवस अमेरिका सर्वश्रेष्ठ होती तोवर त्यांना चिंता नव्हती पण आता पूर्वीचे छोटे, पण विकसित देश आता इतके पुढे गेले की दुसरं महायुद्ध प्रत्यक्षात कुणी जिंकलं याबद्दल शंका वाटायला लागावी. जर्मनी आणि जपान हे हरलेले देश आज व्यापारामध्ये अमेरिकेच्याही वर कुरघोडी करायला सज्ज झालेले आहेत. या दोघांमधला व्यापार जर का मित्रत्वाच्या पद्धतीचा झाला नाही, शेजाऱ्याचा गळा कापायच्या दृष्टीने झाला तर व्यापार काही फार टिकणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली. तिसरा मुद्दा असा की, हिंदुस्थानासारखे गरीब देश, समाजवादाची भाषा करणारे, रशियातील समाजवाद गडगडल्याबरोबर भानावर आले आणि समाजवादी अर्थव्यवस्था ही काही उपयोगी नाही हे त्यांच्या लक्षात आलं आणि तेही आता खुल्या अर्थव्यवस्थेकडे जायला लागले आहेत.

या तीनही मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्याची ही जागा नाही. पण, उरूग्वे बोलणी सुरू झाली त्यावेळच्या परिस्थितीत नसलेल्या या तीन मोठ्या गोष्टी घडल्या. त्यामुळे या बोलण्यांतून काही फलनिष्पत्ती खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्वरूपात बाहेर आली. पण खऱ्या अर्थाने खुली अर्थव्यवस्था जर हवी असेल तर अशी खुली देवघेव फक्त वस्तूंची असून चालत नाही. सेवांचीही असेल. त्याबरोबरच, गुंतवणुकीलासुद्धा कसला अटकाव असता कामा नये. नाही तर, तंत्रज्ञानाच्या बाबती भिंती उभ्या राहातील, या देशातील तंत्रज्ञान त्या देशात जाऊ शकणार नाही. जे काही नैसर्गिक, भौगोलिक फायदे आहेत ते फक्त त्या त्या देशांनाच मिळतील, दुसऱ्या देशातील लोकांना मिळवता येणार नाहीत. म्हणून, वस्तू जगामध्ये मुक्तपणे फिरल्या पाहिजेत तसं भांडवलसुद्धा फिरलं पाहिजे.

**भांडवलाची खुली देवघेव**

पण, भांडवल म्हणजे काय? यंत्रं म्हणजे भांडवल ही गोष्ट खरी. पण, एका यंत्राची किंमत जर हजार रुपये असली तर त्या यंत्राची शारीरिक किंमत केवळ पन्नास शंभरच रुपये असेल आणि त्या यंत्राच्या किंमतीतला साडेनऊनऊशे रुपयांचा भाग ते यंत्र तयार करण्याकरिता झालेल्या संशोधनाचा खर्च असतो. तो त्या यंत्रात दिसत नाही. एडिसनने विजेचा दिवा तयार करण्याकरिता आधी शेकडो प्रयोग केले, शेवटचा प्रयोग यशस्वी झाला. आधीचे सगळे अयशस्वी झाले. बल्बच्या निर्मितीतील या आधीच्या सगळ्या प्रयोगाचा खर्च लक्षात घ्यायला हवा की नाही? एडिसनने कदाचित तो लक्षात नसेल घेतला, पण आजच्या संशोधकांना हा खर्च लक्षात घेणं भाग आहे. म्हणजे, जर का भांडवल मुक्तपणे फिरावं असं वाटतं असेल तर याचा अर्थ हा की भांडवलावर बंधनं असता कामा नये, ते थांबवता कामा नये; आपलं भांडवल बळजबरी ढकलता कामा नये आणि त्याबरोबरच भांडवलाची चोरीसुद्धा थांबली पाहिजे. कारण चोरी सुरू झाली की तिथं व्यापार राहात नाही. तुम्ही एक तर चोरी करू शकता, किंवा व्यापार करू शकता. एडिसनच्या काळी एकेकटा शास्त्रज्ञ घराच्या एखाद्या खोलीमध्ये किंवा गॅरेजमध्ये बसून रात्रंदिवस काम करून, तहानभूक हरवून अशा पद्धतीने संशोधन करीत असे अशी वर्णनं वाचायला मिळतात. पण नवीन संशोधन

हे काही असं राहिलेलं नाही. नवीन संशोधनाकरिता प्रचंड संशोधनशाळा असते. त्याचा पडताळा घेण्याकरितासुद्धा फार प्रचंड खर्च करावा लागतो. संशोधन हे काही एकट्या दुकट्याचं काम राहिलेलं नाही, हजारो लोकांना एकत्र काम करावे लागते. प्रत्येकजण संशोधनाचा एखादा लहानसा भाग सांभाळत असतो. या संशोधनाची किंमत आता, एडिसनच्या काळात धरली गेली नसेल तशी न धरून चालणार नाही. नवीन संशोधन करायला धन हवंच ना? यामध्ये, झालेल्या संशोधनाचा खर्च भरून काढण्यापलीकडे त्यानंतर पुन्हा जे नवीन संशोधन करायचं त्यासाठी पैसा उभा करायला पाहिजे ही भूमिका असायला हवी आणि संशोधन आता संपलं, यापुढे संशोधन करण्यासारखं राहिलं नाही असं काही विज्ञानाच्या बाबतीत नसतं. असं फक्त धर्माच्या किंवा अध्यात्माच्या क्षेत्रात असू शकेल! विज्ञानाच्या बाबतीत प्रत्येक संशोधन हे एक पाऊल पुढे पडलेले, त्याचा खर्च भरून निघाला तर त्याच्या पुढचे पाऊल टाकता येईल. अशा परिस्थितीत साहजिकच संशोधनाचा खर्च भरून निघाला पाहिजे ही संशोधकांना पैसे देणाऱ्या लोकांची धारणा आहे. इथंच हिंदुस्थानच्या बाबतीत एक महत्त्वाचा प्रश्न तयार झाला.

**'पेटंट'चा अर्थ**

आपण संस्कृतमधलं एक सुभाषित वापरतो की ज्ञान दिल्याने वाढते आणि ठेवल्याने कमी होते. पण आपल्याकडील परंपरा ही ज्ञान झाकून ठेवण्याची आणि कुलुपबंद ठेवण्याची आहे. परदेशात जे संशोधक संशोधन करतात त्यांनी संशोधन लपवून ठेवू नये; जे काही संशोधन केलं असेल ते कागदावर व्यवस्थित नकाशे, आलेख, आराखडे, फोटो, आकडेवारी यांबरोबरच त्याचे जे काही पडताळे घेतले असतील त्यांच्या अनुभवांसकट लिहून काढावे; आपल्या संशोधनात नवीन काय आहे, त्याचा उपयोग काय आहे हे स्पष्ट मांडावं आणि समाजाला ते द्यावं; आणि त्याच्या कृतज्ञतेपोटी समाज त्या माणसाला त्याच्या संशोधनाचा खास उपयोग करण्याचा अधिकार काही मर्यादित काळापर्यंत, म्हणजे पाच वर्षं, दहा वर्षे, पंधरा वर्षे इत्यादि देतो; त्या काळात त्या संशोधनाचा उपयोग दुसरा कोणीही त्याच्या परवानगीशिवाय करू शकणार नाही असं समाज त्याला सांगतो. याचा अर्थ संशोधकाला 'पेटंट' दिला जातो. साध्या भाषेत सांगायचं तर हाच 'पेटंट' या

शब्दाचा अर्थ आहे.

**इंडियातील ज्ञानपरंपरा!**

हिंदुस्थानातली पद्धत वेगळी आहे. आपल्याकडे अमुक एक विद्या आहे असं सांगणारे लोक खूप आहेत. अमक्या बाबाला समोरच्या माणसाच्या मनात काय आहे ते अंतर्ज्ञानाने कळते असे म्हणतात. पण अशा विद्येचं पेटंट घेतल्याचं काही ऐकीवात नाही. किंवा गावामध्ये एखाद्या माणसाला एखाद्या रोगावरचं झाडपाल्याचं औषध माहीत असतं. तो ते लोकांना फुकट देईल पण त्या औषधाची माहिती तो कोणालाही, अगदी स्वत:च्या मुलालाही न सांगता मरून जातो आणि त्याचं त्याबाबतीतलं ज्ञान त्याच्या बरोबर संपतं. विद्येबाबत आपली परंपराच ही आहे. विद्या ही फक्त ब्राह्मणांनीच करायची. इतरांना तो अधिकार नाही. म्हणजे मग जी काही विद्या असेल, ज्ञान असेल ते ब्राह्मणाकडेच राहाणार; समाजाने आम्हाला विद्वान म्हणावे आणि इतर कामे करत राहावे. अशी एक भारताची मोठी परंपरा आहे आणि त्याच परंपरेचा भाग म्हणजे आम्ही ज्ञान साठवून ठेवतो, देत नाही. परिणामी 'ज्ञान दिल्यानं वाढतं, ठेवल्यानं संपतं आणि चोरी केल्यानं लाभत नाही' अशी साहित्यातील वाक्यं साहित्यातच राहिली आणि जगाच्या इतिहासामध्ये भारत हा अडाण्यातला अडाणी, संशोधनाच्या बाबतीत अत्यंत मागासलेला राहिला.

**उद्योजक डावलले**

या परिस्थितीमध्ये स्वातंत्र्यानंतर काय धोरण अवलंबायला हवं होतं? संशोधन झालं नाही याला कारण 'ब्राह्मणी' व्यवस्था हेच आहे. (यात मला 'मंडल'वाद वगैरे मांडायचा नाही.) संशोधन कुठं होतं? ज्याचे पाय जमिनीवर असतात तो जमिनीचं संशोधन करतो. लोहार त्याच्या लोखंडावर ठोके मारता मारता, जर त्याला काही अडथळा आणला नाही तर कधीतरी आपल्या कामामध्ये अधिक सुबकता कशी आणता येईल, याचा विचार करू शकतो. चांभार आपल्या चामड्याच्या कामाबद्दलही असंच करू शकतो. पण ज्यांनी प्रत्यक्षात हाताचं काम करायचं त्याचा विचारच मुळी पांगळा राहावा, म्हणजे त्याला शब्दाचं सामर्थ्यच मिळू नये अशी व्यवस्था आली. त्यामुळे असे उद्योजक संशोधन करू शकले नाहीत. जर या उत्पादकांच्या हाती संशोधन दिलं असतं, जर हे उत्पादक संशोधन करू शकले असते तर हिंदुस्थान

संशोधनाच्या बाबतीत इतका मागे पडला नसता.

संशोधनात मागे पडण्याला आणखी एक महत्त्वाचं कारण आहे. इंग्रज इथे आला आणि ज्या देशामध्ये नदीवरील पूलसुद्धा आम्हाला माहीत नव्हता, फक्त सांडवे आणि साकव माहीत होते त्या देशामध्ये पुलावर रुळ टाकून त्या रुळांवरून आगगाड्या धावू लागल्यानंतर एक इतकं नवीन जग सगळ्या हिंदुस्थानच्या पुढे आलं की आपण पाश्चिमात्य जगाशी याबाबतीत तुलना करू शकतो हे अशक्य आहे असं वाटू लागलं.

**परभृत इंडिया**

१८५७ सालापर्यंत इंग्रजांनी जातिव्यवस्था तोडण्याकरिता खेडेगावात शाळा काढून ब्राह्मणी व्यवस्थेचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न केला. १८५७ च्या उठावानंतर इंग्रजांनी जातिव्यवस्थेला हात लावायचा नाही असं धोरण धरलं. अशा वेळी जुन्या काळातील व्यवस्था हाती असलेली ब्राह्मणक्षत्रीय अशी मंडळी कोणत्या कामाला लागली? त्यांच्याकडे शब्द होता. संस्कृत होता त्याच्याऐवजी इंग्रजी शब्द त्यांनी घेतला. इंग्रजांनी हिंदुस्थानचे व्यापाराने शोषण करण्याचा जो कारखाना उघडला होता त्यात आपली भागीदारी घेतली. मग परदेशात जी काही यंत्रसामुग्री, तंत्रज्ञान मिळेल ते घ्यायचं आणि उद्योग सुरू करायचा असं त्यानी केलं. त्याला काही कष्ट करायला नको, संशोधन करायला नको. मालही परदेशातून आणायचा आणि तो इथल्या लोकांना फायद्याने विकायचा. या तऱ्हेने इंडिया तयार झाला. परदेशात तयार होणाऱ्या वस्तूंची नक्कल करण्याची प्रवृत्ती हिंदुस्थानात इतकी प्रचंड वाढली की गेली कित्येक वर्षे हिंदुस्थानातल्या सगळ्या भाषांतले कवी म्हणजे इंग्रजी भाषेतल्या कवितांचं रूपांतर करणारे असं झालं! आचार्य अत्र्यांनी त्यांच्या एका व्यंगकाव्यात तत्कालीन चोरकवींचे वर्णन –

पुढे कवन लेखनी कुशल चोर तो जाहला
स्वतंत्र कृतीचा कवी म्हणुनी मान्यता पावला। असे केले आहे.

अगदी कथाकादंबरीकारसुद्धा इंग्रजी साहित्यात डल्ला मारणारे झाले. आमचे अर्थशास्त्रज्ञही तसेच. आणि आमचे संशोधक म्हणजे तिकडे झालेलं संशोधन मिळवून तेच वापरणारे. अशी परभृतता निर्माण झाली.

**इंडियन पेटंट ॲक्ट = चोरीची मुभा**

या बाबतीत नेहरूसरकारच्या धोरणाचा सारांश म्हणजे 'इंडियन पेटंट

ॲक्ट' आहे. १९७० चा पेटंट कायद्याची मांडणी अशी : हिंदुस्थानात कोणी संशोधन केलं तर त्याला या कायद्याचं संरक्षण आहे. पण परदेशात कोणी जर संशोधन केल तर त्या संशोधनाला काही मर्यादित मान्यताच या कायद्यात आहे. म्हणजे, जर परदेशातील एखाद्या संशोधनातील पद्धतीत क्षुल्लक किरकोळ बदल केले, मूळ प्रक्रियेवर काही परिणाम न करणारे, आणि हा आपला शोध आहे असे इंडियातील एखाद्या संशोधकाने म्हटले तर त्याला या कायद्याने संरक्षण मान्य केले जाते. अशी पद्धत तयार झाल्याने हिंदुस्थानामध्ये परदेशातील संशोधनाची चोरी करण्याची आम मुभा झाली. आणि याचं समर्थनही करण्यात आलं. चोरी करून ज्ञानाच्या क्षेत्रात मोठं होता येईल अशी कल्पना करणं चूक आहे. परदेशी संशोधनाच्या चोरीची आता इतकी सवय झाली आहे की नवीन काही करण्याची इच्छाशक्तीच राहिली नाही. पंचेचाळीस वर्षांत आज अशी स्थिती आहे की संशोधनाच्या क्षेत्रात स्वातंत्र्याच्या वेळी आपण जगाच्या जितके मागे होता त्यापेक्षा आज जास्त मागे आहोत. आज परदेशात काय संशोधन चाललं आहे ते थोडंफार आम्हाला समजतं आणि आम्ही विस्मित होऊन जातो. इतका मोठा फरक झाला आहे.

जपानचं उदारहण इथंही गिरवण्यासारखं आहे. त्यांना जर वाटलं आपण तंत्रज्ञानात इतरांपेक्षा मागे पडतो आहोत तर ते आपल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परदेशात पाठवतात आणि शिकून आलेल्यांच्या मदतीने आपलं तंत्रज्ञान विकसित करतात. आवश्यक असेल तर पांगुळगाड्याची मदत घेतात, पण जरूरी संपली की पांगुळगाडा टाकून देऊन आपल्या पायांवर वाटचाल सुरू करतात.

पांगुळगाड्याची सवय झालेल्या मुलाला तात्पुरते अपंगत्व आलेले असते ते घालवायचे असेल तर पांगुळगाडा काढून घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे १९७० च्या इंडियन पेटंट ॲक्टमुळे हिंदुस्थानातील संशोधनक्षेत्राला अशा पांगुळगाड्याची सवय झाली. या कायद्यास फायदा झाला का तोटा? या कायद्याचा औषध उत्पादन उद्योगाला फायदा झाला असं मोठ्या अभिमानानं सांगितलं जातं. आणि डंकेलविरोधी जे काही वादळ उठलं आहे त्याच्यामागे प्रामुख्याने या औषध निर्मात्यांचा हात आहे. १९७० पर्यंत हिंदुस्थानात तयार होणारी औषधं जगातील सर्वांत महाग औषधं असायची. पण १९७० चा पेटंट

कायदा झाल्यापासून ती स्वस्त झाली आणि आतापर्यंत देशातील औषध उत्पादनात दहापट वाढ झाली. याचं एकमेव कारण म्हणजे १९७० च्या कायद्याने जगातील औषधासंबंधी संशोधनाची चोरी करायला परवानगी मिळाली. या औषधांसाठी लागणाऱ्या संशोधनाचा खर्च वाचल्यामुळे आम्ही जगातील इतर देशांपेक्षा स्वस्त औषधे निर्माण करू शकतो. ही चोरी आजपर्यंत चालली, आता चालणार नाही कारण अशाप्रकारची धोरणं तिसऱ्या जगातील देश ज्या दोन महाशक्तींच्या भांडणाचा लाभ घेऊन करत होते त्यातील समाजवादी साम्राज्य आता लोप पावले आहे. रशिया बौद्धिकसंपदा हक्क वगैरे काही मानत नव्हता त्यामुळे त्याच्यामागे बौद्धिकसंपदेच्या चोरांना लपता येत होते. आता तीच जागा नष्ट झाली, आता चोरी शक्य नाही. कारण रशियाच्या पतनाबरोबर अमेरिकेने बौद्धिक संपदेच्या चोरीविरूद्ध मोहीम उघडली. चोरांच्या यादीत दोन नावं महत्त्वाची :– एक चीन आणि दुसरं इंडिया.

औषध उत्पादनांत चोरीमुळे फायदा झाला असं वाटतं, पण, परदेशातील चोरून आणलेल्या संशोधनाची सवय झाल्याने, इथं असलेल्या वनस्पतींपासून जी औषधं तयार करण्यासाठी संशोधन होऊ शकलं असतं ते गेल्या २३ वर्षांत झालं नाही. हा तोटा झाला असं म्हणायचं नाही का?

यूरोपातून दूधपावडर आणि लोणी आणल्यानं जसा देशातील दूध उत्पादकाचा व्यवसाय बुडतो तसं परदेशातून संशोधन आणल्यानेही स्थानिक संशोधन बुडतं हा संशोधनाच्या चोरीचा तोटाच आहे.

१९७० साली आपण आयुर्वेदाच्या औषधांच्या संशोधनात जितके मागे होतो त्याच्यापेक्षा आज आणखी कितीतरी मागे गेलो आहोत.

शेती क्षेत्राच्या बाबतीत तरी आमच्याकडे काही संशोधन झालं आहे का?

मेक्सिकोमध्ये गव्हाच्या जाती तयार करण्यात आल्या. संयुक्त राष्ट-संघाने त्या तयार केल्या. त्या संशोधनामुळे आज आपण जिवंत आहोत. पण एरवी शेतीक्षेत्राच्या बाबतीत 'पेटंट' घेण्यासारखं काही संशोधन अजून झालं नव्हतं.

पण आता विज्ञानामध्ये एक नवीन दालन उघडलं आहे. आणि आजपर्यंतचं संशोधन हे पदार्थ विज्ञान शास्त्र, रसायन शास्त्र अशा शास्त्रांमध्ये होतं. आता प्रामुख्याने, अत्याधुनिक संशोधन हे जीवशास्त्रामध्ये सुरू झालं आहे. जिनेटिक इंजिनिअरिंग किंवा जीन टेक्नॉलॉजी. हे तंत्रज्ञान इतकं क्लिष्ट, इतकं

नाजुक, इतकं कठीण आहे की मनुष्यप्राणी अशा तऱ्हेचं तंत्रज्ञान हाताळू लागला आहे ही मोठी अद्‌भूत गोष्ट आहे. या तंत्रज्ञानानं पुढेमागे पाहिजे तसा सजीव तयार होणं शक्य आहे. अजून प्राणी तयार झालेला नाही पण गहू, हरभरा इत्यादी तयार झाला आहे. तेव्हा संशोधनाची पुढची दिशा म्हणजे जिनेटिक इंजिनिअरिंगने तयार केलेलं बियाणं. हे फार खर्चिक आहे, सोपं नाही.

जग इतकं पुढं जात असतांना आम्ही मात्र संशोधनात मागे पडलो.

आणि संशोधनाची चोरी करून तरीही देशातील सर्वसामान्यांच्या लुटीवर चंगळ करणाऱ्या, नेहरूव्यवस्थेवर पोसलेल्या बांडगुळांनी डंकेल प्रस्तावातील व्यापारसंबंधी बौद्धिक संपदा हक्कांबाबतच्या प्रस्तावावर गदारोळ चालू केला आहे.

डंकेल प्रस्तावांना विरोध करण्याकरिता बौद्धिक संपदेच्या हक्कांचा प्रश्न मोठ्या हिरीरीने मांडला जात आहे. या विषयावरील डंकेल मसुद्यातील प्रस्ताव मानले तर

(१) पेटंट हक्क अन्न, रसायने, औषधे, आणि सूक्ष्मजिवाणूशास्त्र यांनाही लागू करावे लागेल,

(२) पेटंट संरक्षणाची मुदत सर्व बाबतीत वीस वर्षांची करावी लागेल.

या तरतुदी लागू करण्याकरिता भारतासारख्या देशांना २००३ सालापर्यंत सवलत दिली जाईल.

**चाच्यांच्या विरोधाची तऱ्हा**

हे प्रस्ताव म्हणजे परकीय संशोधनाच्या चोरट्या आयातीवर चंगळ करणाऱ्या भारतीय बुद्धिजीवी आणि उद्योजक यांच्या मुळावरच घाव. हे प्रस्ताव मान्य होऊ नयेत म्हणून त्यांनी जिवाचा आकांत चालवला आहे. पण, या मूठभर लोकांचे ऐकणार कोण? म्हणून, ज्यांची सगळी हयात सर्वसामान्य भारतीयांना आणि शेतकऱ्यांना लुटण्यात गेली ती ही मंडळी आता शेतकऱ्यांची सहानुभूती संपादण्यात गुंतली आहेत. भारतीय शेतकऱ्याला नव्या संशोधनाचे महागडे पेटंट बियाणे विकत घेणे भाग पडेल कारण बाजारात दुसरे काही बियाणे मिळणारच नाही, बियाण्याच्या वाणातून नव्या वर्षाकरिता बियाणे शिल्लक ठेवण्याची बंदी येईल, पेटंट हक्काचा भंग होतो आहे किंवा काय हे बघण्याकरिता गावोगाव बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हेरांच्या टोळ्या फिरू लागतील आणि वनस्पतीसृष्टीतील सगळी विविधताच नष्ट होऊन जाईल; शिवाय, या पेटंट हक्कांमुळे भारतातील

संशोधन ठप्प होऊन जाईल असे बागुलबुवा शेतकऱ्यांना दाखविण्याचा प्रयत्न होत आहे.

**खरे काय ते शेतकरी जाणतो**

खरे म्हणजे, या सगळ्या आक्षेपांत काहीही तथ्य नाही. संकरित बियाणी शेतकऱ्यांनी वापरलेली आहेत. त्यांचे फायदे तोटे त्यांना चांगले माहीत आहेत. दुसऱ्या पिढीचे संकरित वाण वापरल्यामुळे पिकाच्या उत्पादनात आणि गुणवत्तेतही फरक पडतो हे त्यांना चांगले ठाऊक आहे. कापसाचा धागा योग्य गुणवत्तेचा हवा असेल तर ४६८ वाणाची फेरलागवड करू नये असे पंजाबराव कृषिविद्यापीठसुद्धा सांगते. त्यात शेतकऱ्याचा फायदा आहे आणि शेतीउद्योगाचा फायदा आहे हे शेतकरी चांगले जाणतो. गुणवत्ता टिकविण्यासाठी अशा शिफारशी मानण्यात त्याला काही अडचण वाटणार नाही. यापुढे जाऊन, दुसऱ्या पिढीचे बियाणे वापरू नये असे बंधन कुणी घातले तर त्यातही शेतकऱ्याला काही मोठी अडचण वाटणार नाही.

वनस्पतीविश्वातील विविधता कमी होणे किंवा संपुष्टात येणे हे एकूण पृथ्वीवरील जीवसृष्टीकरिता धोक्याचे आहे. विविधता टिकविण्याकरिता जे काही प्रयत्न करावयाचे ते सर्व समाजाने केले पाहिजे, शेतीउद्योगावर पोट भरणाऱ्या शेतकऱ्याचीच केवळ, ती जबाबदारी होऊ शकत नाही.

**शेतकरी फुकटे नाहीत**

परकीय तंत्रज्ञानाची तस्करी करणाऱ्यांनी आजपर्यंत शेतकऱ्यांना काही लाभ मिळवून दिलेला नाही आणि गेल्या तीस वर्षांत शेतीचा जो विकास झाला, निदान जी उत्पादनवाढ झाली त्याचे श्रेय परदेशी संशोधनाला आणि शस्त्रज्ञांना आहे. परदेशातील अद्ययावत संशोधन भारतीय शेतकऱ्यांना पैसे टाकून वापरायला, तातडीने वापरायला मिळाले तरी त्याचे समाधान आहे. किंबहुना, परदेशी शास्त्रज्ञांच्या कष्टांचा फुकट फायदा घ्यावा ही शेतकऱ्यांची प्रवृत्तीच नाही. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात हिंदुस्थान शेकडो वर्षे मागे आहे. केवळ वीस वर्षांच्या अवधीत परदेशी तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, औषधे विनाखर्च वापरायला मिळाली तर परदेशी शास्त्रज्ञांविषयी सर्वसामान्य जनांच्या मनात कृतज्ञताभावच असेल.

(२१ मार्च १९९३)

# ७. डंकेल : शेतकऱ्यांचा दृष्टिकोन - भारतीय व फ्रेंच

डंकेल प्रस्तावाच्या वाटाघाटीसाठी ठरवण्यात आलेल्या वेळापत्रकाचा शेवटचा पंधरवडा सुरू झाला आहे. १५ डिसेंबरपर्यंत या प्रश्नासंबंधी सोक्षमोक्ष लागून जाईल. डंकेल प्रस्ताव आंतरराष्ट-ीय व्यापारासंबंधी करारांचा मसुदा किंवा खर्डा आहे. या कराराचा हेतू शासकीय हस्तक्षेपाने मोडकळीस आलेला आंतरराष्ट-ीय व्यापार पुन्हा एकदा 'टप्प्याटप्प्याने का होईना, खुला करणे' असा आहे. ज्या देशांचा व्यापारात सहभाग अधिक ते देशच कराराला शेवटी मान्यता मिळणार किंवा नाही ते ठरवणार. आंतरराष्ट-ीय व्यापारात जास्तीतजास्त ढवळाढवळ करणारे जे देश आहेत त्यांची मान्यता नसेल तर करारावर बाकीच्या सगळ्या देशांच्या सह्या होऊन काय उपयोग?

व्यापारात जास्तीतजास्त सहभाग असलेले आणि जास्तीतजास्त हस्तक्षेप करणारे देश तेच ते आहेत. अमेरिका, जपान आणि युरोप. त्यांनी सह्या केल्या म्हणजे हत्ती गेला, शेपूट राहिले अशी स्थिती होणार. ऑस्ट-ेलिया, अर्जेंटिना यांसारखे शेतीमालाची निर्यात मोठ्या प्रमाणावर करणारे परंतु शेतकऱ्यांना माफक प्रमाणात, म्हणजे १० ते २० टक्केच सबसिडी देणारे देश डंकेल प्रस्तावावर सही करण्यासाठी पहिल्यापासूनच तयार झालेले आहेत. राहता राहिले हिंदुस्थानसारखे देश; खरे म्हटले तर, सही करण्यावाचून त्यांना काही गत्यंतर नाही.

कराराला मान्यता देण्याचा शेवटचा दिवस जसा जवळ येत आहे तसे भारतासारख्या देशांतील डंकेलविरोधी लॉबीचा जीव मोठा घायकुतीला आला आहे. औषधे, रसायने या क्षेत्रांतील संशोधनाची पेटंटे ओलांडून चोरी करण्याची आजपर्यंत मिळालेली मुभा संपुष्टात आली तर आपले कसे होईल, या चिंतेने व्याकूळ झालेले औषधांचे कारखानदार 'आपले हित म्हणजेच राष्ट-ाचे हित' असे मोठ्या तावातावाने ओरडून सांगत आहेत. डंकेल प्रस्तावाचे समर्थन करणाऱ्या शेतकरी संघटनेवर ही सगळी मंडळी ताळमेळ सोडून तुटून पडली आहे. डंकेल प्रस्तावाचा अक्षरश: गंधही न घेतलेले त्यावर तुटून पडले आहेत. डंकेल म्हणजे शेतकऱ्यांचा विनाश, डंकेल म्हणजे देशाचा विनाश, डंकेल म्हणजे ब्रह्मासुर असले मथळे चहूकडे झळकत आहेत.

डंकेलविरोधी लोक शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना वारंवार एक प्रश्न विचारतात. अमेरिकेतली, युरोपमधली, जपानमधली शेतकरी मंडळी डंकेलविरोधी आहेत. फ्रान्सच्या शेतकऱ्यांनी तर डंकेलविरोधात दंगे केले. हिंदुस्थानातही शेतकरी आंदोलनाचे काही नेते डंकेलला विरोध करीत आहेत. तुम्हीच तेवढे डंकेलला पाठिंबा देता हे कसे काय?

हिंदुस्थानातील स्वत:ला शेतकऱ्यांचे नेते म्हणवणारी काही मंडळी डंकेलला विरोध करीत आहेत ही गोष्ट खरी. ती का विरोध करीत आहेत हे समजणे किंवा सांगणे कठीण आहे! काही महिन्यांपूर्वी डंकेल प्रस्ताव अंमलात आला तर शेतकऱ्याला घरचे बियाणे वापरता येणार नाही, घरात पैदा झालेली कालवड डंकेल घेऊन जाईल, अशा तऱ्हेच्या विनोदी अफवा ते पसरवत होते. डंकेल प्रस्तावात असे काही नाही हे आता स्पष्ट झाले आहे. औषधकारखानदारांच्या प्रचारकांनी हा बाष्कळ युक्तिवाद सोडून दिला, तेव्हापासून हे शेतकरी नेते आता खुल्या व्यापारामुळे आणि पेटंट कायद्यामुळे भारत पुन्हा एकदा गुलाम होणार अशा तऱ्हेच्या कंड्या पिकवीत आहेत. ही मंडळी डंकेलला विरोध का करतात? याची चौकशी आणि संशोधन CID कडे दिले तर कदाचित पत्ता लागेल!

देशी शेतकरी नेत्यांचा विरोध आणि फ्रान्ससारख्या देशातील शेतकऱ्यांचा विरोध यांचा परस्पर संबंध काहीही नाही. अमेरिकेतील आणि फ्रान्स येथील काही शेतकरी नेते मला भेटले होते. हिंदुस्थानातील शेतकऱ्यांनीही डंकेल-विरोधी आघाडीत सामील व्हावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांचा विरोध डंकेल प्रस्तावातील आंतरराष्ट-ीय व्यापारसंबंधींच्या तरतुदींना आहे. भारतातील शेतकरी 'बौद्धिक संपदेच्या' हक्क्याच्या मुद्द्यांवर म्हणजे 'पेटंट पद्धती'च्या प्रश्नावर डंकेल प्रस्तावांना विरोध करताहेत हे कळल्यावर त्यांना मोठे आश्चर्य वाटले! बौद्धिक संपदेच्या प्रश्नावर हरकत असायचे कारणच काय, हेच त्यांना उमजेना. शेतकऱ्यांचा विरोध सरकारी मदत, सूट, सबसिडी टप्प्याटप्प्याने कमी करण्याच्या तरतुदींना असला पाहिजे अशी त्यांची स्पष्ट भूमिका. फ्रान्समधील शेतकऱ्यांना जवळजवळ ६०% सबसिडी आहे पण तरीही शेतीत उभे राहायला नव्या पिढीत कोणी तयारच होत नाही, ही त्यांची तक्रार आहे. फ्रान्समधील शेतकऱ्यांच्या दोन संघटना

‘शेतकरी महासंघ’ आणि ‘युवा शेतकरी संघटना’ फ्रेंच शेतकऱ्याला मिळणारे सर्व फायदे, सर्व सवलती, सर्व सबसिडी कायम राहिल्या पाहिजेत असा आग्रह धरत आहेत. विकसित देशातील शेतकऱ्यांना सरकार नाना तऱ्हेने मदत करते; उत्पादनात सबसिडी देते. अमेरिकेसारख्या देशात तर उत्पादन न करण्याकरिता भरपाई मिळते. शेतीमाल दुसऱ्या देशात निर्यात व्हावा, तो पडून राहू नये म्हणून सरकार मोठी तोशिस सहन करते. दुधाचे भाव कमी करण्यापेक्षा उत्पन्न झालेले लोणी, पावडर वगैरे पदार्थ ते कमी भावात निर्यात करतात; एवढेच नव्हे तर, हिंदुस्थानसारख्या देशांना फुकट देऊन टाकतात.

ही सगळी धडपड का, हे नीट लक्षात घेतले पाहिजे. सतत लढायांचा युरोपीय देशांना अनुभव आहे, विशेषत: शेवटच्या दोन महयुद्धांचा. औद्योगिकीकरण कितीही झाले आणि कारखानदारीचा विकास कितीही झाला तरी सगळ्या राष्ट-ाची सुरक्षितता टिकून राहायची असेल तर अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण राहिला पाहिजे. कारण अन्न हे हत्यार आहे, याची त्यांना चांगली जाणीव आहे. नवीन पिढीतील तरूण आता मातीत आणि घाणीत हात मळवू इच्छीत नाहीत आणि जड कामेही करायला ते तयार नाहीत. इलेक्ट-ॉनिक गणकयंत्रावर बौद्धिक करामती करायला त्यांची तयारी आहे, कष्ट करण्याची नाही. अशा परिस्थितीत शेतावर कोणी राहावे असे सरकारला वाटत असेल तर शेतीकामाच्या गदळ स्वरूपाची भरपाई होईल असे शेतकऱ्याला काही मिळाले पाहिजे. विकसित देशातील शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सबसिडीचे हे सर्वात मोठे रहस्य आहे.

अन्नधान्याची सुरक्षा असो की आणखी कोणतेही कारण असो, विकसित देशातील शेतीमालाचा उत्पादनखर्च मोठा आहे आणि केवळ सरकारी मदतीच्या कुबड्यांच्या आधाराने तेथली शेती उभी आहे. ग्राहकांना शेतीमालाची किंमत किंमतीच्या आणि करांच्या दोन्ही स्वरूपाने द्यावी लागते. राष्ट-ातील परस्पर संशय आणि युद्धखोरीचे वातावरण संपले तर प्रत्येक देशाने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंभू होण्याची आवश्यकता नाही. सगळ्या जगात जेथे कोठे स्वस्त अन्नधान्य मिळत असेल तेथून ते मिळवण्याची मजबूत व्यवस्था केली म्हणजे चिंता करण्याचे कारण नाही. विकसित देशांनी नवनवीन तंत्रज्ञानांच्या उद्योगधंद्याकडे लक्ष द्यावे आणि येनकेन प्रकारेण नागरिकांना

शेतावर न डांबता शेतीची जबाबदारी तिसऱ्या जगातील देशांवर सोडावी यात सगळ्यांचेच हित आहे. या विकसित देशातील शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मदतीची रक्कम टप्प्याटप्प्याने कमी करण्याचा कार्यक्रम हा डंकेल प्रस्तावाचा मुख्य हेतू आणि पाया आहे.

या कार्यक्रमाला भारतातील शेतकऱ्यांनी विरोध करायचे कारणच काय? डंकेल प्रस्ताव श्रीमंत देशांच्या रोगावरचे औषध आहे; हिंदुस्थान सारख्या अर्धपोटी राहणाऱ्या देशाचा त्या प्रस्तावांशी फार थोडा संबंध आहे. डंकेल उपाययोजना आहे मधुमेहावरची आणि भारताचा रोग आहे कुपोषणाचा. पण विकसित देशातील सरकारचे धोरण बदलले तर इथल्या शेतकऱ्याला थोडे बरे दिवस येतील एवढीच गरीब शेतकऱ्यांची डंकेलबद्दल आशा.

श्रीमंत देशांतील शेतीधोरणाच्या नेमके उलटे धोरण हिंदुस्थानात आहे. तेथील सरकारे शेतकऱ्यांना सबसिडी देतात, हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना 'उलटीपट्टी' म्हणजे उणे सबसिडी मिळते. गेली १० वर्षे 'शेतकरी संघटना' हा मुद्दा आग्रहाने मांडते आहे. खते, पाणी, वीज यासंबंधीची सबसिडी शेतकऱ्याला मिळत नाही हे संघटनेने ठामपणे मांडले. आजपर्यंत संघटनेची ही मांडणी कोणीच कबूल करत नव्हते. ना सरकार, ना नोकरदार, ना पुढारी, ना अर्थशास्त्री. डंकेलचे भारतीय शेतकऱ्यावर एवढेतरी मोठे उपकार आहेत की प्रस्तावावरील चर्चेच्या कारणाने हिंदी शेतकऱ्यांना 'नकारात्मक सबसिडी' आहे हे मान्य करणे सरकारला भाग पडले. अजूनही सरकारी लटपटपंची चालूच आहे. शेतकऱ्यांना उणे सबसिडी आहे, पण ती केवळ दोनतीन टक्क्याचीच आहे अशी बतावणी सरकार करीत आहे. पण सरकारी आकडेवारीवरूनच भारतातील सबसिडी सरासरीने उणे ४७ टक्के केली आहे. कापसासारख्या शेतीमालाच्या बाबतीत नकारात्मक सबसिडी २०० टक्क्याच्या वर आहे हे स्पष्ट आहे. थोडक्यात, श्रीमंत देशांतील शेतकऱ्यांना ९० टक्क्यापर्यंत सबसिडी आहे तर हिंदी शेतकऱ्याला उणे ४७ टक्के.

श्रीमंत देशांतील सरकारे शेतकऱ्याचा माल निर्यात व्हावा म्हणून सबसिडी देतात, इतर मदत करतात. हिंदुस्थान सरकार या ना त्या सबबीखाली

शेतीमालाच्या निर्यातीवर बंदी घालते. श्रीमंत सरकारे आपल्या देशांतील शेतीमाल इतर देशात खपावा यासाठी इतर देशांवर माल लादतात. हिंदी सरकार परदेशातला महागडा शेतीमाल आणून आपल्याच शेतकऱ्यावर तो माल लादते. सक्तीची वसुली, जिल्हाबंदी हे प्रकार श्रीमंत देशांना ठाऊक नाहीत.

खुला व्यापार सुरू झाला, श्रीमंत देशातील शेतकऱ्यांची सबसिडी कमी झाली तर हिंदी शेतकऱ्यांचा माल अधिक सहजपणे निर्यात करता येईल हे खरेच, पण सच्चा भारतीय शेतकरी डंकेल प्रस्तावाचे स्वागत करतो ते वाढत्या निर्यात व्यापाराच्या आशेने नाही; डंकेल प्रस्तावामुळे दिल्ली सरकारचे निर्यातबंदीचे हत्यार बोथट होईल, देशातील शेतकऱ्यापेक्षा परदेशातील शेतकऱ्यांना अधिक भाव देण्याचे धोरण राबवणे अशक्य होईल या आशेने आणि हिशोबाने तो डंकेलचे स्वागत करतो.

श्रीमंत देशातील शेतीची आणि शेतकऱ्यांची परिस्थिती अगदी वेगळी आहे. डंकेल प्रस्तावांचा फायदा अखेरीस श्रीमंत देशांनांही होणार आहे. पण आज तात्काळ तेथील शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे चालत असलेल्या सवलतींचा फायदा सोडावा लागेल. तेव्हा त्यांनी कण्हावे हे समजण्यासारखे आहे. भारतातील शेतकऱ्यांच्या स्वयंघोषित कैवाऱ्यांनी नेमक्या उलट्या परिस्थितीत किंकाळ्या का माराव्यात आणि दंगेधोपे का करावेत हे समजणे कठीण आहे.

# ८. तीन तोंडाचे अंदाजपत्रक

## चित्रपटाचा नवा हीरो मनमोहन

डॉ. मनमोहन सिंग यांनी आपले चौथे लागोपाठचे अंदाजपत्रक लोकसभेत सादर केले. १२९ क्रिकेटसामन्यांपैकी १२८ सामन्यांत खेळणाऱ्या कपिल देवच्या बरोबरीचा हा उच्चांकच झाला. सिंग साहेबांचे अंदाजपत्रकी भाषण कपिल देवच्या खेळाप्रमाणेच चित्तवेधक फटकेबाजीचे होते. चिंतामणि द्वारकानाथ देशमुखांनंतर अंदाजपत्रकी भाषण करतांना दीड-दोन तास श्रोत्यांना खिळवून ठेवण्याचा चमत्कार मनमोहन सिंग करून दाखवत आहेत. दूरदर्शनवर अंदाजपत्रकी भाषण दाखवले जाते म्हणून लोक ऐकतात असे नाही; झी चॅनेलवर चित्रपट दाखवला जात होता तरी लोक मनमोहन सिंगांचे भाषण ऐकत होते. नाट्य, शेरोशायरी, सस्पेन्स, हलके फुलके विनोद, काय पाहिजे ते त्यांत होते.

सी. डी. देशमुख भाषणात अभिजात संस्कृत साहित्यातील अवतरणे देत आणि अनेकवेळा उस्त्फूर्त काव्यरचनाही करीत. मनमोहन सिंगांचा भर शेरोशायरीवर. पण त्यांची निवड शायरीचा सखोल अभ्यास असणाऱ्या सच्च्या जाणकाराची नाही; पाच पन्नास मशहूर शेर कानांवरून गेलेल्या किरकोळ दर्दीची आहे. त्यांच्या शायरी अवतरणांनी लोकसभेतील काँग्रेस सदस्यांना बाके बडवण्याची संधी मिळाली, पण अर्थमंत्र्यांच्या भाषणाची शान कमी झाली, वाढली नाही. पंतप्रधानांच्या थोर नेतृत्वाचा त्यांनी वारंवार आग्रहाने उल्लेख केला. सारी हयात लांगूलचालन करणाऱ्या एखाद्या काँग्रेसी पुढाऱ्याच्या तोंडीदेखील असली बाष्फळ स्तुती आता ऐकवत नाही. डॉ. मनमोहन सिंगांच्या तोंडी पंतप्रधानांची वारेमाप स्तुती बीभत्स वाटत होती.

## मनमोहनांची संमोहन विद्या

आर्थिक सुधार, खुली व्यवस्था यासंबंधीची धोरणे मांडतांना अर्थमंत्री, हयात काँग्रेसमध्ये काढलेल्या पुढाऱ्यांपेक्षादेखील पक्षाभिमानाचा आक्रमक पवित्रा घेतात. आर्थिक सुधार आणि काँग्रेसपक्ष तथा पक्षाचे नेते नरसिंह राव यांचा त्यांनी असा काही संबंध जोडून दिला आहे की काँग्रेस म्हणजेच खुली व्यवस्था असा भास निर्माण व्हावा. मनमोहन सिंग ज्या

आर्थिक धोरणांविरुद्ध आज तिरीमिरीने बोलत आहे ती धोरणे राबवण्यात, सेवेतून निवृत्त होईपर्यंत, त्यांचा स्वत:चाच मोठा हातभार लागलेला आहे. जी पातके धुण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे ती पातके काँग्रेसच्या चार दशकांच्या शासनाची आहेत याचा त्यांनी संमोहन विद्येने भारले गेल्यासारखा लोकांना विसर पाडला आहे. नेहरू-व्यवस्थेची पापे धुवून टाकतांना नेहरूंचाच जयजयकार करण्याचे त्यांचे कसब मोठे वाखणण्यासारखे आहे.

खुल्या व्यवस्थेच्या दिशेने वाटचाल सुरू करणे, काँग्रेस शासनाची ४० वर्षांची धोरणे उलटी फिरवणे, त्याबरोबरच मागील चुकांची किंमत पक्षाला द्यावी लागणार नाही याची काळजी घेणे अशी तारेवरची मोठी अवघड कसरत हे करीत आहेत. त्याचबरोबर नोकरदारांच्या मिराशींना धक्का लागणार  नाही, संघटित कामगार नाखूष होणार नाहीत याचीही त्यांना चिंता आहे. खुली व्यवस्था असली म्हणून काय झाले? ‘‘गरीबी हटाओ’’ची भाषा चालू राहिलीच पाहिजे. गरीबी हटवण्याच्या घोषणेने इंदिरा गांधीदेखील देवतासमान बनल्या. गरीबी काही कोठे कमी झाली नाही. ‘गरीबी हटाओ’ कार्यक्रमाचा पक्षाच्या प्रचारकामात मोठा उपयोग होतो. तेव्हा तो कार्यक्रम चालू राहिलाच पाहिजे. कल्याणकारी कार्यक्रम निरुपयोगी असतात हे सर्वसिद्ध, सर्वमान्य झाले तरी कल्याणकारी कार्यक्रम मते मिळवण्यासाठी मोठे उपयोगी असतात; ते चालू राहिलेच पाहिजेत. असे परस्पर विरुद्ध कार्यक्रमांचे गाठोडे वित्तमंत्र्यांनी अंदाजपत्रकाच्या नावाने लोकसभेसमोर ठेवले. दावोस येथे पंतप्रधानांनी ‘मध्यममार्गी’ आर्थिक धोरणाचे तत्त्वज्ञान मांडले ते अशा गाठोड्याचेच. समाजवादाची स्पप्ने पाहणाऱ्या नेहरूंनी ‘समाजवादी धाटणीची समाजरचना’ असा मध्यममार्ग काढला आणि सारा देश नोकरदारांच्या हाती सोपवला. खुल्या व्यवस्थेचे स्वप्न पाहणारे नरसिंहराव ‘खुल्या पद्धतीच्या समाजरचने’ चा व्यवहारी मध्यममार्ग धरत आहेत. नवी व्यवस्था म्हटले तर खुली, पण सारी महत्त्वाची नियंत्रणे सरकारच्या हातीच. ‘समाजवादी धाटणीच्या समाजरचने’चा पुरस्कार करून सत्ता हाती ठेवणाऱ्या काँग्रेस पक्षाची प्रतिष्ठा अबाधित.

**पूर्णता म्हणजे विनाश?**

अंदाजपत्रक सादर केल्यानंतर दिलेल्या मुलाखतीत वित्तमंत्र्यांनी एक

महत्त्वाचे वाक्य वापरले. आर्थिक सुधारांकडे अधिक वेगाने आपण का जात नाही? आणि चलनवृद्धीचा धोका घेऊनही वित्तीय तूट आटोक्यात का ठेवली नाही? याचे स्पष्टीकरण देतांना वित्तमंत्री म्हणाले, 'पूर्णतेच्या शोधांत कार्यनाश दडलेला असतो.' पंडित नेहरूंच्या काळापासून व्यवहारवादाचे कित्ते गिरवलेला, समाजवादी शैलीच्या समाजरचनेसाठी सेवा रुजू केलेला हा नोकरदार आता खुल्या पद्धतीची समाजरचना उभारण्यासाठी हजर झाला आहे.

दुर्दैवाची गोष्ट ही की नेहरूपद्धतीला जन्मभर कसोशीने विरोध केलेले भले भले लोक राव-सिंग जोडीच्या हातचलाखीला आणि संमोहन विद्येला भुलले आहेत आणि काँग्रेसने टाकून दिलेल्या सरकारशाही धोरणांशी घरोबा करू पहात आहेत. सार्वजनिक क्षेत्राचे आधिपत्य, स्वावलंबनाच्या नावाखाली देशी अकार्यक्षम कारखानदारीला संरक्षण इत्यादी टाकाऊ ठरलेल्या संकल्पनांचा पुरस्कार डावे पक्ष करतात यांत काही आश्चर्य नाही. त्यांचा पिंडच मुळी 'नवीन काही शिकायचे नाही आणि जुने काही विसरायचे नाही' असा.

पण 'असरकारी' कार्यक्रमांचा आग्रह धरणारे गांधीवादीदेखील नेहरूछापाची धोरणे चालू राहावीत असा आग्रह धरू लागले आहेत हे मोठे विनोदी दृश्य आहे.

**तारेवरच्या कसरती**

खुली व्यवस्था, परिवर्तनीय रुपया, कार्यक्षम करप्रणाली यांच्याबरोबरच नोकरशहांना संरक्षण आणि पक्षाची प्रतिमा जपणे अशा चित्रविचित्र वस्तूंचे गाठोडे घेऊन मनमोहन सिंगांचा फेरीवाला देशापुढे उभा आहे. वेगवेगळ्या चिजा ग्राहकापुढे ठेवताना फेरीवाल्याप्रमाणे ते वेगवेगळ्या युक्त्या वापरतात. मनमोहन सिंगांच्या यंदाच्या अंदाजपत्रकाची निदान तीनचार तोंडे आहेत.

**फेब्रुवारी : अंतिम दिवस**

दूरदर्शनच्या प्रसारामुळे अंदाजपत्रक सादर करण्याचा दिवस म्हणजे राज्यकर्त्या पक्षाला शंभरेक कोटी रुपयांची फुकट प्रसिद्धी. अशी सुवर्णसंधी कोणताही मुत्सद्दी सत्ताधारी का म्हणून गमावेल? २८ फेब्रुवारीला सादर करायच्या अंदाजपत्रकांत कठोर असा कोणताही निर्णय जाहीर करणे म्हणजे

आपल्याच हाताने आपल्याच पायावर धोंडा पाडून घेणे. दूरदर्शवर साबण, सुगंधी तेले, सोंदर्य प्रसाधने यांचे जाहिरातदार वापरतात ती सर्व कुशलता वापरून अर्थमंत्री आपला माल विकायला उभे राहतात. विक्रीचा माल अंदाजपत्रक नाही, आर्थिक धोरणही नाही, त्यांना विकायचा आहे पक्ष आणि पक्षाचा 'थोर' नेता.

अंदाजपत्रकाच्या शुभादिनाच्या आधी सगळी दुष्ट, कठोर आणि नीच कर्मे उरकून गॅस, पेट-ोल, कोळसा, अन्नधान्य अशा वस्तूंच्या प्रशासित किंमती वाढवून टाकायच्या; रेल्वे, टपाल इत्यादींचे दर चढवून द्यायचे आणि फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवशी सुहास्य मुद्रेने गोडगोड अंदाजपत्रक सादर करायचे ही पद्धत दिवसेंदिवस अधिकाधिक रूढ होत जाणार आहे.

**तुटीचा भस्मासुर**

यंदाचे अंदाजपत्रक तयार करतांना अर्थमंत्र्यांसमोर सर्वांत गंभीर प्रश्न होता तो अंदाजपत्रकी आणि वित्तीय तुटीचा. अंदाजपत्रकाआधी प्रशासित किंमती वाढवून वित्तीय वर्षाच्या शेवटच्या दोन महिन्यात चारपाच हजार कोटी रुपयांची कमाई केली तरी तुटीचा आकडा आटोक्यात आला नाही. ३६ हजार कोटी रुपयांची वित्तीय तूट येईल असा गेल्या वर्षीचा अंदाज होता. प्रत्यक्षात ही तूट ५६ हजार कोटींची निघाली. शासनाचे अंदाजपत्रकी नियोजन इतके गळबट असेल याची शासनाच्या सर्वाधिक कठोर टीकाकारांनादेखील कल्पना करता आली नाही. तूट भरून काढण्यासाठी उत्पन्न वाढवणे आणि/किंवा खर्च कमी करणे यापलीकडे तिसरा पर्याय असूच शकत नाही.

**मनमोहनांचे मोहक रूप**

२८ फेब्रुवारीच्या शुभदिनी अमंगल असे काही बोलायचे नाही हे पक्के ठरले असल्यामुळे करात वाढ करणे संभवच नव्हते. करप्रणालीत वित्तमंत्र्यांनी कपात केली, एवढेच नव्हे तर करप्रणाली सोपी आणि सुटसुटीत असावी, भ्रष्टाचाराला फारसा वाव देणारी नसावी अशा दृष्टीने काही महत्त्वाच्या सुधारणा सुचवल्या आहेत. डॉ. मनमोहन सिंगांचे अर्थशास्त्राचे व्यक्तिमत्व अंदाजपत्रकातील ह्या अध्यायातच काय ते दिसते. परिपूर्णतेला सैद्धांतिक विरोध करणाऱ्या अर्थमंत्र्यांनी साहजिकच या सुधारांची गती मोठी मंद ठेवली. ट-क चालकांकरिता एक वैकल्पिक करपद्धती सुचवण्यात आली आहे.

मालकीच्या प्रत्येक ट-कमागे कराची रक्कम ठरलेली. ती ठरवण्यासाठी काही हिशेब देण्याची गरज नाही. अशी पद्धत बहुतेक क्षेत्रांत सहज लागू करता आली असती. करवसुलीचा खर्च कमी झाला असता, उत्पन्न वाढले असते. असली परिपूर्णता अर्थशास्त्री मनमोहनसिंगांना रुचेल, पण पुढारी मनमोहन सिंगांना पचणारी नाही.

**पुढाऱ्यांना हवी उधळपट्टी**

कराचे दर वाढवता येत नाहीत आणि त्याबरोबर सरकारी खर्च आणि उधळमाधळी थांबवता येत नाही. नोकरदारांवर दोनतृतीयांश अंदाजपत्रक खर्चले जाते. यातील प्रत्येक नोकरदार उद्योजकांच्या मार्गातील अडसर असतो. खुल्या व्यवस्थेचे डिमडीम वाजले तरी गेल्या वर्षी केंद्रशासनात ४० हजार नवीन नोकऱ्या तयार करण्यात आल्या आणि मंत्र्यांच्या पगारभत्त्यावरील खर्च चौपटीने वाढला. तरीही या सगळ्या नोकरशहांचा महागाईभत्त्याचा एक हप्ता रोकण्याची सरकारची ताकद नाही.

कल्याणकारी कार्यक्रम राबवण्याचे खूळही थांबवता येत नाही. गेल्या १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधानांनी लाल किल्ल्याच्या तटावरून जाहीर केलेल्या कल्याणकारी कार्यक्रमांबाबत त्यांनी वित्तमंत्र्यांशी सल्लामसलतदेखील केली नव्हती.

मग तूट घटवायची कशी? साधे सोपे उत्तर. सरकारी खर्चाला कात्री लावायची नाही असे ठरले की तूट घटवण्याचा कोणताही प्रामाणिक मार्ग राहात नाही. या विषयावर बोलतांना अर्थमंत्री पक्के राजकारणी बनले. अर्थशास्त्राचे सारे सिद्धांत, ज्ञान आणि अनुभव त्यांनी बाजूला ठेवले. कराचे दर कमी केले तरी करांचे उत्पन्न वाढणार आहे, कारण करव्यवस्था कार्यक्षम होणार आहे आणि करातील सुटींमुळे उत्पादनात अशी काही भरपेट वाढ होणार आहे की सरकारी तिजोरीत उत्पन्नाचा महापूर येणार आहे आणि पुढील वर्षी अंदाजपत्रकी आणि वित्तीय तूट खूपच कमी होईल अशी चलाखीची भाषा वापरून वित्तमंत्र्यांनी आपली सुटका करून घेतली आहे.

**उत्पादन का वाढावे?**

गेल्या वर्षीचा अनुभव सांगतो की कराचा भार कमी केल्याने उत्पन्न वाढते या कल्पनेत काही तथ्य नाही. सीमाशुल्क आणि इतर करांचा भार कमी

केल्यामुळे देशातील उत्पादन वाढेल या आशावादालाही काही आधार नाही. सरकारी नोकरशाही चालू आहे, लायसेंस-परमिट राज्य चालू आहे तोपर्यंत देशात आर्थिक चैतन्य निर्माण होईल अशी आशा करायला नको. बँका, विमा, वहातूक या सगळ्या व्यवस्था सरकारच्या हाती आहेत तोपर्यंत कार्यक्षम उद्योजकदेखील एक रतिमात्र पुढे हालू शकत नाहीत. केवळ करामध्ये सूट मिळाली म्हणजे भारतीय कारखानदार आंतरराष्ट-ीय बाजारपेठेत स्पर्धा करून उभे राहू शकतील ही कल्पनाही चुकीची आहे. खुल्या अर्थव्यवस्थेच्या प्रेरणांना प्रतिसाद देण्याची ताकद प्रामुख्याने शेतीक्षेत्रात आहे पण त्या क्षेत्रात तर खुलेपणाचे वारे फिरकू म्हणून द्यायचे नाही असा सरकारी निश्चय आहे.

पुढल्यावर्षीची तूट यंदापेक्षा कमी असण्याची शक्यता आज तरी काही दिसत नाही.

**शेतीला खुले वारे नको?**

यंदाच्या अंदाजपत्रकाचे सर्व सव्यापसव्य अशा तऱ्हेने पार पडले की देशात जणू शेती नावाची गोष्टच नाही, असली तरी तिला खुलेपणाची गरज नाही. खतावरील सबसिडी गेल्यावर्षी ४००० कोटी रुपयापर्यंत कमी करण्यात आली होती. त्याच पातळीवर ती राहील. शेतकऱ्यांना देशांतर्गत वाहतुकीचे स्वातंत्र्य आणि निर्यातीची मोकळीक देण्याची भाषा वित्तमंत्र्यांनी वापरली पण काही ठोस कार्यक्रम सुचवला नाही. शेतीक्षेत्राला कर्ज पुरवठा व्हावा याकरिता नाबार्ड, ग्रामीण क्षेत्रीय बँका आणि सहकारी संस्था यांना भांडवल पुरवठा करण्याकरिता ३०० कोटीच्या आसपास तरतूद करण्यात आली आहे ती खास नेहरू जमान्याशी जुळणारी आहे. शेती परवडणारी नसेल तर त्यासाठी कर्जपुरवठा करण्याचा आग्रह वित्तीय संस्थाना करणे हे मुळातच खुल्या व्यवस्थेशी सुसंगत नाही. ग्रामीण बँकांना भांडवल पुरवण्याऐवजी शेतीमध्ये खुलेपणा आणण्यासाठी वित्तमंत्र्यांनी पावले उचलली असती तर ग्रामीण क्षेत्रांत कर्जपुरवठा व्हावा यासाठी कृत्रिम आटापिटा करण्याची गरजच पडली नसती.

वित्तमंत्र्यांनी ''उद्याचे उद्या पाहता येईल, आज तर अडचणीतून सुटलो.'' अशा हिशेबाने वित्तीय तुटीच्या प्रश्नावर तोडगा काढण्याचे पुढे ढकलले आहे, पण तुटीचे हे भूत असे संपणारे नाही. मनमोहन सिंगांना किंवा त्यांच्या नंतर येणाऱ्या अर्थमंत्र्यांना आणि काँग्रेसखेरीज इतर पक्ष सत्तेवर आला

तर त्यांच्या वित्तमंत्र्यांनाही या भूतावरचा मंत्र शोधून काढावाच लागेल. हातचलाखीने हा प्रश्न सुटणारा नाही.

**अनेक चेहरे अनेक सोंगे**

अंदाजपत्रकाचे एक विक्राळ तोंड प्रशासकीय किंमतीच्या वाढीच्या रूपाने अंदाजपत्रकाआधीच दिसले होते. अंदाजपत्रकाच्या दिवशी त्याची आणखी दोन तोंडे दिसली. एक अर्थशास्त्रज्ञ डॉ. मनमोहन सिंगांचे आणि दुसरे नव्याने पुढारी बनलेल्या, नव्या मुल्लाच्या उत्साहाने बांग देणाऱ्या, कॉंग्रेसचे वित्तमंत्री मनमोहन सिंग यांचे. किंवा एक तोंड आजच्या मनमोहन सिंगांचे आहे. दुसरे तोंड कालच्या. आणखी एक शक्यता अशी – एक तोंड आजच्या मनमोहन सिंगांचे तर दुसरे तोंड कॉंग्रेस पक्ष नेते पी. व्ही. नरसिंहराव यांचे.

(ग्यानबा न्यूज सर्व्हिस)

# ९. खुली व्यवस्था आणि संप

टपाल व तार कर्मचाऱ्यांनी नुकताच संप केला आणि सरकारला नमविले. विमा कर्मचारी आता संपावर उतरत आहेत. महाराष्ट- राज्य शासनाचे कर्मचारीही लवकरच संपावर जातील आणि पगारवाढ, बोनस, हक्काच्या सुट्ट्या इत्यादी इत्यादी ज्या काही मागण्या असतील त्या पदरात पाडून घेतील.

सरकारी कर्मचाऱ्यांचे संप यशस्वी होतात. याउलट, खाजगी क्षेत्रातील केवळ संपच नव्हे तर सर्व कामगार चळवळच काहीशी थंडावली आहे. खाजगी क्षेत्रातील उद्योगधंद्यांना शेवटी, जमा आणि खर्च यांचा मेळ घालणे आवश्यक आहे. मजुरीवरचा खर्च वाढला आणि त्यामानाने बाजारात मिळकत होण्याची शक्यता नसली तर उद्योजकांना नोटा छापून वेळ निभावून नेण्याची काही शक्यता नसते. कारखाना बंद करणे, नोकरकपात करणे किंवा कंत्राटी मजूर लावून खर्च कमी करणे आणि उत्पादकता वाढविणे असा काहीतरी मार्ग त्यांना काढावाच लागतो. कामगार नेत्यांनी संप पुकारला म्हणजे कारखानदारांना आता दु:ख होत नाही; चिंता वाटत नाही. डॉ. दत्ता सामंत यांनी कापडगिरणी कामगारांचा संप सुरू केला तेव्हा मालक आणि व्यवस्थापक दोघांनीही आनंदोत्सव साजरा केला.

भांडवलशाही व्यवस्थेच्या आणि कारखानदारीच्या सुरुवातीच्या काळात बाजारपेठा उभ्या राहिलेल्याच नव्हत्या, नवा कारखानदारी माल स्वस्तात स्वस्त विकण्यासाठी कारखानदारांचा खटाटोप चालत असे, त्या काळात नाममात्र वेतनावर मजुरांना राबविले जाई. अगदी दहाबारा वर्षांची मुलेही गिरण्यांत, खाणींत आरोग्यास बाधक अशा परिस्थितीत दिवसाला बाराबारा तास काम करीत. वेतन अगदी तुटपुंजे – चार ते सहा आणे रोज, जेवणाची सोय नाही, औषधाची व्यवस्था नाही, सुट्टी म्हणून नाही; मग म्हातारपणासाठी निवृत्तीवेतन वगैरे दूरच राहिले. अशा 'नाही रे' अवस्थेतील कामगारांनी निकराचे हत्यार म्हणून संपाचे साधन वापरले. कामगार संघटना मजबूत होत गेल्या. संपाच्या काळात उपासमार, पोलिसांचा लाठीहल्ला, गोळीबार, भाडोत्री गुंडांचे अत्याचार या सर्वांना समर्थपणे तोंड देत अक्षरश: रक्त, घाम आणि अश्रू यांची किंमत देऊन कामगारांनी आपली आर्थिक स्थिती

सुधारून घेतली.

समाजवादाच्या काळात कामगार तितके शोषित आणि कारखानदार, उद्योजक, व्यापारी, म्हणजे नोकऱ्या देणारे तेवढे सगळे कामगारांचे रक्त पिणारे महाराक्षस अशी मान्यता होती. कामगारांसंबंधी अनेक कायदे झाले त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील कामगारांचे वेतन, भत्ते ठरले; नोकरीची शाश्वती मिळाली. बोनस, प्रवासभत्ता, औषधोपचार, निवृत्तीवेतन अशा अनेक सोयीसवलती कामगारांनी मिळवून घेतल्या. हे खासगी क्षेत्रात घडले तसेच सरकारी क्षेत्रातही घडले.

समाजवादाच्या नावाखाली कारखानदारांना संरक्षण देण्यात आले आणि त्याबरोबर भारतातील ग्राहकांना मनसोक्त लुटण्याचा परवाना देण्यात आला. इतर देशांच्या तुलनेने गचाळ माल कित्येक पट अधिक किंमतीने घेणे भारतीय ग्राहकास अपरिहार्य झाले. फायद्याची टक्केवारी कडाडली. याचा फायदा 'आर. जे. मेहता', 'जॉर्ज फर्नांडिस', 'दत्ता सामंत' आणि अलीकडे प्रभावी ठरलेल्या कामगार सेना यांनी भरपूर घेतला. कारखानदार गडगंज कमावतात, खरे फायदे हिशोबात किंवा ताळेबंदात दाखवीत नाहीत आणि कामगारांच्या तोंडाला मात्र पाने पुसतात हे या चाणाक्ष कामगार नेत्यांनी अचूक हेरले आणि पगार दुपटीतिपटीने वाढविण्याच्या मागण्या ते बेधडक करू लागले. एक दिवसही कारखाना बंद ठेवणे, म्हणजे आपल्या कब्जातील बाजारपेठेस लुटण्याचा एका दिवसाचा मोका गमावणे कोणत्याच कारखानदारास मान्य होण्यासारखे नव्हते. कामगारांशी झटपट तडजोड करून ते त्यांच्या मागण्या पटापट मान्य करून मोकळे होऊ लागले. कामगार नेत्यांतही स्पर्धा लागली. जो नेता अधिक भरमसाठ मागण्या करे तो चटकन लोकप्रिय होऊ लागे.

गरीबातील गरीब मजुरापासून प्राध्यापक, विमानचालक इत्यादी सर्व नोकरदार वर्ग मालेमाल होऊन गेला. 'उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी' हा जमाना संपला आणि नोकरीच सर्वश्रेष्ठ ठरली.

सरकारी कर्मचाऱ्यांची तर लयलूटच झाली. तिथे फायदा मिळवून दाखविण्याची गरज नाही; उत्पादन किंवा उत्पादकता वाढविण्याची कोणालाच चिंता नाही. पगार वाढले, महागाईभत्त्याचा निर्देशांकाशी संबंध जोडण्यात

आला. निर्देशांकाचा हिशोब करणेही सरकारी कर्मचाऱ्यांच्याच हाती! त्यामुळे सरकारी नोकरी अत्यंत आकर्षक बनली. डॉक्टरइंजिनिअरही आपले व्यवसाय सोडून सरकारी नोकरीच्या मागे लागले. सरकारी नोकऱ्यांच्या अभिलाषेने राखीव जागांचे तत्त्वज्ञान तयार झाले.

तसे पाहिले तर जगातील इतर देशांच्या तुलनेने भारतीय मजुरांचे किंवा कर्मचाऱ्यांचे वेतन तसे जास्त नाही. पण कार्यक्षमता आणि उत्पादकता लक्षात घेतली तर ही कमी वेतनाची रोजंदारीसुद्धा अति महागडी ठरते. अपरिहार्यपणे, भारतीय उद्योगधंदेही अडचणीत आले आणि सरकारचेही दिवाळे निघाले. नोकरशाही कमी करावी, सरकारी प्रशासकीय खर्च कमी करावा, ग्राहकांना योग्य तो माल मिळावा व गुणवत्तेची सेवा मिळावी याकरिता लायसन्स-परमिट व्यवस्था खुली करण्याची भाषा चालू झाली. विजेचा तुटवडा, पाण्याचा तुटवडा, रस्ते अपुरे, लोहमार्ग अगदीच कमी अशा साऱ्या संरचना ठाकठीक उभ्या करायच्या म्हटले तर त्यासाठी आवश्यक ते तंत्रज्ञानही नाही आणि भांडवलही नाही. घराला आग लागली म्हणजे जेथून कोठून घागरी, कळश्या, बादल्यांनी पाणी येईल त्याचे स्वागत करावे तसे परकीय गुंतवणुकीला देशात येण्याचे आवाहन केले जाऊ लागले. देशातील टपाल खाते, टेलिफोन व्यवस्था, विमा, बँक सेवा इतक्या दळभद्री की चालू जमान्यातील कोणताही उद्योजक त्यांच्याबरोबर कामच करू शकणार नाही. देश दिवाळखोर झाला, सोने गहाण पडले. सुदैवाने, काही तातडीची उपाययोजना केल्यामुळे दिवाळखोरीची अवस्था तात्पुरतीतरी संपली आहे.

अरिष्ट होते तोपर्यंत कामगार आणि कर्मचारी दोघेही थोडे दबून होते. देशाच्या या दुरवस्थेला आपण मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहोत याची त्यांना जाणीव होती. देशावरचे संकट जसे थोडे ढळले तसे या कामगार आणि कर्मचारी यांनी उचल खाल्ली. प्रशासनावरचा खर्च कमी होता नये, खुलीकरण येवो न येवो नोकरदार वाढलेच पाहिजेत, त्यांचे पगार, भत्ते, सवलती वाढल्याच पाहिजेत असे मोठ्या कोडगेपणाने ते सांगू लागले.

भारतातील दरडोई उत्पन्न लक्षात घेतले तर कमीत कमी वेतनश्रेणीतील कर्मचारी किंवा कामगार हा सरासरी उत्पन्नाच्या कितीतरी पट कमाई करतो. आपल्या वाढत्या उत्पन्नाचा फायदा घेऊन देशातील असंघटित कामगारांना,

शेतमजुरांना संघटित करण्याचा यत्किंचितही प्रयत्न या धनदांडग्या नोकरदार पगारदारांनी केला नाही. यापलीकडे यातील एखाददुसरा अपवाद सोडल्यास प्रत्येकाने वरकड उत्पन्नाची साधने आणि मार्ग तयार केले आणि जनसामान्यांना भरडून काढण्यातच ते धन्यता मानू लागले. अशा कामगारांना कामगार चळवळीचा वारसा सांगण्याचा खरे म्हटले तर काही अधिकार नाही.

एकूण अंदाजपत्रकी तरतुदींतील तीन चतुर्थांश हिस्सा प्रशासनावर खर्च होतो. आणि या रकमेवर पोसले जाणारे जनतेला नाडण्याचेच काम करतात; उत्पादकांच्या मार्गात अडथळे आणण्याचे काम करतात. एकवेळ लग्नाच्या बायकोला किंवा नवऱ्याला फारकत देणे सोपे, पण कायम नोकरदाराला दोन शब्द बोलायची सोय नाही. अशा परिस्थितीत देश पुन्हा एकदा दिवाळखोरीकडे जाणार आहे आणि रुपयाची घसरगुंडी अधिक वेगाने होणार आहे यात शंका नाही. नोकरदारांचे लाड कमी केल्याशिवाय देश वाचू शकत नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

पण नोकरदारांना याचे काहीच सुखदुःख नाही. संपाचे हत्यार सरकारी क्षेत्रात तरी अजून प्रभावी आहे. तेव्हा, आपले फळफळलेले भाग्य सांभाळण्याकरिता ते लढ्याची भाषा बोलत आहेत.

संपाचा हक्क औद्योगिक कामगारांनी मोठ्या कष्टांनी आणि बलिदानांनी मिळवलेला आहे. समाजवादी कालखंडात तयार झालेल्या कायद्यांप्रमाणे असा संप करणे न्याय्य आणि संवैधानिक आहे अशी त्यांची मांडणी आहे. या मांडणीत चूक काहीच नाही. कामगारांना वैयक्तिकरीत्या आणि सामुदायिकरीत्या आपल्या नोकरीच्या अटी ठरवून घेण्याचा अधिकार असला पाहिजे. पण त्याबरोबर आपल्या मालकांना मक्तेदारी हक्क असले पाहिजे, आपल्या क्षेत्रात स्पर्धेसाठी कोणी उतरता नये, मक्तेदारीमुळे ग्राहकांची सरेआम लूट होत असली तरी हरकत नाही असे म्हणण्याचा त्यांना अधिकार नाही.

सामुदायिक वाटाघाटींचा कामगारांना हक्क आहे तसाच ग्राहकांना निवडीचा हक्क असला पाहिजे. सगळे हक्क कामगारांना आणि इतरांना काहीच हक्क नाही अशी गर्जना ऐकून घेण्याचे दिवस संपले.

कामगारांना संपाचा अधिकार आहे तसाच उद्योजकांनाही त्यांच्या मर्जीप्रमाणे व्यवसाय कमी करण्याचा, वाढविण्याचा किंवा बंद करण्याचा

अधिकार असला पाहिजे. समाजवादाच्या काळात उद्योजकांना भरपेट संरक्षण होते. सरकारी आधाराने आणि वित्तपुरवठ्यामुळेच कारखाने उभे रहात होते, तेव्हा कारखाना चालू ठेवण्याची काही सामाजिक जबाबदारी त्यांच्यावर पडत होती. खुलीकरणानंतर, कारखान्याच्या उद्योजकता-स्वातंत्र्यावर बंधने आणील अशी मागणी योग्य राहणार नाही.

स्वातंत्र्य सर्वांना मिळाले पाहिजे – शेतकऱ्यांना, मजुरांना, व्यापाऱ्यांना, कारखानदारांना. अशा खुल्या व्यवस्थेत आपल्या न्याय्य मागण्यांसाठी नोकरदारांनी संप केला तर तो योग्य ठरेल. सरकारी कर्मचाऱ्यांची आज अवस्था अशी की सरकारी पदावर काम करण्यासाठी पगार देण्याऐवजी काही हुंडा सरकारने वसूल करण्याची पद्धत चालू केली तरी अर्जदारांचा तोटा पडणार नाही. अशा परिस्थितीत प्राध्यापकांनी उठावे, विमानचालकांनी उठावे, टपाल कर्मचाऱ्यांनी उठावे आणि उगाच कामगारक्रांतीच्या भाषा कराव्यात हे हास्यास्पद आहे.

टपाल खात्याच्या गेल्या संपाच्या वेळी मी जाहिर आव्हान दिले होते की 'आजच्या नोकरवर्गाच्या तुलनेने फक्त निम्मा नोकरवर्ग घेऊन, आजच्या तुलनेने त्यांना निम्मा पगार देऊन मी टपालखाते चालवायला घ्यायला तयार आहे. आज कोणत्याही महत्त्वाच्या शहरामध्ये पाच दिवसांच्या आत टपाल पोहोचत नाही, तेथे चोवीस तासांच्या आत बटवड्याची हमी द्यायला मी तयार आहे.' पण असले आव्हान सरकारच्याही कानी पडत नाही आणि नोकरदारांनाही त्याची नोंद घेण्याची गरज वाटत नाही. नोकर मालक बनले की मूळ धन्याची अवस्था अशीच होणार.

(२१ डिसेंबर १९९६)

# १०. सौख्याचे अर्थशास्त्र

कोणाही माणसाला तहानभूक भागविण्यासाठी काही प्यायला मिळाले, खायला मिळाले म्हणजे आनंद वाटतो. थंडीवाऱ्यापासून संरक्षण व्हावे यासाठी कपडे, निवारा मिळाला म्हणजे संतोष होतो. संसार थाटला की गृहस्थीच्या जीवनात मुलाबाळांना आनंदाने खेळताबागडता यावे यासाठी, खाणेपिणे, कपडे, निवारा, करमणूक यासाठी अनंत साधने हवीहवीशी वाटतात. माणसाच्या या सर्व जन्मजात प्रेरणा आहेत. खावे, प्यावे, उपभोगावे, आनंद लुटावा यासाठी माणूस जन्मभर खटाटोप करतो.

उपभोग वाढविण्याची प्रत्येक प्राणीमात्राची इच्छा असते हे खरे; पण, अशा तऱ्हेने सर्व प्रयत्नांनी ऐहिक सुखसंपदांच्या मागे लागणाऱ्या व्यक्तींचा समाज सुखीसमाधानी, आनंदी राहील का? समाजाला मन नाही, राष्ट्रांना बुद्धी नाही; तेव्हा त्यांच्याकरिता भल्याचे काय हे ते बोलत नाहीत. मग साऱ्या देशाकरिता उत्पादन, वितरण इत्यादी अर्थकारणासाठी भल्याची व्यवस्था कोणती? हे जाणण्यासाठी काही फूटपट्टी आहे काय? समाजाच्या सौख्याचे मोजमाप करता येईल काय? अमेरिकेतील लोकांचे सौख्य अमुक अमुक एकक, हिंदुस्थानातील लोकांचे सौख्य इतके इतके एकक असे काही मोजता येईल काय? निदान, दोन देशांची तुलना करून त्यातील एक सौख्यात वरचढ आहे, दुसरा काही कमी आहे असेतरी म्हणता येईल काय? हे सारे प्रश्न सोडविण्यासाठी केवळ अर्थशास्त्राचा आधार पुरेसा नाही. जीवशास्त्र, समाजशास्त्र, अगदी तत्त्वज्ञानाचादेखील आधार घ्यावा लागेल.

उदाहरणाने हा प्रश्न समजावयास थोडा सोपा होईल. समजा 'अ' आणि 'ब' ही दोन माणसे आहेत. दोघांनीही शेवटचे जेवण चोवीस तासांपूर्वी घेतले. त्यानंतर त्यांना काहीच खायला मिळाले नाही. चोवीस तासांनी एकएक भाकरी मिळाली आणि त्यांनी ती भाकरी खायला सुरुवात केली. दोघांच्याही पोटात कमालीची भूक आहे. दोघांनाही, कधी एकदा काहीतरी पोटात जाते अशी वखवख लागलेली. पण, ही भुकेची आर्तता मोजायची कशी? जर माणसाच्या जठरात भुकेमुळे उत्पन्न होणाऱ्या आम्लाचे मोजमाप, शरीरविच्छेदन न करता घेता येत असते तर भुकेच्या तीव्रतेचा काहीसा अंदाज

बांधता आला असता; पण, तोदेखील फारसा शास्त्रीय ठरला नसता. भुकेने तयार होणाऱ्या एक औंस आम्लाचा परिणाम 'अ' आणि 'ब' या दोघांवरही सारखाच होईल असे मानण्यास काहीच आधार नाही. 'अ'ला पूर्वायुष्यात उपासमार काढण्याची सवय असली किंवा तो वजन आणि आकारमान यांत कमी असला तर त्याची भुकेच्या तीव्रतेची जाणीव 'ब'पेक्षा वेगळी असू शकेल. काही माणसे अती भूक लागली म्हणजे चिडचीड, रागराग करतात. दुसरी काही माणसे शक्तीचा व्यय टाळण्याकरिता निमूटपणे शांत झोपून घेतात. थोडक्यात, भुकेला काही मोजमाप नाही आणि दोन माणसांच्या भुकेची तुलनाही नाही.

दोघांचीही भूक चोवीस तासांची, पण तिची तीव्रता ज्याला त्याला जाणवणारी वेगळी; त्यांची तुलना अशक्य. तसेच, भुकेच्या समाधानाने होणाऱ्या आनंदाची तुलनाही अशक्य. 'अ' आणि 'ब' यांनी भाकरीचा पहिला घास खाल्ला तेव्हा परब्रह्म भेटल्याचा आनंद दोघांनाही होणार. पण, दोघांच्या परब्रह्म आनंदाची तुलना करण्याची शक्यता नाही. प्रत्येकाच्या अनुभवातले परब्रह्म हेही वेगळे वेगळेच असते.

भाकरी खाण्यापासून 'अ' आणि 'ब' यांना मिळणाऱ्या समाधानाबद्दल एक गोष्ट निश्चित सांगता येईल. पहिला घास खाताना उच्च कोटीचा आनंद झाला. पुष्कळदा भुकेल्या घशाला कोरड पडलेली असते. चवीची जाणीवसुद्धा होत नाही. दुसरा, तिसरा, चौथा घास अधिकाधिक गोड लागत जातो. काही काळानंतर का होईना, पाचपन्नास घासांनंतर भूक शमते आणि प्रत्येक नव्या घासाने मिळणारे समाधान आधीच्या समाधानाच्या तुलनेने कमी कमी होऊ लागते. पहिली भाकरी संपेपर्यंत समाधान वाढत राहील असे समजू. दुसरी भाकरी समोर आली की तिच्या दर्शनाने होणारा आनंद पहिल्या भाकरीच्या तुलनेने दोघांच्याही बाबतीत कमीच झालेला असणार; तिसऱ्या भाकरीच्या वेळी त्याहूनही कमी, चौथी भाकरी समोर आली तर 'आता नको, पोट भरले' अशी अवस्था होईल. तरीही आग्रह चालूच राहिला तर काही काळाने भाकरीमुळे सौख्य मिळण्याऐवजी त्रास वाटू लागेल, ती गिळवणार नाही, गिळलेल्या भाकरीचेही अपचन होईल. सारांश, भाकरीच्या घासागणिक तिच्या सेवनातून मिळणारा आनंद 'अ' आणि 'ब' या दोघांच्याही बाबतीत

अधिकाधिक घटत जाईल.

घसरत्या संतुष्टीच्या आधाराने सामाजिक अर्थशास्त्राचे काही आधार बनविण्याचा अगदी पहिल्याने प्रयत्न, दुसरे महायुद्ध संपल्यानंतर पिगू नावाच्या अर्थशास्त्रज्ञाने १९४६ साली ''सामाजिक सौख्याचे अर्थशास्त्र Economics of Welfare'' हे पुस्तक प्रसिद्ध करून केला. त्याच्या या पुस्तकाचा दहावीस वर्षे दबदबा राहिला. वेगवेगळ्या रंगछटांच्या समाजवाद्यांनी पिगूच्या अर्थशास्त्राचा वारंवार उपयोग केला. पिगूच्या साऱ्या विश्लेषणाचा अनेक अर्थशास्त्रज्ञांनी पार धुव्वा उडविला आहे. पण तरीही, सरकारी अर्थकारण, अंदाजपत्रकातील धोरणे, सरकारी कल्याणकारी योजना या सर्वांमागे अजूनही पिगूचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

मनुष्यप्राण्याच्या सौख्याची अनेक साधने आहेत : मानसिक, आध्यात्मिक, बौद्धिक, कलासंबंधी इत्यादी, इत्यादी. ज्या सौख्यांचे मोजमाप पैशाच्या आधाराने करता येते त्याला आर्थिक सौख्य म्हणावे ही पिगूची व्याख्या. आर्थिक सौख्य वाढले म्हणजेच समाजाचे सर्वार्थाने भले होते हे खरे नाही. आर्थिक सौख्याचा सर्वसाधारण समाजाच्या भल्यावर विपरीत परिणामही होऊ शकतो. देशातील एकूण राष्ट्-ीय उत्पादन हे त्या देशातील आर्थिक सौख्याचे एक मोजमाप आहे. पण, उत्पादनाचे वाटप वेगवेगळ्या पद्धतीने होऊ शकते. वाटप कसेही झाले तरी सामाजिक सौख्याची बेरीज सारखीच राहील काय? उत्पादनातून जमीनदारांना भाडेपट्टी मिळेल, कामगारांना मजुरी मिळेल, भांडवल पुरविणाऱ्यांना व्याज मिळेल आणि उद्योजकांना फायदा मिळेल. अशा तऱ्हेने राष्ट्-ीय संपत्तीचे वाटप होईल. पण, अशा वाटपाने राष्ट्-ीय संपत्तीतून मिळणारे आर्थिक सौख्य सर्वोच्च पातळीचे ठरेल याची काहीच खात्री नाही. उत्पादनाच्या वेगवेगळ्या घटकांना मिळालेला मोबदला त्यांचा उत्पादनातील सहभाग लक्षात घेता योग्यच आहे असे मानले तरी वेगवेगळ्या घटकांच्या हातात येणाऱ्या उत्पन्नातील तफावत फार मोठी असेल तर साऱ्या समाजाचे मिळून आर्थिक सौख्य कमी भरेल.

वर घेतलेल्या उदाहरणात 'अ'ला दहा भाकरी दिल्या आणि 'ब'ला दोनच दिल्या तर 'अ'ला अजीर्णाचा त्रास आणि 'ब'ला अर्धपोटी राहण्याचा अशी अवस्था होऊन जाईल. त्यापेक्षा, दोघांनाही सहा सहा भाकऱ्या

मिळाल्या असत्या तर एकूण बारा भाकऱ्यांपासून दोघांना मिळून होणारे सौख्य सर्वात अधिक झाले असते.

एकेका घासापासून मिळणाऱ्या आनंदाचे मोजमाप करता येईल; सर्व उपभोगांतून मिळणारा आनंद कमी कमीच होत जातो आणि उपभोगाची सर्व मनुष्यप्राण्यांची क्षमता सारखीच असते ही पिगूची गृहीततत्त्वे. त्यांच्या आधाराने त्याने समाजधुरीणांसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे मांडली.

– राष्ट-ीय संपत्ती वाढली म्हणजे आर्थिक सौख्यात वाढ होते हे खरे. फक्त या वाढीव उत्पादनासाठी लोकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध श्रम करण्याची सक्ती होता कामा नये.

– राष्ट-ीय उत्पादनातील गरीबांचा वाटा वेगवेगळ्या मार्गांनी वाढविता येतो. आणि, काही अपवाद सोडल्यास गरीबांचा वाटा वाढविल्याने सामाजिक सौख्यात वाढ होते. फक्त अशा कार्यक्रमांमुळे उद्योजकांचे प्रोत्साहन कमी होऊ नये आणि गुंतवणूक व उत्पादन यांवर विपरीत परिणाम होऊ नये.

पिगूच्या सौख्याच्या अर्थशास्त्राचे, त्यातील गृहीततत्त्वांचे, तर्कशास्त्राचे आणि विश्लेषणाचे अर्थशास्त्र्यांनी वाभाडे वाभाडे काढले. पण दीनदुबळ्या करुणेपोटी दानधर्म करण्याची धार्मिकांची करुणेवर आधारित परंपरा आणि समाजवाद्यांची गरीबांसंबंधीची कळकळ या दोघांनाही पिगूच्या मांडणीने, थोडासा शास्त्रीय वाटणारा आधार मिळाला.

माणसे समान असतात; सारी देवाची लेकरे; त्यात विषमता नाही या सर्वमान्य तत्त्वांचा मोठा विपरीत अर्थ पिगूच्या सौख्याच्या अर्थशास्त्रामध्ये आहे. सारी माणसे एकाच ठशाची, एकसारखीच आहेत; दोन माणसांना येणारे सुखदु:ख, गरम आणि थंड यांचे अनुभव एकसारखेच असतात; जांभळा रंग म्हटला की 'अ'च्या मन:पटलावर ज्या रंगछटेची अनुभूती होते तीच 'ब'च्याही मनात होते या कल्पनांना काही आधार नाही. प्रत्येक माणसाला वाढत्या उपभोगाबरोबर होणारा आनंद कमी होत जातो हे खरे. पण, माणसे काही तीच तीच वस्तू उपभोगत नाहीत; उपभोगाच्या वस्तूंची विविधता वाढवीत राहतात. भाकरीबरोबर कोरड्यास घेतात; चपात्या, पुऱ्या, मांडे, मिठाई असे नवनवे पदार्थ शोधून काढून उपभोगसौख्याची कमान वाढती राहील अशी व्यवस्था ते करतात. भाकरीच्या प्रत्येक घासापासून मिळणारे

समाधान घसरत जाईल हे खरे; पण, आमदनीच्या प्रत्येक नव्या रुपयापासून होणारे समाधान घटत जाईल असे नाही. दोन वेगवेगळ्या माणसांच्या मनातील उपभोगसौख्याची तुलना करणे तर अगदीच अशक्यप्राय आहे. उपाशी माणसाची भूक तीव्र, ती शमविण्यासाठी तो प्रचंड खटाटोप करेल; ज्याची भूक कमी तीव्र त्याचा खटाटोप तुलनेने कमी तीव्र राहील असे म्हणावे तर इतिहास त्याला साक्षी राहात नाही. दुष्काळाच्या काळात माणसे उपासमारीने मरून पडतात, पण धान्याच्या गोदामांवर हल्ले करून धान्य लुटण्याचा प्रयत्न करीत नाहीत. उलट तुलनेने, चैनीच्या वस्तूंचा तुटवडा पडताच चैनी माणसे आकाशपाताळ एक करून टाकतात हा अनुभव नेहमी येतो.

मोरारजी देसाई अर्थमंत्री असताना त्यांनी जवळजवळ साऱ्याच परदेशी वस्तूंच्या आयातीवर बंदी घातली; प्रसाधनांच्या वस्तूंवरही बंदी घातली. आयातीवरील नियंत्रणे साऱ्या देशाने मुकाटपणे सहन केली. पण, दिल्लीतील उच्चभ्रू समाजातील महिला तक्रारी घेऊन पंडीत नेहरूंकडे गेल्या आणि त्यांना लागणाऱ्या प्रसाधनसाधनांचे उत्पादन देशातल्या देशात सुरू व्हावे याची तजवीज त्यांनी करून घेतली.

मनुष्यप्राणी समान आहेत, पण ती एका मुशीतून काढलेली बाहुली नाहीत. प्रत्येक प्राणी वेगळा आहे, अनन्यसाधारण आहे हे त्यांच्यातील समानतेचे सूत्र आहे. हे न समजल्याने धर्मवादी फसले, समाजवादीही फसले. करुणा आणि विषमतानिर्मूलन यांना काही तार्किक पाया देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पिगूने अर्थशास्त्र्यांना त्याच मार्गावर नेण्याचा प्रयत्न केला. 'सौख्याचे अर्थशास्त्र' आपल्या पायावर कधी उभे राहिलेच नाही. पण, प्रत्यक्ष शासकीय धोरणावर त्याचा प्रभाव प्रचंड आहे. श्रीमंतांवर कर बसवून गरीबांसाठी कल्याणकारी योजना राबवाव्या असे कार्यक्रम सर्वच पक्ष आग्रहाने मांडतच असतात. बिनबुडाचा हा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन दररोजच्या शासकीय अर्थकारणात महत्त्वाचा ठरला आहे. कारण उघड आहे. राजकीय शासनाच्या हाती अर्थकारणाची सूत्रे गेली. दरडोई एक मत हे तत्त्व अर्थकारणातही लागू झाले. पिगूची अशास्त्रीय गृहीततत्त्वे प्रत्यक्षात खरी मानली गेली. अशास्त्रीय पिगू प्रत्यक्षात मोठी मान्यता मिळवून व टिकून आहे.

(६ मार्च १९९८)

# ११. शेवगा तोडा, पाय नको

## प्रेमचंदांची कहाणी

सात वर्षांपूर्वी मी एक लेख लिहिला होता; लेखाचे नाव 'नाणे निंधी - शेवग्याचे झाड.' (लेख १) याच शीर्षकाची प्रेमचंदांची एक मोठी प्रसिद्ध कथा आहे. एका मोठ्या जमीनदाराचे खानदान. चार-सहा मुले, सुना, नातवंडे असे मोठे खटले. थाट सगळा देशमुखी. कामे करायची ती सारी नोकराचाकरांनी. घरच्या माणसांनी कामाला हात म्हणून लावायचा नाही. घराण्याचे नाव मोठे. त्यामुळे, सावकार दागिने गहाण ठेऊन घेऊन जमिनी लिहून घेऊन गरज पडेल त्याप्रमाणे कर्ज पुरवीत होते. सारा मोठा बारदाना चालत राहिला. कुणाला काही कमी नाही. साऱ्यांची चंगळ चाललेली. आणि कर्जाचा बोजा वाढत राहिला. एक दिवस अचानक जमीनदार मरून गेले. सावकारांचे तगादे सुरू झाले. कर्जे फेडता फेडता जमीनजुमला दागदागिने सारे धुवून गेले. राहाता जुना वाडाच काय तो राहिला. घर चालावे कसं? कामाची सवय कोणालाच नाही. सुदैवाने, कोणाला व्यसने वगैरे काही नव्हती. पण, दिवसभरात तीन वेळा घरातल्या सगळ्या लोकांसमोर काही चटणी भाकरी तरी आली पाहिजे? ती सोय व्हावी कशी? सुदैवाने, वाड्याच्या परसात शेवग्याच्या शेंगाचे एक जुने मोठे झाड होते. वर्षभर भरपूर शेंगा येत. जमीनदाराच्या पोरांनी एक युक्ती काढली. भल्या पहाटे अंधारात शेंगा तोडून बाजारात विक्रीला पाठवून द्यायच्या; काय येतील त्या पैशात ओल्या कोरड्याची होईल तशी व्यवस्था करायची असा क्रम काही दिवस चालत राहिला. वडिलांचे एक जुने स्नेही एक दिवस पाहुणे म्हणून मुक्कामाला आले. दोनतीन दिवसातच सारी परिस्थिती त्यांच्या लक्षात आली. एवढ्या खानदानी घराची अशी अवस्था झालेली पाहून पाहुण्याला मोठे दु:ख झाले. एक दिवस सगळीकडे सामसूम आहे असे पाहून पाहुणा उठला आणि कुऱ्हाडीने त्याने शेवग्याचे सारे झाड मुळापासून तोडून टाकले आणि अंधारातच, तो कोणाला न सांगता सवरता निघून गेला. दुसरे दिवशी पहाटे नित्यनियमाप्रमाणे पोरे शेंगा तोडायला गेली तर सारे झाडच खाली आलेले. सगळ्या शेंगांवर फार तर आठदहा दिवस गुजराण होईल, पण नंतर

उपासमारीला तोंड देणे भाग आहे, हे साऱ्यांच्या लक्षात आले. सर्वांनी मोठा आकांत केला. वडिलांचा जवळचा स्नेही म्हणून स्वागत केलेल्या पाहुण्याने असे नीच कृत्य का केले, कोणालाच कळेना. पाहुण्याच्या नावाने सगळ्यांनी शिमगा केला. अगदीच उपासमारीची वेळ आली तेव्हा सारी जनलज्जा आणि खानदानाचा मोठेपणा बाजूला ठेवून सारी माणसे झटून कामाला लागली. आणि, काही वर्षातच पुन्हा एकदा घरात लक्ष्मी नांदू लागली. पाहुण्याने शेवग्याचे झाड तोडून सर्वांना पुरुषार्थाचा मार्ग पकडण्यास भाग पाडले हे त्यांच्या लक्षात आले. सर्वांनी मनोमन पाहुण्याला धन्यवाद दिले.

**कहाणीचा पर्यायी शेवट**

प्रेमचंदांची कहाणी थोडक्यात अशी आहे. ज्यावेळी मी हा लेख लिहिला त्यावेळी जागतिक बँकेकडून कर्ज मिळण्यासाठी वाटाघाटी चालू होत्या. उद्योगधंद्यात मंदी, निर्यात दरवर्षी अधिकाधिक घसरती, आयातीची मात्र चढती कमान अशा परिस्थितीत परकीय मदत आणि जागतिक बँकेचे कर्ज यांच्या आधाराने अर्थव्यवस्था रडतखडत चालली होती. जागतिक बँकेने कर्ज देण्याचे नाकारले तर काय होईल? सुरुवातीस मोठ्या अडचणी येतील, मोठे संकट कोसळले असे वाटेल; पण, काय सांगावे, प्रेमचंदांच्या कहाणीतील जमीनदाराच्या पोरांप्रमाणे, शेवग्याच्या झाडाचा आधार तुटला हे स्पष्ट झाले तर सारे देशवासी झटून कामाला लागतील; त्रास संकटे सोसण्यास तयार होतील; पुरुषार्थाचा मार्ग धरतील आणि त्यातून कदाचित्, देशाचे भले होईल. पण, शेवग्याचे झाड तोडायची हिम्मत कोण करेल?

प्रेमचंदांच्या कहाणीत शेवग्याच्या झाडाचा आधार सुटल्यानंतर सारे कुटुंबीय कामाला लागले, त्यांनी पुरुषार्थाची कास धरली. तशी त्यांची बुद्धी नसती तर काय झाले असते? झाड तोडल्याने घरात पुन्हा लक्ष्मी नांदू लागेल ही एक शक्यता; पण साऱ्या घराची धूळधाण होईल, सारे अन्नाला मोताद होतील हीच शक्यता अधिक. शेवग्याचा आधार तुटला हे समजल्यावर कष्टाला लागणे आणि नेटाने, कसोशीने सातत्याने प्रयत्न करत राहणे या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या. झाड पडल्याच्या पहिल्या धक्क्यापोटी हिरीरीने कामाला लागणे हे महत्त्वाचे, पण तो निश्चय टिकवून धरणे आणि शेवटपर्यंत तडीस नेणे हे त्याहून कठीण आहे.

प्रेमचंदांच्या कहाणीतल्याप्रमाणे गोड शेवट क्वचित् कोठे पूर्वजांच्या पुण्याईमुळे घडतही असेल. आकडेवारीने पाहायचे झाले तर अशा परिस्थितीत बरबाद होऊन जाणाऱ्या घरांची संख्याच कितीतरी पटीने अधिक भरेल. देशांचा इतिहास पाहिला तर आलेल्या संकटावर मात करण्यासाठी जिद्दीने दीर्घकाळपर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा केल्याची उदाहरणे फारच कमी.

**चैतन्याचा लखलखाट**

शत्रूचा हल्ला झाला, भूकंपमहापूर अशा नैसर्गिक आपत्ती कोसळल्या तर काही काळ संकटाच्या विक्राळतेसमोर सारे हिणकस कुंठित होते; समाजात एक नवीन बंधुभावाची, ऐक्याची लाट पसरते. लोक केवळ पैसाअडका ओतायला तयार होतात एवढेच नव्हे, तर प्राणावर धोका घेऊन रक्त सांडण्यासही तयार होतात.

१९६२ साली चीनशी युद्धाचा प्रसंग आला. गाठ बलाढ्य शत्रूशी होती. सर्वच बाबतीत आपण कमी पडत होतो. तरीदेखील हिमालयाच्या रक्षणासाठी सारा देश एकत्र झाला. बायाबापड्यांनीदेखील सैन्यातील जवानांच्या मदतीसाठी अंगावरचे दागदागिने उतरवून देऊन ढीग घातले. सुदैवाने, ती सारी लढाई २१ दिवसच चालली. चीनने आपले सैन्य एकतर्फी काढून घेतले नसते, चिनी सैन्य हिमालयातून खाली उतरून गंगायमुनेच्या खोऱ्यात उतरले असते आणि साऱ्या सीमा खरोखरच इंचाइंचाने लढवण्याची वेळ आली असती तर हिंदुस्थान देशवासियांचा उत्साह किती वर्षे टिकून राहिला असता याबद्दल मोठी शंका आहे.

किल्लारीला भूकंप झाला. मृत्यूच्या तांडवाने थैमान घातले. साऱ्या देशातून आणि जगभरातून मदतीचे पूर लोटले. साऱ्या लोकांनी ज्या तत्परतेने मदतीसाठी धाव घेतली आणि जीवाची बाजी लावली त्याचे सर्वत्र मोठे कौतुक होऊ लागले. कौतुकाच्या शब्दांचे ध्वनीप्रतिध्वनी विरतात न विरतात तोच दगडामातीच्या ढिगाऱ्यात पडलेल्या प्रेतांच्या अंगावरचे दागिने काढून नेण्यासाठी भुरटे चोरटे हल्ले करू लागल्याच्या आणि त्यात पोलीसही सामील झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या. परदेशातून मदतीच्या रूपाने आलेले कपडे, अन्नधान्याचे डबे मान्यवर पुढाऱ्यांच्या कुटुंबियांची आणि दोस्त मंडळींची शरीरे आणि घरे सजवू लागले. नेते मंडळींनी कोट्यवधींच्या माया जमा

केल्याची खुलेआम चर्चा होऊ लागली. थोडक्यात, शेवग्याचे झाड तुटलेले पाहिले की प्रतिक्रिया वेगवेगळ्या असू शकतात. निराशेने आणि वैफल्याने ग्रस्त होऊन निष्क्रिय होणारेच बहुसंख्य. क्षणमात्र का होईना, तिरीमिरीने तडफेने कामाला लागणारे तुलनेने दुर्मिळ आणि पहिला उत्साह सातत्याने टिकवून ठेवून नेटाने अथक प्रयत्न चालू ठेवणारी माणसे त्याहून दुर्मिळ आणि अशा गुणवत्तेचे देशतर त्याहूनही विरळा.

कुटुंबावर, गावावर, समाजावर, जातीवर, धर्मावर, देशावर संकट कोसळताच माणसांमध्ये एका चैतन्याचा संचार होतो. त्या चैतन्याच्या भरात माणसे अद्‌भूत कामे करून जातात. पण, हे चैतन्य आणि त्यासाठी करायच्या कष्टांची आणि बलिदानाची तिरीमिरी अल्पजीवी असते. इस्रायली लोकांनी जवळजवळ दोन हजार वर्षे मायदेश निर्माण करण्याचे स्वप्न उराशी बाळगले आणि तडीस नेते. आपला म्हणून कोणता एक प्रदेश नाही आणि जगभर साऱ्या देशात ज्यू जमातीचा अवमान आणि शिरकाण होत आहे अशा परिस्थितीत ही चैतन्याची उर्मी १९ शतके टिकली, ही मोठी विशेष गोष्ट. सारा रशिया नेपोलियनने व्यापला आणि नंतर हिटलरनेही पादाक्रांत केला. लक्षावधी लोक ठार झाले. रशियावर अन्नाला मोताद होण्याची वेळ आली आणि तरीही नेपोलियन आणि हिटलर यांच्या फौजांना मागे हटवीत हटवीत रशियन सैन्याने आणि जनतेने प्रचंड शौर्याने आणि कमालीच्या चिवटपणाने झुंजत झुंजत मागे पिटाळून लावले. खुद्द राजधानी लंडन शहरावर अहोरात्र बाँबचा वर्षाव होत असताना 'देशाला देण्यासाठी माझ्याकडे रक्त, अश्रू आणि घाम याखेरीज काहीच नाही,' अशी घोषणा करणाऱ्या चर्चिलने पाच वर्षे एकाकीपणे शर्थीची झुंज दिली. आणि शेवटी विजय संपादन केला. अल्लाउद्दिन खिलजी पद्‌मिनीवर नजर ठेवून आहे ही जाणीव होताच सारे राजपूत वीर केसरीया बनले, स्त्रियांनी जोहार केले आणि शत्रूच्या फळ्यांमध्ये घुसून लढत लढत वीरांनी बलिदान दिले. चारी दिशांचे प्रदेश शत्रूने व्यापलेले. स्वकीयांपैकी बहुतसारेजण यवनांच्या दरबारात सामील झालेले. अशा परिस्थितीत मूठभर मावळ्यांची फौज उभी कर, कोणा देशमुखाशी सोयरीक जमव, कोणा मोऱ्याचा उच्छेद कर, अंगावर आलेल्या मुसलमान फौजांना युक्तियुक्तीने, गनिमी काव्याने त्रस्त करून सोड असा शिवाजीचा उपक्रम. ही

सारी, संकट तोंडावर आले असता समाजात संचरणाऱ्या चैतन्यशक्तीचा इतिहास घडवण्यासाठी झालेल्या वापराची उदाहरणेच आहेत.

**उन्माद स्थायीभाव नाही**

पण, आपत्ती ओढवली असता वाटेल त्या त्यागास, बलिदानास तयार करणारे चैतन्य ही एक प्रकारची उन्मादावस्था असते; मनुष्यप्राणी आणि समाज यांच्या जीवनाचा तो स्थायीभाव असू शकत नाही. सर्वसामान्य माणसांना जगायचे असते, आयुष्याचा अनुभव घ्यायचा असतो, सुखांचा उपभोग घ्यायचा असतो; धर्म, अर्थ, काम यांबरोबरच समाज आणि मोक्ष हे पुरुषार्थही संपादन करायचे असतात. अशा सुफल आयुष्याची शक्यता जिवंत राहावी यासाठी, आवश्यक पडल्यास, संकटकाळी तो सर्व हिशेब बाजूला ठेवून स्वत:ला झोकून देण्यास तयार होतो. बेफाम उन्मत्त चैतन्याचा हा अनुभव मोठा स्फूर्तीचा स्रोत असतो. पण, असे चैतन्य आणि बलिदान ही जीवनशैली होऊ शकत नाही.

दुर्दैवाची गोष्ट अशी की बहुतेक हुकुमशहांना आणि अनेक क्षुद्रवादी नेत्यांना आपत्कालीन चैतन्य हाच माणसांचा आणि समाजाचा सतत टिकणारा स्थायीभाव असावा असे वाटते. ज्या देशात लोकांना आपल्या राष्ट-ाविषयी प्रेम अधिक, राष्ट-ासाठी त्याग करण्याची जेथे तयारी अधिक ते देश प्रगती करतात असा त्यांचा विश्वास असतो. राष्ट-प्रेमाची निर्मिती हा अशा मंडळींच्या मते देशाच्या थोरवीचा एकमेव मार्ग असतो. राष्ट-, धर्म, जाती, इतिहास, पूर्वजांची थोरवी आणि त्याहीपेक्षा दुसऱ्या एखाद्या जाती-जमाती-राष्ट-ाचा विद्वेष अशा गोष्टींच्या आधारे माणसाच्या आणि समाजाच्या अस्मितेला गोंजारले, त्यांच्या अहंकाराला जोपासले की त्यातून निर्माण होणारे चैतन्य हीच विकासाची खरी ऊर्जा अशा भावनेपोटीच इतिहासभर अनेक प्रसिद्ध पुरुषांनी राष्ट-भावनांना हाक घातली, प्रचंड युद्धे घडवून आणली, लक्षावधींच्या कत्तली केल्या, मुलुखच्या मुलुख बेचिराख केले. पण, एकालाही सतत, धीमेपणे पावलापावलाने का होईना, प्रगती करणारे समाज तयार करता आले नाहीत.

थोडक्यात, शेवग्याचे झाड कापून टाकणाऱ्या पाहुण्याने एक मोठा धोक्याचा निर्णय घेतला. प्रेमचंदांच्या कथेत शेवट गोड झाला. अशी

सुखांतिका होण्याची संभाव्यता, आकडेवारीने पाहू गेले तर, फारशी नाही.

**झाड तोडू नका, लागवड करा**

शेवग्याच्या झाडाविषयी मी लेख लिहिला त्यावेळी ते झाड समूळ कापून टाकण्याचा उपद्व्याप कोणाला सुचला नाही. उलट, दिवसेंदिवस आधुनिक तंत्रज्ञानामुळे राष्ट-राष्ट-ातील सरहद्दींच्या भिंती कोसळत गेल्या, संचार आणि वाहतूक क्षेत्रातील क्रांतीमुळे सारे जग लहान होऊ लागले आहे. जागतिक व्यापारातील आणि देवघेवीतील अडथळे दूर करून सारी व्यापारी देवघेव, गुंतवणूक अधिकाधिक मुक्त असावी या विचाराला अधिकाधिक मान्यता मिळत गेली. खुलेपणास विरोध करणारी मंडळी स्वदेशी राष्ट-भावनेस गोंजारून मताचा काही लाभ घेण्याचा प्रयत्न करतात; पण 'देवेगौडा' काय आणि 'स्वदेशी जागरण मंच'वाले काय – सत्तेची जबाबदारी अंगावर येऊन पडली म्हणजे खुलेपणाचीच भाषा बोलू लागतात; जागतिक व्यापार आणि गुंतवणूक वाढवण्याचीच आवश्यकता प्रतिपादन करू लागतात. थोडक्यात, शेवग्याचे झाड तोडून उत्कर्ष साधण्याची भाषा बाजूला पडली आणि त्याऐवजी 'शेवग्या'ची लागवड करावी, त्याच्या बियांवर प्रक्रिया करून मौल्यवान तेलाचे उत्पादन करावे आणि शेंगेच्या गराचा उपयोग औषधी कामासाठी करावा, त्यासाठी आवश्यक तर इतरेजनांकडून कर्ज घ्यावे, तंत्रज्ञान घ्यावे अशा तऱ्हेची विचारसरणी सर्वदूर सर्वमान्य होत होती.

**अणुचाचण्यांची कुऱ्हाड**

आणि एका रात्रीत कोणा पाहुण्याने 'शेवग्या'ची सारी लागवड उद्ध्वस्त करण्याचा खटाटोप केला, एवढेच नव्हे तर प्रक्रियेसाठी तयार होत असलेला छोटासा उद्योग उद्ध्वस्त केला, उद्योगाच्या विकासासाठी आर्थिक आणि तांत्रिक मदत देऊ करणाऱ्या शेजाऱ्यांशी भांडण उकरून काढले. प्रेमचंदांच्या कहाणीचा आधुनिक आविष्कार दोन टप्प्यात अण्वस्त्रांच्या पाच चाचण्या करून वाजपेयी शासनाने घडवून आणला!

गेल्या आठवड्यात भारताने केलेल्या अणुचाचण्यांचा अर्थ यापरता वेगळा लावणे कठीण आहे. भाजपा हा केवळ पर्यायी पक्ष नाही, ती एक वेगळी राष्ट-वादी प्रवृत्ती आहे, विचारधारा आहे असे वाजपेयींपासून त्या पक्षाचे गल्लीबोळातील नेते सातत्याने आणि उघडपणे सांगत आले आहेत.

निवडणुकीनंतर देश चालवण्याची जबाबदारी येऊन पडताच अर्थशास्त्रज्ञांच्या व्याकरणात उलथापालथ करणे शक्य नाही, पावलापावलाने 'स्वदेशी' सौम्य करत जावी लागेल, अंततोगत्वा स्वदेशीबरोबरच राष्ट-भावना मंदावत जाईल; स्वदेशी राष्ट-भावनेचे युग पुन्हा एकदा आणायचे असेल तर एकच मार्ग आहे; सर्व 'फॉरेन' वस्तूंची 'क्रेझ' असलेले हिंदुस्थानी विलायती गोष्टींचा हव्यास सोडून स्वदेशीकडे वळतील हे आता शक्य नाही, 'स्वदेशी स्वदेशी'च्या उद्‌घोषात प्रत्यक्ष स्वार्थ जोपासला गेला तो काही मूठभर कारखानदारी घराण्यांचा, त्यासाठी शेतकरी आणि ग्राहक यांना प्रचंड बोजा सहन करावा लागला, आता शेतकरी आणि ग्राहक सहजासहजी स्वदेशीच्या भूलथापांना बळी पडणार नाहीत हे भाजपा आणि स्वदेशी जागरण मंच इत्यादी साऱ्या परिवारास स्पष्ट झाले. देश स्वदेशीचा स्वीकार राजीखुषीने करत नसेल तर साऱ्या जगापासून त्याला बाजूला काढण्याचा एक मार्ग आहे. ब्रह्मदेशाने जाणीवपूर्वक जगापासून दूर व्हायचे ठरवले. वाजपेयी शासनाने मोठी युक्ती लढवली. साऱ्या जगाकडून देशाला बहिष्कृत करून घेतले म्हणजे आपोआपच 'स्वदेशी' अर्थव्यवस्थेखेरीज काही पर्यायच राहात नाही. अटलबिहारींच्या अणुस्फोटाच्या पाच चाचण्या जगाला जोडणारे पूल जाणीवपूर्वक उद्‌ध्वस्त करून राष्ट-ीय भावनेच्या उद्‌घोषात 'स्वदेशी' कंपूचे हित साधण्याचा प्रयत्न आहे.

**संशोधन तस्करांची कुर्रेबाजी**

'शेवग्याचे झाड' तोडणारी कुऱ्हाड एवढाच या चाचण्यांचा खरा अर्थ आहे; अन्यथा, त्याला दुसरा काही अर्थच असू शकत नाही. अणुविस्फोट ही काही आता विज्ञानाच्या क्षेत्रातील नवलाच्या करामतीची गोष्ट राहिलेली नाही. उत्सर्गी द्रव्य पर्याप्त प्रमाणात संपादन करू शकणारा देश काय, व्यक्तिदेखील अशा तऱ्हेच्या अणुचाचण्या करू शकते. अमेरिकेतील 'टाईम'सारख्या साप्ताहिकाने सारा तांत्रिक तपशील छापून प्रसिद्ध केला, त्यालाही १० वर्षे होऊन गेली. बऱ्यापैकी प्रयोगशाळा हाताशी असलेला कोणीही विद्यार्थी घरबसल्यादेखील अशा चाचण्या करू शकतो हे सर्वमान्य आहे. किंबहुना, निव्वळ शास्त्रीय कारणासाठी अशा चाचण्या करण्यात काही अर्थ राहिला नाही. चाचण्यांचे सारे निष्कर्ष तपासून पाहाण्यासाठी

गणकयंत्रातील मॉडेलच्या आधारे पडताळून घेता येतात. यातील कोणत्याही गोष्टीबद्दल मतभेद वादविवाद होऊ शकत नाहीत. आणि तरीही, भाजप शासनाने जाणीवपूर्वक, धाडसाने, काहीशा बेदरकारीने चाचण्या घडवून आणल्या हे तर स्पष्ट आहे.

**चाचण्यात बहादुरी राहिली नाही**

अणुशस्त्रांचे अधिकृत स्वामी पाच देश आहेत. याखेरीज, निदान डझनभर देशांना अणुस्फोट घडवण्याचे विज्ञान आणि तंत्रज्ञान अवगत आहे. जर्मनी, जपान, इस्रायल या तीन देशांकडे तांत्रिक जाणकारी आहे एवढेच नव्हे तर, पाचपन्नास अणुस्फोट घडवून आणावेत इतकी त्यांची आर्थिक कुवतही आहे. जर्मनी आणि जपानसमोर कोणी शत्रुराष्ट- उभे ठाकलेले नाही, पण इस्रायलची परिस्थिती तशी नाही. सतत ५० वर्षे रक्ताची मोठी किंमत देऊन भोवतालच्या साऱ्या अरब देशांशी ते झुंज घेत आहेत. अशाही परिस्थितीत त्यांनी अणुचाचणी करणे आवश्यक मानले नाही. मग, हिंदुस्थान व पाकिस्तान याच देशांना अणुचाचण्यांची एवढी उतावळी आणि उत्साह कशासाठी? रेडिओ, दूरदर्शन आणि इतर प्रसारमाध्यमे यांनी एकच धुमधडाका चालवला आहे. अणुचाचण्यांनी भारतीय विज्ञान आणि वैज्ञानिक यांची प्रगती आणि सामर्थ्य स्पष्ट केले आहे अशा कोणीही कितीही गमजा मारो, त्यात काही तथ्य नाही हे उघड आहे.

**हिंदुस्थान पाकिस्तान रानवट देश**

अणुचाचणीविरोधी आंतरराष्ट-ीय करारावर भारताने सही केलेली नाही. ह्या करारामुळे जगभर पाच राष्ट-ांची अणुशक्ती क्षेत्रात मक्तेदारी तयार होईल, चाचण्यांवर बंदी घालायची असेल तर ती सर्वच राष्ट-ांनी मानली पाहिजे, राष्ट-राष्ट-ात याविषयी पंक्तिप्रपंच उपयोगाचा नाही ही भारताची भूमिका तशी तर्कशुद्ध आहे.

**अण्वस्त्रांचा हक्क आणि जबाबदारी**

पण, समर्थ राष्ट-ांना अणुविस्फोटासारख्या विद्ध्वंसकारी क्षेत्रात सर्व राष्ट- एकसारखी मानली जावीत हे तत्त्वच मुळात मान्य होण्यासारखे नाही. ज्या राष्ट-ांकडे अणुविस्फोटाची शक्ती असेल त्यांच्याकडे काही किमान स्थैर्य आणि जबाबदारीची जाणीव असणे आवश्यक आहे. इस्रायलने अरब राष्ट-ांविरुद्ध

अणुबाँबचा प्रयोग करण्याचा मोह ५० वर्षे कटाक्षाने टाळला आहे. रशिया व अमेरिका यांच्यातील शीतयुद्ध मोठ्या गरमाहटीने चाळीस वर्षे चालले. सारी पृथ्वी पंचवीसतीस वेळा समूळ नष्ट करण्याइतकी अण्वस्त्रे दोन्ही महासत्तांकडे मौजूद होती. कितीएक संघर्षाचे प्रसंग उद्‌भवले. जागतिक युद्धाची ठिणगी आता उडते की काय अशी परिस्थिती अनेकदा निर्माण झाली. ख्रुश्चेवने क्यूबामधील अस्त्रे परत घेऊन एका तऱ्हेने हार स्वीकारली. व्हिएतनाममध्ये तर बलाढ्य अमेरिकन महासत्तेचा अपमानजनक पराभव झाला. पण, अशाही परिस्थितीत अण्वस्त्रांच्या नियंत्रणाचे बटण दाबण्याचा मोह महासत्तांच्या राष्ट-प्रमुखांनी टाळला. अशा तऱ्हेचा संयम आणि मुत्सद्दी सुज्ञपणा सगळ्याच राष्ट-प्रमुखांकडे असेल असे कोणीच म्हणणार नाही. इदी अमीन आणि गद्दाफी यांसारख्या राष्ट-प्रमुखांकडे अणुविस्फोटाची शक्ती राहिली तर जगाला सुखाने झोप घेणे अवघड होईल हे उघड आहे. हिंदुस्थानी, पाकिस्तानी लोकांना हे सत्य पचवणे कठीण जाईल; पण, दोन्ही देशांची गणना जबाबदार राष्ट-ात केली जात नाही. एखादे देऊळ किंवा मशीद, फार काय क्रिकेटचा सामना किंवा एखाद्या कलावंताचा कार्यक्रम या विषयावर ज्या देशातील मान्यवर नेतेही माथेफिरूसारखे बोलतात, हातात जी जी काही साधने असतील – सुरे, तलवारी, पिस्तुले, मशीनगन, स्फोटके – त्यांचा बिनदिक्कत वापर करून मुडदे पाडतात आणि त्यासंबंधी खुलेआम शेखी मिरवतात; राष्ट-, धर्म अशी नावे घेऊन आपल्या बर्बरतेचे समर्थन करतात त्या देशांना जगाने अण्वस्त्र संपादनास पात्र मानावे कोणत्या आधाराने? मशिदी पाडणारे, खेळाची मैदाने उद्‌ध्वस्त करणारे, मान्यवर कलावंतांना हैराण करणारे भारतीय नेते आणि धर्माचा उद्‌घोष आणि परधर्मीयांचा विद्वेष केल्याखेरीज ज्यांना राजकीय स्थान टिकवणे शक्य नाही अशा पाकिस्तानी नेत्यांच्या हाती अण्वस्त्रे आली तर केवळ जिद्दीपोटी – पृथ्वी बुडते का जगते याचा विचार न करता – ही मंडळी खुशाल एकमेकांवर अण्वस्त्रांचा प्रयोग करतील अशी आशंका जगाला वाटली तर त्यांना दोष देणे कठीण आहे.

**राष्ट-ीय सुरक्षेत काय फरक पडणार?**

हिंदुस्थान आणि पाकिस्तान, दोन्ही देशांचे पंतप्रधान अणुस्फोटांच्या

चाचणीविषयी बोलताना जवळजवळ एकच पालुपद घोळवितात. हा प्रश्न राष्ट-ाच्या सुरक्षेचा आहे. आम्ही निर्णय घेऊ ते आमच्या देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने घेऊ. त्यात कोणाची ढवळाढवळ सहन करणार नाही; इत्यादी इत्यादी.

अण्वस्त्रे तयार केल्यामुळे देशाची सुरक्षितता कितपत सुधारते? संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांचे अलिकडचे एक निवेदन 'चीन हाच आमचा सर्वात मोठा शत्रू आहे.' सोडल्यास पाकिस्तान हेच प्रमुख शत्रुराष्ट- आहे. त्याच्याशीच आतापर्यंत तीन मोठी युद्धे लढावी लागली. आजही काश्मिर, पंजाब आणि इतरत्र पाकिस्तानच्या अतिरेकी आणि घातपाती कारवायांना तोंड द्यावे लागत आहे. गेली पन्नास वर्षे हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्यात एक अघोषित युद्ध सतत चालूच आहे. चीन अण्वस्त्रांच्या क्षेत्रात आपल्यापेक्षा कितीतरी पुढे आहे. पारंपरिक शस्त्रास्त्रांनी चीनशी खुलेआम युद्ध लढणेही मोठे दुष्कर होईल; अण्वस्त्रांच्या बाबतीत तर चीनशी तुलना करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. थोडक्यात, अण्वस्त्रांच्या विकासाने हिंदुस्थानच्या सुरक्षा व्यवस्थेस मजबुती येईल असे म्हणणाऱ्यांच्या मनात शत्रुराष्ट- म्हणून फक्त पाकिस्तानच असू शकते.

हिंदुस्थानी लोकांच्या डोक्यात पाकिस्तानविषयी एक अगदीच अजागळ गंड आहे. आकाराने, अर्थसामर्थ्याने आणि लष्करी तयारीत पाकिस्तान ही ताकद हिंदुस्थानच्या तुलनेत वीस टक्केसुद्धा नाही. काही आधुनिक विमाने आणि अस्त्रे यांबाबतीत प्रमाण कमी व्यस्त आहे. पण, कोणत्याही युद्धात पाकिस्तान हिंदुस्थानवर मात करू शकेल ही गोष्ट केवळ अशक्यप्राय आहे. या परिस्थितीची पाकिस्तानी नेत्यांना चांगली जाणीव आहे. त्यामुळेच, पाकिस्तानी अंदाजपत्रक आणि अर्थव्यवस्था या दोघांवरही लष्करी खर्चाचा बोजा फार मोठा आहे. तेथील राजकारणावरही लष्कराचे प्रभुत्व सतत राहाते याचे कारण हिंदुस्थानविरुद्ध लष्करी तयारी हे त्यांच्या अंतर्गत आणि परराष्ट-ीय धोरणांचे मुख्य सूत्र आहे.

अणुबॉंब संपादन केल्यामुळे पाकिस्तानबरोबरच्या संघर्षातील परस्पर बलात काय फरक पडू शकतो? आजमितीस तरी त्यामुळे पाकिस्तानची बाजू वरचढ झालेली दिसते. आंतरराष्ट-ीय क्षेत्रातील हिंदुस्थानची एक शांतताप्रिय

लोकशाही राष्ट- म्हणून प्रतिमा आणि प्रतिष्ठा होती. इस्लामिक देशसुद्धा या प्रतिमेमुळे काही मर्यादेपलीकडे हिंदुस्थानविरोधी भूमिका घेण्यास धजत नसत. गौतमबुद्ध, महात्मा गांधींपासूनच्या या परंपरेची दोन दिवसातील पाच स्फोटांनी वासलात लावून टाकली आहे.

सार्‍या इस्लामिक देशांचाच आता पाकिस्तानवर दबाव वाढणार आहे. इस्लामी देशांच्या हाती अणुशक्ती असावी असा अनेक वर्षे तेथील जहाल हुकुमशहांचा प्रयत्न चालू आहे. अशी शस्त्रे हाती आली तर बिनदिक्कतपणे इस्रायलविरुद्ध त्यांचा उपयोग करण्यास ते कचरणार नाहीत. इस्लामी अणुबॉंब हरप्रयत्नाने तयार होऊ न देणे हे पाश्चिमात्य राष्ट-ांच्या परराष्ट-ीय धोरणाचे मोठे सूत्र आहे. मध्यपूर्वेतील, त्यातले त्यात आर्थिकदृष्ट्या प्रबळ असलेली मुस्लिम राष्ट-े केवळ अमेरिकेच्या दबावामुळे अणुस्फोट करण्यास धजावत नाहीत. पण, गद्दाफी आणि सद्दाम हे काही फक्त दोनच माथेफिरू नेते नाहीत. ‘हिंदुस्थानपासून संरक्षण करण्यासाठी बॉंब तयार करणे हा आमच्या राष्ट-ीय अस्मितेचा आणि सुरक्षेचा प्रश्न आहे’ असा कांगावा करून पाकिस्तानने अणुसामर्थ्य मिळविले तर ते थोड्याच काळात सार्‍या अरब लष्करांना उपलब्ध होईल यात काही शंका नाही. पाकिस्तानी बॉंब तयार होऊ नये यात पाश्चिमात्य देशांना प्रचंड स्वारस्य आहे. पाकिस्तानने हिंदुस्थानी चाचण्यांना उत्तर म्हणून अणुस्फोट करू नयेत यासाठी सर्वतोपरी प्रयत्न पाश्चिमात्य राष्ट-े करतील. पाकिस्तानच्या अणुकार्यक्रमाला चेपण्यासाठी, पाकिस्तानने खरेदी केलेली एफ-१६ विमाने देखील अमेरिकेने कित्येक वर्षे अडवून ठेवली, एवढेच नव्हे तर खरेदीची रक्कमही गोठवून टाकली. हिंदुस्थानी अणुचाचण्यांनंतर आता ही विमाने पाकिस्तानला देण्याचे अमेरिकेने ठरविले आहे. हिंदुस्थानच्या हुंब भूमिकेचा फायदा घेऊन पाकिस्तान पारंपरिक शस्त्रास्त्रसज्जतेत भरगच्च मजबुती आणेल असे दिसते आहे. प्रत्युत्तर म्हणून अणुस्फोट करण्यापेक्षा अणुस्फोट करण्याची भाषा बोलत राहणे आणि त्या धमकीपोटी आधुनिकतम शस्त्रास्त्रे मिळवीत राहणे हा खेळ पाकिस्तानला मोठा फायद्याचा ठरणारा आहे. पाकिस्तानी पुढार्‍यांचेही डोके फिरले आणि त्यांनी स्फोट केला की शस्त्रसामुग्रीच्या मदतीची ही गंगा आटून जाईल. येत्या काही काळात तरी सोन्याची अंडी देणारी कोंबडी कापण्याचा अजागळपणा पाकिस्तान करणार नाही. कारण उघड आहे. खरोखर युद्धाचा प्रसंग उद्‌भवला तर अण्वस्त्रांचा तसा

काहीच उपयोग नाही. हिंदुस्थान अण्वस्त्रधारी देश झाला. अण्वस्त्रांचा वापर करण्याचा आदेश देण्याचे एक बटण पंतप्रधानांच्या हाती आले तर त्याचा ते उपयोग कधी आणि कसा करू शकतील?

पाकिस्तानातून काश्मिरात घुसलेल्या आतंकवाद्यांनी पाचशेहजार हिंदुंची कत्तल केली; पंतप्रधान अणुबटण दाबतील? काश्मिरमध्ये घातपात्यांच्या झुंडीच्या झुंडी पाकिस्तानने पुन्हा एकदा घुसविल्या, स्थानिक लोकांच्या पाठिंब्यामुळे ते यावेळी श्रीनगरपर्यंत चालून आले; पंतप्रधान अणुबटण दाबतील? पाकिस्तानची विमाने अमृतसर-लुधियाना-अंबालापर्यंत बाँबवर्षाव करू लागली, पंतप्रधान अणुबटण दाबतील?

दोन्ही देशातील युद्ध एकाचा सपशेल पाडाव आणि दुसऱ्या देशाने त्याचा सर्व मुलुख व्यापणे आणि तेथे आपली सत्ता बसवणे अशा तऱ्हेने होणेच शक्य नाही. तेव्हा, अगदी निर्वाणीचा मार्ग म्हणूनदेखील युद्धप्रसंगात अणुबाँबचा काही उपयोग नाही. भाजपा सरकारला राष्ट-ीय सुरक्षेची खरी चिंता असती तर त्यांनी अणुचाचण्या किंवा आधुनिक विमाने, तोफा यांच्या उपयोगावर आधारलेली संरक्षणनीती सोडून साऱ्या लष्कराची पुनर्रचना करण्याचे काम हाती घ्यायला पाहिजे होते. हिंदुस्थानची संरक्षण दले पूर्णत: व्यावसायिक रचनेची आहेत. युद्ध सुरू झाले की फौजा लढतात, लोक बातम्या ऐकत राहातात. ही शस्त्रास्त्रांची 'मॅच' दोनतीन आठवड्यांपलीकडे चालणार नाही याची सर्वांना खात्री असते. १८ ते २५ वयोगटातील सर्व तरुणांना सक्तीचे लष्करी शिक्षण आणि युद्धकाळात प्रत्येक तरुणास आघाडीवर जाण्यासाठी बोलावण्याची व्यवस्था आणून लष्कराची पुनर्रचना केली तर छोट्या स्वयंचलित बंदुकांच्या वापराने भारताची संरक्षण व्यवस्था अधिक मजबूत झाली असती. उत्तम स्वयंप्रेरित बंदुका हर जवानाच्या हाती देणे ही राष्ट-ीय सुरक्षेच्या दृष्टीने अणुबाँबपेक्षा कितीतरी पटीने परिणामकारक ठरेल. पण, अणुस्फोट केल्याची घोषणा करण्यात जो थाटमाट आहे आणि राजकीय भांडवल करण्याची शक्यता आहे ती अशा घोषणेने थोडीच होणार आहे? जवान लढतात तोपर्यंत सुरक्षेची महती गाणारे आपल्या पोटच्या पोरांना किंवा स्वत:ला आघाडीवर जाण्याची वेळ येणार आहे हे समजले तरी त्यांचा सूर कायम ठेवतात काय, हे पाहाणे मोठे मनोरंजक होईल.

## अणुंच्या आतषबाजीची किंमत

एका बाजूला अर्थमंत्री, व्यापारमंत्री जगभरचे दौरे करतात, परदेशी गुंतवणूकदारांनी हिंदुस्थानात धन ओतावे, तंत्रज्ञान आणावे म्हणून विनवणी करीत फिरतात; पावसाने थोडे डोळे वटारले तर दक्षिणोत्तर चारपाचशे शेतकऱ्यांना विष पिऊन जीव देण्याखेरीज पर्याय राहात नाही. अशा देशाने, दुसऱ्या बाजूला अणुक्षेत्रातील आपली मस्ती दाखविण्यापूर्वी काही विवेक केला पाहिजे. प्रमुख श्रीमंत देशांच्या उच्छिष्टावर पिंड पोसलेल्या दरिद्री देशांच्या यादीतील हा भणंग देश, विज्ञानाच्या क्षेत्रात उगाचच काही आंग्लविद्याविभूषित संशोधनतस्करांचे अहंकार गोंजारण्यासाठी मिशीला तूप लावून फिरतो हा जागतिक कुतुहलाचा किंवा करमणुकीचा विषय राहिला आहे. पण, या माकडचेष्टा प्राणघातक मर्यादा ओलांडून पलीकडे जाऊ लागल्या तर जग त्याची गांभीर्याने दखल घेईल, आवश्यक तर बडगा दाखवेल हे सहज समजण्यासारखे आहे.

पाच अणुस्फोट घडवल्यानंतर जगातील प्रबळ राष्ट्रांनी भारताविरुद्ध आर्थिक कार्यवाही केली तर त्याबद्दल तक्रार करण्यास हिंदुस्थानला जागा नाही. इराकचा सद्दाम आणि हिंदुस्थानचे 'अटलबिहारी' यात फरक करणे कठीण आहे.

आंतरराष्ट्रीय बहिष्काराचा धोका चाचणीचा निर्णय घेण्यापूर्वी वाजपेयी शासनाच्या लक्षात आला नव्हता असा युक्तिवाद बाष्कळपणाचा होईल. परिणामांची पुरेपूर जाणीव ठेवून घेण्यात आलेला हा निर्णय आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारातील हिंदुस्थानने लादलेल्या प्रतिबंधांबद्दल जागतिक व्यापार संस्थेच्या दरबारात अनेक प्रकरणे चालू आहेत. त्यातील बहुतेकांचा निर्णय भारताच्या विरुद्ध लागत आहे. अशा परिस्थितीत आपल्या माथी दोष न घेता आर्थिक क्षेत्रात जगापासून फारकत ठेवण्याचा हा जाणीवपूर्वक घेतलेला निर्णय आहे.

आतापर्यंतच्या लक्षणांवरून तरी ही रणनीती यशस्वी आणि लोकप्रिय होत असल्याचे दिसत आहे. कोणाही विरोधी पक्षाची अणुचाचण्यांविरुद्ध 'ब्र' काढण्याची हिम्मत झालेली नाही. सर्वांनी हा मुद्दा राष्ट्रीय सुरक्षेचा असल्यामुळे आपली सहमती दाखविली आहे. सर्वजणच देशी विज्ञान आणि वैज्ञानिक यांच्या स्तुतिस्तोत्रपाठात सामील झाले आहेत.

आजमितीस जगातील सर्व प्रमुख सातही देशांनी भारतावर व्यापार आणि मदत या दोनही क्षेत्रातील संबंध तोडण्याचे जाहीर केले आहे. याचे परिणाम निभावून नेण्याची आणि सोसण्याची भारतीय शासनाची आणि जनतेची कितपत तयारी आहे हा मुद्दा खरा महत्त्वाचा.

इराकच्या सद्दाम हुसेनने गेली १० वर्षे कठोर आंतरराष्ट-ीय आर्थिक बहिष्काराचा सामना चालवला आहे. अशा बहिष्काराला चिवटपणे तोंड देण्यासाठी लागणारी कुवत आणि नेतृत्व आपल्याकडे आहे? भारतातील अणुशक्ति संस्थाने नष्ट करण्यासाठी लष्करी कारवाईचा निर्णय संयुक्त राष्ट-संघाने घेतला तर त्याला आपण किती दिवस तोंड देऊ शकू. राष्ट-ीयत्वाच्या गर्जना आणि वल्गना वातावरणात विरून जाऊ लागल्या आणि स्वदेशी राष्ट-भावनेच्या वल्गनांचा जोश ओसरू लागला म्हणजे इराकसदृश्य परिस्थितीचा सामना आपण किती समर्थपणे करू शकू हा खरा प्रश्न आहे. सरकारी नियुक्तीने दूरदर्शनवर मुलाखती देणारे स्वयंमान्य तज्ज्ञ 'जागतिक बहिष्काराचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर काहीच परिणाम होणार नाही' असे बजावून बजावून सांगत आहेत. 'देशाचा जागतिक व्यापार राष्ट-ीय उत्पादनाच्या एक टक्कासुद्धा नाही, तेव्हा बहिष्काराचा परिणाम होऊन होऊन होणार किती? पुष्कळसे देश बहिष्कारात सामील होणारच नाहीत' असा त्यांचा युक्तिवाद आहे. पण, 'जागतिक व्यापाराचे प्रमाण कमी आहे आणि जागतिक गुंतवणूक नगण्य आहे हेच भारतीय अर्थव्यवस्थेच्या कमकुवतपणाचे कारण आहे' असे सर्व मान्यवर अर्थशास्त्रज्ञ मांडतात; व्यापार आणि गुंतवणूक वाढली तरच देशावरील आर्थिक अरिष्ट दूर होईल असे मानतात. थोडक्यात, आर्थिक संकट टाळण्याचा जो मान्यवर महामार्ग त्याचा या बहिष्काराने 'रास्ता रोको' होतो आहे. त्याचे नेमके परिणाम काय होतील? भारतीय ग्राहक आणि शेतकरी यांनी स्वातंत्र्यानंतरची ५० वर्षे सरकारी धोरणांचा काच सतत सहन केलाच आहे. खुलेपणाच्या वाऱ्याचा थोडा अनुभव घेतल्यानंतर ते पुन्हा आपली मान समाजवादाऐवजी राष्ट-वादाच्या गोंडस नावाच्या जुवाखाली देण्यास तयार होतील काय?

या विषयावर विद्वान, पंडीत काहीही अकांडतांडव घालोत; खरे उत्तर बाजारपेठेने दिले आहे. शेअर बाजार कोसळत आहे. एका दिवसात रुपया ७० पैशाने पडला. येत्या पाच सहा महिन्यात तो कोठपर्यंत कोसळेल हे सांगणे कठीण

आहे. डिसेंबर १९९८ पर्यंत डॉलरची किंमत ६० रुपयांवर जाईल असे भाकीत मी १९९५ सालापासून सांगत आहे, ते खरे ठरण्याची सारी लक्षणे दिसत आहेत. स्वदेशीच्या जपमाळा ओढणारे कारखानदार प्रत्यक्षात सर्वच बाबतीत पाश्चिमात्य देशांवर अवलंबून आहेत. समाजवादाच्या काळात ५० वर्षे त्यांना हरतऱ्हेने आंजारले गोंजारले तरी ते खरेखुरे उद्योजक बनले नाहीत. असा परभृतांच्या आधाराने स्वदेशीचे गलबत पाण्यात सोडणे हा मोठा विलक्षण प्रकार आहे.

अटलबिहारी पंतप्रधान आहेत; देशाचे मान्यवर नेते आहेत. राष्ट-ीय सुरक्षेच्या ललकारीने देशात आणि देशवासियांत काय चैतन्याचा हुंकार भरता येतो याबद्दल त्यांच्या अनुमानाला आव्हान देणे धाष्ट्यार्चे होईल. आणीबाणीचा उत्साह सात महिने टिकला, अणुचाचणीतून निघालेली उन्मादावस्था तितकी टिकली तरी पुरे झाले.

समजा, भारतावरील व्यापारी बहिष्कारामुळे पेट-ोलियम, वरखते, रसायने यांचा पुरवठा तुटला तर त्याची काही पर्यायी व्यवस्था आहे? भारतीय लष्कराकडे पुरेसे पेट-ोल, डिझेल नसेल तर त्यांच्या हाती अणुबॉंब देऊन काय फायदा होणार आहे? आणि, सारी अर्थव्यवस्था कोसळत असेल तर लष्कराच्या हातातील दोनचार अणुबॉंब देशाचे संरक्षण करू शकतील?

देश जोपर्यंत प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करीत असतो तोपर्यंत लोक पुढाऱ्यांना डोक्यावर घेऊन नाचतात. बिरबलाच्या 'माकडीण आणि तिचे पिल्लू' या कथेतील माकडीणीच्या नाकात पाणी जाऊ लागले की ती आपल्याच पिल्लाला पायाखाली घालण्यास कचरत नाही. ३० वर्षे इंडोनेशियावर सतत अधिसत्ता गाजवणाऱ्या सुहार्तोचा हा आजमितीचा अनुभव आहे. अर्थव्यवस्था कोसळली तर वाजपेयींची गतही काही वेगळी राहणार नाही.

अशा परिस्थितीत प्रार्थना करायची तर ती एकच. ''इंद्रराज देवा! वरुणराजा! आता भाजपचे राज्य आले आहे. यंदा भरपूर आणि चांगला पाऊस पडू द्या, यंदा ओला किंवा सुका दुष्काळ झाला आणि भिकेची थाळी घेऊन अन्नधान्यासाठी याचना करीत फिरावे लागले तर आज चाललेल्या भारतीय विज्ञानाच्या उदेउदेच्या ललकाऱ्यांनंतर ती लाचारी डोळ्यांनी पाहणे कठीण होईल. तेवढी वेळ येऊ देऊ नको इंद्रदेवा! राज्य आपल्या लोकांचे आहे!''

(२१ मे १९९८)

# १२. प्रचलित अर्थव्यवस्था व शेतकऱ्यांचे भवितव्य

हिमालयातील सर्वोच्च शिखर एव्हरेस्ट सर्वप्रथम शेर्पा तेनसिंगने जिंकले. पण, एव्हरेस्ट जिंकल्यानंतर शेर्पा तेनसिंग Spent Force झाला. नंतर कित्येक जणांनी एव्हरेस्ट सर केले. तेनसिंगचे नाव विस्मरणात गेले; वाहून गेलेल्या धबधब्यासारखे.

एका अर्थाने मीही Spent Force झालो आहे. मी १९८० साली श्रीरामपूरला आलो होतो तेव्हा अण्णासाहेब शिंदे यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांना सांगितले की, देशाच्या गरिबीचे कारण म्हणजे शेतकऱ्यांची गरीबी आहे. शेतकऱ्यांच्या गरीबीचे कारण शेतीमालाला भाव नाही हे आहे, आणि शेतीमालाला भाव नाही याचे कारण शेतीमालाला भाव मिळता कामा नये असे सरकारी धोरण आहे. या माझ्या विधानाला आणि भूमिकेला त्यावेळचे, वि. म. दांडेकरांपासून सगळे अर्थशास्त्रज्ञ विरोध करीत होते; कोणीही राजकारणीसुद्धा त्याला मान्यता देत नव्हता. उसाचा लढा चालू झाल्यानंतर 'उसाला जर ३०० रुपये टन भाव दिला तर साखर कारखाने सगळे मोडीत काढायला लागतील' असे आजचे मान्यवर नेते त्यावेळी म्हणत होते. आज निवडणुकीचे जाहिरनामे पाहिले तर जाहिरनामा कोणत्याही पक्षाचा असो 'शेतकऱ्यांना उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव मिळाला पाहिजे' हे कलम त्यात असतेच. आणि म्हणून मी Spent Force झालो आहे.

डंकेल प्रस्तावावर हिंदुस्थानात जेव्हा चर्चा सुरू झाली तेव्हा 'भारताने जागतिक बाजारपेठेत ताकदीने प्रवेश केला पाहिजे आणि त्याकरिता डंकेल प्रस्तावाच्या रूपाने एक चांगला दरवाजा उघडतो आहे' म्हणून त्याचे समर्थन करणारा सबंध देशात मी एकटा होतो – डॉ. मनमोहनसिंग नव्हते, डॉ. मुखर्जी नव्हते. ही सर्व मंडळी आपली व्यवस्था सुरक्षित असावी, लोकांना काहीतरी संरक्षण असावे, खुल्या व्यवस्थेत आपण टिकणार नाही अशी भूमिका मांडणारी होती. मग, जवळजवळ दोन वर्षांच्या चर्चेनंतर हिंदुस्थान सरकारने जागतिक व्यापार संघटने (WTO) च्या करारावर सह्या केल्या आणि मग सगळे खुल्या व्यवस्थेबद्दल बोलू लागले. एव्हरेस्ट सर झाले आणि शेर्पा तेनसिंग Spent Force झाला.

ज्यावेळी समाजवादाचा उदो उदो होत होता त्यावेळी शेतकरी संघटनेच्या वतीने मी भूमिका घेतली की सामूहिक निर्णयप्रक्रिया ही कधीही शास्त्रीय असू शकत नाही. दिल्लीला बसून जर कोणी ठरवू पाहील की मी किती धान्य उगवायचे आणि किती पिकवायचे, आणि त्याकरिता कोणती खते वापरायची आणि कोणती औषधे वापरायची तर तो निर्णय चुकीचाच असेल, तो बरोबर असूच शकत नाही. जर निर्णयाची प्रक्रिया शेताच्या पातळीवर झाली, कारखान्याच्या पातळीवर झाली तर निर्णय योग्य होऊ शकतात. प्रत्येक व्यक्तीच्या मनात 'स्वत:चं भलं व्हावं' अशी एक प्रेरणा असते. त्या प्रेरणेचा पाठलाग करता करता तो केवळ स्वत:चाच नव्हे, स्वत:च्या कुटुंबाचाच नव्हे तर सबंध समाजाचा आणि राष्ट्राचा उद्धार साधून जातो. पण, 'मी राष्ट्राचा उद्धार करतो आहे, जे काही आहे ते मला समजले आहे आणि मला जे समजले आहे ते सर्वसामान्यांना समजण्याच्या पलीकडे आहे; तेव्हा, लोकहो, तुम्ही माझे ऐका' असे म्हणणारे जे धार्मिक, पंडित निघाले त्यांनी सबंध समाजाला धोका दिला. आणि अशा तऱ्हेची भाषा वापरणाऱ्या समाजवाद्यांचादेखील इतिहासाने पराभव केला. शेतकरी संघटना चालू झाली तेव्हा समाजवादाच्या पाडावाचे भाकित केल्यावर सगळे म्हणायचे, 'हा काय मूर्खपणा आहे, समाजवाद हे उद्याचे भविष्य आहे!' पण, दहा वर्षांच्या कालावधीत संपूर्ण जगभर समाजवादाचा पाडाव झाला; तेनसिंगने एव्हरेस्ट गाठले आणि तो Spent Force झाला.

१९८९ साली व्ही. पी. सिंग पंतप्रधान असताना मी कॅबिनेट दर्जाच्या 'कृषी सल्लागार समिती'चा अध्यक्ष होतो. मिळालेल्या अपुऱ्या कार्यकालामध्ये इतर काही नाही तरी शेतीमालाचा उत्पादनखर्च काढण्याच्या पद्धतीत काही बदल केले. त्या बदलांमुळे मोठा फरक पडला. १९९१ नंतर शेतीमालाच्या भावांच्या वाढीची गती बिगरशेतीमालांच्या भावांच्या वाढीच्या गतीपेक्षा पहिल्यांदाच जास्त झाली. हे आकडेवारीतून तपासता येईल. त्याच्या आधी कापसाचा भाव क्विंटलमागे ५ किंवा १० रुपयांनी वाढायचा. त्यावर्षी क्विंटलमागे ९० रुपयांनी जी वाढ झाली ती आमच्या समितीने उत्पादनखर्च काढण्याच्या पद्धतीत केलेल्या बदलांमुळे झाली. 'हातामध्ये पैसे आले तरीसुद्धा लोक क्रांती करीत राहतात' अशा तऱ्हेचा विचित्र विचार फक्त माओ

त्से तुंग मांडतो. एकदा मनुष्य सुखवस्तु झाला की तो रस्त्यावर बसायला फारसा तयार होत नाही; झालाच तर नऊ दिवस, पुढे नाही. नंतर पसार. त्याप्रमाणे, आपल्या मालाला बरा भाव मिळू लागला, उसाला बऱ्यापैकी भाव मिळू लागला, कापसाला बऱ्यापैकी भाव मिळू लागला, कांद्याला बऱ्यापैकी भाव मिळू लागला की मग रस्त्यावर कोण जाऊन बसेल, तुरुंगात कोण जाऊन बसेल अशी साहजिकच भावना तयार होते. संपन्नता आणि क्रांतिप्रवणता यांचा विरोध आहे. आणि ज्या प्रमाणात शेतकरी आंदोलनाने शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता आणून दिली त्या प्रमाणात क्रांतिप्रवणता संपुष्टात आली आणि शरद जोशी Spent Force झाला ही गोष्ट खरी आहे.

स्वातंत्र्य मिळाले आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अन्नधान्याचा तुटवडा तयार झाला. अमेरिकेतून गहू आणावा पण हिंदुस्थानातील शेतकऱ्याला मात्र उत्पादन वाढवायला उत्तेजन देऊ नये असे तत्त्वज्ञान अधिकृतरीत्या स्वीकारले गेले. जुने समाजवादी अशोक मेहता यांनी आपल्या अहवालात म्हटले आहे की, ''अमेरिकेतून जहाजांनी आणलेला गहू इतका स्वस्त पडत असेल तर आपण हिंदुस्थानच्या शेतीकडे काही काळ दुर्लक्ष केले तरी चालेल.''

१९६५ साली यात बदल घडला. हा बदल नेहरू घराण्याने घडवला नाही, लाल बहादूर शास्त्रींनी घडवला हे मुद्दाम सांगायला हवे. कारण नेहरू घराण्याने शेतीकडे कधी लक्ष दिले नाही. लाल बहादूर शास्त्री आले, त्यांनी सी. सुब्रह्मण्यम् यांना शेतीमंत्री केले. सी. सुब्रह्मण्यम् यांनी आपल्या एक पुस्तकात सुरुवातीलाच लिहिले आहे की, 'मी आधी उद्योगधंद्याचा मंत्री होतो, नंतर शेतीमंत्री झालो. शेतीमंत्री झाल्यावर माझ्या लक्षात पहिली गोष्ट आली की हिंदुस्थानातील शेती हा आंतबट्ट्याचा व्यवहार आहे, तोट्याचा धंदा आहे; त्यातून दोन पैसेसुद्धा सुटत नाहीत' आणि त्याचे कारण 'सरकारचे शेतीमालाच्या भावासंबंधीचे धोरण शेतकरीविरोधी आहे.' हे आहे. ही १९६५ साली दिलेली शेतीच्या लुटीची कबुली. त्यानंतर लाल बहादुर शास्त्रींच्या नेतृत्वाखाली हरित क्रांतीला आणि धवल क्रांतीला सुरुवात झाली. याचे श्रेय शास्त्रीजींच्या बरोबरीने सी. सुब्रह्मण्यम्, अण्णासाहेब शिंदे यांच्याकडेही जाते. नेहरूंनी नागपूरच्या अधिवेशनात शेतीच्या राष्ट्रीयीकरणाची अभद्र कल्पना मांडली. तिला कडाडून विरोध करणाऱ्या पंजाबराव देशमुख आणि चरणसिंग

यांचाही या श्रेयामध्ये मोठा वाटा आहे.

माझ्या आतापर्यंतच्या लिखाणात अण्णासाहेब शिंदे यांचे नाव श्रेयनामावलीत घालण्याचे माझ्याकडून राहून गेले. ही चूक कशी झाली समजत नाही. खरे तर ३० जानेवारी १९८० ला मी श्रीरामपूर येथे त्यांच्या घरी भेटायला आलो होतो. तेव्हा त्यांनी माझे म्हणणे अत्यंत शांतपणे ऐकून घेतले आणि म्हणाले, 'शरदराव, शेतीमालाला भाव मिळत नाही कारण तसा भाव मिळावा अशी राजकीय कांक्षाच नाही.' मंत्रीमंडळात असलेला मनुष्य हे स्पष्टपणे सांगतो याचा किती भयानक अर्थ होतो? अर्थ स्वच्छ आहे. शेतकऱ्यांच्या पिढ्यान् पिढ्या कर्जात जन्मल्या, कर्जात जगल्या आणि कर्जात मेल्या. याचे कारण त्यांनी असेच मरावे ही राजकीय बुद्धी होती. थोडा जरी प्रामाणिकपणाचा अंश असता तरी त्यावेळी काँग्रेसचे जे कोणी शेतकरी आईबापांच्या पोटी जन्मलेले मंत्री होते त्यांनी पटापट राजीनामे दिले असते. पण, अशी भलतीच अपेक्षा करण्यात काही अर्थ नाही.

मंत्री असताना अण्णासाहेब शिंदे यांनी जे काम केले ते माझ्या नजरेतून सुटण्यास, त्यांच्याबद्दल पूर्वग्रहदूषितपणा येण्यास आणखीही एक कारण असावे. आमची भेट झाली त्यावेळी आमच्या ज्या आंदोलनाची उभारणी चालू होती ते सहकारी साखर कारखान्यांच्या विरोधात झाले. सहकारी साखर कारखाने शेतकऱ्यांना उसाचा रास्त भाव देत नाहीतच, पण सहकारी साखर कारखान्यांमुळे, शेतकऱ्यांना रास्त भाव मिळू नये अशी योजना राबविणे सरकारला अधिक सुकर झाले अशी माझी भूमिका आहे आणि सहकाराच्या विरोधातील या भूमिकेमुळे अण्णासाहेबांच्या इतर कर्तृत्वाकडे माझे दुर्लक्ष झाले.

'प्रचलित अर्थव्यवस्था आणि शेतकऱ्यांचे भवितव्य' असा विषय आज माझ्यासमोर आहे. प्रचलित अर्थव्यवस्था म्हणजे आजची अर्थव्यवस्था आणि शेतकऱ्यांचे भवितव्य म्हणजे शेतकऱ्यांची उद्याची परिस्थिती असे दोन वेगवेगळ्या काळातले मुद्दे आहेत. या दोघांचा संबंध जोडायचा मी जो प्रयत्न केला आहे तो थोडक्यात मांडतो.

अण्णासाहेब शिंदे यांची इतिहासामध्ये नेमकी जागा काय? अण्णासाहेबांना पूर्णपणे जाणून घेण्यात माझी चूक झाली होती; पण

अण्णासाहेबांच्या प्रेमी मंडळींनाही त्यांनी अण्णासाहेबांना पूर्णपणे जाणलेले नाही हे कबूल करावे लागेल. पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूट या अर्थशास्त्रविषयक संस्थेच्या ग्रंथालयात सी. सुब्रह्मण्यम् यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे अर्धे कपाट आहे. तिथे पंजाबराव देशमुखांचे समग्र साहित्य उपलब्ध आहे. अण्णासाहेबांचे साहित्य काय आहे ते मला सविता भावेंच्या पुस्तकात अवतरणांच्या स्वरूपात सापडले. ते सोडल्यास अण्णासाहेबांनी शेतीप्रश्नासंबंधी केलेली समग्र मांडणी काही मला कोणत्या ग्रंथालयात सापडली नाही. तेव्हा, अण्णासाहेबांचे या विषयावर जे काही लिखाण आहे ते आणि त्यांची भाषणे एकत्र समग्र ग्रंथाच्या रूपाने संकलित करण्याचे काम त्यांच्या प्रेमी मंडळींनी करावे अशी माझी सूचना आहे.

सबंध स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये काय काय घडले याचा आढावा मी घेतो.

बहुतेक लोकांच्या मनात कल्पना असते की इंग्रज आले, इंग्रजांनी हिंदुस्थानचे शोषण केले, त्याच्या विरोधात काँग्रेसची स्थापना झाली, त्यांनी थोडीशी चळवळ केली, मग महात्मा गांधी आले, त्यांनी जनआंदोलन केले, अहिंसेचे हत्यार दिले, सत्याग्रहाचे हत्यार दिले आणि इंग्रजांना येथून जावे लागले. रामायण जसे चार वाक्यात सांगावे तसा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास अशा चार वाक्यात बहुतेकांच्यासमोर येतो. मी अत्यंत नम्रपणे सांगू इच्छितो की हा इतिहास खोटा आहे.

इंग्रज आल्यानंतर काय घडले? इंग्रज आल्यानंतर, जातिव्यवस्थेने फोडल्या गेलेल्या या समाजातील तळागाळातल्या लोकांना तरी इंग्रज आले यामुळे फार दुःख झाले नाही. मी हे काही वेगळे मांडत नाही. मुसलमान आक्रमकांच्या बाबतीत जोतिबा फुल्यांनी म्हटले आहे की, त्याकाळचे हिंदु राजे गरीब हिंदु रयतेला इतके पीडीत की ''महम्मदाचे जवाँमर्द शिष्य'' आल्यावर येथील शेतकऱ्यांनी त्यांचे आनंदाने स्वागत केले. तसेच, येथील तळागाळातल्या माणसांना – ज्यांना शिक्षणाची संधी नव्हती, शाळेत जाता येत नव्हते, व्यापारउदिमाची संधी नव्हती त्यांना – 'ईस्ट इंडिया कंपनी'च्या काळातसुद्धा सरकार शाळा काढते आहे आणि त्यात ब्राह्मणब्राह्मणेतर असा भेदाभेद न करता सर्व लोकांना घेतले जाते, नोकरीत घेतले जाते आणि निदान

राज्यकर्त्यांच्या दृष्टीने 'ब्राह्मण जरी झाला भ्रष्ट, तरी तो तिन्हीं लोकीं श्रेष्ठ' असली काही भावना नाही याबद्दल आनंद आणि समाधान वाटत होते.

काँग्रेसची स्थापना झाली तेव्हा जोतिबा फुले म्हणाले की, ''तुम्ही 'न्याशनल' काँग्रेस म्हणता पण 'नेशन कुठे आहे? नेशन म्हणजे 'एकमय लोक'. तुमचा सबंध देश जातिव्यवस्थेने फुटून फुटून गेलेला आहे. 'राष्ट-'च नाही तर तुम्ही 'राष्ट-ीय काँग्रेस' कुठून म्हणता? आणि राष्ट-ीय स्वातंत्र्याची मागणी कसली करता?'' जोतिबा फुल्यांनी दाखविलेला दूरदर्शीपणा लक्षात घेतला म्हणजे अण्णासाहेबांचे महत्त्व कळेल. जोतिबा म्हणाले की, 'जर का सामाजिक अन्याय दूर न होताच' इंग्रज येथून निघून गेले आणि तुम्हाला राजकीय स्वातंत्र्य मिळालं तर इथे पुन्हा 'पेशवाई' स्थापन होईल. त्या काळात वादविवाद झाले. आगरकर आणि टिळक यांच्यात वादविवाद झाले. आगरकरांनी मांडले की, 'ज्या देशामध्ये स्त्रियांना माणूस म्हणून मानले जात नाही तेथे स्वातंत्र्याची कसली मागणी करता? स्वातंत्र्य काय फक्त पुरुषांकरिता घ्यायचे आहे?' अशा तऱ्हेने या देशातील जे जे पीडित, शोषित होते, हजारो वर्षांच्या वर्णाश्रमधर्मामध्ये पीडले गेलेले होते त्यांची भावना अशी होती की, 'इंग्रजांचे राज आल्यामुळे श्वास मोकळे झाले. आता जिवंत माणूस म्हणून जगण्याची थोडीतरी संधी मिळणार आहे.'

म. फुल्यांनी स्वातंत्र्य मागितले नाही, त्यांनी व्हिक्टोरिया राणीला म्हटले, 'आम्ही मुले अज्ञानी आहोत, फक्त आमच्या शिकण्याची व्यवस्था करा.' पण, आम्ही शिक्षण महत्त्वाचे मानले नाही कारण त्यावेळी दुसरा एक घटक हिंदुस्थानात असा होता की ज्याला राजकीय स्वातंत्र्याची फार घाई झाली होती. या मंडळींच्या हातून राजकीय सत्ता नुकतीच गेली होती. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी म्हटले की, 'आमच्या हातून राज्य गेले, आम्ही गुलाम झालो हा काही आमच्या संस्कृतीचा दोष नाही. आम्ही इंग्रजांपेक्षा कोणत्याही दृष्टीने कमी नाही. आमचे वाङ्मय तितकेच श्रेष्ठ, संस्कृती तितकीच श्रेष्ठ, काव्य तितकेच श्रेष्ठ, तत्त्वज्ञान त्यांच्यापेक्षा दोन बोटे अधिक श्रेष्ठ. पण आम्ही गुलाम झालो याचे कारण इतिहासामध्ये रहाटगाडग्याचा नियम असतो. 'चक्रनेमीक्रमा'ने आम्ही आज खाली आलो, उद्या आपोआप आम्ही वर जाणार आहोत' त्यामुळे पहिल्यांदा इंग्रजांना काढून लावा मग

आमची मागची देणीघेणी आम्ही पाहून घेऊ. इंग्रजांनी जेव्हा संमतीवयाच्या कायद्याचा प्रस्ताव मांडला तेव्हा त्याला विरोध करण्यासाठी लोकमान्य टिळकांसारखा नेता म्हणाला की, 'म्हातारी मेल्याचं दु:ख नाही, काळ सोकावतो. इंग्रजाला आमच्या समाजव्यवस्थेमध्ये हात घालू द्यायला आम्ही तयार नाही.'

दुर्दैवाची गोष्ट अशी की जोतिबा फुले, आगरकर यांचा म्हणजे 'प्रथमत: एकमय लोक याअर्थी राष्ट- तयार करा.' असे म्हणणाऱ्या लोकांचा पराभव झाला. जोतिबा फुल्यांचा पराभव झाला, बहुजन समाजाचा पराभव झाला आणि काँग्रेसवाल्यांचा म्हणजे 'आधी राजकीय स्वातंत्र्य मिळायला हवे' असे म्हणणारांचा जय झाला. शिक्षणाची आस धरणाऱ्या बहुजन समाजाचा पराभव होऊन ज्यांना आयसीएस मध्ये जागा हव्या होत्या, इंग्रज जावे आणि त्यांच्या खुर्च्या आपल्याला मिळाव्या अशी ज्यांची कामना होती त्या लोकांची ताकद वाढली. बहुजन समाजाच्या मनामध्ये या लोकांविषयी संशय होता. वर्षातून एकदा टायबूट घालून मुंबईला काँग्रेसमध्ये जमणारी ही मंडळी आपली आहेत असे काही त्यांना वाटत नव्हते. पण, महात्मा गांधी आले आणि त्यांनी दलितांच्या उद्धाराचा ग्रामीण अर्थशास्त्राचा विचार मांडला आणि बहुजन समाजाने राष्ट-ीय चळवळीला विरोध करायचे सोडून दिले. काही लोक त्याच्या जवळही गेले. पण, बहुजनांचा पहिला पराभव आणि सवर्णांचा विजय झाला आणि सामाजिक सुधारणांचा विचार बाजूला पडून 'राजकीय स्वातंत्र्या'ला अग्रक्रम देणारा विचार यशस्वी झाला. बहुजन समाज काँग्रेसबरोबर गेला नाही, दूर राहिला. पण नंतर, महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची चळवळ जसजशी वाढू लागली तसतसे बहुजन समाजाचे लोकही त्या प्रवाहात सामील होऊ लागले. महाराष्ट-पुरता विचार करावयाचा झाल्यास, खानदेशामध्ये फैजपूर येथे भरलेल्या काँग्रेसमध्ये पहिल्यांदा हा बहुजन समाजाचा प्रवाह काँग्रेसमध्ये विलीन झाला आणि तो शेवटपर्यंत मिसळून राहिला.

स्वातंत्र्य आले आणि जोतिबा फुल्यांचे भाकित खरे ठरले. 'पेशवाई' आली. गांधींना नेता, महात्मा मानणाऱ्या काँग्रेसने पंडित नेहरूंच्या हाती सत्ता आल्याबरोबर गांधीजींनी ज्याचे कधी नावही घेतले नव्हते त्या समाजवादाचा

उद्‌घोष सुरू केला. विकास व्हायचा असेल तर तो समाजवादानेच होईल, सर्वसामान्य शेतकरी, उद्योजक, कारखानदार यांच्यात निर्णय करण्याची ताकदच नाही, ते देश सुधारू शकत नाहीत; देशाला प्रगतीच्या मार्गावर न्यायचे तर ते दिल्लीचे 'नियोजन मंडळ'च करू शकेल. हा झाला नेहरूंचा समाजवाद. जयप्रकाश नारायण आणि लोहिया यांच्या समाजवादाची व्याख्या थोडी वेगळी होती. 'कसणाऱ्यांची जमीन आणि श्रमणाऱ्यांची गिरणी' अशी त्यांची व्याख्या होती. त्यांच्याऐवजी पंडित नेहरूंचा समाजवाद 'सर्व जमीन, सर्व कारखाने सरकारचे; संपत्तीचे राष्ट्रीयीकरण करावे' असा सोव्हिएट तोंडवळ्याचा.

म्हणजे, बहुजन समाजाचा पहिल्यांदा पराभव झाला तो राजकीय स्वातंत्र्य मागणाऱ्या सवर्णांनी केला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजवादाच्या नावाखाली राष्ट्रीयीकरण पुढे आले आणि बहुजन समाजाच्या थोर थोर नेत्यांनी त्याला पाठिंबा दिला. या समाजवादाचा खरा अर्थ काय होता?

नागपूरला एक विद्वान कम्युनिस्ट गृहस्थ होते; त्यांना नागपूरचे माओ त्से तुंग म्हणत. १९८० साली मी त्यांनाही भेटलो होतो. त्यांनी माझ्यावर खूप टीका केली. ते म्हणाले, ''तुम्ही ब्राह्मण आहात, तुम्ही शेतकऱ्यांचे काम करता आहात हे मानणे शक्यच नाही, कारण ब्राह्मणांनीच शेतकऱ्यांवर पिढ्यान् पिढ्या अन्याय केला आहे.'' मी म्हटले, ''हे अगदी खरे आहे की ब्राह्मणांनी शेतकऱ्यांवर पिढ्यान् पिढ्या अन्याय केला आहे. पण, याचा अर्थ असा नव्हे की मला जे सत्य दिसलं ते मी शेतकऱ्यांपुढे मांडू नये. मी त्यांच्यापुढे मांडीन, त्यांना पटलं तर घेतील.''

मग त्यांनी दुसरा प्रश्न विचारला की, ''तुम्ही राष्ट्रीयीकरणाला विरोध का करता?''

मी त्यांना उत्तर दिले की, ''तुमची विचारसरणी मला काही समजत नाही. एक ब्राह्मण म्हणून तुम्ही माझा निषेध केलात. पण 'राष्ट्रीयीकरण' याचा खरा अर्थ 'ब्राह्मणीकरणच' आहे.''

कारण, या समाजवादात जे निर्णय शेतकऱ्यांनी करायचे किंवा उद्योजकांनी करायचे किंवा कारखानदारांनी करायचे आहेत ते त्यांनी न करता दिल्लीला किंवा वेगवेगळ्या राज्यांच्या राजधान्यांतल्या नोकरशहांनी करायचे

ज्यांच्यांतील ९० टक्के ब्राह्मण आणि सवर्ण आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या नव्या येणाऱ्या आर्थिक पहाटेमध्ये ज्या वर्गाला उद्योजक म्हणून त्यांच्यातील उद्योजकतेच्या अभावामुळे स्थान मिळालं नसतं अशा ब्राह्मण व सवर्ण मंडळींनी आपल्या हाती आर्थिक सत्ता यावी यासाठी समाजवादाचा झेंडा उभारला आणि बहुजन समाजाचा दुसरा पराभव झाला.

स्वातंत्र्याच्या बाबतीत भ्रमनिरास झाल्यामुळे लवकरच ठिकठिकाणी बंडे होऊ लागली. बंगाल, तेलंगणा आणि महाराष्ट-ातही विशेषत: नगर जिल्ह्यात अशी बंडे होत होती. त्यातून काही साध्य होत नाही म्हणून स्वातंत्र्याबद्दल निरुत्साही व काही अंशी नाउमेद झालेली काही मंडळी वेगळा विचार करू लागली. इतके दिवस फक्त ब्राह्मणांनी लुटले आता आपल्यातल्याही लोकांना लुटण्याची संधी मिळू द्या म्हणून एकमेकांच्या पाठीवरून हात फिरविण्याचे वातावरण सुरू झाले. आणि मग, अनेक कर्तृत्ववान मंडळी – ज्यांची पाळेमुळे शेतकरीवर्गात, बहुजनसमाजात खोलवर रूजलेली होती – काँग्रेसमध्ये प्रवेश करती झाली आणि पक्षहिताच्या किंवा जातिहिताच्या दृष्टीने का होईना त्यातील काहींच्या मनामध्ये, काय करायला पाहिजे ते स्पष्ट झाले. पण, नेहरू म्हणायचे, रासायनिक वरखते कशाला पाहिजेत, त्याने देशाचे वाटोळे होईल, जमिनीचे वाटोळे होईल, कुलक (बडे शेतकरी) लोकांचाच फायदा होईल; मजुरांचा फायदा होणार नाही, छोट्या शेतकऱ्यांचा फायदा होणार नाही. त्यामुळे नेहरूंच्या काळामध्ये शेतीविषयक आखलेली सर्व धोरणे संरचना सुधारण्याची होती; धरणे बांधा, हव्या तर सहकारी संस्था तयार करा, हवी तर जमीनसुधारणा करा; जी काही संरचनात्मक व्यवस्था असेल तिच्यात काय हवी ती सुधारणा करा पण तंत्रज्ञान बदलायचे नाही अशी त्यांची नीती.

शेतीचा विकास करायचा तर तीन गोष्टी महत्त्वाच्या. एक म्हणजे संरचना, दुसरी गोष्ट तंत्रज्ञान आणि तिसरी गोष्ट आर्थिक प्रोत्साहन आणि गेली गेली वीस वर्षे मी करीत असलेल्या अर्थशास्त्रीय मांडणीत मी आग्रहाने असे मांडतो आहे की संरचना, तंत्रज्ञान आणि किंमत यांच्यात किंमत ही आर्थिक प्रोत्साहन देणारी असल्याने तिलाच अग्रक्रम द्यायला हवा. किंमत मिळाली तर संरचना आणि तंत्रज्ञानाची काळजी शेतकरी स्वत: घेऊ शकतात;

सरकारने धरणे बांधली नाहीत तरी शेतकरी ती बांधतील; तंत्रज्ञानसुद्धा ते आणतील. खरे म्हणजे, सरकार तंत्रज्ञान आणतच नाही. जे तंत्रज्ञान देशामध्ये आपोआप आले असते ते तंत्रज्ञान येऊ नये याकरिता स्वातंत्र्यानंतरच्या सर्व सरकारांनी प्रयत्न केला. जोतिबा फुल्यांनी म्हटले होते की बाहेरच्या जगाशी संपर्क आला की बहुजन समाजाचे आपोआप कल्याण होणार आहे. पण, बहुजन समाजाचा बाहेरच्या जगाशी संपर्क होऊ नये असा खटाटोप समाजवादाच्या नावाखाली केला गेला.

राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ आणि त्यानंतर समाजवाद या दोन नावांखाली बहुजन समाजाला फसवले गेले आहे हे लक्षात आल्यानंतर साधारणपणे १९६५ च्या सुमारास अण्णासाहेब शिंदे यांच्यासारख्या माणसांनी त्यांच्या मूळच्या आर्थिक व्यवसायाकडे – शेतीव्यवसायाकडे तज्ज्ञ शेतकऱ्याच्या नजरेने पाहून शेतीच्या विकासासाठी काय करायला पाहिजे याचा विचार सुरू केला आणि त्यातूनच हरित क्रांतीचा प्रयोग साकारू लागला. हरित क्रांतीचे संपूर्ण श्रेय कोणा व्यक्तीला देणे योग्य होणार नाही कारण असे काम काही एकट्यादुकट्याने होणारे नसते. हरित क्रांती त्या काळात यशस्वीही झाली. पण, इतिहासाचाही एक कल असतो. आपण एखादी सुधारणा करतो. पण एक सुधारणा केली म्हणजे जगातील सर्व समस्या सुटतील असा एक कलमी कार्यक्रम कोणताही नसतो. आपण एक सुधारणा केली की त्याबरोबरच काही नवे दोष तयार होतात. हे दोष दूर करण्याकरिता आणखी नवीन सुधारणा कराव्या लागतात आणि त्यातून आणखी नवीन दोष तयार होतात. 'शेतकरी संघटनेचे नैतिक दर्शन' (१९८४) या माझ्या लेखात मी म्हटले आहे की, 'समाज निर्दोष व्यवस्थेला कधी पोहोचतच नाही; समाज एका दोषास्पद अवस्थेतून दुसऱ्या दोषास्पद अवस्थेत जात असतो.'

१९६५ साली हरित क्रांती झाल्यानंतर उत्पादन वाढले, यात काही शंका नाही. जहाजातून आलेल्या अन्नावर गुजराण करण्याची परिस्थिती संपली. दहा वर्षांत अन्नधान्याचे उत्पादन तिप्पट झाले, दुधाचेही उत्पादन वाढायला लागले. ही वाढ होण्यासाठी नेमका परिणाम कशाचा झाला याविषयी थोडा गोंधळ आहे. आम्ही तंत्रज्ञान दिले, बियाणे आणले, खतांचे कारखाने काढले म्हणून हे उत्पादन वाढले असे जे म्हटले जाते ते चुकीचे

आहे. १९६५ साली एक सर्वात मोठा बदल झाला आणि त्याचे श्रेय लालबहादूर शास्त्री आणि सी. सुब्रह्मण्यम यांना द्यायला हवे. हरितक्रांतीसाठी अधिक उत्पादन देणारे वाण आणण्याबरोबरच या मंडळींनी प्रथमतःच कृषिमूल्य आयोगाची स्थापना केली. शेतीमालाला भाव देण्याची राजकीय कांक्षा त्यावेळी तयार झाली होती किंवा नाही माहीत नाही, पण अण्णासाहेब शिंदे यांच्या मते ती नव्हती. निदान शेतकऱ्यांची समस्या काय आहे ती समजून तर घ्यावी एवढी भूमिका त्याच्यामागे होती. पण, लालबहादूर शास्त्री थोड्याच महिन्यात निवर्तले. त्यांच्या जागी इंदिरा गांधी आल्या आणि मग त्यांनी खास डावपेच आखून कृषिमूल्य आयोग शेतकऱ्यांना हितकारक न राहता जाचक कसा होईल हे पाहिले. त्यासाठी त्यांनी कृषिमूल्य आयोगाच्या अध्यक्षपदी ज्यांची सर्व प्रसिद्धी शेतकरीविरोधी भूमिका घेण्याबद्दल होती अशा मंडळींना एका पाठोपाठ बसवले, तेही विशेषत: डाव्या विचारसरणीचे निवडून निवडून बसवले. दांतवाला, अशोक मित्रा ही त्यातलीच नावे. आणि मग कृषिमूल्य आयोग हा शेतकऱ्यांना भाव देण्याचे साधन बनण्याऐवजी शेतकऱ्यांना भाव नाकारण्याचे साधन बनले.

तंत्रज्ञान, संरचना आणि किंमती यांच्या वेगवेगळ्या क्रमवारीमुळे फरक कसा पडतो ते पाहू या. धवल क्रांतीचेच उदाहरण घेऊ या. डॉ. कूरियन यांची मांडणी अशी की आपण दूध गोळा करणे आणि शहरात पोहोचविणे याकरिता लागणारी व्यवस्था तयार केली तर दुधाचा प्रश्न सुटेल. गुजरातमध्ये त्यांनी तशी व्यवस्था उभी केली. त्याकरिता त्यांनी युरोपमधून दूधभुकटी आणि दुधाची चरबी फुकट मिळविली. तिथून ती फुकट आणणे शक्य होते, कारण त्यांच्याकडे दुधाचे महापूर येत होते आणि त्यांच्याकडील दुधाच्या किंमती पडू नये याकरिता दुधाची भुकटी आणि चरबी ते फुकट देत होते. युरोपमधील माणसे त्यांच्याकडील दुधाचा भाव पडू नये म्हणून आपल्याला फुकट दूध देतात आणि आपण मात्र आपल्याला फुकटात मिळालेला हा माल हिंदुस्थानच्या बाजारपेठेत ओतून येथील दुधाच्या किंमती प्रत्यक्षात पडतील अशी व्यवस्था करीत आहोत. यातून हिंदुस्थानच्या लोकांचे भले कसे काय होणार अशी शंकासुद्धा आमच्या अग्रणींच्या मनात कधी आली नाही. तंत्रज्ञान पुरविल्यामुळे दुधाच्या उत्पादनात वाढ झाली हे म्हणणे खोटे आहे. दूध महापूर

योजनेवर झा कमिटीने दिलेल्या अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे की दुधाच्या उत्पादनामधील सर्वांत जास्त वाढ गुजरातमध्ये नाही झाली, उलट गुजरातमधील वाढ सगळ्यात कमी आहे; सगळ्या जास्त वाढ महाराष्ट-ात झाली आणि तीसुद्धा कोल्हापूर आणि जळगाव हे दूध महापूर योजनेचे दोन जिल्हे सोडून. शेतकरी संघटनेने केलेल्या दूध आंदोलनामुळे, दुधाचे उत्पादन वाढवायचे असेल तर दूध उत्पादन करणाऱ्या माणसाला त्याच्या कष्टाचे आणि गुंतवणुकीचे काहीतरी फळ मिळायला पाहिजे ही कल्पना महाराष्ट-ात पहिल्यांदा मान्य झाली आणि म्हणून महाराष्ट-ात दूध उत्पादन वाढले. महाराष्ट-ातले दूध जमशेटपूरला आणि कलकत्त्याला जाते, दूध महापूर योजनेच्या गुजरातचे नाही.

तेव्हा, उत्पादकतेत बदल घडतो तो कशामुळे घडतो हे नीट समजावून घेतले पाहिजे. समजा, एखाद्या बँकेच्या मॅनेजरसमोर एक कारखानदार आला आणि त्याच्यासमोर एक वस्तू ठेवून म्हणाला की, 'मी ही फार सुंदर वस्तू तयार केली आहे. त्याचे मला उत्पादन करायचे आहे त्यासाठी कर्ज हवे आहे.' तर बँक मॅनेजर त्याला पहिला प्रश्न विचारील की, ''ही वस्तू कितीही सुंदर असो, तिला बाजारात मागणी आहे का? ती वस्तू बनवायला जो खर्च येईल तो भरून निघेल अशी किंमत द्यायला कोणी तयार होईल का?'' उद्योगधंद्याच्या बाबतीत जर तुम्ही असे मानता की कारखानदारांना फायदा होतो किंवा नाही हे समजण्याची अक्कल आहे तर मग, शेतकऱ्यांना इतकी अक्कल नाही असे गृहीत का धरता? डाव्या विचारवंतांच्या आणि डाव्या अर्थशास्त्र्यांच्या पुस्तकात असे कित्येक उल्लेख सापडतात की, 'शेतकरी, किंमत वर जावो का खाली पडो, उत्पादनाचे निर्णय बदलत नाही. त्याच्या शेतामध्ये जितके काही उत्पादन होणे शक्य आहे तितके उत्पादन तो (गाढवासारखे) काढीत राहतो.'

अनेक भागात शेतकऱ्यांनी आता दूध उत्पादन सोडून दिले आहे, उसाचे शेतकरीही ऊस सोडून देऊन कांद्याचे उत्पादन घेऊ लागले आहेत. ज्याच्यात जास्त उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे ते उत्पादन शेतकरी घेतात. कारण उघड आहे. शेतकरीसुद्धा माणसे आहेत, बुद्धी असलेली माणसे आहेत आणि आपला सर्व खटाटोप 'अंततो गत्वा' काही फायद्याचा होणार आहे

किंवा नाही याचा ते विचार करतात. म्हणजे शेती करणे फायद्याचे ठरले तर ते उत्पादन वाढविण्याचे सर्वात मोठे साधन ठरते; तंत्रज्ञान पुरविणे आणि संरचना पुरवणे ही उत्पादनवाढीची साधने होऊ शकत नाहीत.

तंत्रज्ञान, संरचना आणि किंमत या उत्पादनवाढीच्या साधनांची क्रमवारी करताना प्रथम क्रमांकावर असावयास हवी ती किंमत सर्वांशाने दुर्लक्षित करण्याचे मोठे दुष्परिणाम झाले. उदाहरणार्थ, अहमदनगर जिल्ह्यात सहकारी व्यवस्था चांगली मोठी झाली, मोठमोठे दिग्गज, टनाटनाचे नेते तयार झाले. पण, शेतकऱ्यांची परिस्थिती मात्र अधिकच बिकट झाली. सगळ्यात जास्त सहकारी साखर कारखाने इथे आणि सगळ्यात कर्जात बुडणारे शेतकरीही इथलेच अशी या जिल्ह्यात परिस्थिती, तंत्रज्ञान आणि संरचना पुरविणाऱ्या हरित क्रांतीनंतर, तयार झाली. सहकाराच्या माध्यमातून अण्णासाहेब शिंदे यांनी नगर जिल्ह्यात एक व्यवस्था तयार केली, पूर्वी लोक उपाशी रहात असत आता त्यांना खायला मिळेल इतकी परिस्थिती तयार झाली. पण मागणीइतका पुरवठा झाल्यानंतर किंमती घसरू लागल्या आणि उत्पादन कमी होऊ लागले आणि किंमती-उत्पादनाचे हे चक्र सुरू झाले आणि दर तीन वर्षांनी उसाचे उत्पादन नाहीसे होऊ लागले.

हा दुष्परिणाम टाळण्यासाठी, किंमत अग्रभागी ठेवण्याच्या मुद्द्यावर शेतकरी चळवळ उभी राहिली ती शेतकऱ्याच्या सामूहिक बुद्धीचा आविष्कार आहे. म्हणजे, आम्ही अण्णासाहेब शिंदे यांच्या पुढची पायरी घेतली. त्यांनी आधीच्या पायऱ्या घेतल्या नसत्या तर शेतकरी संघटना उभी रहाणे इतके सरळपणे झाले नसते.

शेतीविषयक चुकीच्या धोरणामुळे आणखी एक समस्या तयार झाली. अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांमध्ये एक दोष होता. पाणी दिले, खते दिली, औषधे दिली तर उत्पादन अधिक गतीने वाढते हा या वाणाचा गुण आहे. पारंपरिक बियाण्यांच्या बाबतीत हे घडत नाही. नवीन वाणांमुळे, मग, रासायनिक खते आणि औषधे यांचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला. पर्यावरणवाद्यांनी हाकाटी सुरू केली की रासायनिक खतांच्या आणि औषधांच्या वापरामुळे पाणी प्रदूषित होत आहे, जमीन प्रदूषित होत आहे, वगैरे वगैरे. त्यावर त्यांनी एक मार्ग सुचवला आणि त्या मार्गावर निष्ठा ठेवणारे

'महात्मे'ही खूप पुढे आले.

पर्यावरणवाद्यांनी म्हटले की आपल्याला प्रदूषण करणारी ही रासायनिक शेती नकोच. आपण जैविक शेतीकडे वळू या. रासायनिक औषधांच्याऐवजी कडुलिंबाचा रस फवारा, आणि रासायनिक खतांच्या ऐवजी गायीचे किंवा म्हशीचे शेण वापरा. त्यांच्यापैकी काहींचे म्हणणे असे होते की गायीचे शेणखत हे जास्त उपयोगाचे असते आणि म्हशीचे शेणखत कमी उपयोगाचे असते. एवढाच त्यांच्यात वादाचा मुद्दा राहिला. यामुळे ते 'महात्मे' संबोधनास पात्र ठरतात.

जैविक शेतीने जर प्रश्न सुटणार असते तर शेतीमध्ये सुधार घडविण्यासाठी अण्णासाहेब शिंद्यांची गरज नव्हती, सी. सुब्रह्मण्यमची गरज नव्हती आणि हरित क्रांतीचीही गरज नव्हती. कारण, गेली दोन हजार वर्षे हिंदुस्थानात जैविक शेतीच चालू होती. पण तरीही दर दहा वर्षांनी दुष्काळ पडून लाखो माणसे मरत होती. तंत्रज्ञानामध्ये झपाट्याने प्रगती होत असताना जैविक शेतीकडे वळणे म्हणजे इतिहासामध्ये मागे जाण्यासारखे आहे. पण, इतिहासामध्ये मागे जाऊन कोणत्याही समाजाचे किंवा राष्ट-ाचे प्रश्न सुटत नाहीत.

१९६५ साली झालेल्या हरित क्रांतीने अन्नधान्याची मुबलकता तयार झाली. त्याबरोबरीनेच पर्यावरणाचा प्रश्न तयार झाला आणि किंमतीचा म्हणजे आर्थिक प्रश्नही तयार झाला हे आपण पाहिले. 'महात्मे' कितीही 'जैविक' शेतीचा, इतिहासात मागे जाणारा उतारा या समस्यांवर सांगोत, जागतिक तंत्रज्ञान या समस्यांच्या सोडवणुकीसाठी पुढे चालले आहे.

हरित क्रांतीच्या काळात आलेल्या नवीन तंत्रज्ञानाच्या स्वीकाराबाबत आम्ही जितके गाफील, बेसावध होतो तितके आज येऊ घातलेल्या नवीन तंत्रज्ञानाच्या बाबतीतही गाफील आणि बेसावध आहोत. अण्णासाहेब शिंद्यांसारख्या ज्या थोड्यांनी त्याकाळी हरित क्रांतीचे तंत्रज्ञान आपलेसे करण्यात जी धडाडी दाखविली ती या नवीन तंत्रज्ञानाच्या बाबतीत आपल्यात आहे किंवा नाही हे येत्या दोन वर्षात आपल्याला सिद्ध करावे लागणार आहे. त्या काळी हरित क्रांती झाली. आता त्याच्या पुढची नवीन तांत्रिक क्रांती येते आहे. प्रत्येक वेळी तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळेच माणसाला अन्न मिळणे शक्य

झाले आहे. तसे झाले नसते तर माल्थसच्या सिद्धांतानुसार जगभर भूकमरी सुरू झाली असती. माल्थसने सांगितले होते की, ''लोकसंख्या भूमिती श्रेणीने वाढते आणि अन्नधान्याचे उत्पादन गणित श्रेणीने वाढते, त्यामुळे अन्नधान्याचा प्रचंड तुटवडा होऊन लोक भुकेने मरतील.'' पण तसे घडलेले नाही. उलट, माल्थसच्या काळापेक्षा आज आपण जास्त आणि जास्त चांगले अन्न खातो आहोत. हे तंत्रज्ञानाने शक्य झाले. कारण, जमिनीची व्याख्या माणसाने तंत्रज्ञान आणून बदलवली. तंत्रज्ञानाच्या प्रगतीची प्रक्रिया ही काही हरित क्रांतीपाशी थांबलेली नाही. हरित क्रांतीने भुकेचा प्रश्न सोडवला पण दोन नवीन प्रश्न तयार केले आणि या प्रश्नांचे निराकरण इतिहासामध्ये मागे जाऊन होणार नाही, तर तंत्रज्ञानाच्या मदतीने पुढे उडी मारून होणार आहे.

नवीन येऊ घातलेल्या तंत्रज्ञानाचे स्वरूप कसे आहे? यापुढे किडीचा बंदोबस्त करण्यासाठी आपल्याला औषधांचा उपयोग करण्याची फारशी गरज पडणार नाही. शास्त्रज्ञांनी बियाण्यांच्या जनुकांमध्ये (Genes) बदल करून अशा तऱ्हेचे वाण तयार करण्यात यश मिळविले आहे की ज्या वाणाला अमुक अमुक किडीचा त्रास होणारच नाही. इतकेच नव्हे तर त्याची उत्पादनक्षमता प्रचंड गतीने वाढेल, एवढेच नव्हे तर आपल्याला हवे असलेलेच गुणधर्म असलेले वाणसुद्धा जनुक तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार करता येतील. उदाहरणार्थ, मधुमेही माणसांनी खाल्ली तरी त्याला त्रास होणार नाही अशी साखर ज्यातून मिळू शकेल असे उसाचे वाणसुद्धा तयार करता येऊ शकेल. औषधे वापरावी न लागता किडीचा बंदोबस्त होईल, उत्पादन वाढेल, हवे तेच गुणधर्म असतील, नको असलेले गुणधर्म नसतील अशा प्रकारचे वाण तयार करणे आता जनुक तंत्रज्ञानाने शक्य झाले आहे. या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने एका मेंढीसारखी दुसरी मेंढी शास्त्रज्ञ करू शकतात, मनुष्यप्राणीसुद्धा तयार करू शकतात.

क्षितिजावर एक नवीन तंत्रज्ञान येते आहे. पण १९६५ साली हिंदुस्थान सरकार हरित क्रांतीला सामोरे जाण्याबाबतीत जितके बेसावध, गाफील होते तितकेच आजचे सरकार नवीन 'जनुक क्रांती (Gene Revolution)' करिता बेसावध आणि गाफील आहे. मी माझा हा निष्कर्ष ५ जानेवारी रोजी दिल्लीला वित्तमंत्र्यांनी अंदाजपत्रकपूर्व चर्चेसाठी जी बैठक बोलाविली होती त्यात

सर्वांसमोर ठेवला.

गेल्या वर्षी आंध्र प्रदेशात १५०० हून अधिक कापूसउत्पादक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. एका लहानशा अळीने – बोंडअळीने त्यांना आत्महत्या करायला लावली. बोंडअळीचा इतका प्रचंड हल्ला झाला की कापसाचे पीक नाहीसे झाले आणि त्यांना आत्महत्या करणे भाग पडले. आता कापसाचे एक नवीन बियाणे असे निघाले आहे की त्या बियाण्यातून उगवलेल्या रोपांवर बोंडअळी येतच नाही. कपाशीच्या बियाण्याच्या विशिष्ट जनुकात काही बदल करून शास्त्रज्ञांनी हे बोंडअळीला प्रतिबंध करण्याची अंगची ताकद असलेले बियाणे तयार केले आहे. आज हे बियाणे अमेरिकेतील ३५ टक्के शेतकरी वापरतात. त्याचा परिणाम असा झाला की तेथील कापसाचे उत्पादन वाढले आणि औषधांचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी झाल्यामुळे उत्पादनखर्चही कमी झाला. आणि त्यामुळे पहिल्यांदा अशी परिस्थिती तयार झाली आहे की कापसाचा जागतिक बाजारपेठेतला भाव हिंदुस्थानातील कापसाच्या भावापेक्षा कमी आहे. हे घडले कारण अमेरिकेत शेतकऱ्यांनी हरित क्रांतीच्या पुढे पाऊल टाकून जनुक क्रांतीत भाग घेतला आहे.

आमच्याकडे काय चालू आहे? कर्नाटकातील शेतकऱ्यांना कापसाच्या या बियाण्याचे चाचणी प्रयोग करण्यासाठी त्याच्या उत्पादकांनी बियाणे दिले होते. तर कर्नाटकातले शेतकरी नेते डॉ. नंजुंडस्वामी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह त्या शेतकऱ्यांच्या प्रयोग शेतांत जाऊन ती झाडे सगळी उपटून टाकली. गेल्या नोव्हेंबरमध्ये सिएटलमध्ये जागतिक व्यापार संघटनेच्या परिषदेच्या वेळी ही सर्व मंडळी जमली होती आणि त्यांनी अशा तऱ्हेच्या तंत्रज्ञानाला विरोध करणारी निदर्शने केली.

महाराष्ट-ामध्ये पाचशे शेतकऱ्यांनी अर्ज करून या बियाण्याची चाचणी घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे. ''आम्ही, हे तंत्रज्ञान चांगले आहे असे म्हणत नाही, वाईट आहे असेही म्हणत नाही. पण, नवीन काहीतरी तंत्रज्ञान आहे त्याचा प्रयोग करण्याचा अधिकार आम्हाला आहे. प्रयोग करून आम्ही ठरवू की हे तंत्रज्ञान स्वीकारायचे का नाही ते. ते चांगले आहे का वाईट आहे, फायद्याचे आहे का तोट्याचे आहे, अधिक उत्पादक आहे का कमी, अधिक

खर्चिक आहे का स्वस्त हे आम्ही ठरवू; तुम्ही कोण सांगणारे दिल्लीला बसून.'' अशी या प्रयोग करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांची भूमिका आहे.

जागतिक व्यापार संघटनेच्या करारनाम्यामुळे हिंदुस्थानात साखरेची, कापसाची आयात होते आहे, कांद्याची निर्यात थांबली आहे हा प्रचार शुद्ध दिशाभूल करणारा आहे. या आयात-निर्यातीशी जागतिक व्यापार संघटनेचा काहीही संबंध नाही; हे सर्व खुल्या व्यवस्थेची केवळ तोंडदेखली भाषा करणाऱ्या सरकारी धोरणामुळे होते आहे. मी १० जानेवारी २००० रोजी जागतिक व्यापार संघटनेचे महानिदेशक माईक मूर यांना दिल्लीत भेटलो तेव्हा भारतातले शेतकरी खुल्या व्यवस्थेची मागणी करीत आहे हे ऐकून त्यांना सुखद आश्चर्य वाटले. हिंदुस्थानातील प्रत्येकजण खुल्या व्यवस्थेचा विरोधकच असेल असा त्यांचा ठाम समज आपल्याकडील बंदिस्त व्यवस्थेच्या समर्थकांच्या कारवायांमुळे झाला होता.

१९६५ साली जी परिस्थिती होती तीच परिस्थिती ३५ वर्षांनी आज २००० साली झालेली आहे. आणि आपण या नवीन तंत्रज्ञानाच्या क्रांतीच्या बाबतीत हरित क्रांतीच्या वेळेपेक्षाही अधिक बेसावध आहोत. आपल्याकडचे थोर थोर विचारवंत, थोरथोर साहित्यिक, थोरथोर पत्रकार हे नवीन तंत्रज्ञानाने येणारी प्रत्येक गोष्ट म्हणजे परमेश्वराविरुद्धचा कट आहे, ते पाप आहे, मनुष्यप्राण्याने असल्या गोष्टी करण्याच्या फंदात पडू नये अशी हाकाटी करतात. बियाण्याचे गुण ईश्वराने तयार केले, त्यात तुम्ही बदल करण्याचा प्रयत्न करता म्हणजे तुम्ही जगबुड आणणारे आहात असा दोषारोप ही मंडळी शास्त्रज्ञांवर आणि त्यांच्या प्रयोगांना मान्यता देणारांवर करतात. याच मंडळींनी, हिंदुस्थानात पहिल्यांदा आगगाडी आली तेव्हा विरोध केला. रासायनिक खते आणि औषधे यांनाही याच लोकांनी विरोध केला. नवीन कोणतीही गोष्ट आली की त्याला विरोध करण्याची ही वृत्ती म्हणजे ज्ञानाला संकुचित करणारी 'ब्राह्मणी' वृत्ती आहे. 'ज्ञानाचे दरवाजे उघडा, सर्व लोकांना त्याचा अनुभव घेऊ द्या, प्रयोग करू द्या' असे म्हणण्याऐवजी 'ज्ञान ज्ञान म्हणून जे काही आहे त्याचे आम्ही मक्तेदार आहोत, ते आमच्या खेरीज दुसऱ्या कोणाला मिळू नये' अशा प्रवृत्तीच्या लोकांचा तिसऱ्यांदा विजय होतो आहे. पहिल्यांदा राजकीय स्वातंत्र्याला प्राधान्य देण्याचा विजय, दुसऱ्यांदा

समाजवादाला प्राधान्य देण्याचा विजय झाला; आता स्वदेशीच्या नावाखाली तिसरा झेंडा घेऊन तंत्रज्ञानावर आपली मक्तेदारी स्थापन करण्याचा 'सवर्णां'चा प्रयत्न चालू आहे.

अण्णासाहेबांनी त्यांच्या काळात त्या काळातील तंत्रज्ञानाला पाठिंबा दिला; आज आपल्यापुढे आलेल्या तंत्रज्ञानाची कास न धरता सवर्णांच्या तिसऱ्या विजयाची वाट मोकळी ठेवली तर इतिहासात आपण करंटे शाबित होऊ. आपण जर आपले दरवाजे बंद करून खुल्या व्यवस्थेला दाराबाहेरच ठेवले तर आपल्या प्रगतीची काहीच शक्यता रहात नाही.

जगाच्या इतिहासाची दिशा काय आहे? मी ब्राह्मणांना नावे ठेवली म्हणून तुम्ही नुसते खुष होऊन चालणार नाही. तुमच्या तुमच्या जातीतील कोणी जर 'ब्राह्मणी' वृत्तीने वागत असेल तर त्याचा धिक्कार करण्याची ताकद तुमच्यात नसेल तर तुम्हीही ब्राह्मणांइतकेच जातीयवादी ठरता. जगाच्या इतिहासामध्ये अनेकांनी धर्माची बंधने घातली, अनेकांनी आर्थिक बंधने घातली, भौगोलिक बंधने घातली. पण, सर्व भिंती पाडणे हा इतिहासाचा कल आहे, तो कोणाचाही मुलाहिजा न बाळगता किंवा दयामाया न ठेवता ज्या ज्या भिंती वाटेत येतील त्या पाडत जातो. तंत्रज्ञानाच्या विरोधाची भली मोठी भिंत आपल्यासमोर उभी केली जात आहे ती पाडण्यासाठी आपण इतिहासाला मदत करतो का नाही यातच आपली परीक्षा होणार आहे.

(माजी केंद्रीय कृषी मंत्री<br>
कै. अण्णासाहेब शिंदे स्मृती व्याख्यान)<br>
श्रीरामपूर, १२ जानेवारी २०००

# १३. गावगाड्याची व्यापार व्यवस्था

हल्ली शेतकरी माल पिकवतो आणि तो कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बाजारपेठेत पाठवतो. किरकोळ उत्पादन करणारे, वाहतुकीचा फारसा खर्च परवडत नाही म्हणून जवळच्या बाजारपेठेत पाठवतात. मोठा माल उत्पादन करणारे मुंबई, पुणे, एवढेच नव्हे तर अगदी हैद्राबाद, बंगलोर, सूरत, बडोदा असा दुसऱ्या राज्यातही माल विक्रीसाठी पाठवतात. बाजारपेठेत पाठवलेला माल कोणा आडत्याच्या दुकानावर जातो. आडते आणि दलाल यांचेही काही विभाग असतात. कोणी भाजीपाल्यासारख्या नाशवंत मालाचाच व्यवहार करतात, कोणी फक्त फळांचाच; कोणी एखाददुसऱ्याच फळांच्या व्यापारात दलाली करतात. ज्वारी, बाजरी अशा भुसार मालाची आडत वेगळी; गुळासारख्या प्रक्रिया केलेल्या मालाला काही वेगळी व्यवस्था लागते, म्हणून त्यांचीही आडत म्हणून पुष्कळदा त्यांची सर्व बाजारपेठच वेगळी असते.

शेतीमाल खरेदी करू इच्छिणारी व्यापारी मंडळी ठराविक वेळी येतात. प्रत्येक दलालाच्या दुकानात जातात, मालाची पहाणी करतात, किंमतींविषयी बोलणी करतात. पूर्वी ही बोलणी व्यापारी आणि दलाल यांच्यात हातावर रुमाल टाकून सांकेतिक खाणाखुणांनी होत असत; आता बहुधा, जमलेले व्यापारी लिलाव बोलून जास्तीत जास्त भाव देणाऱ्या व्यापाऱ्याशी सौदा ठरतो.

व्यापारी माल घेऊन जातात, ज्यांचा व्यवहार मोठा ते काही किरकोळ विक्रीची दुकाने चालवत नाहीत. ठोक व्यापारी मध्यस्थांना माल विकतात, मध्यस्थ दुसऱ्या मध्यस्थांना विकतात आणि शेवटी ग्राहक जेथे खरेदी करतो त्या किरकोळ दुकानापर्यंत भाजीपाला, फळफळावळ, भुसारमाल, गूळ, तंबाखू इ. शेतीमाल पोचतो.

मध्यस्थांच्या लांबलचक रांगेचा एक परिणाम असा होतो की शेतमालाला मिळणारी किंमत व ग्राहकाला द्यावी लागणारी किंमत यातील तफावत वाढत जाते. खेडेगावातील भणंग गरीबीत राहणारा शेतकरी मातीमोलाने माल विकतो, ग्राहक माल विकत घेतो ते त्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणे वेगवेगळ्या दुकानात.

मुंबईच्या फुले (क्रॉफर्ड) मार्केटच्या आसपास लाल झुरझुरीत कागदात घासून पुसून चकचकीत करून ठेवलेल्या सफरचंदांची बाजारपेठ वेगळी. क्रॉफर्ड मार्केटच्या समोर टोपलीत रचून ठेवलेल्या सफरचंदांचे गिऱ्हाईक वेगळे. अशा उतरत्या श्रेणीने शेवटी चिंचपोकळीच्या पुलाखाली, लागलेल्या सफरचंदाचा किडका भाग कापून उरलेल्या चांगल्या भागाचे तुकडे तेथील गिऱ्हाईकांना विकण्याची दुकाने वेगळी. क्रॉफर्ड मार्केट ते चिंचपोकळीच्या दुकानातील किंमतीचा फरक पाचपाच पटीचा असतो.

शेतकऱ्यांच्या घरीही असाच काहीसा प्रकार होतो. लागलेला डागाळलेला माल चाकूने साफ करून शेतकरी मजुरांसाठी ठेवतो किंवा स्वत:च्या घरी ठेवतो. अखंड चांगले बटाटे शेताचा मालकसुद्धा खायला क्वचित वापरतो. कापून साफ केलेला मालसुद्धा खीस काढणे, साठवणीच्या वस्तू तयार करणे अशा कामांसाठी वापरतो. अगदी निवडक माल असेल तेवढाच बाजारात जातो.

बाजारात माल पाठवणे इतके सोपे नाही. कदाचित् एका काळी, डोक्यावर टोपली घेऊन शेतकऱ्यांच्या घरचेच कोणी बाजारपेठेच्या गावी जाऊन जमले तर एखाद्या झाडाच्या सावलीचा आधार बघून विकायला बसत असेल; माल जरा जास्त असला तर बैलगाडी लादून बाजारपेठेच्या गावी कोणी नेतही असतील. पण स्वत: विकायला घेऊन बसलेला माल खराब होण्याआधी विकला जाईलच याची खात्री नाही. किरकोळ गिऱ्हाईक रोख पैसे मोजून माल घेऊन जाते, पण त्याने भागत नाही. कोणा दलालाने माल मोठ्या प्रमाणावर उचलला तर तोही काही पैसे रोख देत नाही, माल उठावा या चिंतेपोटी अशा गिऱ्हाईकाला नाकारताही येत नाही. असे बडे गिऱ्हाईक अनेकदा पैसे बुडवते.

**जुनी खुली व्यवस्था**

कांदा, बटाटा, भुईमूग हा कमी नाशवंत माल. या मालाच्या बाजारपेठेतील उलाढालही फार मोठी, त्यात व्यापाऱ्यांना फायदाही चांगला सुटतो. पूर्वी असा माल शेतकरी पिकेल तसा बाजारात पाठवत नसत. घरातील खोल्यात एखाद्या वखारीत तो काळजीपूर्वक सांभाळून ठेवत. व्यापारी किंवा त्यांचे दलाल गावोगावी जात, माल पहात, शेतकऱ्याशी किंमतीचा सौदा

करीत; जमले तर माल घेऊन जात, नाही जमले तर शेतकरी दुसरा कोणी व्यापारी माल पाहण्यासाठी येईल अशी वाट पहात राही.

डागाळलेला, मार खाल्लेला माल गावातच वापरायचा. किरकोळ विक्री बाजाराच्या दिवशी पेठेच्या गावात जाऊन करायची. जरा जांगड माल कोण्या खाजगी आडतीत लावायचा आणि कांदा, बटाटा, भुईमूग, तंबाखू, कापूस असा भारी माल घरात साठवून ठेवायचा आणि सौदा करेल त्या व्यापाऱ्याला द्यायचा अशी पद्धत वर्षानुवर्षे चालली.

या पारंपरिक पद्धतीत दोष अनेक होते. पहिला दोष म्हणजे पिकलेला माल खराब होण्याआधी खात्रीने विकला जाईल आणि तो योग्य किंमतीने विकला जाईल याची काहीच शाश्वती नसे. बाजारपेठ सारी चिरफाळलेली होती. कोणत्याही मालाला एक निश्चित चालू भाव अशी गोष्टच नव्हती. प्रत्येक शेतकऱ्याच्या मालाची किंमत वेगळी वेगळी ठरे. ''माझ्या भुईमुगाला इतकाच भाव मिळाला, शेजारच्या शेतकऱ्याचा माल माझ्या मालासारखाच होता, पण त्याला किंमत जास्त मिळाली. हे असे का?'' असे प्रश्न कोणाच्या मनात येत नसत. आले तरी सलत नसत आणि त्याबाबत आरडाओरडा होण्याची तर काही शक्यताच नसे.

खाजगी आडतीत काय किंवा गावात आलेल्या व्यापाऱ्याशी केलेल्या व्यवहारात काय, मालाचे मोजमाप खरेखुरे होणे क्वचित. माल कमी भरावा यासाठी वापरण्याच्या शेकडो युक्त्या व्यापाऱ्यांना अवगत होत्या आणि ते त्यांचा सरसहा वापर करीत.

विक्री करून मिळालेली किंमत आडते ज्या त्या मालदारास प्रामाणिकपणे पोचवतील ही गोष्ट दुर्मिळच. एकूण मिळालेली रक्कम आपल्या आडतीवर माल पाठवणाऱ्या शेतकऱ्यांना विभागून कशी द्यावी हे ठरवताना व्यापाऱ्यांच्या मनात शेतकऱ्याच्या व्यवहाराचा आकार, त्याच्याशी असलेले वैयक्तिक संबंध, शेतकऱ्याने घेतलेली उचल अशा अनेक गोष्टी असत.

शेतकऱ्याला किती रक्कम द्यायची त्याची पट्टी ठरली म्हणजे ती रक्कम शेतकऱ्यास तातडीने पोचेल असेही मुळीच नाही. शेतकरीही प्रत्येकवेळी पैसे तातडीने मागतातच असे नाही. पेरणी, खुरपणीच्या हंगामात त्यांना पैशाची गरज पडते. त्यावेळी ते पैसे मागायला येत. एरव्ही, वर्ष सहा महिने

शेतीमालाच्या विक्रीच्या रकमा व्यापाऱ्यांना बिनव्याजी वापरावयास मिळत. असे असूनही शेतकऱ्यांचे पैसे मुळातच बुडवले असे अनेकवेळा होईल.

गावातील शेती डबघाईला आलेली; सर्वसामान्य कुणब्यांची दुर्दशा तर विचारण्याची सोयच नाही. गावातील वतनदार मंडळी, काही सवर्ण कारभारी सावकारीचाही धंदा करीत आणि या सावकारवतनदारांचे अडत व्यापारात जबरदस्त वजन असे. त्यांच्या एका खुणेने एखादा कुणबी पार धूळदाणही होऊन जाई. शेतीमालाच्या विक्रीची ही व्यवस्था अंदाधुंदीची, बेबंदशाहीची पण जोपर्यंत शेतीला लागणारे बी-बियाणे, खतेमुते सर्व शेतातच तयार होई; जेव्हा शेतजमिनी भरपूर असल्याने दर तीनचार वर्षांनी जमिनीचा तिसरा चौथा हिस्सा मोकळा ठेवला जाई; अशा पड ठेवलेल्या जमिनीत नंतरच्या वर्षी वाढीव पीक येई तोपर्यंत बाजारपेठांच्या या जुलमाचा विक्राळ जाच शेतकऱ्यांना पुरेपूर जाणवत नसे.

बाजारपेठेत अशा तऱ्हेने नाडला जाणारा शेतकरी फार काळ तग धरून राहील हे शक्यच नव्हते. पाऊसपाणी ठीक झाले; चांगली पिके आली तर बाजारातील फटका क्षुल्लक वाटे आणि कुणबी त्याची फारशी फिकीर करत नसे.

एखाद्या वर्षी पावसाने डोळे वटारले, पिके बुडाली म्हणजे संकट आ वासून पुढे उभे राही. चांगल्या पावसाच्या वर्षी मुबलक पिकले पण त्यातून काहीच उरले नाही, मग दुष्काळ पडला की पोराबाळांसकट खडी फोडण्यास जाणे, देशोधडी लागणे, आपल्या लाडक्या जनावरांना चारापाण्यापासून तडफडत प्राण सोडताना पाहणे यापलीकडे काही गत्यंतरच नसे.

हिंदुस्थानात हजारो वर्षे सुखशांती नांदत होती, कशाची ददात नव्हती. अशा सुवर्ण कालखंडाचे वर्णन गांधीवादी, हिंदुत्ववादी आणि इतर प्रचारक करत असतात. या सुवर्ण कालखंडातही दर दहा वर्षातून एकदातरी शेतकऱ्यांची दुष्काळाने दैना दैना होई. दिसायला कारण आसमानी – पाऊस पडला नाही, खरे कारण पाऊस पडला तेव्हा हाती काही आले नाही, त्यामुळे पावसाने डोळे वटारले की दैनाच दैना. पण ती सारी शेतकऱ्यांचीच. शेतीमालाच्या व्यापारात असलेला कुणी आडत्या, व्यापारी, दलाल दुष्काळ पडला म्हणून कधी निर्वासित झाला नाही, खडी फोडायच्या कामावर गेला नाही.

**कृषिउत्पन्न बाजार समित्यांची व्यवस्था**

शेतीमालाच्या बाजारपेठेचा हा उग्र प्रश्न स्वातंत्र्यानंतर समाजवादी धुरिणांच्या लक्षात आला, याबद्दल अनेक अहवाल लिहिले गेले चर्चा झडल्या आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांची एक देशव्यापी यंत्रणा तयार करण्यात आली. या व्यवस्थेचे स्वरूप बारकाईने पाहिले तर प्रश्न पडतो तो असा की, ही सारी व्यवस्था शेतकऱ्यांना बाजारपेठेची आणि किंमतीची हमी मिळावी ही यंत्रणेच्या शिल्पकारांची खरोखरच बुद्धी होती काय? त्यांचा खरा हेतू ग्रामीण व्यवस्थेतील मातबर शेतकरी, आडते, व्यापारी, दलाल यांना मिळत असलेला लाभ स्वातंत्र्योत्तर काळातील शासनाला जवळ असणाऱ्या लोकांच्या पदरात टाकण्याचा असावा.

जमाना समाजवादाचा, त्यामुळे नवीन यंत्रणेत जुन्याच बाजारव्यवस्थेचे सहकारीकरण किंवा नोकरशाहीकरण करण्याची योजना दिसते. बाजारपेठा शेतकऱ्याच्या जवळ आणण्याऐवजी दूर नेल्या गेल्या. साधारणपणे, प्रत्येक तालुक्यात एक कृषि उत्पन्न बाजार समिती असावी. त्या समितीची एक किंवा अधिक मंड्या असाव्यात. अशा मंड्यांसाठी जमिनी सक्तीने संपादन करून सरकारने द्याव्या, समितीच्या क्षेत्रातील शेतकऱ्यांनी त्यांचा सर्व माल या मंड्यांतच आणून विकला पाहिजे, काही किरकोळ विक्री सोडल्यास मंडीबाहेर माल विकणे हा गुन्हा होतो. समित्या तशा लोकशाही तोंडवळ्याच्या, त्यावर काही शेतकऱ्यांचे प्रतिनिधी, काही व्यापाऱ्यांचे; पण मोठी संख्या परिसरातील सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींची. समितीचा सभापती निवडला जायचा, पण राज्यकर्त्या पक्षाचे प्राबल्य रहावे अशा बुद्धीनेच समितीची आखणी केलेली. थोड्याच काळात कृषि उत्पन्न बाजार समित्या राज्यकर्त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांची चरायची कुरणे झाली.

शेतकऱ्यांनी वाहतूक करून माल मंडीत आणायचा, मालाची उतरंड लावून बसायचे; उन्हापावसापासून संरक्षणाची सोय बहुधा नाहीच. याउलट, व्यापारी मंडळींची मोठी सोय झाली. सगळा शेतीमाल एका जागी येऊन पडू लागला. त्याच्या संरक्षणाची व्यवस्था अपुरी असल्याने शेतकरी होईल तितक्या लवकर विक्री व्हावी यासाठी घायकुतीला आलेला. व्यापाऱ्यांची टोळी त्यांच्या सोयीने येणार. औपचारिकरीत्या म्हटले तर लिलाव बोलले

जाणार, पण सर्व बोलींची कमाल मर्यादा मंडीच्या बाहेरच, आधीच ठरल्यासारखी. जो भाव निघेल त्याला नाकारण्याची शक्यता काही नाही. पुण्याच्या महात्मा फुले मंडईतदेखील आणलेला भाजीपाला फारच मातीमोल भावाने जाऊ लागला तर बैलगाड्याबरोबर आलेल्या बैलांना शेतकरी तोच माल खाऊ घालतात असे दृश्य अनेकदा दिसते. माल घराकडे परत घेऊन जाण्याची शक्यता नाही, कारण वाहतुकीचा खर्च अवाढव्य. घरी नेऊनही काही उपयोग नाही कारण आज ना उद्या पुन्हा मंडीत परत आणावा लागणार आहे, तेदेखील पुन्हा एकदा वाहतुकीवर पैसे खर्चून. पुढच्यावेळीतरी काय भाव मिळेल याची काय खात्री? माल घराकडे वाहून न्यायचा आणि परत वाहून आणायचा या यातायातीचा खर्च सुटेल इतकी अधिक किंमत दुसऱ्या खेपेस मिळण्याची शक्यता जवळजवळ नाहीच. माल बाजारातच पडू द्यावा तर पुन्हा, उन्हापावसापासून सांभाळण्याची सोय नाही. एखादा वळीवाचा पाऊस आला तर सगळ्या मालाचा चिखल होण्यास काही वेळ लागणार नाही. अशा हवालदिल परिस्थितीत शेतकरी आला.

**बाजार समित्यांची मक्तेदारी**

साऱ्या देशभरातल्या हजारो कृषि उत्पन्न बाजार समित्यांपैकी एकीच्याही मंडीवर न खपणाऱ्या मालावर प्रक्रिया करून साठवून ठेवण्याची सोय नाही. आपल्या बाजारपेठेत भाव नाही. देश-परदेशात कोठे जरा बरा भाव मिळून पडतळ सुटण्याची शक्यता असेल तर तेथे माल पाठवण्याची व्यवस्था नाही. थोडक्यात, कृषि उत्पन्न बाजार समित्यांना मक्तेदारी मिळाली; सत्ता मिळाली. शेतीमालाच्या बाजारपेठेत सुधारणा काहीच झाली नाही. समित्यांच्या मंड्यातही खोट्या वजनमापांचा व्यवहार खुलेआम चालतो. विकल्या गेलेल्या मालाचे पैसे आडत्याने शेतकऱ्यांना ४८ तासात पोचते करावेत अशी कायद्याची तरतूद आहे. त्यासाठी काही भांडवल आडत्याने घालावे, अशी अपेक्षा आहे हे उघड आहे. प्रत्यक्षात आडते व्यापाऱ्यांकडून पैसे मिळतील तेव्हा त्यातूनच काही रक्कम शेतकऱ्यांना अदा करतात.

विक्रीची रक्कम मिळण्यास शेतकऱ्यांना आठवडे नाही महिनेन् महिने लागतात. याखेरीज, शेतकरी कोणत्या सहकारी सोसायटीचा वा कारखान्याचा कर्जदार असेल तर विक्रीच्या रकमेतून त्या कर्जापोटी रक्कम कापून घेण्याचा

अधिकार आडत्यांना दिला आहे. काही पिकांच्या बाबतीत विक्रीची सारी किंमतसुद्धा कर्जापोटी वळती केलेली दाखवली जाते. अशी कापून ठेवलेली रक्कम तातडीने धनको सोसायटीकडे पोचती करायला आडते म्हणजे काही दूधखुळे नाहीत. शेतकऱ्यांकडून रक्कम कापून घेतली जाते. ती धनकोकडे पोचत नाही, त्यामुळे शेतकरी व्याज, दंडव्याज भरत राहतो. एवढेच नाही तर भरलेल्या कर्जापोटीही त्याच्या घरावर जप्ती येते. घरातील चीजवस्तू, घरावरील पत्रे, घरासमोरील मोटारसायकल जप्त करून नेली जाते. असे सरसहा घडत असते.

सरकारी कायद्याखाली मंडी आली म्हणजे मोजमाप, तोलाई चोख झाली असे कोणीही छातीवर हात ठेवून म्हणू शकणार नाही. थोडक्यात, विक्रीची शाश्वती नाही, तोलाईची खात्री नाही, विक्रीचे पैसे केव्हा मिळतील हे सांगता येत नाही.

हे सगळे हालहाल करून घेण्यासाठी शेतकऱ्यांना समितीला कर द्यावा लागतो, आडत द्यावी लागते, तोलाई, हमाली द्यावी लागते. बाजारसमितीने काही निधी गोळा करायचे ठरवले तर त्यासाठीही शेतकऱ्याच्या विक्रीच्या रकमेतून सक्तीची कपात केली जाते. घरी खायला नाही, पोरांना शाळेत पाठवता येत नाही असा कुणबी अनेक विद्यालयेमहाविद्यालये, मंदिरे आणि धर्मादाय संस्था यांच्यासाठी सतत निधी देतच असतो. मग कृषि उत्पन्न बाजार समितीमुळे फायदा झाला कुणाचा?

**बाजार समित्या कोणाच्या फायद्याच्या?**

१) सर्वात जास्त फायदा झाला तो पुढारी मंडळींचा. समितीचा सदस्य होणे किंवा सभापती होणे पुढच्या आमदारकीची नांदीच समजायची. समितीकडे शेतकऱ्यांनी दिलेल्या करापोटी कोट्यवधी रुपये जमतात. त्यांच्याशी हवा तसा खेळ करणे सहज शक्य होते. समितीच्या मंड्यांसाठी प्रत्येक ठिकाणी सरकारने गावाच्या मध्यभागी अत्यंत मौल्यवान जमीन संपादन करून समितीला दिलेली असते, या जमिनींचा व्यवहार हा अनेक समित्यांचा प्रमुख व्यवसाय झाला आहे. मिळालेल्या जमिनीवर कोणी प्रक्रिया कारखाने बांधले नाहीत. पण आदरणीय नेत्यांकरिता मंगल कार्यालये किंवा इतर व्यावसायिक इमारती बांधण्यासाठी जमिनी जवळ जवळ फुकट उपलब्ध

करून दिल्याची अनेक उदाहरणे सापडतील.

२) मंडी-व्यवस्थेमुळे विशेष मातबर झालेला दुसरा गट म्हणजे माथाडी कामगार. मंडीपूर्व व्यवस्थेत आवश्यक असेल तर शेतकरी किंवा त्याचा मुलगा साऱ्या पोत्यांना पाठ लावून ती कचकन उचलत असे आणि ठेवत असे. आजही मंडीत माल पाठवताना टेंपो, ट-क, बैलगाड्या शेतावर भरताना हमाली शेतकरीच करतो, समितीच्या मंडीत हे करण्याची त्याला परवानगी नाही. हमालीचे दर हमालांच्या युनियनने ठरवून घेतलेले आहेत. ढिगापासून काट्याकडे फेरी वेगळी, काट्यापासून भरणीकडे फेरी वेगळी. भरण्यानंतर वाहनापर्यंतची फेरी वेगळी. हमालीची रक्कम इतकी वाढली की चाकण बाजारात बीडउस्मानाबादकडून दुष्काळाच्या वर्षी येऊन हमाल झालेले निर्वासित शेतकरी आता स्थानिक शेतकऱ्यांना व्याजाने रकमा देऊन सावकार बनले आहेत. पूर्वीच्या काळच्या बाजारव्यवस्थेपेक्षा बाजार समित्यांच्या व्यवस्थेत सुधारणा काहीच नाही. वजने, मापे तशीच खोटी, पैसे हाती पडण्याची दुष्करता तीच. पूर्वीच्या व्यवस्थेत मोकळेपणा होता. आता कायद्याची दंडेली आली, पुढाऱ्यांचे राजकारण आले.

३) सगळ्यात मोठा फायदा कोणाचा झाला असेल तर तो धनको बँकांचा. पूर्वीच्या काळी शेतकऱ्यांनी माल विक्रीसाठी पाठवला की पठाण सावकार मागोमाग जाई; आडत्याच्या दरवाजाशी उभा राही आणि शेतकरी विक्रीचे पैसे घेऊन बाहेर पडला की आपली वसुली पुरी करी आणि त्यावेळच्या त्याच्या इच्छेप्रमाणे शेतकऱ्याला दोनचार दंडुकेही मारी.

पाकिस्तान झाले, पठाण गेले. राहिले ते सारे पंचतारांकित हॉटेलांच्या किंवा तत्सम संस्थांच्या बाहेर रुबाबदार पेहराव करून मोठ्या थाटात दारवान म्हणून उभे राहतात आणि दिवसापोटी शेकडोंनी रुपये बक्षिसी म्हणून कमावतात.

त्यांचे कर्जवसुलीचे काम आता बाजारसमित्याच करतात. लाठी, छडीचा फारसा प्रयोग होत नाही, पण वसुलीत जबरदस्तीचा भाग तेवढाच. पठाणांनी वसूल केलेली रक्कम हिशोबात घातलेलीच नाही, असे सहसा घडत नसे. तोट्यात चालणाऱ्या शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची वसुली सक्तीने आणि कार्यक्षमतेने करण्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समित्या आणि त्यांच्या मंड्या

हे फार महत्त्वाचे साधन ठरल्या आहेत.

**केवळ, बचतीच्या शोषणासाठी**

कृषि उत्पन्न बाजार समित्यांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात एकाधिकार देण्याची काही आवश्यकता होती काय? बाजार समित्यांना, त्यांच्या मंड्या असू द्यात, पण दुसऱ्या कोणी आपला माल घेऊन मंडीच्या भिंतीबाहेर विकायला ठेवला तर त्यात दु:ख वाटण्याचे कारण काय? एखाद्या सोयीस्कर जागी एक एक म्हणता म्हणता मोठ्या संख्येने शेतकरी जमू लागले आणि तेथेही एक छोटीशी मंडी तयार झाली तर चोरी, खून, दरवड्याच्या प्रकरणी निष्क्रिय राहणाऱ्या पोलीस व्यवस्थेस दंडुका घेऊन धावण्याचे कारण काय?

स्वातंत्र्योत्तर काळात समाजवादाच्या मस्तीत कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या मंड्यांची व्यवस्था झाली. तिच्या प्रेरणा गावातील प्रस्थापित नेतृत्व नेस्तनाबूत करून त्यांच्याकडे जमा होणारे शेतीतील वरकड उत्पन्न शहराकडे वाहून न्यावे, सत्ता टिकविण्यासाठी राजकीय संस्थाने तयार करावीत व कार्यकर्त्यांना 'पांजरपोळ' खोलून द्यावेत याच असणार हे मंड्यांच्या व्यवस्थेचे आजचे परिणाम पाहता स्पष्ट होते.

शेतमालाच्या बाजारपेठेची नवी व्यवस्था उभी करण्याची शक्यता तयार झाली त्यावेळी जगात इतर देशात काय व्यवस्था आहे याचा अभ्यास करता आला असता. तसे झाले असते तर काही वेगवेगळे प्रयोग होऊ शकले असते, काही अनुभव मिळाला असता आणि शेतमालाच्या बाजारपेठेच्या जुनाट समस्येला काही तोडगा सापडू शकला असता. हा प्रश्न शेतीमालासाठी अत्यंत निकडीचा, पण शेतीक्षेत्रापुरताच मर्यादित आहे असे नव्हे.

**उद्योजकतेलाही तीच वागणूक**

तांत्रिक शिक्षण घेऊन नोकरी न करता उद्योजक बनायचे अशा उमेदीने अनेक तरुण पुढे येतात, नवनवीन उत्पादनांच्या त्यांच्याकडे अनेक कल्पना असतात. त्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी काही भांडवलाची गरज असते. काही अत्यंत नाविन्यपूर्ण उत्पादनांच्या बाबतीत तर सारा व्यवहार प्रयोगाचा असतो, म्हणजे धोक्याचा. माल ग्राहकांच्या पसंतीस उतरला तर छप्परफाड फायदा होण्याचीही शक्यता आहे आणि डाव हुकला तर तत्काळ दिवाळखोरांच्या यादीत जावे लागणार आहे. अशा वेळी लागणाऱ्या

भांडवलाला 'धाडसी भांडवल' म्हणतात. आपल्याकडे अनेक बँका आहेत; वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था आहेत. त्यांच्याकडे असा कोणी धाडसी उद्योजक तरुण गेला तर त्याचे म्हणणे कोणी धड ऐकूनसुद्धा घेणार नाही. त्याला भांडवल पुरवण्याची गोष्ट दूरच राहली. समजा, धाडसी भांडवलाचाही प्रश्न सुटला– यासाठी बहुधा घरगुती वित्तपुरवठ्याचाच उपयोग होतो – तरी बाजारपेठेचा प्रश्न शिल्लक राहतोच. माल तयार करायचा, पण त्याला बाजारपेठ असली म्हणजे निदान उत्पादनखर्च भरून येण्याइतकी किंमत देणारा ग्राहक असला, तर उत्पादनाच्या खटाटोपाला काही अर्थ आहे. ती समस्या शेतकऱ्यांच्या बाबतीत जितकी खरी तितकीच छोट्या उद्योजकांच्या बाबतीतही खरी आहे. सुलभ बाजारपेठेच्या अभावी मग छोटे उद्योजक कोणा बड्या कारखानदाराच्या जाळ्यात अडकतात. मोठ्या कारखान्यात जुळणी होणाऱ्या मालासाठी मोठ्या प्रमाणावर किरकोळ फुटकळ भाग लागतात. त्यांचा घाऊक पुरवठा करण्याचे काम लघुउद्योजक स्वीकारतात आणि काही काळ त्यांना मोठा आनंदाचा आणि भरभराटीचा वाटतो. उत्पादन सुधारण्यासाठी नवनवीन संशोधनाची गरज नाही, कारखानदाराने दिलेल्या आराखड्याप्रमाणे आणि तपशीलाप्रमाणे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करायचे आणि कारखानदाराला विकायचे. थोडक्यात, डोक्याला कटकट म्हणून नाही. थोड्याच दिवसात हे चित्र बदलू लागते. जुळणी करणारे मोठे कारखानदार फुटकळ भाग अधिकाधिक स्वस्त मिळावे यासाठी त्यांचा पुरवठा करणाऱ्या छोट्या उद्योजकांची गळचेपी करू लागतात. मग या छोट्या उद्योजकांना विश्व आठवते. कर्जात बुडालेला शेतकरी विष पिऊन जीव देतो तसे प्रत्यक्षात छोट्या उद्योजकांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर घडत नाही किंवा घडले तरी त्याचा फारसा गवगवा होत नाही एवढेच. अन्यथा, बाजारपेठेची समस्या शेतकरी आणि छोटा उद्योजक या दोघांचीही सारखीच.

### कारखानदारांचे लाड

भारतातील बाजारपेठेच्या व्यवस्थेत सुखी म्हणायचे ते मोठे उद्योगपती, पुढारी आणि नोकरशहा यांच्या मदतीने लायसेन्स परमिट मिळवावे, उत्पादनाच्या त्या क्षेत्रात मक्तेदारी ठेवावी, परदेशातूनही स्पर्धा करण्यासाठी आयात होणार नाही अशी शासनाकडून तरतूद करून घ्यावी.

म्हणजे भद्द्या मालाचे उत्पादन केले तरी तो विकत मिळावा यासाठी ग्राहकांच्या रांगा लागतात. आणि मिळेल तो माल स्वीकारून ते चूपचाप राहतात. स्पर्धा नाही; परदेशातील बहुदा कालबाह्य तंत्रज्ञानाच्या उसनवारीमुळे संशोधनासाठी खर्च नाही. मक्तेदारीमुळे जाहिरात करण्याची गरज नाही, उत्पादनात काही सुधारणा घडवण्याचीही आवश्यकता नाही. असा हा आनंदाचा सुखसागर फक्त सत्ताधाऱ्यांच्या भांडवलदार दोस्तांकरताच राखून ठेवण्यात आला आहे. या क्षेत्रात समस्या आहे ती उत्पादकांची नाही ग्राहकांची आहे. भिकार माल वर्षानुवर्षे महागड्या किंमतीत विकत घेत रहायचा यापलीकडे ग्राहकाला काही पर्याय रहात नाही. परदेशातील वस्तूंच्या जाहिराती पाहनूसुद्धा 'तोंडाला पाणी सुटावे', परदेशात जाण्याची संधी मिळाली तर फार उत्तम, नच जमल्यास येनकेन प्रकारेण 'इम्पोर्टेड माल' मिळवावा. आणि त्यांचा उपयोग 'प्रतिष्ठा चिन्ह' म्हणून करावा एवढीच काय ती सुखवस्तू ग्राहकांपुरती मर्यादित शक्यता.

बाजारपेठेची समस्या सर्वच क्षेत्रांना जाचणारी आहे. शेतीच्या बाबतीत, निदान पुढाऱ्यांना पोसण्यासाठी, कृषि उत्पन्न बाजार समितीची एकाचवेळी क्रूर आणि अजागळ व्यवस्था तयार करण्यात आली. सर्वच क्षेत्रांचा विचार करून एक सर्वंकष बाजारपेठेची व्यवस्था तयार करता आली असती ती न करता केवळ शेतीपुरती कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मंड्यांची व्यवस्था तयार करून 'इंडिया-भारत' हे द्वैत अधिक ठळक झाले.

**सुपर मार्केटांचे जाळे**

अमेरिका, युरोप, जपान किंबहुना जगातील सर्वच प्रगत देशात बाजारपेठांचे प्रश्न सोडवण्यासाठी अगदी वेगळ्या तऱ्हेची बाजारव्यवस्था उभी झालेली आढळते. शेतीमालाच्या बाबतीत संघ तयार होतात ते एकेका शेतीमालाच्या उत्पादकांचे. भुईमूग उत्पादकांचा संघ वेगळा, सोयाबीन उत्पादकांचा स्वतंत्र इ. इ. हे संघ सुसज्ज कार्यालये ठेवतात, देशातील आणि देशाबाहेरील सर्व बाजारपेठांवर बारकाईने नजर ठेवतात. आपल्या मालाच्या वाणात बाजारपेठेतील मागणीनुसार फरक करणे किफायतशीर असेल तर ते वाण सदस्य शेतकऱ्याला उपलब्ध करून देतात. इतर उत्पादक देशांवर मात करण्यासाठी सातत्याने नवनवीन संशोधन करून वेगवेगळी वाणे तयार

करतात. साठवणूक वाहतूक यांची व्यवस्था हाती ठेवतात आणि जगातील जास्तीत जास्त चांगल्या किंमती आपल्या सदस्यांच्या पदरी पडाव्यात यासाठी ते राष्ट-ीय शासन, सांसद यांच्यावर दडपण आणतात आणि क्वचित प्रसंगी परदेशातील सरकारांनाही वश करून घेतात. या सगळ्या कामगिरीबद्दल उत्पादकांचे संघ एकूण विक्रीच्या रकमेच्या ठराविक टक्केवारीने फीही वसूल करतात. अलीकडे मी अमेरिकेतील सोयाबीन आणि भुईमूग यांच्या उत्पादकांच्या संघांना भेट दिली. त्यांची साधनसंपन्नता आणि कार्यक्षमता पाहून मलातरी आपण कोणा अद्‌भुताच्या देशात आलो आहे असे वाटले.

बाजारपेठ म्हटली की ती पुरवठा करणाऱ्यांची आणि मागणी करणाऱ्याची एकत्र येण्याची जागा. उत्पादकांचे संघ उत्पादकांच्या हिताचे संरक्षण करतात. पण ग्राहकांच्या हिताचे काय? ग्राहकांच्या हितांचे संरक्षण करणारी दुसरी यंत्रणा उभी राहिली तर 'ग्राहक विरुद्ध उत्पादक' असा संघर्षही झडण्याची शक्यता तयार होईल. या कारणाने उत्पादकांच्या संघांसारखेच ग्राहकांचेही संघ असतात. आणि त्याखेरीज, उत्पादक आणि ग्राहक यांच्यात दुवा साधणारी एक अद्‌भुत व्यवस्था सर्व प्रगत देशात आढळून येते. या अजब व्यवस्थेचे नाव 'सुपर मार्केट्स्.'

आपल्याकडेही अलीकडे 'सुपर मार्केट्स' अशी पाटी लावलेली दुकाने अनेक आढळतात. कोपऱ्यावरच्या किराणा मालाच्या दुकानाचीच थोडी वाढवलेली आवृत्ती, कौंटरजवळ काही खाद्यपदार्थ आणि जवळपास थोडीफार फळफळावळ, भाजीपाला एवढाच काय तो फरक. नेहमीच्या दुकानांप्रमाणेच ग्राहकाने मागणी केली म्हणजे या सुपर मार्केटचा दुकानदारही मोठ्या डब्यातून किंवा पोत्यातून माल काढून गिऱ्हाईकाच्या मागणीप्रमाणे वजनमाप करून पुडके बांधतो, दोरा गुंडाळतो.

खरोखरीच्या 'सुपर मार्केट'मध्ये ग्राहक दुकानभर फिरतात, दुकानातील वेगवेगळ्या विभागात वेगवेगळे पदार्थ, किराणा, भुसार, भाजीपाला, फळफळावळ, प्रसाधने, मसाल्याचे पदार्थ, तयार खाद्यपदार्थ इ. वजनमाप करून किंमतीचे लेबल लावून मांडून ठेवलेले असतात. गिऱ्हाईक आपापल्या गरजेप्रमाणे वस्तू घेऊन टोपलीत किंवा हातगाडीत जमा करत जातो. वस्तूंची

विपुलताच इतकी असते की दुकानात प्रवेश करतानाच जी वस्तू विकत घेण्याचा मनात इरादाही नसतो अशा वस्तूही गिऱ्हाईक कळत न कळत घेऊन टाकतो. व्यापारी उलाढाल वाढते.

परदेशातील मी पाहिलेली काही सुपर मार्केटस् म्हणजे आपल्याकडील तथाकथित सुपर मार्केटपेक्षा सहस्रपटींनी अजस्र. एकेक दुकान म्हणजे कित्येक मजल्यांची इमारत असते. सर्वसाधारण सुपर मार्केटमध्ये किराणा, भुसार, डेअरी, पोल्ट्री, मटन, चहासाखरेपासून ते केवळ विवाहप्रसंगी उपयोगी येणाऱ्या १० फूट उंचीच्या शोभिवंत केकपर्यंत सर्व काही मिळते. कापड विभागात गेलात तर कापडचोपड, त्याशिवाय सतत नवनवीन बदलणाऱ्या फॅशनचे स्त्री-पुरुषांचे अनेक तऱ्हांचे पेहराव, त्यांच्या किंमती अशक्यप्राय वाटाव्या इतक्या स्वस्त. दर दोन तीन महिन्यांनी तेथे सेल लागतात. त्यावेळच्या किंमती पाहिल्या तर दुकानदारांचा चरितार्थ कसा चालत असेल याची चिंता वाटते. औषधे, प्रसाधने, खेळणी असे शेकडो विभाग. त्याखेरीज, खास वस्तूंकरिता वेगवेगळी दुकाने असतात. एक सुपरमार्केट केवळ पुस्तकांचेच, एक केवळ गणकयंत्रांचेच. एक केवळ घरदुरुस्तीसाठी लागणाऱ्या सामानांचे. ऑफिसकामासाठी लागणाऱ्या स्टेशनरी सामानाचे भव्य दुकान आणि त्यातील विविध सामानांची रेलचेल पाहून मी तर थक्क झालो. दुकानांचे वर्णन करताना जुन्याकाळी 'पीन टू पियानो' असे वर्णन करीत आता 'टाचणी ते विमान' सर्व काही येथे मिळते असे म्हटले तरी ते पुरेसे नाही. सर्वत्र, एखाद्या गर्भश्रीमंत वाटणाऱ्या मुलीला दुकानात जाऊन विक्रेतीचे काम करताना पाहिलं म्हणजे आश्चर्य वाटते. सुपर मार्केट यंत्रणांमुळेच मोलकरणीला सरदारणींप्रमाणे पेहराव करण्याची शक्यता तयार झाली असे एका लेखकाने म्हटले आहे. पाश्चिमात्य समाजातील गरीब आणि श्रीमंत ही विषमता नष्ट झाली ती समाजवादाचे उद्‌गाते मार्क्स आणि एंगल्स यांच्यामुळे नाही तर 'मार्क्स आणि स्पेन्सर' नावाच्या इंग्लंडमधील सुपर मार्केट यंत्रणेसारख्या व्यवस्थांमुळे होय.

**यशाचे गमक**

हा चमत्कार घडतो कसा? सुपर मार्केटच्या व्यवस्थापनावर पुरा प्रबंध लिहिण्याची ही जागा नव्हे. त्यांच्या कार्यपद्धतीची दोन तीन महत्त्वाची सूत्रे

आहेत. तेवढी मांडणे पुरेसे आहे.

पहिले सूत्र असे : एका एककामागे किती फायदा होतो याला फारसे महत्त्व नाही, उलाढाल मोठी असली आणि एककी फायदा किरकोळ असला तरी शेवटी होणारा एकूण फायदा मोठा असू शकतो. एका साबणाच्या वडीची किंमत ठरवताना वडीमागे फायदा जास्तीत जास्त किती ठेवाल? चार आणे किंवा आठ आणे. किंमत एवढीशी वाढवल्यामुळे सारे ग्राहकच दुसऱ्या साबणांकडे वळले आणि विक्री काही झालीच नाही तर मग काय फायदा? याउलट, फायदा अगदी किरकोळ ठेवला आणि त्यामुळे हजार वड्या खपू लागल्या तर उत्पादकाची आणि विक्रेत्याची मिळकत वाढते. 'उलाढाल वाढवा, फायदा कमवा! नफेखोरीने नाही.' हे पहिले सूत्र.

दुसरे महत्त्वाचे सूत्र : मागणी तसा पुरवठा. हे शेतीच्या उदाहरणाने सांगता येईल. ग्राहकाला कोणता माल पसंत आहे, कोणत्या वाणाचा, कोणत्या गंधाचा, कोणत्या चवीचा. हे सुपरमार्केटमधील दररोजच्या कीर्दखतावण्यांकडे पाहिले तरी लक्षात येते. तिथले व्यवस्थापक शेतकऱ्यांना वाण पुरवतात, साधने पुरवतात, प्रशिक्षणही देतात आणि शेतकऱ्यांच्या मालाच्या पुरवठ्यासंबंधी करार करतात. जितका येईल तितका माल घेतला जातो. सुपर मार्केटचे जाळे हजारो दुकानांचे, देशभर विखुरलेले असल्यामुळे माल विकत घेण्याची त्यांची ताकद अफाट असते.

कारखानदारीच्या क्षेत्रात सुपर मार्केटची व्यवस्था एक पाऊल आणखी पुढे टाकते. कारखानदारांनी तयार केलेला माल केवळ कमिशनपोटी विक्रीला ठेवणे या व्यवस्थेला परवडत नाही. त्यांच्याकडे स्वतंत्र संशोधन-शाळा असतात. समजा, एका कंपनीचा पंखा बऱ्यापैकी लोकप्रिय आहे. कार्यशाळेत त्या पंख्यातील यंत्रणेचा तज्ज्ञांकडून खास बारकाईने अभ्यास केला जातो. पंख्याच्या बांधणीत काही आलतू फालतू मालाचा वापर केला असेल तर तो काढून टाकला जातो. काही महागडे सुटे भाग वापरलेले असले तर त्यांच्या जागी स्वस्त सुटे भाग कसे वापरले जातील याचाही बारकाईने अभ्यास होतो. अनुभव असा की कोणत्याही गृहोपयोगी वस्तूचा उत्पादनखर्च २०% ते ३०% नी कमी करता येतो. मग, व्यवस्थापक कारखानदारांशी बोलणी चालू करतात. आम्हाला तुमचे पंखे विकत घ्यायचे आहेत, पण डिझाईनमध्ये आम्ही सांगतो

ते फेरफार करून. मालाच्या गुणवत्तेची जबाबदारी तुमची नाही, आमची. किंबहुना आम्ही घेतलेल्या पंख्यावर तुमचे नाव नकोच, आमचे हवे. तुमच्या उत्पादनशक्तीपैकी निम्मी आमच्या कामाला लावा किंवा पाहिजे तर त्यासाठी नवा कारखाना टाका. एवढ्या उत्पादनासाठी तुमचा जाहिरातीवरचा खर्च, विक्रेत्यांवरचा खर्च वाचणार आहे. घाऊक किंमत काय लावता ते बोला! अशा तऱ्हेने सुपर मार्केट व्यवस्था स्वत:चे कारखाने काढत नाही, दुसऱ्यांकडून उत्पादन करून घेते आणि बाजारपेठेतील किंमतीच्या तिसऱ्या चौथ्या हिश्श्याच्या किंमतीने बाजारात आणते. उलाढाल वाढते. ग्राहकाचे भले, सुपर मार्केटचे भले, उत्पादकांचे भले आणि साऱ्या अर्थव्यवस्थेचेही. उलाढाल वाढल्याने, महागाईवर रोक, बेरोजगारी कमी असे सर्व भलेच भले! म्हणजे, उत्पादनखर्चाचे परिणामकारक नियोजन हे तिसरे सूत्र.

**प्रामाणिक इच्छा हवी**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात बाजारपेठेचे प्रश्न सोडवण्याच्या नावाखाली राज्यकर्त्यांनी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मंड्यांचे कुभांड रचले. मध्यंतरी, महाराष्ट-ात युती शासनाने या समित्यांची मक्तेदारी संपवण्याची शिफारस मान्य केली पण ती अंमलात आणण्यासाठी काहीच पावले उचलली नाहीत. मुंबईतील 'अपना बझार', वारणा नगर येथील १८-२० दुकानांचे जाळे असे काही किरकोळ अपवाद सोडले तर जगभर यशस्वी झालेल्या पर्यायी बाजारपेठेच्या व्यवस्थेचा प्रयोग आपल्याकडे आजपर्यंत झालाच नाही. अलीकडे मोठ्या शहरात अकबर अलीज्, फूड वर्ल्ड अशी महाकाय दुकाने लोकप्रिय होत आहेत. पण ती सुपर मार्केटच्या सर्वंकष व्यवस्थेची बरोबरी करू शकत नाहीत. कृषि उत्पन्न बाजार समित्यांची मक्तेदारी संपणे शेतीच्या संपन्नतेकरिता आवश्यक आहे. पण मक्तेदारी संपवताना एकाऐवजी अनेक पुढाऱ्यांचे अड्डे करून भागायचे नाही. त्यासाठी सुपर मार्केट व्यवस्थेसारखे नवे प्रयोग आवश्यक आहेत. यासाठी परदेशातील काही संस्थांशी हातमिळवणी करणे फायद्याचे ठरेल. दुर्दैवाने, अशा तऱ्हेने झालेले आजवरचे प्रयत्न शासनाने आणि नोकरशाहीने हाणून पाडले आहेत.

# १४. WTO च्या धर्मक्षेत्री, कुरुक्षेत्री

म्हणता म्हणता २००० साल उगवले आणि दोन तृतीयांश संपलेही. १ जानेवारी २००१ ही तारीख काही फार लांब राहिलेली नाही. डंकेल प्रस्तावावर चर्चा चालू होती त्यावेळी जागतिक व्यापार खुला करण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट-ांनी ज्या ज्या अनेक शर्तींची पूर्तता करण्याचे मान्य केले होते, त्यासाठी मुदती ठरवून देण्यात आल्या होत्या; काही शर्तींसाठी जानेवारी २००१, तर दुसऱ्या काही शर्तींसाठी जानेवारी २००३. मॅराकेश येथे १९९४ मध्ये, करारावर सही करताना अनेकांची भावना अशी होती की, २००१ साल तर अजून खूप दूर आहे, पुढचे पुढे पाहून घेऊ. दरम्यान, काही चमत्कार होईल आणि आपण घेतलेल्या जबाबदाऱ्या प्रत्यक्षात पार पाडण्याची वेळ येणारच नाही अशा भोळसट आशेत ज्या अनेक देशांची सरकारे राहिली त्यांच्या यादीत हिंदुस्थानचा क्रमांक, अर्थातच शिरोभागी होता. शहामृगाची शिकार करण्याकरिता एखादा रानटी प्राणी त्याचा पाठलाग करू लागला की तो पळू लागतो. त्याच्या पळण्याचा वेग इतर कोणत्याही प्राण्याच्या तुलनेने कितीतरी फार अधिक असतो. पळून पळून दमला की शहामृग उभा राहतो आणि जवळपासच्या वाळूत किंवा मातीत डोके खुपसतो. बाहेरचे जग दिसेनासे झाले की मग आपणही जगाला आता दिसणार नाही, तेव्हा आता जगापासून आपल्याला काही धोका नाही अशी त्याची समजूत होते असे म्हणतात. कोणताही प्राणी इतका मूर्ख असू शकेल काय याबद्दल चर्चा होऊ शकते. पण, आंतरराष्ट-ीय व्यापार खुला करण्याच्या बाबतीत हिंदुस्थान शासनाची अवस्था त्या शहामृगासारखीच झालेली दिसते. हिंदुस्थानातील वनस्पतींसंबंधी बौद्धिक संपदेचे रक्षण करण्यासाठी आपल्या परिस्थितीस अनुरूप असा कायदा हिंदुस्थान सरकारने लोकसभेत संमत करून घ्यायला पाहिजे होता; प्रत्यक्षात आजपर्यंत अशा विधेयकाचा मसुदादेखील तयार झालेला नाही.

आंतरराष्ट-ीय व्यापार संघटना लवकरच वाटाघाटींच्या दुसऱ्या एका फेरीला सुरुवात करणार आहे. १९९४ साली स्वाक्षरी झालेल्या कराराची पूर्तता किती प्रमाणात झाली, मागील करारांच्या तरतुदींपेक्षा काही वेगळ्या किंवा

अधिक व्यापक तरतुदी आंतरराष्ट-ीय व्यापारव्यवस्थेसाठी करणे आवश्यक किंवा उपयुक्त ठरेल काय अशा प्रश्नांवर या वाटाघाटी होतील. प्रत्येक राष्ट-ाच्या आर्थिक जीवनमरणाचा हा प्रश्न असल्याने तेथे जाणारे सारे प्रतिनिधी सज्जड आकडेवारी आणि युक्तिवाद प्रस्ताव तयार करून जाणार. शेतीव्यापारासंबंधी इतर काही देशांतील तज्ज्ञ मला भेटून या विषयावर चर्चा करून केव्हाच गेले. आपल्या देशात 'शेतीव्यापाराच्या जागतिकीकरणाच्या संदर्भातील समस्या' या विषयावर एक प्राथमिक चर्चा झाली; पण, वाटाघाटीत नेमकी कोणती भूमिका घ्यायची, वाटाघाटींच्या रस्सीखेचीत प्रत्येक प्रस्तावावर आपल्या बाजूने कोणते देश उभे राहतील आणि विरुद्ध बाजूला कोण उभे राहतील याची प्राथमिक चाचपणीदेखील अजून व्हायची आहे. निश्चित माहिती नसली की अज्ञानाच्या अंध:कारात साहजिकच मनात भीती उभी राहते. साऱ्या देशभर, देशादेशांतील व्यापार अटकविणाऱ्या भिंती तोडून सारे जग एकत्र आणणे म्हणजे काही भयाण राक्षसी घटना घडली आहे अशी कल्पना अनेकांनी करून घेतली आहे. अनेक वर्षे विलायती सत्तांनी हिंदुस्थानची लूट केली; इंग्रजांनी तर येथे साम्राज्य स्थापले. त्यामुळे, देशाच्या सरहद्दीपलीकडील सर्व शक्तींबद्दल हिंदुस्थानच्या मनात एक भीतीची भावना आहे. परदेशांशी जेथे जेथे आपला संबंध येईल तेथे तेथे आपले नुकसानच होणार अशी अनेकांची ठाम समजूत आहे. जागतिक व्यापार हा विषय तसा समजण्यास सोपा नाही. सर्वसाधारण लोकांना 'निर्यात केली तर डॉलर मिळतात आणि आयात केली तर डॉलर द्यावे लागतात; तस्मात्, निर्यात करणे चांगले' एवढेच काय ते आंतरराष्ट-ीय व्यापाराबद्दल समजते!

''तरीही, हापूस आंबा भारतातून निर्यात होऊ लागला हे काही फार चांगले झाले नाही; आता आपला आंबा गोरे खाणार आणि आपल्याच देशातील लोकांना तो चाखावयासदेखील मिळणार नाही ही गोष्ट काही बरी नाही'' ही भीती समजण्यासारखी आहे. पण त्याबरोबरच, ऑस्ट-ेलियातून येथे सफरचंद आले तर तेथे पिकलेले उच्च प्रतीचे फळ आपल्याला खायला मिळणार याचा आनंदही व्हायला पाहिजे. प्रत्यक्षात निर्यात होवो का आयात, आपले नुकसानच नुकसान होणार आहे अशी आपली 'हिंदुभावना' आहे. समुद्रपर्यटनातील हजारो वर्षांच्या बंदीतून आणि परकीय आक्रमकांपुढे हजारो

वर्षे शरणागती स्वीकारावी लागल्यामुळे ही पराभूत मनोवृत्ती खोल रुजली आहे.

ॲडमिरल पेरीने जपानी सम्राटाच्या राजमहालावर तोफ डागली आणि सारा जपान खडबडून जागा झाला; आपला सम्राट सूर्याचा वंशज असला तरी पाश्चिमात्यांच्या विज्ञानविद्येपुढे त्याचे काही चालत नाही हे त्यांनी पक्के ओळखले. आणि, त्यांनी विज्ञान, तंत्रज्ञान व उद्योगधंदे या साऱ्या क्षेत्रात अशी काही हनुमानउडी घेतली की, आता जपानशी स्पर्धा करणे अमेरिकेसारख्या देशासही अनेक क्षेत्रात जमत नाही.

आंतरराष्ट-ीय व्यापार संस्थेच्या वाटाघाटींसाठी हिंदुस्थानचे जे प्रतिनिधीमंडळ जाईल त्यात प्रामुख्याने नोकरमाने सरकारी अधिकारी किंवा लिखापटी तज्ज्ञ मंडळी असणार; त्यांच्या मनात व्यापाराविषयी विजिगीषु तर सोडा, पण युयुत्सु मानसिकतासुद्धा उपजण्याची काही शक्यता नाही. प्रतिनिधीमंडळातील मुत्सद्दी अर्थव्यवस्थेतील उद्योजकतेचा फारसा अनुभव नसलेले असणार हे तर खरेच. आजपर्यंतच्या आंतरराष्ट-ीय वाटाघाटींत याची कोणाला फारशी जाणीव झाली नाही पण, आंतरराष्ट-ीय व्यापार संस्थेच्या वाटाघाटींच्या गेल्या म्हणजे युरुग्वे फेरीत पहिल्यांदा शेतीमालाच्या व्यापाराविषयी चर्चा झाली आणि हिंदुस्थानी मुत्सद्द्यांची या क्षेत्रातील आणखी एक कमजोरी प्रकाशात आली. शेती, शेतीमालाचे उत्पादन, व्यापार, प्रक्रिया इत्यादिसंबंधी या 'साहेबी' मुत्सद्द्यांच्या गाठी किमान आकडेवारीसुद्धा असणार नाही.

आंतरराष्ट-ीय व्यापारासंबंधी देशादेशांतील वाटाघाटी संयुक्त राष्ट-संघाची स्थापना झाल्यापासून म्हणजे, पन्नासहून अधिक वर्षांवर चालू आहे. वाटाघाटींची आठवी फेरी 'युरुग्वे फेरी' म्हणून गाजली आणि त्याची फलश्रुती म्हणून जागतिक व्यापारसंस्था निर्माण झाली. या सगळ्या वाटाघाटी, संस्था, चर्चा यांचा हेतु काय आहे?

व्यापारक्षेत्रात साऱ्या देशातील सरकारे हस्तक्षेप करतात, या हस्तक्षेपामुळे देशादेशांत सर्वोत्तम श्रमविभागणी होण्यात व्यत्यय येतात. जो तो आपले घोडे पुढे काढू पाहतो आणि जमल्यास शेजारच्या स्वाराच्या घोड्याचे पाय मोडण्याचे प्रयत्न करतो. असल्या संकुचित स्वदेशी धोरणातून अंततोगत्वा

त्या देशाचेही भले होत नाही आणि जागतिक अर्थव्यवस्थेचे तर नाहीच नाही. 'स्वदेशी स्वदेशी' असा 'उदे उदे' करीत जो तो दुसऱ्याच्या पायात पाय घालून त्याला पाडण्याचा प्रयत्न करतो; परिणामत:, सारेच आडवे पडतात. दुसऱ्या महायुद्धापूर्वी हिटलरच्या नेतृत्वाखाली अशा तऱ्हेच्या राष्ट-वादी धोरणांची सुरुवात झाली. त्यातून दुसरे महायुद्ध उभे राहिले आणि आंतरराष्ट-ीय व्यापार जवळजवळ बंद पडला. जो तो देश सर्वार्थी स्वयंभू होण्याचा प्रयत्न करील तर त्यात राष्ट-प्रेमाचा आविष्कार दिसेल, कदाचित; पण, त्यामुळे सर्वत्र अकार्यक्षमता माजेल, उत्पादन घटेल आणि सर्वसामान्यांचे जीवनमान खालावेल.

देशादेशांतील श्रमविभागणी कोणत्या आधारांनी व्हावी, त्यांचा नियम काय असावा यासंबंधी अर्थशास्त्राचा एक सर्वमान्य सिद्धांत आहे. तो समजाविण्यासाठी एक चांगले उदाहरण घेता येईल.

आइनस्टाइनसारखा विश्वविख्यात वैज्ञानिक विश्रांतीसाठी काही काळ दूर जंगलातील घरात जाऊन रहातो; बरोबर फक्त एक हरकाम्या गडी घेतो. जंगलातील वास्तव्याच्या काळात आइनस्टाइन आणि त्याचा गडी यांनी कामाची वाटणी एकमेकात कशी करून घ्यावी? घरगडी झाडूकामात निष्णात आणि आइनस्टाइनला संशोधनात तोड नाही अशी परिस्थिती. कामाची वाटणी करण्यात काही अडचण नाही; गडी झाडू मारेल आणि आइनस्टाइन संशोधन करेल! काही चमत्काराने घरगडी कार्यक्षम वैज्ञानिक झाला तर ते एकमेकात कामांची अदलाबदल करून घेऊ शकतात. पण, समजा, आइनस्टाइन श्रेष्ठ वैज्ञानिक तर आहेच, वर झाडूकामातही तो घरगड्यापेक्षा उजवा आहे असे लक्षात आले तर दोघांनी कामाची वाटणी कशी करावी? दोन्ही कामात आइनस्टाइन सरस, मग काय त्याने झाडूकाम करावे आणि वर, प्रयोगशाळेत जाऊन संशोधनही करावे?

अर्थशास्त्रातील व्यापारविषयक सिद्धांत सांगतो की, याही परिस्थितीत आइनस्टाइनने संशोधन करावे, झाडूकामात वेळ घालवू नये. कारण, संशोधनक्षेत्रातील त्याचे श्रेष्ठत्व घरकामातील त्याच्या सरसतेपेक्षा अधिक आहे. प्रत्येक देशाने, ज्या उत्पादनात त्याचे तुलनेने अधिक श्रेष्ठत्व आहे त्याकडे अधिक लक्ष द्यावे. अमेरिका गणकयंत्रशास्त्रात हिंदुस्थानपेक्षा सरस

आहे आणि शेतीच्या उत्पादनातही. पण, गणकयंत्रशास्त्रातील अमेरिकेचे श्रेष्ठत्व अधिक सरस असल्याने त्यांनी हिंदुस्थानकडून काही शेतीमाल विकत घेणे आणि त्यामुळे बचत झालेली साधने गणकयंत्रक्षेत्रात वापरणे अमेरिकेच्या फायद्याचे आहे.

हिटलर, त्याचा वित्तमंत्री डॉ. शाख्त आणि त्यांच्याच गणनेतील राजकारणी व्यापारक्षेत्रात ढवळाढवळ करण्याचे थांबवतील तर जगातील 'आइनस्टाइन्स्'वर झाडूकाम करण्याची पाळी येणार नाही. जागतिक व्यापारसंस्थेच्या साऱ्या वाटाघाटींचा आणि खटाटोपांचा उद्देश व्यापारसंस्थेतील सरकारची ढवळाढवळ थांबवून ती अधिकाधिक कार्यक्षम आणि संपन्न करणे हा आहे.

**''भारता''वर सूर्य उगवणारच आहे**

राजकारणी लोक आपल्या हाती सत्ता एकवटावी आणि टिकावी यासाठी आपापल्या देशातील कधी या, तर कधी त्या गटावर मेहेरनजर करून त्यांना खूष करण्याचा प्रयत्न करत असतात. शेतीमालाच्याच व्यापाराचे उदाहरण घेऊ. बहुतेक श्रीमंत देशांची सरकारे त्यांच्या देशातील शेतीक्षेत्राला भरपूर मदत करतात. कारखानदारी समाजाच्या तुलनेने तेथील शेतकरी वर्गाचे आर्थिक उत्पन्न कमी नसते, पण शहरी लोकांची सामाजिक प्रतिष्ठा खेड्यातील शेतकऱ्यांना लाभत नाही. किमान आवश्यक तेवढेच लोक शेतीवर राहावे यासाठी औद्योगिक देशातील सरकारे शेतीव्यवसाय अधिकाधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न करतात – काही मदत बाजारपेठेतून होते, काही मदत सरकारी तिजोरीतून. युरोपातील शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांना खुल्या बाजारपेठेत जी किंमत मिळाली असती त्यापेक्षा ती ६०-६५% अधिक मिळावी अशा तऱ्हेच्या व्यवस्था तेथील सरकारे चालवतात. अमेरिकेतील व्यवस्था शेतकऱ्यांना ३०-३५% ची वाढीव किंमत पदरात टाकते. जपानचे सरकार शेतकऱ्यांना सर्वात सढळ हाताने मदत करते आणि त्यांना जवळजवळ दुप्पट किंमत मिळावी अशी व्यवस्था करते. भारतातील परिस्थिती अगदी उलट. येथे कारखानदारीच्या सेवेत शेतीला लावण्यात येते. परिणामत:, वर्षानुवर्षे भारतीय शेतकऱ्यास खुल्या बाजारपेठेच्या तुलनेने ८०% कमी किंमत मिळत आली आहे. थोडक्यात, बहुतेक श्रीमंत देशातील शेतकऱ्यांना

बाजारपेठेत सब्सिडी मिळते तर भारतीय शेतकऱ्यांना उलटी पट्टी म्हणजे उणे सब्सिडी मिळते.

औद्योगिक देशात केवळ बाजारपेठेत शेतकऱ्यांना मदत मिळते असे नाही. काही पिके केवळ घेण्याबद्दल तेथे सरकारी अनुदान मिळते; काही वेळा पिके न घेण्याबद्दलही अनुदान मिळते. इंग्रज शेतकरी बाजारात गहू घेऊन गेला की दर पोत्यामागे त्याला ४० पौंड रोख अनुदान मिळते. त्याखेरीज, देशातील वेगवेगळ्या प्रदेशातील शेतकऱ्यांमध्ये आर्थिक समानता असावी यासाठीही योजना राबवल्या जातात. भारतात अशा योजनांचा जवळजवळ अभावच आहे. छोटे आणि सीमांत शेतकरी यांच्या मदतीकरिता काही चुटपुट योजना आखल्या जातात, पण त्यांचा सारा लाभ सरकारी नोकरवर्ग आणि पुढारीच खाऊन जातात. खते, वीज, पतपुरवठा यांकरिता शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर अनुदाने दिल्याचा देखावा होतो; प्रत्यक्षात त्याचा लाभ शेतकऱ्यांना काहीच होत नाही.

श्रीमंत देशात शेतकऱ्यांना दक्षिणांची लयलूट आणि भारतासारख्या देशात शेतकऱ्यांच्या पाठीवर चाबूक! ही शासन संस्थेची दोन टोकाची रूपे. दोन्ही प्रकारच्या हस्तक्षेपांमुळे जागतिक श्रमविभागणी बिघडते. जागतिक व्यापार संस्था सरकारी हस्तक्षेप कमीत कमी करण्याचा यासाठीच प्रयत्न करते. भारतासारख्या, शेतकऱ्यांवर आसूड उगारणाऱ्या शासनाविरुद्ध काही कार्यवाही करणे जागतिक व्यापार संस्थेस शक्य नाही. तसे केले तर देशाच्या सार्वभौमत्वाला धक्का लावल्याचा आक्षेप येतो. म्हणून जागतिक व्यापार संस्थेचा कार्यक्रम हा श्रीमंत देशातील दक्षिणावाटपावर मर्यादा घालण्यावर लक्ष देतो.

पूर्वी चीन देशात मुलगी जन्मताच तिचे पाय पट्ट्यांनी बांधून टाकत, त्यामुळे पावले लहान राहत आणि लहान पावले सौंदर्याचे लक्षण मानले जाई. क्रांतीनंतर या पद्धतीवर बंदी घालण्यात आली. त्यापलीकडे जाऊन, वर्षानुवर्षे पाय बांधून राहिलेल्या मुलींच्या पट्ट्या काढण्याचे फर्मान निघाले. आयुष्यात प्रथम पावलातून रक्त सळसळत जाऊ लागल्याच्या वेदना त्या मुलींना असह्य होत. त्या आक्रंदून, आपले पाय पुन्हा बांधावेत अशी विनंती करीत. बंदिस्त अवस्थेत वर्षानुवर्षे राहिलेल्या भारतीय समाजाची परिस्थिती त्या चिनी

मुलींप्रमाणे झाली आहे. 'नको ते स्वातंत्र्य, नको ते स्वातंत्र्य' असे ते विव्हळत आहेत. 'जागतिक व्यापार संस्थेच्या नियमांमुळे २००१ साली परदेशातील शेतीमाल देशात येऊ लागेल, त्यावर बंधने घालता येणार नाहीत, असे झाले तर देशातील शेतीव्यवसाय बुडून जाईल' असा कोलाहल सर्वत्र उठत आहे आणि 'हा सारा दोष खुली व्यवस्था, जागतिकीकरण आणि आंतरराष्ट-ीय व्यापारसंस्था यांचा आहे, या सगळ्या वेदनांपेक्षा जुन्या लायसन्स-परमिट-कोटा राज्याच्या पङ्याच अधिक सुखावह होत्या' असे भले भले मोठ्या शहाजोगपणे मांडू लागले आहेत.

नव्या व्यवस्थेत परदेशी मालाची देशात आयात होईल हे खरे, पण ती व्यापारी पायावर होईल. गेली पन्नास वर्षे परदेशातील महागडा गहू, कापूस हिंदुस्थानात आणून स्वस्तात विकण्याचा 'अव्यापारेषु व्यापार' सरकारे वर्षानुवर्षे करीत राहिली आणि शेतकऱ्याला बुडवीत राहिली. यापुढे होणारी आयात किफायतशीर असली तरच होईल, राजकीय सत्तेच्या बडग्याच्या ताकदीवर नाही हे लक्षात घेतले पाहिजे. पूर्वीपेक्षा यापुढे, आयात शेतकऱ्यांना तसेच ग्राहकांना अधिक फायदेशीर असेल. भारतात माल पाठवायचा म्हणजे परदेशी उत्पादकांना वाहतुकीवर मोठा खर्च करावा लागतो. वाहतुकीवर हा खर्च म्हणजे भारतीय शेतकऱ्यांना मिळणारे एक अप्रत्यक्ष संरक्षणच आहे. उदाहरणार्थ, मेक्सिकोतील गहू भारतात आणण्यासाठी ८०० रुपये प्रतिटन खर्च येतो. हिंदुस्थानातील गव्हाची किंमत ६००० रुपये प्रतिटन धरली तर भारतात येऊन स्पर्धा करण्यात मेक्सिकन शेतकऱ्याला जास्तीत जास्त ५२०० रुपये प्रतिटन मिळू शकतात. धावण्याच्या शर्यतीत एका स्पर्धकाला काही अंतर पुढे उभे राहून सुरुवात करायची परवानगी द्यावी असा हा प्रकार आहे.

वाहतूक खर्चाचा लाभ घेऊनही भारतीय शेतकरी स्पर्धेत टिकू शकला नाही तर काय करावे? भारतीय शेतकरी टिकू न शकण्याची दोन कारणे असू शकतात. एक म्हणजे शासकीय दक्षिणांच्या आधारे परदेशी शेतकऱ्यांचा उत्पादन आणि निर्यात खर्च कमी होऊ शकतो. भारत सरकार शेतकऱ्यांना अशी कोणतीच मदत देत नाही. दुसरे उघड कारण असे असू शकते की, भारतात काही माल नैसर्गिक अनुकूलता नसतानाही पिकवला जातो. बहुतेक देशात उसाचे पीक पावसाच्या पाण्यावर निघते. भारतात त्यासाठी कालव्यांचे

महागडे पाणी द्यावे लागते. अशा परिस्थितीत कालव्याच्या पाण्यावरील ऊसउत्पादन जागतिक स्पर्धेत टिकणे कठीण आहे. तसेच, उसाची लागवड, निगराणी, कापणी, वाहतूक आणि उत्पादनाचे तंत्रज्ञान व कार्यक्षमता यांत दोष असतील तर भारतातील साखर परदेशातील साखरेशी टक्कर देणे कठीण होईल, अशा परिस्थितीत काय करावे?

दुसऱ्या देशांप्रमाणेच आपल्याही देशात शासनाने भरपूर दक्षिणावाटप सुरू केल्याने हा प्रश्न सुटेल काय? 'कोणी गाय कापली म्हणून आपण वासरू कापावे' अशा तऱ्हेचा हा युक्तिवाद आहे. यातून जगातील सामंजस्य मावळत जाईल आणि पुन्हा इष्ट कल्याणकारी श्रमविभागणी अशक्य होऊन जाईल. सुदैवाने, जागतिक व्यापार संस्थेचे करार आणि नियम यांत श्रीमंत देशांतील दक्षिणावाटप टप्प्याटप्प्याने बरखास्त करीत नेण्याची तरतूद आहे. अमुक एक 'मुसलमान करतात म्हणून हिंदुंनीही करावे' असा संकुचित दृष्टिकोन न ठेवता जे अंततोगत्वा कल्याणकारी होईल त्याची कास धरणेच श्रेयस्कर आहे.

'परदेशातून येणारा शेतीमाल अधिक चांगला आहे, स्वस्तही आहे तरीही त्याचा फायदा भारतीय ग्राहकाला मिळू नये, अशा आयातीवर आयातशुल्क आकारावे, त्यामुळे येथील शेतकऱ्यांना संरक्षण मिळेल' अशी मागणी भारतीय शेतकरी कधीही करणार नाहीत.

स्वातंत्र्यानंतर कित्येक दशके ॲम्बॅसडार व फियाट गाड्यांचे उत्पादन करणाऱ्यांनी निकृष्ट दर्जाची वाहने महागड्या किंमतीत ग्राहकांवर लादली. ग्राहकांनाही वीस वीस वर्षे रांगांत उभे राहून या गाड्या खरीदणे भाग पडले. कारण, गाड्यांच्या आयातीस बंदी होती. अशा संरक्षणामुळे देशाचा फायदा झाला नाही, मोटारगाड्यांच्या तंत्रज्ञानात देश कायमचा मागास राहिला आणि ग्राहक भरडला गेला.

व्यापारी संरक्षणाचा असा विपरीत परिणाम अपरिहार्य आहे. १९८४ सालापर्यंत ब्राझील देशातील गणकयंत्राचे उत्पादन खूपच पुढारलेले होते. 'आम्हाला आता आयातीची गरजच नाही' अशा 'स्वदेशी' जोशात ब्राझील सरकारने गणकयंत्रांच्या आयातीवर बंदी घातली. परिणामत:, तो उद्योग कोंडला गेला; अव्याहतपणे विकसित होणाऱ्या जागतिक तंत्रज्ञानाच्या भरारीपासून तो तोडला गेला. १९९५ सालापर्यंत त्यांचे गणकयंत्र उत्पादन बंद

पडण्याची वेळ आली तेव्हा शासनाने पुन्हा एकदा आयात खुली केली.

शासनाने हात घालून केलेली बंदी ही हमेशा घातकच असते – मग, ती दारूबंदी असो की आयातबंदी. भारतातील शेतकरी स्वत:च्या लाभाकरिता ग्राहकांवर अन्याय व्हावा असे म्हणणार नाही अशी त्याची इमानाची परंपरा आहे. आणीबाणीच्या काळात इंदिराबाईंनी सावकारी खलास केली तरीदेखील अनेक शेतकऱ्यांनी आपली कर्जे सावकारांना आपखुशीने परत केली. कारण, सरकारी कायद्याच्या आधारानेदेखील, घेतलेले कर्ज बुडविणे हे आपल्या पूर्वजांच्या पिढ्यान् पिढ्या नरकात लोटणारे कर्म आहे अशी त्यांची धारणा आहे. भारतीय शेतकरी निरक्षर असेल पण, सरकारी व्यवस्थेने घातलेल्या दंडबेड्या काढल्या गेल्या तर जगाच्या बाजारपेठेत कोणत्याही देशातील शेतकऱ्याशी आपण टक्कर देऊ शकतो असा त्याचा आत्मविश्वास आहे. आजही जागतिक बाजारपेठेत उतरणाऱ्या बहुतेक महत्त्वाच्या शेतीमालांच्या भारतातील किंमती परदेशांच्या तुलनेने खूपच कमी आहेत. आपल्या शिवाराच्या कुंपणाशी भारतीय शेतकरी तयारीने स्पर्धा करू शकतो. पण, बाजारव्यवस्था, वाहतूकव्यवस्था आणि लाचखोर प्रशासन यांचे अडथळे दूर करीत त्याचा माल बंदरावर पोहोचेपर्यंत त्या मालाची सरसता जवळजवळ संपून जाते.

ग्रामीण भागात सारी संरचना तुटकीफुटकी झाली आहे. पन्नास वर्षांच्या 'उणे सबसिडी' कालखंडाचा हा परिणाम आहे. दुसऱ्या महायुद्धात उद्ध्वस्त झालेल्या जर्मन देशाची पुनर्रचना करण्यासाठी 'मार्शल प्लॅन' राबविण्यात आला. पन्नास वर्षे 'इंडिया'ने 'भारत' उद्ध्वस्त केला. येथेही ग्रामीण भागातील संरचनेच्या पुनर्बांधणीसाठी एक नवा 'मार्शल प्लॅन' राबविण्यात आला तर भारताचा शेतीमाल गोदीच्या धक्क्यापर्यंत सहीसलामत पोहोचून जागतिक बाजारपेठेतील आपले उजवेपण टिकवू शकेल.

परदेशात जाऊन ज्यांनी तेथील फळफळावळ, भाज्या इत्यादींच्या भरमसाठ किंमती पाहिल्या असतील त्यांना भाजीपाला व फळफळावळीच्या बाजारपेठेतील भारताच्या ताकदीचा भरवसा मिळाला असेल. साऱ्या जगात रसायनांचा वापर न करता पिकविलेल्या शेतीमालाला प्रचंड मागणी आहे; दीडदुपटीने किंमत देऊन ग्राहक जैविक शेतीचे उत्पादन वापरू पहातो. त्यामुळे आपल्या आरोग्याचे रक्षण होईल अशी त्याची खात्री आहे. रासायनिक शेतीत

भारत मागासलेला राहिला. एकूण जमिनीपैकी ४० टक्के जमिनीत युरियाचा पहिला कणही पडलेला नाही. खात्रीशीर रसायनमुक्त शेतीमाल मिळण्याचे भारत हे मोठे केंद्र होऊ शकते. आपले मागासपण येथे वरदान ठरणार आहे. देशात औषधी आणि सुगंधी वनस्पतींची असीम विपुलता आहे. बी-बियाण्यांच्या संशोधनात आमचे शास्त्रज्ञ जागतिक पातळीवर काहीसे कमी पडले असतील, पण संकरित वाण तयार करण्याची कुशलता येथील शेतकरी स्त्रियांनी इतक्या अद्‌भुत तऱ्हेने दाखविली आहे की, संकरित वाणांच्या गुणनाची मक्तेदारी भारत प्रस्थापित करू शकतो.

थोडक्यात, 'नाचता न येणारे' अंगण वाकडे असल्याची तक्रार करीतच राहणार. खरा नर्तक कशाबशा चोपडलेल्या पंधरावीस चौरस फुटांच्या अंगणातही आपले सारे कसब दाखवू शकतो. भारतीय शेतकरी शतकानुशतके शोषणाचा बळी ठरला आहे. या प्रदीर्घ वनवासात त्याने अंगी बाणवून घेतलेले सोशिकता, धडाडी आणि कष्टांची तयारी हे गुण त्याला नव्या कालखंडात मोठे उपयोगी ठरणार आहेत.

सरकारी हस्तक्षेपाने आजपावेतो भारतीय शेतकरी नागविला गेला. आपल्या शेतात एका दाण्याचे शंभर दाणे करण्याचा गुणाकार करणारा शेतकरी दरिद्री राहिला. जगातील शेतकी तंत्रज्ञानाची विद्या येथल्या शेतकऱ्यांना मिळावी आणि त्यांनी पिकविलेला माल नोकरशाहीने लुटून नेऊ नये ही मागणी जोतिबा फुल्यांपासून इमानदार शेतकऱ्यांनी केलेली आहे. खुली व्यवस्था आणि जागतिकीकरण यांच्या धक्क्याने सरकारी दंडबेड्या खळाखळा तुटून पडू लागल्यावर 'इंडिया'तील काही सज्जन चिंताग्रस्त झाले आहेत आणि ते शेतकऱ्यांना आपल्याच हाताने दंडबेड्या चढवून घेण्याचा आग्रह करीत आहेत. त्यापलीकडे जाऊन, ''दंडबेड्यांत राहणे हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे'' अशा आरोळ्याही ते ठोकू लागले आहेत.

पिंजऱ्यातील प्राणी त्यातून निसटून जाण्याची संधी मिळाली तर कसा वागतो यावरून त्या प्राण्याची प्रकृती सांगता येते. वाघ असेल तर छलांग मारून तो बाहेर पडतो. 'उद्या शिकार मिळेल किंवा नाही, उपाशी तर रहावे लागणार नाही ना' हा विचारही त्याच्या मनात येत नाही. कुत्रा मात्र गळ्यातील पट्ट्याचेच भूषण मानतो आणि सुटून गेल्यावरही भाकरीच्या वेळी

शेपटी हलवीत पुन्हा मालकापाशी हजर होतो.

भारतीय शेतकऱ्याने पिंजऱ्यातून निघून जाण्याचा निश्चय केला आहे. बाहेर पडल्यानंतर सवय नसलेल्या पावलांना दगडगोट्यांचा, काट्याकुट्यांचा जाच होणारच; पण भारतीय शेतकरी त्यांना भिऊन जाणारा प्राणी नव्हे.

नव्या कालखंडात काही वेदना होणार, अडचणी येणार हे स्पष्ट आहे. पण, नाकातोंडात पाणी जाऊन जीव गुदमरल्याचा अनुभव घेतल्याखेरीज पोहणे येत नाही. काही कठोरपणा दाखविल्याखेरीज व्यसन सुटत नाही. आणि, बावरणाऱ्या नववधुला पाठीवर हात फिरविणारे कुणीतरी वडीलधारे लागते. तसेच काहीसे आज शेतकऱ्यांच्या बाबतीत गरजेचे आहे. पण, शतकांची गुलामगिरी आणि अर्धशतकाची समाजवादी बंदिस्त व्यवस्था यातून सुटू पाहणाऱ्या भारतीय शेतकऱ्यांना घाबरवून, भांबावून टाकण्याचा शिकस्तीने प्रयत्न होत आहे. १ जानेवारी २००१ ही तारीख उगवली की जणू जगबुडीच होणार आहे अशी आवई उठविली, पसरविली जात आहे. पुढचा मार्ग काय याबद्दल शेतकऱ्यांच्याही मनात मोठा गोंधळ आहे. प्रख्यात इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे एक वाक्य अशा गोंधळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांनी आठवणीत ठेवावे.

''गेल्या ३००० वर्षांच्या अनुभवावरून या देशाच्या शेतकऱ्यांची खात्री पटली आहे की, सरकार म्हणून जी गोष्ट असते ती शेतकऱ्याच्या भल्याची कधीही असत नाही.''

सरकारी पिंजऱ्यात जाऊन भले होत नाही हे एकदा स्पष्ट झाले की ''मागचे दोर कापले आहेत'' याची जाणीव होते आणि ''जिंकू किंवा मरू'' असा निर्धार उफाळतो. अशा निश्चयाने शेतकरी नव्या कालखंडाला सामोरा गेला तर विजयश्री त्याच्या गळ्यात माळ घालणार आहे.

भुकेकंगालांच्या यादीत असलेल्या भारताला या शेतकऱ्यांनी अवघ्या दहा वर्षात अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी करण्याचा चमत्कार करून दाखविला आहे. भले भले याबद्दल तोंडात बोट घालून अचंबा करतात. खुल्या बाजारपेठेची ही लढाई जिंकण्यास भारतीय शेतकरी सज्ज झाला आहे. घुबडांनी कितीही अपशकुन केले तरी सूर्य उगवण्याचा राहणार नाही, झाकून ठेवलेले कोंबडे आरवणार नाही कदाचित्, एवढेच!

*(लोकमत दि. ९ व १६ सप्टेंबर २००० साठी लिहिलेले लेख. साभार पुनर्मुद्रण)*

# १५. खिडकीला दिशा दोन

केरळातील कोण्या ॲलेक्झांडरबाईंनी आपल्या तीसचाळीस महिला सहकाऱ्यांबरोबर न्यूयॉर्क शहरात मोर्चा काढला. बाईंची आणि त्यांच्या साथीदारांची तक्रार अशी की, जागतिकीकरणामुळे केरळातील मासेमार कोळ्यांच्या पोटावर पाय येत आहे; या नव्या स्पर्धेमुळे त्यांना जगणे अशक्य झाले आहे.

परदेशी बाजाराबद्दल हिंदुस्थानात विचित्र विचित्र कल्पना ऐकू येतात. आपल्याकडून हापूस आंब्याची परदेशी निर्यात झाली तर ''आता सगळे चांगले आंबे परदेशात जाणार आणि आपल्याला ते खायला मिळणार नाहीत'' अशी तक्रार होते. उलटपक्षी, ऑस्ट्ेलियातून आलेल्या सफरचंदांपुढे देशी फळांचा काय टिकाव लागणार? मग, देशातील शेतकऱ्यांनी कोणत्या आधारावर जगावे?'' असेही प्रश्न विचारले जातात. 'ओली पडो की सुकी', नुकसान आपलेच अशी एक पराभूत मनोवृत्ती हिंदुस्थानात सर्वदूर आढळते.

जागतिक व्यापार संस्थेच्या वाटाघाटींना सुरुवात झाल्यापासून वास्तवातील भीतीपेक्षा या काल्पनिक कथांची भूते लोकांच्या मानगुटीवर बसविली जात आहेत. दिल्लीपासून ते चेन्नईपर्यंत सगळीकडे गेल्या दोन महिन्यात एकच अफवा पसरली आहे की, ''युरोपातून पाचसाडेपाच रुपये प्रति लिटर किंमतीने दूध आयात करून विकले जात आहे.'' हिंदुस्थानातील दुधाची किंमत सर्वसाधारणपणे १५ रुपये प्रति लिटरच्या आसपास आहे आणि तरीही, गायीम्हशी पाळून कोणी इमले चढविले असे काही ऐकीवात नाही. अशा परिस्थितीत, ''परदेशी दूध इतके स्वस्त मिळू लागले तर येथील गवळ्यांना विष पिऊन आत्महत्या करण्यापलिकडे गत्यंतरच नाही'' असा बोभाटा केला जात आहे. इतक्या जणांनी इतक्या वेळा वेगवेगळ्या ठिकाणी ही कथा माझ्या कानावर घातली की, थोडीफार तरी चौकशी करणे आवश्यक झाले. चौकशीअंती 'साडेपाच रूपये दूध' म्हणजे 'पिंपळाच्या झाडावरचा मुंजा अमक्याने पाहिला, तमक्याने पाहिला' अशा भूतकथांसारखी ठरली. युरोपातील दूध हिंदुस्थानातील दुधापेक्षाही अधिक महाग आहे. डॉ. कुरियन साहेबांच्या 'दूध महापूर' योजनेसाठी युरोपातील देशांनी देणगीदाखल दुधाची

भुकटी आणि दुधाची चरबी हिंदुस्थानात फुकट आणून टाकली हे खरे. त्या दानात त्यांचा काही डाव असेल कदाचित्. पण, व्यापार म्हणून असला मूर्खपणा केवळ समाजवादी सरकारच करू शकते. अमेरिकेतून ८०० रुपये क्विंटल दराने गहू विकत घ्यायचा, त्यावर दीडदोनशे रुपये जहाज वाहतुकीचा खर्च करायचा आणि, हिंदुस्थानातील बाजारपेठेत त्याहीपेक्षा चांगला गहू ६०० रुपये प्रति क्विंटल भावाने मिळत असताना आयात गहू ५०० रुपयांनी विकायचा असला ''अव्यापारेषु व्यापार'' हिंदुस्थान सरकारच करू शकते; व्यापारी संस्था नाही.

परदेशी व्यापाराशी सर्वसामान्य माणसांचा फारसा काही संबंध येत नाही. 'इंपोर्टेड' वस्तू म्हणजे चांगल्याच दर्जाची असते, याकरिता 'फॉरेन' वस्तूचा हव्यास ठेवणे यापलीकडे परदेशी व्यापाराच्या वेगवेगळ्या अंगांची फार थोडी माहिती जनसामान्यांना असते. साहजिकच, आयातनिर्यातीसंबंधी वेडगळ किंवा विचित्र कथा रस्त्यांवरील गप्पांत सांगितल्या जाव्यात हे समजण्यासारखे आहे. राजकीय स्वार्थापोटी 'स्वदेशी, स्वदेशी'चा गजर करणे फायद्याचे ठरत असेल तर देशाभिमानाच्या गर्जना करणारे नेते आणि संघटना व मंच संख्येने काही थोडे नाहीत.

पण, हिंदुस्थान सरकारचे वित्तमंत्री यशवंत सिन्हाजी परदेशी व्यापाराबद्दल काही अजाण नाहीत आणि स्वदेशीचा दुराग्रह बाळगण्यात त्यांचा काही राजकीय हेतूही नसावा. निवडणुकीत जिंकून केंद्र शासनात वित्तमंत्री झाल्यापासूनतरी यशवंत सिन्हाजी 'खुल्या व्यवस्थेसंबंधी आपली निष्ठा अव्यभिचारी असल्याचे' निक्षून सांगत असतात. 'डॉ. मनमोहनसिंग यांनी १९९१ साली खुलीकरणाचा पहिला कार्यक्रम घोषित केला. तर, खुलीकरण टप्पा-२ आपण अंमलात आणीत आहोत' असे ते अभिमानाने सांगतात. देशातील 'लायसेन्स परमिट राज्य' संपावे आणि शासनाने अर्थव्यवस्थेत कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये ही तत्त्वे ते मानतात. खुलीकरणाचा हा पुरस्कर्ता एकदम, जागतिकीकरणाच्या विरुद्ध आणि खुल्या आंतरराष्ट-ीय व्यापाराविषयी काही विरोधी भूमिका घेईल हे असंभाव्य वाटते. पण, प्रत्यक्षात तसे घडले आहे. मागील आठवड्यात सिन्हा साहेबांनी दिल्लीत एक निवेदन केले. ''जगाबरोबरच्या व्यापाराच्या खिडक्या व दरवाजे

उघडताना पूर्ण सावधगिरी बाळगली पाहिजे आणि परदेशी व्यापाराचा देशी उद्योजकांवर व अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत नाही ना हे कसोशीने तपासून पाहिले पाहिजे.'' असे त्यांनी सांगितले.

कोणत्याही कार्यक्रमाविषयी बोलताना त्या कार्यक्रमाचा काही विपरीत परिणाम आपल्या देशावर होत नाही ना हे तपासून पहाणे योग्यच आहे. त्यात विशेष आग्रहाने निवेदन करण्यासारखे काहीच नाही. श्री. गुजराल यांच्या सरकारने ऑस्ट्रेलियातून गहू मागविला. गहू खरेदी करण्याची इतकी घाई त्यांच्या सरकारला झाली होती की, गव्हाच्या सर्वसाधारण तपासणीलासुद्धा फाटा देण्यात आला. पोत्यातील गव्हाबरोबर काही विषारी वनस्पतींची बियाणी आली; ती सर्वत्र पसरली असती तर गव्हाच्या प्रदेशातील पिकांचे अतोनात नुकसान झाले असते. किंबहुना, पंडित नेहरूंच्या काळात गव्हाच्या आयातीबरोबर 'काँग्रेस गवता'चे जे तण घुसले आणि शेतकऱ्यांना त्याने 'दे माय, धरणी ठाय' करून सोडले तसा प्रकार झाला असता. परदेशातून कोणताही माल आला, फार काय, कोणी माणूसही आला तरी त्याच्याबरोबर जंतुंची, रोगराईची आयात होण्याचा धोका संपूर्ण नाकारणे शक्य नाही. जुन्या काळात परदेशात जाऊन आलेल्या कोणाही भारतवासीयास प्रायश्चित्त घ्यावे लागे त्यामागे, कदाचित अशा प्रकारची काही धास्ती असण्याची शक्यता आहे. तरीही, भारतीय परदेशात जातात, अभिमानाने जातात; प्रायश्चित्त दूरच राहिले, आपल्या देशपर्यटनाची बढाई मारतात. कारण, परदेशाच्या संपर्काने काही धोका निर्माण होत असला तरीही त्यापासून होणारे लाभाचे प्रमाण इतके प्रचंड आहे की, परदेशसंपर्काच्या अपायकारक बाबींकडे आता कोणी फारसे लक्ष देत नाही.

समाजवादी नियोजनाच्या काळात परदेशी चलनाची चणचण होती. त्यामुळे, निर्यात आणि आयातीला पर्याय या दोन गोष्टींना मोठे महत्त्व दिले जात होते. निर्यात करणे म्हणजे परदेशी चलन कमविणे, म्हणजे परदेशातून हव्या त्या वस्तू विकत घेण्याचे सामर्थ्य मिळविणे असे झाले. याउलट, आयात करणे म्हणजे दुर्लभ परकीय चलनाचा अपव्यय करणे झाले. थोडक्यात, निर्यात तेवढी चांगली आणि आयात सर्व विनाशकारक अशी कल्पना दृढ होऊन बसली. या कल्पनेत थोडेफार तथ्य आहे. केन्स यांच्या अर्थशास्त्राच्या

आधारे, निर्यात म्हणजे अधिक उत्पादन, म्हणजे अधिक रोजगार, म्हणजे अधिक भरभराट असे सूत्र मांडता येईल. उलट, आयात म्हणजे उत्पादनात घट, रोजगारात घट आणि, परिणामी, मंदी हे उघडच आहे. या कारणास्तव जो तो देश अधिकाधिक उत्पादन करून आपल्या मालाला बाजारपेठ शोधण्यासाठी अव्याहत भगीरथ प्रयत्न करीत आहे.

पण, आयात म्हणजे वरपासून खालपर्यंत नुकसानीचीच बाब ही कल्पना खरी नाही. जगाशी व्यापारी संबंध ठेवणे, इतर देशांशी वस्तू वा सेवा यांची देवघेव करणे हे लाभदायक आहे यात काही शंका नाही. जागतिक व्यापारामुळे जो तो देश ज्या वस्तू उत्पादन करण्यात काही नैसर्गिक सोय असेल त्याच वस्तू तयार करतो. जागतिक श्रमविभागणी होते आणि निर्यात करणाऱ्यांचा तर फायदा होतोच होतो; पण, आयात करणाऱ्यांचादेखील फायदा होतो.

जगाशी संपर्क तेवढा वाईट ही कल्पना इंग्रजी अमदानीच्या पहिल्या काळात आग्रहाने, राष्ट-वादी आवेशाने त्या काळचे पुढारी मांडीत, त्याला अपवाद फार थोडे. त्यातील एक जोतिबा फुले. ''इंग्रजांचे राज्य आले नसते तर बरे झाले असते. पण आले आहे हे खरे. ते काही कायम टिकणार आहे असेही नाही. कधीतरी त्यांना या देशावरील सत्ता सोडून द्यावीच लागेल ही काळ्या दगडावरची रेघ आहे. पण, इंग्रजांच्या संपर्काचे काही विलक्षण लाभही समोर वाढून आले आहेत. इंग्रजी राज्यामुळे नवे ज्ञान आले, तंत्रज्ञान आले. शूद्रांना शिक्षणाचा अधिकार नव्हता तो मिळू लागला. अशा परिस्थितीत, इंग्रजांविरुद्ध विद्वेष पसरवून सामाजिक सुधारांखेरीज राजकीय स्वातंत्र्याचा आग्रह धरणे म्हणजे इंग्रजांनंतर पुन्हा एकदा पेशवाईलाच निमंत्रण देणे आहे.'' असे जोतिबा फुलेंनी स्पष्ट केले आहे.

जगाशी जितका अधिक संपर्क तितकी माणसाची आणि पर्यायाने, देशाची क्षितिजे रुंदावतात हा एकच फायदा ''केल्याने देशाटन, पंडितमैत्री, सभेत संचार....'' ही उक्ती सिद्ध करण्यास पुरेसा आहे.

एका उदाहरणाने ही कल्पना स्पष्ट व्हावी. दक्षिण अमेरिकेतील ब्राझील देश आकारमानाने हिंदुस्थानच्या तुलनेत अगदीच लहान. आज भारतीयांत गणकयंत्राच्या क्षेत्रात आपल्याला काही विशेष बुद्धी आहे अशी एक सार्वत्रिक

भावना आहे. ही वल्गना फक्त गणकयंत्राच्या आज्ञावली-भाषेविषयी खरी आहे; गणकयंत्राच्या अभियांत्रिकीविषयी नाही. १९८५ साली ब्राझील देशाने गणकयंत्रांच्या उत्पादनात इतकी मोठी आघाडी मारली की, आता गणकयंत्रे किंवा त्यासाठी लागणारे पुष्कळ सामान आयात करण्याची काहीही गरज नाही अशी तेथील ''स्वदेशीमंच''वाले ओरड करू लागले. त्यांनी जिंकले आणि त्यांच्या सरकारला गणकयंत्रे आणि त्यासाठी आवश्यक सामानाच्या आयातीवर बंदी घालावी लागली. परिणाम असा झाला की, ब्राझीलचा जगाशी संपर्क तुटला; गणकयंत्राच्या क्षेत्रात जे नवेनवे तंत्रज्ञान दिसामासाला उदयाला येत आहे त्याच्याशी त्या देशाचा संबंध राहिला नाही; उद्योगधंदा घसरत गेला, दहा वर्षांनी म्हणजे १९९५ साली तेथील गणकयंत्रांचे कारखाने बंद पडले; आणि आज, मजबुरी म्हणून, गणकयंत्रांची आयात पुन्हा सुरू झाली आहे.

प्रत्येक देशातील उद्योगधंद्यांना भौगोलिक कारणानेच एक संरक्षण मिळालेले असते. परदेशातील माल येथील बाजारपेठेत आणून ओतण्यासाठी निदान वाहतूकखर्च तरी करणे भागच असते. भारतीय उद्योजक परदेशी स्पर्धेत टिकत नाहीत याचा अर्थ साऱ्या वाहतूकखर्चाचा फायदा असूनही ते कमी पडतात. अशी परिस्थिती असेल तर शहाण्या शासनाने काय करावे? सर्वसामान्यांची इच्छा अशी दिसते की, 'सरकारने आयात कर लावावेत, परदेशी आयात महाग करून टाकावी म्हणजे देशी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन मिळेल' या विचारात एक तर्कदुष्टता आहे. आपण करांच्या भिंती उंचावल्या तर परदेशांचे हात काही केळी खायला जात नाहीत! तेही तोडीस तोड म्हणून त्यांच्याकडील आयातकर वाढवू शकतात. म्हणजे, आपण त्यांचे पाय कापायचे आणि त्यांनी आपले! असा सारा व्यापारच बुडविण्याचा हा कार्यक्रम आहे. एवढे समजूनही परदेशी मालावर अवजड कर लादले तर देशावर काय परिणाम होईल? देशातील ग्राहकाला केवळ 'स्वदेशी' म्हणून भिकार माल महागड्या किंमतीत विकत घ्यावा लागेल. असा जुलूम ग्राहकांनी काय म्हणून स्वीकारावा आणि किती काळ सहन करावा?

देशात खुली व्यवस्था असावी, पण जगभर मात्र प्रत्येक देशाने स्वार्थाचाच तेवढा विचार करून आर्थिक धोरणे आखावी यात परस्परविरोधी

तर्कप्रणाली आहे. जगभर खुली व्यवस्था नसेल तर देशाच्या आत खुली व्यवस्था अंमलात आणणे आणि टिकविणे केवळ अशक्य होईल.

थोडक्यात, नव्या काळाचे सूत्र असे आहे. साऱ्या भिंती पडू देत, जगभर मोकळे वारे वाहू दे, त्यातच सर्वभूतांचे कल्याण आहे. खिडक्या उघड्या राहू देत, काही वारा बाहेरून आत येईल, काही वारा आतून बाहेर जाईल. एकाच दिशेने वारा वाहू देणारी खिडकी अशक्य आहे.

नुसतीच आयात झाली तरी ती जागतिकीकरणाची एक लाट आहे म्हणून शेवटी, कल्याणप्रदच आहे एवढी निष्ठा निदान वित्तमंत्र्यांकडून तरी इ. स. २००० मध्ये अपेक्षित करणे चूक नसावे.

(दैनिक लोकमत ४-११-२००० साठी लिहिलेला लेख)

# १६. असाध्य ते साध्य करिता सायास

वाटाघाटींच्या उंबरठ्यावर जागतिक व्यापार संस्थेची (WTO) स्थापना १९९५ साली झाली. उरूग्वे येथे झालेल्या वाटाघाटींच्या शेवटी जे काही आंतरराष्ट्-ीय करारमदार तयार झाले त्यांवर १९९५ साली सह्या झाल्या. या करारांतच करारांतील तरतुदींची पुनर्पहाणी करण्याची तरतूद कलम २० मध्ये अंतर्भूत आहे. त्याप्रमाणे, नवीन वाटाघाटी आता सुरू होतील. या वाटाघाटी सुरू होतानाच जागतिक व्यापार संस्था, जागतिकीकरण आणि खुला व्यापार या सगळ्यांनाच विरोध करणाऱ्या मंडळींनी मोठी आघाडी उभी करण्याचा चंग बांधला आहे. गेल्या वर्षीच्या डिसेंबरमध्ये सिएटल येथे मंत्रीस्तरावरील वाटाघाटी चालू व्हायच्या होत्या. तेथे विरोधकांनी रस्त्यांवर दंगली केल्यामुळे त्या वाटाघाटींची बैठक आटोपती घ्यायला लागली. आता नवीन बैठकींची तयारी सुरू असून येत्या एकदोन महिन्यात वाटाघाटींना पुन्हा एकदा सुरुवात होणार आहे.

### विरोधकांचा फुसका आशावाद

या नवीन वाटाघाटींना सरुवात होण्याआधीच WTO म्हणजे जणू काही एक भयानक राक्षस आहे, WTO म्हणजे आंतरराष्ट्-ीय नाणेनिधी, जागतिक बँक यांनी केलेला एक कट आहे अशा तऱ्हेची प्रचारकी भाषा वापरून WTO च्या वाटाघाटींना आपण जाऊच नये, आणि जावे लागलेच तरी त्यातून बाहेर पडावे अशा प्रकारचे प्रस्ताव WTO विरोधक मांडीत आहेत. काही लोकांच्या मनात अजून आशा आहे की जागतिकीकरण आणि जागतिक व्यापार संस्था या गोष्टी प्रत्यक्ष अंमलात येणारच नाहीत. कारण, व्यापार खुला करण्याच्या बाबतीमध्ये श्रीमंत देशांतसुद्धा एकमेकांत वादावादी आहे, मतभेद आहेत. यूरोपला वाटते की अमेरिकेने जास्त उदार धोरण घ्यावे, अमेरिकेला वाटते की यूरोपने घ्यावे, जपानने घ्यावे आणि, त्यांच्यामध्ये लगेच उद्या काही एकमत होईल अशी लक्षणे दिसत नाहीत. आणि मग, या वादांपैकी एखाद्या मुद्द्यावर सगळ्याच वाटाघाटी मोडतील अशा आशेने काही मंडळी वाट पहात आहेत.

### दिरंगाईची किंमत

मराकेश येथे जागतिक व्यापारासंबंधी करारांवर सही करण्यात, विशेषत: गरीब देशाच्या सरकारांनी चालढकल केली, वेळ लावला. आणि

त्याच काळामध्ये अमेरिका, यूरोप यांसारख्या श्रीमंत देशांतील कामगार संघटनांना एका मोठ्या संकटाची चाहूल लागली. त्यांना अशी भीती वाटली की व्यापार खुला झाला तर ज्या देशांमध्ये मजुरी कमी आहे, बालमजुरांची प्रथा आहे, किंवा जेथील पर्यावरणासंबंधीचे कायदे फारसे कठोर नाहीत त्या देशांत तयार होणारा माल तुलनेने स्वस्त राहील आणि तो जर त्यांच्या देशात येऊ लागला तर त्यांचे कारखाने बंद पडतील आणि बेकारी वाढेल. म्हणून, जागतिक व्यापार संस्थेच्या करारात त्या श्रीमंत देशांनी त्यासंबंधीची काही कलमे या दिरंगाईच्या काळात घुसविण्याचा प्रयत्न केला. उदा. ज्या देशात बालमजूर असतील किंवा ज्या देशातील मजुरीचे दर फार कमी असतील, पर्यावरणासंबंधीचे कायदे चांगले नसतील त्या देशातील माल आयात करण्यावर काही निर्बंध लादण्याचा अधिकार इतर देशांना असावा. या प्रश्नावर बहुतेक सगळ्या गरीब देशांचे एकमत आहे की व्यापार हे क्षेत्र वेगळे आहे आणि मजुरीचे दर, कामगारांच्या काम करण्याच्या जागेवरील परिस्थिती, पर्यावरण संरक्षण हे प्रश्न वेगळे आहेत. मजुरांची परिस्थिती सुधारावी असे ज्यांना वाटत असेल त्यांनी जागतिक मजूर संघटनेच्यामार्फत ते करावे; परंतु, कोणी एक देश त्या पातळीला येऊ शकत नाही म्हणून त्याला शिक्षा करून त्याचा व्यापार बुडवला किंवा त्यांच्या निर्यातीवर बंदी घातली तर कोणाचेच कल्याण होणार नाही – गरीब देशांचेही होणार नाही आणि श्रीमंत देशांचेही होणार नाही. त्यामुळे, अशा प्रकारची कलमे जागतिक व्यापार संस्थेच्या करारात घालू नये असे सर्व गरीब देशांचे मत आहे. पण, श्रीमंत देश याला लगेच तयारी दाखवतील असे नाही. आणि म्हणून पुष्कळशा लोकांना अजून अशी आशा आहे की या मुद्द्यावरसुद्धा जागतिक व्यापार संस्था मोडून पडेल.

प्रत्यक्षात पहायला गेले तर जागतिक व्यापार संस्था ही काही इतक्या सहजासहजी तुटून पडण्यासारखी गोष्ट नाही. हिंदुस्थानसारख्या देशाने आपण त्याच्यात जाऊच नये असे म्हटल्याने ती संस्था तुटून पडेल असे म्हणणे हे तर हास्यास्पदच आहे. ज्यांचा जागतिक व्यापारातील हिस्सा एक टक्कासुद्धा नाही त्या देशाचे प्रतिनिधी वाटाघाटी करायला गेले नाहीत किंवा करारमदारांवर सह्या करायला गेले नाहीत तर ते कोणाच्या लक्षातसुद्धा येणार नाही अशी प्रत्यक्षात परिस्थिती आहे.

**खुलीकरणाचा इतिहास**

जागतिक व्यापार खुला असावा ही जी इच्छा आहे तीमागे फार मोठी परंपरा आहे. पहिल्या महायुद्धातील पराभवानंतर हरलेल्या जर्मनीवर विजेत्या फ्रान्स आणि इंग्लंडसारख्या देशांनी प्रचंड खंडणी लादली, एवढेच नव्हे तर जर्मनीतील लोखंडाच्या, कोळशाच्या खाणी असलेले उत्पादक प्रदेश बळकावून घेतले. उत्पादक प्रदेश हातचे निघून गेले आणि खंडणी तर दरवर्षी भरायलाच हवी अशा आर्थिक अडचणीमध्ये जर्मनी सापडला. आंतरराष्ट-ीय व्यापार वाढविण्याखेरीज खंडणी देणे काही शक्य नाही, नोटा छापून खंडणी देता येत नाही, कारण ज्या देशाला खंडणी द्यायची त्या देशाच्या चलनात ती द्यायला हवी. मग, आपली निर्यात आयातीपेक्षा जास्त व्हावी या दृष्टीने हिटलरचे अर्थमंत्री डॉ. शाख्त यांनी पहिल्यांदा आपल्याच देशाच्या निर्यातीला प्रोत्साहन द्यायचे आणि दुसऱ्या देशांची आयात थांबवायची अशा, आजही स्वदेशीवादी मांडू इच्छितात त्या कार्यक्रमाची सुरुवात केली. आणि मग इतर देशांनीही जर्मनीला प्रत्युत्तर म्हणून तोच कार्यक्रम सुरू केला आणि 'शेजाऱ्याला भिकारी बनवा (begger thy neighbour)' धोरणाचा जगभर अवलंब होऊ लागला. अशा तऱ्हेच्या कुंठित व्यापारातून अटीतटी वाढल्या आणि त्यातून निघाले दुसरे महायुद्ध.

या महायुद्धाने जगामध्ये मोठ्या प्रमाणावर वाताहत झाली. हे महायुद्ध संपल्यानंतर जिंकलेल्या राष्ट-ांनी विचार केला की गेल्या युद्धानंतर जी चूक केली ती आता करायची नाही. हरलेल्या राष्ट-ावर खंडणी लादून काहीही हातात येत नाही, उलट नवीन शत्रू तयार होतात. त्यापेक्षा, पराभूत राष्ट-ांना आपापल्या पायांवर उभे रहाण्याकरिता मदत केली तर जगामध्ये शांतता रहाण्याची शक्यता आहे. म्हणजे हा एक प्रकारे गांधीवादी विचारच झाला. तेव्हा, पुन्हा एकदा हरलेल्या जर्मनी आणि इतर युरोपीय राष्ट-ांना खंडणी द्यायला लावण्याऐवजी जिंकलेल्या राष्ट-ांनी त्यांना 'मार्शल प्लॅन' आणि इतर योजनांखाली प्रचंड प्रमाणावर मदत केली. त्याचवेळी, जगातला व्यापार खुला असावा या बुद्धीने संयुक्त राष्ट- संघामध्ये एक वेगळी संघटना तयार करण्यात आली. या संघटनेला यश आले असते तर आता जी जागतिक व्यापार संस्था तयार झाली आहे ती १९४७-४८ सालीच तयार झाली. पण, अजून

राष्ट-राष्ट-ांत स्वदेशी, आमची निर्यात आयातीपेक्षा जास्त असली पाहिजे अशासारख्या तथाकथित स्वदेशाभिमानाच्या कल्पना होत्या त्यामुळे चर्चेत एकमत होणे शक्य नव्हते.

**व्यापार आणि सीमाशुल्कावरील समझोत्यासाठी**

पण, आज अशी संस्था तयार होत नसली तरी भविष्यात सुरू व्हावी अशा बुद्धीने या देशांनी चर्चावाटाघाटींसाठी एक वेगळाच मंच तयार केला त्या मंचाचे नाव GATT (General Agreement on Trade and Tariff). सर्व देशांना एकत्र बोलावून त्यांच्यात वाटाघाटी घडवत ठेवणे आणि सर्व देशांना खुल्या व्यापाराकरिता तयार करणे हे GATT या मंचाचे काम.

१९९५ सालापर्यंत या मंचाला यश मिळाले नाही, १९९५ साली पहिल्यांदा जागतिक व्यापार संस्था तयार झाली. या जागतिक व्यापार संस्थेचे नियम फारच उत्तम आहेत आणि त्यात काही सुधारणा करण्याची आवश्यकता नाही असा आग्रह कुणी धरणार नाही. नियम आहेत, त्यांत सुधारणांना पुष्कळ वाव आहे, पण, निदान नियम झाले, कसे वागले तर चुकीचे असते एवढे कळायला मार्ग झाला. भारतीय दंडविधान झाले म्हणजे काही खून व्हायचे थांबले नाही, कोणीतरी विघातक माणसे असतातच. म्हणून काही दंडविधान असूच नये असे कोणी म्हणणार नाही. जागतिक व्यापार संस्थेच्या कराराच्या रूपाने जागतिक व्यापारात चांगले वागणे म्हणजे काय याची एक जागतिक फूटपट्टी तयार झाली.

ही जागतिक फूटपट्टी खुल्या व्यापाराच्या बाजूने का आहे याचे थोडे अर्थशास्त्रीय विवेचन करणे आवश्यक आहे. जगामध्ये किंवा कोणत्याही देशामध्ये कोणी कोणता माल उत्पादन करावा याचा अर्थशास्त्रीय नियम काय? आपल्या देशामध्ये सुताराचे काम कोणी करावे, लोहाराचे काम कोणी करावे, तांबटाचे काम कोणी करावे हे ठरविण्याकरिता आपण जातिव्यवस्था तयार केली. आणि तांबटाच्या मुलाने तांब्याचेच काम करावे, लोहाराच्या मुलाने लोखंडाचेच काम करावे अशा तऱ्हेने जन्माने ज्याचा त्याचा व्यवसाय ठरायला लागला. प्रत्यक्षात अनुभव असा की जन्माने कौशल्य काही वाढत नाही. म्हणजे सुताराचा मुलगा अधिक कुशल सुतार होतो असे काही दिसत नाही. उलट, ज्या देशामध्ये अशी काही बंधने नाहीत तेथील कारागीर मंडळी फार

पुढे गेली आणि आपल्या देशात मात्र परिस्थिती अशी की बुरुडातल्या एका उपजातीतील माणसे म्हणतात आम्ही फक्त चौकोनीच टोपल्या विणतो, गोल टोपल्या विणत नाही अशा तऱ्हेची संकुचित वृत्ती इथे तयार झाली.

**श्रमविभागणीची संकल्पना**

कोणी कोणत्या वस्तुचे उत्पादन करावे, कोणी कोणते काम करावे यासाठी अर्थशास्त्राचा नियम काय? जो एखादे काम करण्यात कुशल आहे, कार्यक्षम आहे त्याने ते करावे; पण कामाची वाटणी (श्रमविभागणी) करण्याने कामाची उत्पादकता वाढते हा अर्थशास्त्रातील पहिला सिद्धांत. उदाहरणार्थ एका माणसाने टाचणी करण्याकरिता तार ओढायची, ती तोडायची, एक टोक बोथट करायचे, दुसरे अणकुचीदार करायचे अशी सगळी कामे जर तो करीत बसला तर तो दिवसात किती टाचण्या तयार करतो आणि या प्रत्येक कामाला श्रमविभागणीच्या पद्धतीने वेगळा वेगळा मनुष्य लावला तर ते सरासरी प्रत्येकी किती टाचण्या तयार करतात हे पाहिले तर श्रमविभागणीमुळे उत्पादकता कितीतरी पटींनी वाढलेली दिसते. तेव्हा, ज्याने त्याने, ज्या ज्या देशाने आम्हाला लागते ते आमचे आम्ही उत्पादन करू असे म्हटले तर ते त्या त्या देशांच्याही फायद्याचे नाही आणि जगाच्याही फायद्याचे नाही.

कामाची वाटणी कशी करावी? उदाहरणार्थ, समजा 'अ' आणि 'ब' हे दोन देश आहेत. 'अ' देशात कापूस 'ब' देशापेक्षा खूप चांगला पिकतो, कार्यक्षमतेने तयार होतो; आणि 'ब' देशात साखर चांगली तयार होते, 'अ' देशात ती तेवढ्या कार्यक्षमतेने तयार होत नाही. 'ब' देशाला साखर तयार करण्यात काही फायदा असेल तर 'अ' देशाने साखर तयार करण्याच्या भानगडीत विनाकारण न पडता 'ब' देशाकडून साखर घ्यावी. त्यामुळे 'ब' देशाचाही फायदा होतो आणि 'अ' देशाचाही फायदा होतो. एवढ्याने प्रश्न सुटत नाही. समजा, अशी परिस्थिती असली की 'ब' देश कापूस आणि साखर या दोन्ही उत्पादनांच्या बाबतीत अधिक कार्यक्षम आहे. अशा वेळी मग काय करायचे? या प्रश्नाचे उत्तर समजण्याकरिता अजून एक उदाहरण घेऊ. आईनस्टाईनची प्रयोगशाळा कामाच्या व्यापांमुळे, समजा, घाणेरडी रहायला लागली, कचराकुचरा साचू लागला. साफसफाईला वेळ मिळत नसल्याने त्या कामासाठी मोलकरीण ठेवली. तीही इतर नोकरदारांप्रमाणे काम उरकून

टाकायची. समोर दिसणारा कचरा झाडून काढून सतरंजीखाली, कोचाखाली ढकलून ठेवायची. आईनस्टाईनने पाहिले आणि त्याने झाडू हाती घेतऊन व्यवस्थित केर काढून प्रयोगशाळा स्वच्छ करून दाखवली. मोलकरणीनेही कौतुक केले. म्हणजे परिस्थिती अशी की आईनस्टाईन हा प्रयोग करण्यात श्रेष्ठ आणि केर काढण्यातही श्रेष्ठ. मग, कामाची विभागणी कशी करावी? अर्थशास्त्राचा सिद्धांत असे सांगतो की ज्या कामामध्ये ज्याला तुलनेने अधिक श्रेष्ठता असेल ते काम त्याने करावे. प्रयोग करणे आणि झाडू काम करणे यांतील दोघांच्या कार्यक्षमतेची तुलना केली तर झाडूकामात आईनस्टाईन श्रेष्ठ असला तरी त्या कामातील त्याच्या कार्यक्षमतेतील फरक प्रयोग करण्याच्या कार्यक्षमतेतील फरकाच्या तुलनेत अगदी किरकोळ आहे. तेव्हा आईनस्टाईनने प्रयोग करावे आणि मोलकरणीने झाडूकाम करावे असे अर्थशास्त्राचा नियम सांगतो. याला इंग्रजीमध्ये Law of Comparative Advantage (म्हणजे तौलनिक लाभाचा नियम) म्हणतात. या नियमाप्रमाणे जर का सगळ्या जगामध्ये श्रमविभागणी झाली आणि आपण काय काय उत्पादन करायचे हे प्रत्येक देशाचे ठरले तर प्रत्येक देशातील उत्पादन वाढते, प्रत्येक देशातील ग्राहकाचा अधिकाधिक फायदा होतो आणि सगळ्या जगातील मिळून संपत्ती वाढते.

अशा तऱ्हेने देशादेशांत श्रमविभागणी व्हावी याकरिता GATT ने प्रयत्न केले. १९४३-४४ साली सुरू झालेल्या या चर्चांमध्ये उरूग्वेमध्ये १९८२-८३ मध्ये सुरू झालेल्या फेरीत शेतीमालाच्या व्यापाराचा विषय पहिल्यांदा चर्चेत आला. तोपर्यंतच्या चर्चांमध्ये शेतीविषयी कोणीच बोलायला तयार नव्हते. कारण, शेती हा प्रत्येक देशाचा राजकारणाचा नाजुक विषय आहे. शेतकरी मोठ्या संख्येने असोत का लहान संख्येने असोत, अनेक कारणांकरिता प्रत्येक देशाला शेतीच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण असले पाहिजे असे वाटते.

**सक्षम बनण्यात खरी राष्ट-ीयता**

खुली व्यवस्था आणताना प्रत्येक देशाला पहिल्यांदा त्या व्यवस्थेचे फायदे समजायला पाहिजेत आणि त्याच बरोबर महत्त्वाचे म्हणजे, राष्ट-ाभिमानाच्या, स्वदेशीच्या नावाने असोत किंवा समाजवादाच्या नावाने,

ज्या काही जुन्या सवयी लागलेल्या आहेत त्यांतून बाहेर पडून एक जागतिक दृष्टिकोन घेऊन त्या दृष्टिकोनामध्ये आपल्या देशाचे भले कसे आहे हे समजून घेणे आवश्यक आहे. जो देश आम्ही आमच्याच घरामध्ये खिडक्यादरवाजे बंद करून बसू म्हणेल, आमची स्वदेशी भली म्हणेल त्या देशाचे वाटोळे होईल. आपल्या शेजारचा ब्रह्मदेश (म्यानमार) हे त्याचे उदाहरण आहे. हा देश चाळीसेक वर्षे आपल्या देशाचे दरवाजेखिडक्या बंद करून बसला आणि त्यामुळे त्याची काही प्रगती झाली नाही; आज तो मागासातला मागास आणि गरीब देश बनला आहे.

हिंदुस्थानची परिस्थिती पाहिली तर आपले तंत्रज्ञान, उत्पादनक्षमता हे इतके कमी आहेत की आपण जर दरवाजे बंद करून बसायचे ठरवले तर थोड्याच दिवसांत हिंदुस्थान हा जंगली लोकांचा देश बनेल. जर आपण ठरवले की, नाही, जगातील देशांबरोबर स्पर्धा करायची आहे आणि त्याही बाबतीत आपले श्रेष्ठत्व सिद्ध करायचे आहे तर त्याला खऱ्या अर्थाने राष्ट्राभिमान किंवा स्वदेशी म्हणता येईल. आम्ही नालायक आहोत, पण नालायकपणा लपविण्याकरिता दरवाजे बंद ठेवणार म्हटले तर त्याला काही, उच्च अर्थाने, राष्ट्रीय भावना म्हणता येणार नाही.

**जागतिक लोकशाही**

जागतिक व्यापार संस्थेच्या करारातील एका गोष्टीकडे पाहून कोण्याही देशाने या करारावर सही करण्यास काही हरकत नाही असे माझे आग्रही मत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व व्यवस्थांमध्ये, सर्व संस्थांमध्ये अमेरिकेने आपले एक वैशिष्ट्य, विशेष स्थान ठेवले होते. सिक्युरिटी कौन्सिलमध्ये त्यांना व्हेटोचा अधिकार आहे, जागतिक बँकेचा अध्यक्ष अमेरिकनच असू शकतो, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रमुखाची नेमणूक अमेरिकेच्या सल्लामसलतीशिवाय होऊच शकत नाही. संयुक्त राष्ट्रसंघामध्ये अमेरिकेला हे जे विशेष स्थान आहे तसे ते नसेल अशा प्रकारची आर्थिक संघटना असावी असे प्रयत्न आम्ही बरीच वर्षे करीत आहोत. जागतिक व्यापारामध्ये अमेरिकेचा वाटा ५१% आहे. त्यांनी जर ठरवले तर त्यांच्या स्पेशल-३०१ किंवा सुपर-३०१ सारख्या कायद्यांप्रमाणे ते त्यांना पाहिजे त्या अटी इतर देशांवर घालू शकतील. त्यांना काय जरूरी आहे WTO ची? त्यांचे न ऐकून

कोणाचे चालणार आहे? त्यांच्याकडून व्यापार मिळावा म्हणून सगळे लोक रांगा लावून उभे आहेत. असे असतानाही त्यांनी जागतिक व्यापार संस्थेत यायचे कबूल केले एवढेच नव्हे तर त्यात ज्या काही मुख्य संस्था – उदाहरणार्थ, निर्णय घेणारे कार्यकारी मंडळ, तर्क मिटविणारी वांधा समिती – यांमध्ये हिंदुस्थान, व्हिएतनाम इत्यादी देशांच्या बरोबरीने अमेरिकेलाही एकच मत आहे. अशा तऱ्हेने लोकशाही तंत्र तयार झाले आहे. अमेरिकेची व्यापारातील ताकद इतकी प्रचंड असूनही त्यांचा मताधिकार इतर सर्वांइतकाच. त्यामुळे, १९९५ सालापासून वांधा समितीसमोर कित्येक प्रकरणांचे निकाल अमेरिकेच्या विरोधातही लागले आहेत. हे सर्व पहाता, खुल्या बाजारव्यवस्थेकडे जायचे असेल तर त्या व्यवस्थेकडे जाण्याचा सगळ्यात चांगला मार्ग जागतिक व्यापार संस्थेच्या रूपाने आपल्याला मिळाला आहे.

हिंदुस्थानला जगाकडून घेण्यासारखे पुष्कळ आहे. त्या मानाने जगाला हिंदुस्थानची काही फारशी गरज नाही. हे सत्य पहिल्यांदा स्वीकारले की मग व्यापार चालू ठेवण्यामध्ये आपल्याला स्वारस्य आहे, चांगला व्यापार म्हणजे बहुराष्ट्-ीय व्यापार आणि बहुराष्ट्-ीय व्यापाराकरिता जागतिक व्यापार संस्था ही आतापर्यंत मिळालेली चांगली संधी आहे हे लक्षात घ्यायला हवे. या व्यापार संस्थेत जर काही उणीवा असतील तर त्या दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. काही उणीवा आहेत म्हणून ही संस्था बुडविण्याचा जे प्रयत्न करतील ते लोक त्यांच्याही देशाच्या दृष्टीने करंटे आणि जगाच्याही दृष्टीने शांतिभंग करणारे ठरतील. व्यापाराला पर्याय फक्त युद्ध आहे. जेथे व्यापार होत नाही तेथे युद्ध होते. तुम्हाला काय पाहिजे ते निवडा.

**शेतीविषयक करार**

या सर्व वाटाघाटींमध्ये मराकेश येथे १९९५ साली ज्या ज्या करारांवर सह्या झाल्या आहेत, त्यात शेतीचा विषय पहिल्यांदा आला आणि शेतीसंबंधीचा एक आंतरराष्ट्-ीय करार (Agreement on Agriculture) हा मुख्य करार. त्याच्या बरोबरीने आणखी काही करार झाले. त्यातील एक म्हणजे ज्या शेतीमालाचा व्यापार होतो त्या वस्तू स्वच्छतेच्या दृष्टीने, आरोग्याच्या दृष्टीने किंवा वेगवेगळ्या आंतरराष्ट्-ीय नियमांप्रमाणे सेवनासाठी

- त्या योग्य आहेत किंवा नाहीत यासंबंधीचा करार. त्याबरोबर, बौद्धिक संपदेसंबंधी झालेल्या करारालाही शेतीसंबंधात महत्त्व आहे. असे दोनतीन करार महत्त्वाचे आहेत.

सध्या मुख्यत: AoA बद्दल म्हणजे शेतीबद्दलच्या आंतरराष्ट-ीय कराराबद्दल चर्चा चालू आहे. प्रथम, १९९५ च्या या करारामध्ये मुख्य तरतुदी काय आहेत हे लक्षात घेऊ.

सरकारी हस्तक्षेपामुळे जागतिक व्यापारातील जो काही नाश होतो तो टाळण्याकरिता सरकारी हस्तक्षेप कमी करणे हे जागतिक व्यापार संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. म्हणजे, शेतकरी संघटना म्हणते त्याप्रमाणे, सरकार हे नेहमी बेकारच असते असे जागतिक व्यापार संस्थेचेही म्हणणे आहे.

या करारातील पहिली तरतूद अशी की कोणत्याही देशाने आयातीवर बंदी घालू नये. कारण, आयातीवर जर बंदी घातली, लायसन्सची पद्धत ठेवली तर लोक लायसन्स घेतात आणि ती विकतात. अशी लायसन्स विकत मिळाल्यामुळे अप्रत्यक्षरीत्या व्यापाराला किंवा उद्योगधंद्याला मदत होते. एखादा माल आपल्या देशात ठराविक प्रमाणापेक्षा जास्त येऊ नये असे वाटत असेल तर त्यासाठी त्या हिशोबाने सीमा शुल्क लावण्याची मुभा या तरतुदीतच आहे. माल फार येतो असे वाटले तर ते शुल्क वाढवता येईल आणि आवश्यकतेइतका येत नाही वाटले तर ते कमीही करता येईल. तेव्हा एकदम बंदी न घालता सीमाशुल्काचा वापर करून आयातीचे नियमन देशादेशाने करायचे आहे. करारावर सह्या व्हायच्या आधी सर्व देशांनी वेगवेगळ्या मालांसाठी त्यांच्या आयातीवर नियंत्रण ठेवता यावे म्हणून आकारल्या जाणाऱ्या सीमाशुल्काचे आपापले प्रमाण जागतिक व्यापार संस्थेकडे नोंदवून ठेवले आहेत.

दुसरी अट अशी की कोणत्याही देशाने आपल्या देशातील निर्यातदारांना सब्सिडी देऊ नये; म्हणजे दुसऱ्या देशांतील शेतकऱ्यांशी तुलना करता आपल्या देशातील शेतकऱ्यांना फायदा देण्याचा मोह टाळावा. ही अट तशी फारशी महत्त्वाची नाही, कारण यूरोपमधील पाचसहा देश सोडले तर निर्यातदारांना कोणी सब्सिडी देत नाहीत.

तिसरी आणि सर्वांत महत्त्वाची अट, शेतकऱ्यांना दिली जाणारी

सब्सिडी (Agreegate Measurement of Support) किती असावी यासंबंधी. जागतिक व्यापार संस्थेचा नियम असा की श्रीमंत देशांनी शेतकऱ्यांना ५% पेक्षा जास्त सब्सिडी देऊ नये आणि विकसनशील देशांनी १०% पेक्षा जास्त सब्सिडी देऊ नये. पण, आजपर्यंत श्रीमंत देश आपल्या शेतकऱ्यांना भरमसाठ सब्सिडी देत आले आहेत. जपान ९०%, यूरोप ६०%, अमेरिका ३०-३५%. हिंदुस्थान मात्र शेतकऱ्यांना प्रत्यक्षामध्ये उणे सब्सिडी देत आला आहे. अशा परिस्थितीमध्ये हिंदुस्थानचे हित काय? हिंदुस्थानने या करारात रहावे. श्रीमंत देश त्यांच्या देशातील सब्सिडी कमी करायला आज तयार नाहीत. कारण सब्सिडी देण्यामागे त्यांची काही राजकीय कारणे आहेत. राजकीय कारणांनी त्यांना शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या शहरातील लोकांच्या बरोबर ठेवणे आवश्यक आहे. आपल्या तुलनेत तेथील सगळे श्रीमंत असले तरी शहरातील आणि शेतीतील माणसांच्या आर्थिक परिस्थितीत तफावत असेल तर काही सामाजिक प्रश्न तयार होतात. 'कितीही मोठी जमीनधारणा असलेला शेतकरी असेल तरी तो आर्थिकदृष्ट्या कमी असला तर शहरातील मुली त्याच्या मुलांबरोबर 'डेटिंग' करायलासुद्धा तयार होत नाहीत म्हणून आम्ही शेतकऱ्यांना सब्सिडी देऊन शहरातील लोकांच्या बरोबरीच्या स्तरावर ठेवतो' असे यूरोपमधील एकाने मांडले आहे. आपल्याकडेही शहरातील कोणी शेतकऱ्याच्या घरी मुलगी द्यायला तयार होत नाही, तसेच आहे हे. पण, आज जरी हे देश शेतीची सब्सिडी कमी करायला तयार नसले तरी उद्या त्यांना ते करावे लागेल. ज्या देशात शेतीवरील सब्सिडी पाच किंवा दहा टक्क्यांपेक्षा अधिक आहे ती टप्प्याटप्प्याने कमी करावी या तरतुदीचा विचार करताना हिंदुस्थानातील सब्सिडीची परिस्थिती काय दिसते? आपल्याकडील परिस्थिती अशी आहे की सरकारने म्हटले तरी सब्सिडी देण्यासाठी त्यांच्याजवळ पैसे नाहीत. त्याशिवाय, आजपर्यंत ज्यांच्या ज्यांच्या हाती राजकीय सत्ता आली त्यांच्या कारभाराकडे पाहिले तर शेतकऱ्यांना मदत करण्याची त्यांची इच्छादेखील नाही असे स्पष्ट दिसते. अशा परिस्थितीत, ज्या देशात सब्सिडीच्या रूपात जास्त मदत दिली जाते तेथे WTO सारख्या करारांचा वापर करून ती कमी करण्याचा प्रयत्न करणे याखेरीज हिंदुस्थानसारख्या देशांपुढे काही पर्याय नाही.

**कबुतरांची हिम्मत**

WTO वर टीका करणारे, हिंदुस्थानने WTO मधून बाहेर पडावे असे म्हणणारे विरोधक नेहमी एक युक्तिवाद करतात. ''आपण गरीब देश आहोत, आपण तंत्रज्ञानात मागास आहोत; दुसरे देश श्रीमंत आहेत, त्यांच्याकडे भांडवल खूप आहे, म्हटले तर ते खूप दिवस बाजारात तग धरून राहू शकतात अशा लोकांबरोबर स्पर्धेत उतरून सामना करणे कसे शक्य आहे?'' असे ते म्हणतात. अगदी प्रकाशसिंह बादलांसारखे लोकही अशीच भाषा करतात. मध्ये चंडीगडला त्यांच्याशी बोलताना मी म्हटले की, ''तगड्या माणसाशी लढाई करायचीच नाही म्हटले असते तर शिखांचा इतिहास घडलाच नसता.'' गुरु गोविंदसिंगांचे प्रसिद्ध वाक्य आहे की, 'मी तर बहिरी ससाण्यांच्या विरुद्ध कबूतरांना लढवणार आहे.' आणि गुरु गोविंदसिंगांच्या कबूतरांनीच शीख इतिहास घडवला. तेव्हा, युद्धामध्ये नेहमी तगडेच जिंकतात असे काही नाही.

तेव्हा, आपण असे धरून चाललो की आपल्याला काही मार्ग काढताच येणार नाही, आणि मार्ग न काढण्याचे ठरवून नुसते 'आमचं आता कसं होणार?' म्हणून हंबरडा फोडत राहिलो तर आपण जगामध्ये राष्ट- म्हणून सोडूनच द्या, माणूस म्हणूनही जिवंत राहणार नाही. कारण, आपण जगाबरोबरचे संबंध तोडून टाकले तर आज जगात संगणक, जैविक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील क्रांतीमुळे जी काही नवीन साधने तयार होत आहेत त्यांनाही आपल्याला मुकावे लागेल. परिणामी, उद्याच्या जगात जगणेही अशक्य होईल. तेव्हा जागतिक व्यापार संस्थेपासून आपण दूर राहू शकतो ही कल्पना मुळातून काढून टाकली पाहिजे.

ससाण्यांविरुद्ध लढलेल्या कबूतरांच्या हिम्मतीने स्पर्धेत उतरायचे ठरले तर स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी आणि जिंकण्यासाठी काय करायला हवे?

**उपायांचा पहिला टप्पा :**

**१. शेतीचे गैरसरकारीकरण**

सरकारी व्यवस्थापन हे सर्वात गचाळ असते हे आता जगन्मान्य झाले आहे. हिंदुस्थानची शेती ही सरकारी आहे, खासगी नाही. कारण सरकार पाहिजे तेव्हा शेतकऱ्याच्या हातून जमीन काढून घेऊ शकते. आणि म्हणूनच शेतकरी जमिनीत भांडवली गुंतवणूक करू इच्छित नाही. तीच गोष्ट

शेतीकरिता लागणाऱ्या सर्व वस्तूंची. खते कोणती वापरायची, औषधे कोणती वापरायची, बियाणी कोणती वापरायची, पिके कोणती घ्यायची या सगळ्यावर प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सरकारचेच नियंत्रण असते. माल तयार झाला की तो कोठे विकायचा, कधी विकायचा, कोणत्या भावाने विकायचा यावरसुद्धा सरकारचेच नियंत्रण. तेव्हा, स्पर्धेला सामोरे जायचे असेल तर ही सरकारी शेती प्रथमत: गैरसरकारी करणे आवश्यक आहे.

**२. देशपातळीवर समाईक बाजारपेठ**

जगाच्या पातळीवरील बाजारपेठेत उतरायच्या आधी 'भारता'तील शेतकऱ्याला आधी 'इंडिया'ची भिंत पार करता आली पाहिजे. सध्या पंजाबमधील गहू हरियाणात नेता येत नाही, आंध्रातला तांदूळ महाराष्ट-ात आणता येत नाही, महाराष्ट-ातला कापूस गुजरात-मध्यप्रदेशात पाठवता येत नाही. अशा प्रकारची अनेक बंधने आहेत. ही सर्व बंधने काढून टाकून, युरोपमधील देश जसे देश म्हणून वेगळे वेगळे असले तरी व्यापारासाठी युरोपीय समाईक बाजारपेठेच्या रूपाने एकमय झाले त्याप्रमाणे हिंदुस्थान हा 'समाईक भारतीय बाजारपेठ' बनवला पाहिजे.

**३. शेती जागतिक दर्जाची करणे**

सगळेच म्हणतात की हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश आहे. जागतिक व्यापाराच्या संदर्भात हिंदुस्थान खरोखर शेतीप्रधान देश आहे का? जागतिक व्यापार संस्थेच्या करारात वेगवेगळ्या 'शेतीमालां'च्या सविस्तर व्याख्या केलेल्या आहेत. उदाहरणार्थ, बासमती तांदूळ – सडलेला आणि बिनसडलेला – म्हणजे काय याची चांगली पानभर व्याख्या आहे. त्यात, स्वच्छता किती असली पाहिजे, उंदरांच्या लेंड्यांचे प्रमाण किती असले तर चालेल, पक्ष्यांच्या विष्ठेचे प्रमाण किती असले तर चालेल इथपर्यंत बारीकसारीक गोष्टींचेसुद्धा सुस्पष्ट विवरण त्या व्याख्येत आहे. या व्याख्यांवर आपल्याकडील शेतीमालांची तपासणी केली तर आपल्याकडे 'शेतीमाल' उत्पादन होतच नाही असा निष्कर्ष निघेल. म्हणजे, हिंदुस्थानातील शेती ही जागतिक दर्जाची (world class) नाही. तेव्हा, हिंदुस्थानची शेती जागतिक दर्जाची बनविली पाहिजे. त्यासाठी, प्रामुख्याने, संयुक्तिक तंत्रज्ञानाचा अभ्यासपूर्वक अवलंब केला पाहिजे, अधिक प्रगत तंत्रज्ञान शोधण्यास प्रोत्साहन मिळाले पाहिजे.

## ४. शेतकऱ्यांच्या कंपन्या

हिंदुस्थानची शेती जागतिक दर्जाची बनवायची असेल तर उत्तमात उत्तम आणि आधुनिक तंत्रज्ञान वापरावे लागेल; जागतिक बाजारात उतरायचे तर मोठ्या प्रमाणावर माल पिकवावा लागेल, त्यासाठी यांत्रिकीकरण करावे लागेल आणि यांत्रिकीकरण छोट्या छोट्या शेतांवर करणे शक्य नसल्याने जमिनीचे एकत्रीकरण करावे लागेल. या गोष्टी करायच्या तर त्यासाठी साधन कोणते असावे? शेतीचे गैरसरकारीकरण करायचे म्हटल्यानंतर हे सर्व सरकार करील असे म्हणण्याचा प्रश्नच येत नाही. सहकार हा कार्यक्षम होऊ शकत नाही हे आपल्याकडे सिद्ध झाले आहे. मग याला पर्याय काय? सरकार नाही, सहकार नाही, कॉर्पोरेशन/कंपनी हा यासाठी एक पर्याय आहे. बाहेरची कोणतीतरी कंपनी आली म्हणजे शेतकऱ्यांचा शत्रू आला अशी धारणा आजपर्यंतच्या भूसंपादनाच्या अनुभवांमुळे पक्की झाली आहे. तेव्हा, एकत्रित भूक्षेत्रावर आधुनिक तंत्रज्ञान आणि यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने जागतिक दर्जाची शेती करण्यासाठी शेतकऱ्यांच्याच कंपन्या/कॉर्पोरेशन उभ्या राहिल्या पाहिजेत. सहभागी शेतकऱ्यांच्या जमिनी त्या कॉर्पोरेशनच्या शेअर्समध्ये रूपांतरित झाल्या म्हणजे भागधारक म्हणून शेतकऱ्यांना कॉर्पोरेशनच्या नफ्यात त्यांच्या त्यांच्या जमीनधारणेच्या प्रमाणात हिस्सा तर मिळत राहीलच. शिवाय, या जागतिक दर्जाच्या शेतीतील वेगवेगळी कामे करून त्यांना आपापल्या घामाचे दाम मिळवता येईल.

## ५. गुणवत्तेची बाजारपेठ

शेतीमालाच्या विपणनासाठी सध्या आपल्याकडे प्रचलित असलेली 'कृषि उत्पन्न बाजार समित्यां'ची व्यवस्था ही शेतकऱ्यांच्या हिताची ठरलेली नाही. ही व्यवस्था मोडून 'मार्क्स् आणि स्पेन्सर'च्या 'सुपर मार्केट'च्या जाळ्यांच्या धर्तीवर विपणनव्यवस्था एकदम उभी करणे शेतकऱ्यांना आज शक्य नाही. आजच्या आपल्या बाजारामध्ये कोणत्याही मालाची गुणवत्ता ठरविण्यासाठी शास्त्रीय उपकरणाचा उपयोग होत नाही, मालाची गुणवत्ता 'ग्रेडर' नावाच्या व्यक्तीच्या मनाप्रमाणे ठरते. अशा तऱ्हेने गुणवत्ता ठरवलेला माल जागतिक बाजारात टिकू शकणार नाही. तेव्हा, नुसती समाईक राष्ट्रीय बाजारपेठ बनवून भागणार नाही, तर ही बाजारपेठ गुणवत्तेची बाजारपेठ

बनवावी लागेल. त्यासाठी शास्त्रीय उपकरणांच्या सहाय्याने मालाची गुणवत्ता/दर्जा ठरवण्याची व्यवस्था तयार करावी लागेल. विकसित देशांतील सुपरमार्केटची बाजारव्यवस्था ही अशा प्रकारची गुणवत्तेची बाजारपेठ आहे.

**६. शेतकरी आणि ग्राहक एकत्र आणणे**

आपल्या व्यापारात पूर्वापार चालत आलेली आडत्यांची पद्धतीच शेतीमालासाठी कृषि उत्पन्न बाजार समित्यांतही वापरण्यात आली. इतर देशांतल्या व्यवस्थेत, आडते जवळ जवळ नाहीत, असला तर एखाद दुसरा. तेथे शेतकरी आणि ग्राहक एकत्र येतात. त्या दिशेने पहिली पायरी म्हणून हिंदुस्थानातील शेतकरी आणि ग्राहक यांना एकत्र आणणारी एखादी यंत्रणा उभी केली पाहिजे.

**७. माहिती तंत्रज्ञानाचे जाळे**

हिंदुस्थानातील शेतकऱ्याला जग काय आहे हे समजायला हवे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जगभर इंटरनेट आणि संगणक यांच्या साहाय्याने माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार सुरू झाला आहे. जगामधील वेगवेगळ्या बाजारपेठांमध्ये काय भाव चालू आहेत, कोणत्या मालाला कशी मागणी आहे, पुरवठा कसा आहे, हवामानाचे अंदाज काय आहेत, त्यानुसार पीकसंरक्षणासाठी काय उपाययोजना करता येईल, इत्यादी बाबींची माहिती हिंदुस्थानच्या प्रत्येक गावातील शेतकऱ्यांना गावातच मिळण्याची व्यवस्था करावी लागेल.

**तात्पर्य**

जागतिकीकरणाच्या वाऱ्याला आता कोणी थोपवू शकणार नाही. जागतिकीकरणाच्या आव्हानाला घाबरून आपल्या देशाच्या सीमांच्या आत दडून बसण्यात देशाचे नुकसानच आहे, फायदा काहीच नाही. तेव्हा, दिवाभीतांच्या घुत्कारांकडे लक्ष न देता वरीलप्रमाणे पावले उचलली तर हिंदुस्थान खुल्या व्यवस्थेच्या जागतिक स्पर्धेतील सक्षम स्पर्धक होऊ शकतो आणि आपले प्राचीनकालीन वैभव पुन्हा प्राप्त करू शकतो.

# १७. शुभकार्य! सावधान!

## अखेर अंगठा उठला

डंकेल प्रस्ताव अखेरीस मंजूर झाला. येती १० वर्षे तरी, म्हणजे नव्या शतकातच नव्हे तर नव्या सहस्रात प्रवेश करतांना पृथ्वीवरील वेगवेगळ्या मानव समाजांमधील वस्तूंच्या, सेवांच्या देवघेवींची नियमावली मान्य झालेल्या GATT कराराची तत्त्वे आणि तपशील यांनुसार होईल.

हिंदुस्थानच्या संसदेच्या दोन्ही सभागृहांत मोठा गदारोळ उडाला आहे. १४ डिसेंबर १९९३ रोजी करारावर सही करण्याचा अधिकार भारतीय प्रतिनिधी श्री. झुत्सी यांना दिला एवढेही कबूल करायला दिल्ली शासन तयार नव्हते. करारावर सह्या झाल्या हे १६ तारखेची वर्तमानपत्रे, टेलिव्हिजन इत्यादी माध्यमांमार्फत जगजाहीर झाले, तेव्हा कोठे शासनाने डंकेल प्रस्ताव ही भारताच्या हिताच्या दृष्टीने सर्वोत्तम व्यवस्था असल्याचे मान्य केले. शेतकरी, संशोधक इत्यादी घटकांच्या संरक्षणासाठी काही कायदेकानून बनवण्याची घोषणाही करण्यात आली.

नव्या दिल्लीत सचिवालयात बसणाऱ्या कोणा एका अधिकाऱ्याने किंवा मंत्र्याने देशाची आर्थिक स्थिती उघड्या डोळ्यांनी पाहिली असती आणि डंकेल प्रस्ताव बारकाईने समजून घेतला असता तर असा गोंधळ आणि फजिती झाली नसती. डंकेल प्रस्ताव आंतरराष्ट-ीय व्यापारासंबंधी आहे. भारताची निर्यातक्षमता प्रामुख्याने कच्चा माल आणि त्यावर थोडीफार प्रक्रिया करून तयार झालेला माल यातच आहे हे पाहता भारतानेही CAIRNS राष्ट-ांप्रमाणेच या प्रस्तावाचा उत्साहाने पाठपुरावा करायला पाहिजे होता.

## 'इंडिया'वाद्यांची हातचलाखी

पण देशात राज्य 'भारता'चे नाही, 'इंडियाचे' आहे. नेहरूव्यवस्था कोसळून पडली तरी खुल्या व्यवस्थेतही शहरी कारखानदार आणि भद्रलोक यांचाच वरचष्मा आहे. अगदी शेवटी, करारावर सही करतानादेखील शेतकऱ्यांच्या, संशोधकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी नवीन कायदे करण्याचे मोठे नाटक झाले. डंकेल प्रस्तावातील तरतुदी शेतकरी इत्यादीना सोयीस्कर नाहीत, जाचक आहे असे क्षणभर मानले तर देशातील संसदेत

कायदा पसार करून काय होणार? GATT कराराशी विसंगत असलेल्या तरतुदी कोणत्याही कायद्यात करणे आंतरराष्ट-ीय कराराशी विसंगत होईल. असे कायदे तयार करण्यात आले तर त्याविरुद्ध, करारावर सह्या करणाऱ्या ११७ राष्ट-पैकी कोणतेही एक तक्रार करू शकेल आणि शिस्तभंगाची कारवाईही GATT च्या कार्यक्रमात किंवा प्रत्यक्ष व्यापारात चालू करू शकेल.

याउलट, करारात शेतकरी आणि संशोधक इत्यादींच्या हिताला बाधा आणणारे असे काही नसेलच तर वेगळा कायदा करण्याची भाषा निरर्थक आहे.

**हिशोबाचे बोला**

सरकारच्या ह्या गडबडगोंधळामागे काही डाव शिजत आहे की काय? करारावर अंगठा उठवणे तर सरकारला भाग पडले पण तरीही त्यांतील तरतुदी प्रत्यक्ष अंमलात येऊच नयेत, कारखानदारांना संरक्षण आणि शेतकऱ्यांचे मरण ही नेहरूव्यवस्था GATT करार झाल्यानंतरही चोरीछुपे चालूच रहावी अशी कार्यवाही करण्याचा सरकारचा इरादा असावा. शेतकऱ्यांचे हितसंवर्धन इत्यादी गोंडस घोषणांचा आधाराने शेती लुटण्याचे सरकारी धोरण पुढे रेटून नेण्याचा शासनाचा इरादा दिसतो.

आता करारावर सही झाली. शेतकरी समाजाची सरकारकडून काय अपेक्षा आहे? शेतकऱ्यांच्या संरक्षणाच्या भाषेने आतां तो फसणार नाही. डंकेल प्रस्तावावरील चर्चेने निदान एक फायदा झाला. शेती मालाच्या किंमती आणि शेतीला लागणाऱ्या निविष्ठा व साधने यांच्या किंमती या दोनच मार्गांनी शासनाने सर्व शेतीवर ५० टक्क्यांवर कर लादलेला आहे हे सरकारी कागदोपत्री, अगदी आकडेवारीने सिद्ध झाले आहे. ३५ ते ९० टक्के सबसिडी शेतकऱ्यांना देणाऱ्या अमेरिका, युरोप आणि जपान यांच्यात डंकेल प्रस्तावाच्या निमित्ताने वादविवाद झाला पण त्यातून, भारतीय शेतकऱ्याला उणे ५० टक्के सबसिडी आहे, हेही सत्य प्रकाशात आले.

आमचे संरक्षण करण्याची भाषा सोडा, आमचा गळा दाबणारे तुमचे हात बाजूला करा एवढीच सरकारकडून शेतकऱ्यांची माफक अपेक्षा आहे.

**उणे सबसिडीचा बोजा**

देशाची निर्यात वाढावी, विदेशी चलनाची मिळकत वाढावी ही देशाची

गरज आहे आणि शासनाची अपेक्षा आहे. गेल्या ५० वर्षांत नेहरूव्यवस्थेने शेतकऱ्यांवर केलेले सगळे घाव सोसूनही भारतीय शेतकरी आंतरराष्ट-ीय बाजारपेठेत उतरण्याला तयार आहे, पण त्या बाजारपेठेत येणारा प्रत्येक शेतकरी स्वत:च्या सरकारकडून सबसिडी घेऊन आलेला असणार आहे. याउलट भारतातला शेतकरी उणे ५० टक्के सबसिडीच्या दंडबेड्या घालून तेथे जाणार आहे. परदेशी माल किमान ५ टक्के सबसिडी खाऊन बाजारपेठेत येईल. बलदंड राष्ट-ांतल्या शेतकऱ्यांच्या सबसिडीत २४ ते ३६ टक्क्यांची कपात प्रत्यक्षात झाली असे समजले तरी उरलेली सबसिडी मोठी सज्जड असणार आहे. भारतीय शेतकऱ्याला उणे ५० टक्के सबसिडीपासून +१० टक्के सबसिडीपर्यंत नेणे हे भारताच्या आर्थिक धोरणाचे महत्त्वाचे सूत्र येत्या दशकांत राहिले पाहिजे. कायम शेतकरीविरोधी राहिलेले हे सरकार शेतीला १० टक्क्यांपर्यंत सबसिडी काढून देतील अशी आशा बाळगण्याइतके शेतकरी भोळे राहिलेले नाहीत. पण उणे ५० टक्के सबसिडीचा बोजा डोक्यावर बाळगण्याइतके ते आता मूर्खही राहिलेले नाहीत.

भारतात आर्थिक सुधारणा आणण्याचे नाटक नोकरशाहीला यत्किंचितही धक्का लागणार नाही अशा बेताने राबवले जात आहे. नेमके त्या उलट, आंतरराष्ट-ीय खुलीकरणाचा GATT करार कार्यवाहीत आला तरी त्याचा कणमात्र फायदा शेतकऱ्यांना मिळू नये अशी धडपड सरकारतर्फे आणि शहरी कारखानदारांतर्फे होणार आहे. १० टक्के सबसिडी सोडा, ५० टक्क्यावरची उणे सबसिडी खलास करा एवढी आता सरकारकडून शेतकऱ्यांची माफक अपेक्षा आहे. यासाठी सरकारने काय पावले उचलावीत हे GATT करारातच स्पष्टपणे सांगण्यात आले आहे. आणि त्यावर केंद्र शासनाने अंगठा उठवला आहे.

**खुला व्यापार**

पहिली कार्यवाही म्हणजे शेतीमालाच्या वाहतुकीवरची आणि व्यापारावरील सर्व बंधने रद्द करणे. जिल्हा बंदी, राज्य बंदी, झोन बंदी यांना GATT करारात स्थान नाही. तसेच भातावरची लेव्ही, आदिवासी शेतकऱ्यांच्या मालाची सक्तीची खरेदी या व्यवस्थांमुळे GATT कराराचा भंग होईल. अन्नधान्य सुरक्षा राखण्याकरितां आवश्यक ती तरतूद करण्याचा शासनाला अधिकार आहे; पण

ज्यांना गरज नाही त्यांच्यासाठीही सार्वजनिक वितरणव्यवस्था आहे असे दाखवून शेतकऱ्यांना लुटता येणार नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून समाजातील वरच्या वर्गांना वगळणे कराराप्रमाणे आवश्यक आहे. आणि गरजू वर्गाला स्वस्त धान्य पुरवण्याचा बोजा यापुढे फक्त शेतकऱ्यांच्या माथी मारता येणार नाही, तो सर्व राष्ट-ाने उचलावा लागेल.

**खुली निर्यात**

शेतीमालाच्या निर्यातीवरील बंधनेही उठवली नाहीत तर तेही GATT कराराशी सुसंगत होणार नाही. देशात वरकड उत्पादन होईल तेव्हा निर्यातीचा कोटा जाहिर करू, कोटा जाहिर करतांना नाफेडसारख्या संस्थांना प्राधान्य देऊ, त्यातले त्यात प्रक्रिया झालेल्या पदार्थांच्या निर्यातीलाच मान्यता देऊ, ही असली लटपटपंची यापुढे चालणार नाही. सर्व निर्यातीला खुला परवाना, ज्याला पाहिजे तितकी, पाहिजे तेव्हा व पाहिजे त्या मालाची, निर्यात करता यावी अशी व्यवस्था आणणे ही GATT कराराखाली शासनाची नैतिक जबाबदारी आहे.

परदेशातील माल सरकारी खर्चाने आणून देशातील बाजारपेठेत लादून कच्च्या मालाच्या किंमती पाडण्याचा दुष्ट खेळ यापुढे चालणार नाही. अमेरिकन गहू आणून येथील शेतकऱ्यांना धडा शिकवण्याचे दिवस आता संपले. दुधाची भुकटी आणि तेल परदेशातून भीक मागून आणून येथील शेतकऱ्यांना बुडवण्याचे दिवस संपले.

**सावध! सावध!**

डंकेल प्रस्ताव संमत झाला. सगळ्या जगात यामुळे कोणाचा सर्वात मोठा विजय झाला असेल तर तो भारतीय शेतकऱ्यांचा. पण करारावर अंगठा उठवला म्हणजे भारत सरकार आता शेतकऱ्यांना न्याय देईल अशी आशा करण्यास काही जागा नाही. शेतकरीविरोधी धोरण संपावे यासाठी शेतकऱ्यांना सरकारवर अनेक मार्गांनी दबाव आणावा लागेल. GATTच्या कार्यकारिणीपुढे हिंदुस्थान सरकारच्या शेतकरीविरोधी दुष्ट नीतिचे पुरावे मांडून निर्णय बदलण्यास सरकारला भाग पाडावे लागेल. नवा करार ही 'बळीराज्या'ची एक पताका आहे पण ती सांभाळण्याचे काम शेतकऱ्यांना स्वत:च करावे लागणार आहे. खाटेवर पडल्यापडल्या देणारा कोणी हरी त्यांना भेटणार नाही!

(२१ डिसेंबर १९९३)

# परिशिष्ट-१
# स्वतंत्रतेची मूल्ये - लेखांक १

**स्वतंत्रतेचा वेदान्त**

स्वतंत्रता म्हणजे काय? सर्व बेड्यासाखळ्या तुटल्या; सर्व गुलामगिरी संपली; स्वातंत्र्याची यात्रा सुरू झाली म्हणजे काय होते नेमके? रवींद्रनाथ टागोरांनी त्यांच्या एका कवितेत वर्णन केले आहे.

..... मने निर्भय असतील;
..... आणि माना ताठ;
..... जगाचे कप्पे कप्पे पाडणाऱ्या
क्षुद्र भिंती कोसळलेल्या असतील;
..... शब्द सांगतील फक्त सत्यच;
..... अथक प्रयत्न पराकाष्ठा करतील
परिपूर्णतेला स्पर्श करण्यासाठी;
..... विचारांचा शुद्ध प्रवाह
सवयीच्या वाळवंटात जिरणार नाही;
..... मने झेपावतील
सतत रुंदावणाऱ्या
विचार आणि कार्य
यांच्या क्षितिजाकडे

मन, ज्ञान, सत्य, परिपूर्णता, विचार अशा चैतन्यमयी अ-जड शब्दात मांडलेली ही स्वतंत्रतेची गुरुदेवप्रणीत व्याख्या; त्यातील शब्दांच्या जादूनेच भारावून टाकणारी. पण रोजच्या व्यवहारात कोणती स्पष्ट जड व्यवस्था पाहिजे? तुरुंगांच्या भिंती आणि गजांआड थोर व्यक्ती आपले व्यक्तिमत्व जपू शकल्या. पारतंत्र्यातही समाज स्वातंत्र्याची स्वप्ने जपू शकतो. पण हे सारे अपवादादाखल. जड बंधने जशी संपतील तसतसे स्वातंत्र्याची क्षितिजे रुंदावू लागतात हा मुख्य नियम. ''जगाचे कप्पे कप्पे करणाऱ्या क्षुद्र भिंती कोसळलेल्या असतील.'' म्हणजे विचार, सेवा आणि वस्तू यांची देवघेव निर्बंधपणे होणे ही स्वतंत्रतेची महत्त्वाची अट आहे. माणसामाणसातील

देवघेवीवर जेथे बंधने आहेत तेथे स्वातंत्र्य असूच शकत नाही. किंबहुना, अशा तऱ्हेची बंधने लादण्याचे सामर्थ्य बाळगणारी कोणतीही संस्था/व्यवस्था अस्तित्वात असणे हेच मुळी स्वतंत्रतेसाठी विषसमान आहे.

देवघेवीच्या खुलेपणाचा फायदा ठगापेंढाऱ्यांनी उठवू नये यासाठी सर्व समाजाने उभी केलेली सहकारी व्यवस्था म्हणजे सरकार. म्हणून राजकीय निवडणुकांत सहकारी तत्त्वाप्रमाणे दरडोई एक मत असते. सरकार म्हणजे इसापनीतीतील 'बेडकांच्या राजा'च्या गोष्टीप्रमाणे लाकडी ठोकळा नाही आणि करकोचाही नाही. समाजाच्या आत एकाने आपले स्वत:चे स्वातंत्र्य जपावे, पण तितक्याच ठामपणे दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे टाळावे. बाहेरच्या आक्रमणाच्या कोणत्याही धोक्यांपासून समाजाचे संरक्षण व्हावे याकरिता तयार झालेली सरकार ही व्यवस्था आहे.

खुलेपणाने, परस्पर संमतीने, सर्वहितेषु व्यवहार करण्याऐवजी दंडेली करू पाहणाऱ्यांना आटोक्यात ठेवणे हे सरकारचे काम. शासनाने ही जबाबदारी स्वीकारली की माणसामाणसांची संरक्षणाच्या जबाबदारीतून सुटका होते. संरक्षणाचे काम सरकारवर सोपवून माणूस इतर गोष्टींसाठी मोकळा होतो. या मोकळीकीची किंमत म्हणून तो आपल्या स्वातंत्र्याचा एक तुकडा तोडून शासनाला देतो, काही बंधने मान्य करतो. आणि नागरिकत्वाची बंधने स्वीकारण्याच्या बदल्यात नागरिक संरक्षणाच्या जबाबदारीतून सुटका मिळवतो. ही शासन संस्था आणि नागरिक यांच्यातील देवघेव आहे.

संरक्षणाखेरीज माणसाच्या पोषण, प्रजनन इत्यादी गरजा आहेत. त्या गरजा पुऱ्या करताना जनावरांप्रमाणे एकसुरी न वागता विविध अंगांनी, रंगांनी पोषण आणि प्रजननाच्या प्रेरणा तो सांतवू आणि जोपासूही पाहातो. या सगळ्या धडपडीच्या पलीकडे पुरुषार्थाच्या सीमा गाठल्यानंतर इंद्रियांच्या बंधनातूनही मोकळे होऊन काही 'मुक्ति-मोक्ष-निर्वाण' इत्यादी साधू पाहतो. संरक्षणाखेरीज इतर क्षेत्रांकरितादेखील काही व्यवस्था लागतातच. विद्येची सरकारे, करुणेच्या संस्था, कलावंतांची मंडळे इत्यादींची बांधणी सुरक्षा-सरकारच्या धाटणीची असणार नाही हे उघड आहे. संरक्षण म्हणजे हडेलहप्पी काम. त्यात शिस्त महत्त्वाची आणि उतरंडही महत्त्वाची. संगीताच्या मैफलीत कसली आली अधिकाराची उतरंड? आणि कसली शिस्त? दुर्बल, अपंग,

असहाय्य, व्याधिग्रस्त अशांच्या मदतीला शुद्ध करुणेपोटी जाणाऱ्यांना संरक्षणाच्या आणि अर्थार्जनाच्या कामी सुयोग्य असलेल्या व्यवस्था कशा चालतील?

थोडक्यात, स्वातंत्र्याची व्यावहारिक व्याख्या काय? शासन मजबूत असावे, सामर्थ्यवान असावे. पण ही सगळी ताकद सरकारने करावयाच्या कामांसाठीच लागावी आणि सरकारचे काम कोणते, तर जे इतर कोणाही व्यक्तीला किंवा संस्थांना करणे जमत नाही ते. किमान आवश्यकच असेल ते शासनही जास्तीत जास्त विखुरलेले आणि प्रत्येक क्षेत्राच्या स्वरूपाप्रमाणे रंगरूप धारण करणारे असावे. सत्ता नाकारल्याने अराजक होईल. तेव्हा, सत्ता असावी पण किमान विखुरलेली असावी. म्हणजे माणूस स्वत:च्या व्यक्तिमत्वाचा परिपोष आणि अधिकाधिक स्वातंत्र्याचा घेऊ शकेल याला म्हणायचे स्वातंत्र्य.

या अशा विचारसरणीस नाव कोणते द्यावे. इंग्रजी किंवा इतर पाश्चिमात्य भाषात याला ‘Liberalism’ असा शब्द वापरला जातो. त्याचा मराठी अनुवाद ‘उदारमतवाद’ असा करता येईल. म्हणजे, स्वत:चे व्यक्तिमत्व जोपासणे आणि दुसऱ्याच्या व्यक्तिमत्वाचा सन्मान राखणे, ‘तुझा विचार मला सपशेल चुकीचा वाटतो तरीही तो चुकीचा विचार मांडण्याच्या तुझ्या अधिकाराकरिता मी प्राण पणाला लावण्यास तयार आहे.’ ही ‘उदारमतवादा’ची प्रवृत्ती. पण, यातून स्वतंत्रतेच्या विचाराचे एक अंगच स्पष्ट होते. अनेकांनी अधिक समर्पक नाव शोधण्यासाठी खूप खटाटोप केले, पण काही यश मिळाले नाही.

समर्पक नाव शोधण्यात अडचण येते याचे कारण ‘स्वतंत्रता’ हा ‘वाद’ नाहीच, ती एक सम्यक् विचारसरणी आहे. कोणा माणसाच्या, समूहाच्या, समाजाच्या, वर्गाच्या, वंशाच्या, जातीच्या, लिंगाच्या दृष्टिकोनातून जगाकडे पाहण्याची दृष्टी म्हणजे ‘वाद’. अनंत, अपार, असीम जगाकडे एका छोट्याशा छिद्रातून पाहिले म्हणजे जे अपुरे दर्शन होते त्यातून एक ‘वाद’ तयार होतो आणि त्या ‘वादा’ला त्या छिद्राचे नाव मिळते. स्वतंत्रतेचा उपासकही जगाकडे त्याच्या छोट्या छिद्रातूनच पाहातो; पण आपल्या छिद्राच्या संकुचितपणाची जाणीव तो ठेवतो. आपले छिद्र अनंतकोटी

छिद्रांपैकी एक आहे. ही सर्व छिद्रे सारखीच परिपूर्ण आहेत आणि सारखीच अपरिपूर्ण आहेत. एका छिद्राने दुसऱ्या छिद्रास 'काफर' म्हणण्याचे काहीच कारण नाही, ही स्वतंत्रतेची भूमिका आहे. आपल्या वाट्याला आलेले छिद्र क्षणाक्षणाने विस्तारले पाहिजे; तरच अनंताची थोडीअधिक जाणीव होईल, ही स्वतंत्रतेची निष्ठा आहे.

ही स्वातंत्र्याची शोधयात्रा कधी संपणारी नाही. कोणा काल्पनिक, आदर्श समाजापाशी किंवा स्वर्गापाशी पोहोचून ही यात्रा थांबत नाही. स्वतंत्रतेच्या विचाराला सीमाच नाहीत. ज्याला अंत आहे त्या सांताला नाव देता येईल. ज्याला अंतच नाही त्या अनंताला नाव काय द्यावे? दार्शनिकांनी ब्रह्मतत्त्वाचे वर्णन करताना 'हे नाही, हे नाही' म्हणजे 'नेति नेति' एवढीच व्याख्या दिली. स्वतंत्रतेची व्याख्या अशीच 'नेति नेति' आहे. आजचे हे बंधन नको, ही बेडी नको. उद्याची नवी बंधनेही आम्ही झुगारू. कोणतेही मत, कोणताही महात्मा, कोणतेही पुस्तक त्रिकालाबाधित वंद्य आणि पूज्य असूच शकत नाही. जन्माच्या अपघाताने मिळालेला कोणताही गुणावगुण दंभ मिरवण्याच्या लायक नसतो. ही स्वातंत्र्याच्या उपासकाची प्रवृत्ती आहे. स्वातंत्र्याच्या कक्षा वाढवणे, संकुचितपणाचा वाढता संकोच करणे एवढीच स्वतंत्रतेची व्याख्या देता येईल.

याच तत्त्वाने जगाची निर्मिती झाली आणि उत्क्रांती चालली आहे; मनुष्य आणि समाज यांचा विकास घडतो आहे. स्वतंत्रता ही सर्व विश्वाच्या चलनवलनाचे सूत्र असे आजतरी दिसते आहे. उद्याचे काय सांगावे? मुक्तीची आस धरणारांना 'मुमुक्षु' असा शब्द आहे. प्रत्येक माणसाला 'मुमुक्षु' समजणाऱ्या विचाराचे नाव काय?

**स्वतंत्रता देशी की विदेशी?**

स्वतंत्रता म्हणजे काय आणि तिला नाव काय द्यावे याची चर्चा वर झाली. त्याची सारी भाषाच 'वेदान्ती' भासू लागते. ही मोठी विचित्रच गोष्ट म्हणायची. कारण, या वादाचे सारे मान्यवर पुरस्कर्ते पश्चिमी देशांतील आहे. ॲडॅम स्मिथपासून हायेक, फॉन मिझेस, पॉपर, फिल्डमनपर्यंत सगळी नावे तिकडचीच. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य ही संकल्पना पश्चिमी आहे. याउलट, भारतीय परंपरा आई, वडील, गुरु आणि राजा यांना मानणारी आहे, पूर्वजांची

पूजा करणारी आहे. तस्मात्, व्यक्तिस्वातंत्र्य हे परदेशी वाण आहे, ते भारतीय भूमीत रुजणे कठीण आहे असे आग्रहाने सांगितले जाते. ''कुटुंबासाठी एका माणसाचा त्याग करावा, गावासाठी कुटुंबाचा, देशासाठी गावाचा, इत्यादी इत्यादी.'' अशी भारतीय परंपरा आहे; समूह श्रेष्ठ, त्यातील सदस्य कनिष्ठ अशी येथली परंपरा आहे, असे आग्रहाने प्रतिपादन केले जाते.

या युक्तिवादात काही फारसे तथ्य नाही. 'आत्मानं सततम् रक्षेत् प्राणैरपि धनैरपि ।' असाही इथला आदर्श आहे. समूह हा धर्म-अर्थ-कामाचे साधन होऊ शकतो पण मोक्षाची यात्रा ज्याची त्याची ज्याने त्यानेच करायची आहे, अशीही येथील परंपरा आहे. किंबहुना, पिंड आणि ब्रह्मांड यांची एकता हा 'लोकायत' आणि वेदान्त तत्त्वज्ञानाचा पाया आहे. मुसलमानी आक्रमणातून आणि इंग्रजी सत्तेतून देश सावरू लागल्यावर मुसलमानी आणि ख्रिस्ती आदर्श स्वीकारणारे काही समाजधुरीण पुढे झाले. स्वामी दयानंद, विवेकानंद त्यांतले अग्रणी. सावरकर-गोळवलकरांनी हिंदु समाजाला समूहाचे रूप देण्यात धन्यता मानली. असे केल्यानेच मुसलमानी, ख्रिस्ती आव्हानाला तोंड देता येईल, अशी त्यांची धारणा. मुस्लिम आणि ख्रिस्त्यांच्या अंधानुकरणाने हिंदु समाजाला संघटित रूप देण्याकरिता प्रमाणग्रंथ आणि राष्ट-वाद तयार करून अथांग हिंदुसागराचे चांगले बांधबंदिस्तीचे तळे बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आजचे 'हिंदुत्व'वादी त्यांचेच करंटे वारसदार!

नव्या येणाऱ्या युगात ख्रिस्ती, मुसलमानी तोंडवळ्याच्या सामूहिकतेचा आणि सामाजिक बांधणीचा पाडाव निश्चित आहे आणि व्यक्ती व विश्व यांच्या प्रेरणा एकच मानणाऱ्या वेदांताचा विजय होत आहे हेही या अभागी 'हिंदुत्व'वादी हिंदुत्वद्रोह्यांच्या लक्षात येत नाही.

'स्वतंत्रतावादा'ची गंगोत्री मनुष्यजातीच्या इतिहासात भारतीय तत्त्वज्ञानात सापडते, इतकी ही अस्सल भारतीय संकल्पना आहे. तिलाच आज परदेशी वाण समजले जावे ही केवढी दुर्भाग्याची गोष्ट!

पुरातन भारतीय व्यवस्था ही 'अ-राज्यवादी' आहे. माणसाच्या वेगवेगळ्या प्रश्नांचे वेगवेगळे शासन विभागण्यात आले आहे. शस्त्राच्या साहाय्याने क्षत्रिय राज्य करतील, भिक्षा एवढाच अधिकार असलेल्या तपस्वी

ब्राह्मणांचा मान तेवढाच मोठा. अर्थार्जनात प्रभुत्व वैश्यांचे. राजाने धन जमवायचे, पण ते यज्ञात वाटून टाकण्याकरिता. शासनाच्या अशा श्रमविभागणीला येथे मान्यता होती. ती विभागणी जन्माच्या अपघाताच्या आधाराने केली गेली हे आजतरी दुर्दैवी आणि विचित्र वाटते. पण, चातुर्वर्ण्याच्या चुकीच्या पायावर का होईना, शासनाची श्रमविभागणी हे भारतीय परंपरेचे वैशिष्ठ्य राहिले आहे.

श्रमविभागणीची ही परंपरा मुसलमान आक्रमणापासून खंडित झाली. परकीय शासन अ-राज्यवादी असूच शकत नाही. आपले राज्य टिकविण्यासाठी सर्वंकष सत्ता हाती घेणे परकीय आक्रमकांना आवश्यक बनते. अ-राज्यवादाला ग्रहण मुसलमानी आक्रमणापासून लागले. इंग्रज राज्यातही ते चालू राहिले, पण इंग्रजी साहित्याच्या संपर्काने 'व्यक्ती'ला मान्यता मिळू लागली.

गांधीजींचे सगळे आंदोलनच अ-राज्यवादावर आधारलेले होते. सरकार किमान असावे अशी अगदी टोकाची भूमिका ते मांडत. हिंदुस्थानातून इंग्रजांना काढून का टाकायचे? इंग्रज गेला म्हणजे स्वातंत्र्य मिळते असे नाही. प्रत्येकाला आपल्या अनन्यसाधारण व्यक्तिमत्वाचा परिपोष करण्याची संधी देते ते स्वातंत्र्य. अशी स्वतंत्रता राजकीय पारतंत्र्यात जगूच शकत नाही म्हणून राजकीय स्वातंत्र्याचे महत्त्व. इंग्रजी अंमल संपविणे हा अ-राज्यवादातील पहिला टप्पा असल्याचे गांधीजी आग्रहाने सांगत.

दुर्दैवाने, गांधीजींचा राजकीय वारसदारच अ-राज्यवादाचा हत्यारा ठरला. पारंपरिक समाज, जात, राष्ट- असल्या समूहांना दूर करून समाजवादी राष्ट-ाचे सर्वश्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याचा नेहरूंनी प्रयत्न केला. महत्त्व व्यक्तीचे नाही, सरकार महत्त्वाचे आहे; व्यक्तीच्या प्रेरणा स्वार्थी असतात; त्यांवर मात सामूहिक नियोजनानेच करता येते असली अजागळ समाजवादी मांडणी करून शिष्योत्तमाने समूहवाद जोपासला.

समाजवादाचा पाडाव झाल्यानंतर, पुन्हा एकदा दयानंद-विवेकानंद प्रेरणेचे हिंदुत्ववादी नवा समूहवाद, शासनवाद आणू पाहात आहेत. समाजवादाची दुर्बलता त्याच्या आर्थिक कमजोरीत होती. शासनवादाला असला आर्थिक फूटपट्ट्यांचा जाच सोसणारा नाही. राष्ट-ासाठी काय करायचे

ते आम्ही राष्ट-नेते ठरविणार. त्याला रुपयापैशांच्या फूटपट्ट्या कसल्या लावता? समाजवादी समूहवादावर काही आर्थिक जबाबदाऱ्या होत्या. 'हिंदुत्वा'त समूहवाद म्हणजे निव्वळ सत्ता. त्यावर कोणते बंधन नाही; अगदी, आर्थिक अंकुशही रहात नाही. अडवानी हे या अर्थाने पंडित नेहरूंचे खरे वारसदार आहेत.

अलीकडच्या काळात समाजवादी समूहवादाला आव्हान देणारे भारतात कोणी निघालेच नाही असे नाही. लायसेन्स-परमिट-कंट-ोल राज्याविरुद्ध चक्रवर्ती राजगोपालाचारींनी बंड उभारले. नियोजनाविरुद्ध ब्रह्मानंद वकील आणि बी. आर्. शेणॉय यांसारख्यांनी सज्जड आव्हान उभे केले. शेवटी, बळीराज्याची संकल्पना मांडणारे शेतकरी आंदोलनही इथे उभे राहिले. अ-राज्यवादी, व्यक्तिस्वातंत्र्यवादी, व्यक्तिप्राधान्यवादी, स्वतंत्रतावादी विचारांची ही अस्सल भारतीय परंपरा आहे. हे परदेशी वाण नाही. हे वाण विलायती असल्याचा कांगावा करून त्याचा पाडाव करणे जमणार नाही.

खरी अडचण येते ती स्वतंत्रतावाद्यांतील आंग्लविद्याविभूषित शहरी विद्वानांची. आपले पांडित्य दाखविण्याकरिता त्यांना हायेक आणि फॉन मिझेस, पॉपर अशी नावे जिभेवर खेळवण्याचा नाद आहे. त्यामुळे, स्वतंत्रतावाद काही परदेशी फॅड आहे अशी समजूत पसरण्यास मदत होते.

(६ जुलै १९९६)

# स्वतंत्रतेची मूल्ये - लेखांक २

## निसर्गाचे कुटुंबनियोजन

'स्वतंत्रतावाद' हे काही विलायती वाण आहे ही समजूत प्रत्यक्षात किती चुकीची आहे हे स्पष्ट झाले. अशी चुकीची समजूत होण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. 'स्वतंत्रतावाद' म्हणजे बाजारपेठेवर आधारलेली व्यवस्था; 'स्वतंत्रतावाद' म्हणजे डार्विनवाद, स्वतंत्रतावाद म्हणजे इतिहासात बदनाम झालेला 'लेसे फेअर'वाद (ज्याला त्याला ज्याच्या त्याच्या मर्जीप्रमाणे करू देणे किंवा 'अ-हस्तक्षेप'वाद); थोडक्यात, स्वतंत्रतावाद म्हणजे भांडवलवादी साम्राज्यशाहीची पहिली पायरी असाही समज होतो. हा गैरसमज सर्वदूर पसरलेला आहे. 'डार्विनवाद', 'अ-हस्तक्षेपवाद', किंवा भांडवलवाद-साम्राज्यवाद हे सारेच विलायती उपजेचे. त्यामुळे स्वतंत्रतावाद हे काही देशी पीक नाही, ते येथे रूजू शकणार नाही, भारतासारख्या देशात 'नायकप्रधान' पूर्वजांची पूजा बांधणारा विचार किंवा व्यवस्थाच मूळ धरू शकेल या समजाला पुष्टी मिळते.

## तगेल तो जगेल

स्वतंत्रतावादाविरुद्धचे हे आरोप, खरे म्हटले तर, निव्वळ शिवीगाळ आहे. डार्विनवाद म्हणजे काय? जड पदार्थातून सजीव प्राण्यांना लागणारे मूलभूत रसायन हजर झाले की सजीव प्राण्यांचे विविध प्रकार प्रजोत्पादनाच्या पिढ्यांमागून पिढ्यात संख्याशास्त्रीय नियमानेच तयार होतात. कालाच्या प्रवाहात किरणोत्सर्गी पदार्थांच्या अपघाताने काही वेळा अचानक आणि विचित्र असे बदलही होऊ शकतात. पण विविधता ही निसर्गसिद्ध आहे. जन्माला आलेल्या विविध प्राण्यांतून सगळेच टिकून राहणे अशक्य आहे. कारण, एवढ्या सगळ्यांचा भार पेलणे पृथ्वीस शक्य नाही. सर्व सजीवांच्या सर्वच इच्छांची पूर्ती करायची म्हटले तर पृथ्वी चटणीलासुद्धा पुरणार नाही. अनेकांच्या इच्छा अनेक आणि त्या पुऱ्या करण्याची साधने मात्र मर्यादित. अशा परिस्थितीला तोडगा काय?

पहिला तोडगा निसर्गच काढतो. पृथ्वीवरील साधने संपादण्यात, वापरण्यात काही विशेष सामर्थ्य, कौशल्य दाखवणारे सजीव आपले स्वतःचे रक्षण करू शकतात, पोषण करू शकतात, प्रजोत्पादन करू शकतात.

थोडक्यात, ते तगून राहू शकतात. ज्यांना हे जमत नाही ते ना स्वत:चा बचाव करू शकतात, ना पोट भरू शकतात. मग अशांची प्रजा निपजणार कशी आणि निपजली तरी टिकणार कशी? जे परिस्थितीवर मात करतात ते टिकतात, जे टिकू शकत नाहीत ते संपतात. जगण्यासाठीचा हा संघर्ष म्हणजेच निसर्ग. यात काही क्रौर्य नाही; अ आणि ब दोघेही टिकणे शक्य नाही; दोघांपैकी एकाला संपले पाहिजे. कोणी संपायचे हे निसर्ग ठरवतो. यात क्रूरता काहीच नाही. कोणी काहीही, कितीही म्हटले तरी सर्वच विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी देऊन किंवा प्रथम क्रमांक देऊन पास करणारी शिक्षणव्यवस्था असूच शकत नाही. काही एका फूटपट्टीने मोजमाप करून श्रेण्या लावण्याखेरीज गत्यंतरच नाही. पहिला आलेला विद्यार्थी सर्वात बुद्धिमान, सर्वात कष्टाळू, सर्वश्रेष्ठ असतोच असे नाही. एका काळी, एका जागी, एका फूटपट्टीने तो इतरांपेक्षा वरचढ ठरतो, एवढेच काय ते! उच्च शिक्षणासाठी प्रवेश किंवा नोकरीत प्रवेश यांच्या शक्यता मर्यादितच असणार. म्हणजे, त्यासाठी निवड करावीच लागणार आणि निवड करायची म्हटली की नाही तरी फूटपट्टी हवीच.

**निसर्गाची निवड**

माणसांच्या समाजात ही निवड आपापल्या सोयीची व्हावी यासाठी सगळेचजण धडपड करतात. भटशाहीत, वरच्या समाजात जन्मला या जन्मसूचीचा फायदा घेतला जाई; सगळ्या शिक्षणाचे स्वरूप 'ब्राह्मणी' करून इतर जातीयांना मागे टाकले जाई. बहुजन समाजाचे राज्य आल्यावर त्या समाजातील लोकांना वेगवेगळ्या क्षेत्रात पुढे काढण्यासाठी 'बहुजनसमाजी साधने' वापरात आली. सामाजिक न्यायाच्या घोषात जन्मसूचीऐवजी जन्मदलिताला प्राधान्य देण्याची टूम निघाली.

माणसाने केलेली निवड म्हटली की त्यात अशी ढवळाढवळ असतेच. पृथ्वीवरचा न्याय आणि देवाच्या दरबारातील चित्रगुप्ताचा हिशोब यात फरक राहणारच. चित्रगुप्ताचा असा काही सर्वसाकल्याने विचार करणारा हिशोब आणि अहवाल ही एक कल्पना आहे. कोणाही माणसाची अशी सर्वांगीण चाचणी होऊच शकत नाही. सर्वतोपरी परिपूर्ण अशी चाचणी माणसाला करणे अशक्य आहे. जास्तीत जास्त काय होईल? निवडीत कोणाचाही हस्तक्षेप कमीत कमी रहावा, म्हणजे जाणूनबुजून केलेली ढवळाढवळ किमान राखावी

एवढेच माणसाला शक्य आहे. थोडक्यात, निसर्गाच्या निवडीपेक्षा अधिक कार्यक्षम निवड या मर्त्यलोकात तरी असंभव आहे.

काही प्राण्यांत आईच आपल्या पिलांना खाते. पिलांची संख्या जास्त झाली, त्यांना सगळ्यांना पाजता येणार नाही, आईची ताकदच कमी पडू लागली की आपल्याच पिलावळीतील काहींचा चट्टामट्टा करणाऱ्या प्राण्यांच्या जाती अनेक आहेत. निसर्गमाता असेच काहीसे करते. जन्माला आलेले सर्व प्राणिजात आणि त्यांच्या जाति टिकून राहिल्या पाहिजेत असा पर्यावरणवादी प्रयत्न निसर्ग करताना कधी दिसत नाही. दररोज असंख्य जाती तयार कराव्या आणि दररोज असंख्य जाती नष्ट कराव्या हा निसर्गाचा खेळच आहे; त्यात दुष्टता काहीच नाही.

असमर्थांना संपवायचे नाही म्हटले तर पर्याय एकच उरतो; तो म्हणजे समर्थांना संपविणे. समर्थांना संपविण्यास समर्थ असलेली तरसत्ता असली तर काही काळ, कदाचित, समर्थांना चेपून असमर्थांना तगवता येईल, पण हा असला 'अव्यापारेषु व्यापार' फार काळ चालणार नाही.

गोसंवर्धन केवळ गोहत्याबंदी केल्यामुळे होत नाही. किंबहुना, सगळ्यात चांगले गोसंवर्धन करण्यासाठी गोवंशाचे कुटुंबनियोजन आणि हत्या आवश्यक आहे; हे अनुभव सांगतो. जेवढी मुले जन्माला येतील तेवढ्यांना जगू द्यायचे म्हटले तर तो भार असह्य होईल. तेव्हा, कुटुंबनियोजनाची गरज आहे हे आता सर्वसामान्यांनाही उमजू लागले आहे. आपण कुटुंबनियोजन केले नाही तर लढाया, दुष्काळ, रोगराई आणि साथी अशी हत्यारे वापरून निसर्ग आपोआप कुटुंबनियोजन करून टाकतो. डार्विनच्या उत्क्रांतीच्या सिद्धांतात 'सुयोग्य' टिकून राहतात. हा सिद्धांत निसर्गाच्या कुटुंब-नियोजनाचा नियम आहे. त्यात दुष्टता कसली?

### निसर्गाचे अनुकरण

डार्विनवादाचा विचार करताना आणखी एक गैरसमज दूर केला पाहिजे. 'सुयोग्य ते' टिकतील याचा अर्थ 'दांडगे' टिकतील, दुष्टांचा विजय होईल, बलिष्ठ तेवढे जगतील असा मुळीच नाही. माणसापेक्षा; एवढेच काय; हत्ती, गेंडे, देवमासे यांच्यापेक्षाही अवाढव्य आकाराचे आणि ताकदीचे प्राणी पृथ्वीतलावरून नष्ट झाले. हरणाचे चापल्य, चित्त्याची लवचिकता, वाघाचे

शौर्य, गरुडाची आकाशात झेप घेण्याची ताकद या सगळ्यांना बाजूला सारून, यातील प्रत्येक गुणात त्या त्या प्राण्यापेक्षा कितीतरी कमी असलेल्या माणसाने विजय मिळविला. विजय ताकदीचा झाला नाही. माणूस टिकून राहिला याचे कारण वेगवेगळ्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचे सामर्थ्य त्याला लाभले. आपल्या बुद्धीचा उपयोग करून, पोटापाण्याच्या गरजा भागवून; साधने आणि संघटना तयार करण्याच्या त्याच्या कसबामुळे माणूस श्रेष्ठ ठरला. निसर्गात माणसाने विजय मिळवला याचे कारण निसर्गापासूनच त्याने धडा उचलला; विविधता जोपासावी आणि त्यातून 'सुयोग्या'ची निवड करावी हा निसर्गनियम माणसाने उचलला म्हणून तो टिकला आहे. आपले निवडीचे स्वातंत्र्य सतत विस्तारत ठेवण्याच्या ध्यासाने/आकांक्षेने मनुष्य श्रेष्ठ ठरला!

डार्विनवादात 'बलिष्ठ ते टिकतात' अशी कल्पनाच नाही. स्वतंत्रता जोपासणारे टिकतात आणि बंधनापुढे मान तुकवणारे संपतात, एवढाच डार्विनवादाचा मतितार्थ आहे. स्वतंत्रतावादाला डार्विनवाद म्हणताना उपहासाचा सूर लावणाऱ्यांना डार्विन समजला नाही, स्वतंत्रतावादही समजला नाही आणि माणूस तर त्याहून समजला नाही.

अर्थव्यवस्था म्हणजे तरी निसर्गाचाच एक टप्पा. निसर्गात जो नियम लागू तोच येथेही लागू. पृथ्वीवर माणसाला लागणारे हवा, पाणी, जमीन, अन्न, निवारा यांत हिस्सा मागू इच्छिणारे सर्व प्राणिजात उत्क्रांतीच्या प्रवाहात संपून गेले तरी टिकून राहिलेल्या माणूस जातीतील सर्वांच्या गरजा, तहान, भुका आणि इच्छा पुऱ्या करण्याससुद्धा धरती असमर्थ आहे. प्रत्येक माणसाच्या इच्छा अनेक. त्यांचे समाधान होते ना होते तोच नव्या गरजा आणि इच्छा तयार होतात. अनंत अपार इच्छा, आकांक्षा, लालसा आणि त्या भागविण्यासाठी लागणारी पृथ्वी मात्र सीमित आणि मर्यादित. इच्छा अनेक, साधने थोडी! तेव्हा वेगवेगळ्या इच्छाआकांक्षात प्राधान्य कोणाला द्यायचे, कोणती गरज पहिल्यांदा भागवायची, कोणती नंतर याचा निर्णय केला पाहिजे. काही गरजा, इच्छा दाबून टाकल्या पाहिजेत; बाकीच्यांचे होईल तितके समाधान केले पाहिजे. त्यासाठी, उत्पादित केलेली साधने जास्तीत जास्त कार्यक्षमतेने वापरली पाहिजेत. असीम इच्छा आणि सीमित साधने यांची कार्यक्षम जोडणी हाच तर अर्थशास्त्राचा विषय आहे.

अशी जोडणी जीवशास्त्राच्या क्षेत्रात निसर्गाने केली. अर्थशास्त्रात ते शक्य आहे काय? जी काही थोडीफार साधने असतील ती आपल्या हाती यावी किंवा आपल्या जवळच्यांच्या हाती यावी यासाठी जो तो खटाटोप करतो. काही खुळे कष्ट करून पीक काढतात, काही दुसरे घाम गाळून जगण्याची इतर साधने तयार करतात. खास हुशार आणि चलाख माणसे आपला घाम गाळण्याऐवजी दुसऱ्यांचे रक्त सांडणे पसंत करतात; दुसऱ्यांनी पिकवावे आणि तलवारीच्या, बंदुकीच्या जोरावर ते हस्तगत करावे हा त्यांचा कायमचा खाक्या. 'बळी तो कान पिळी' असे आजपर्यंत चालले. बळीचे रूप बदलले. बळीराजाला जमिनीत गाडून बलशाली पुढे सरसावले. धर्माच्या आधाराने काहींनी तलवार चालवली. काहींनी राजेशाहीच्या नावाने, काहींनी साम्राज्याच्या नावाने, काहींनी राष्ट-वादाच्या नावाने. अर्थव्यवस्थेत प्रत्येक माणसाला किंवा समाजाला त्याच्या गरजा भागवण्यापोटी काय आणि किती मिळावे याचा निर्णय आजपर्यंत तलवारीच्या धारेवर झाला. दुष्ट मातले आणि कष्ट करणारे झिजत मेले. कष्टकऱ्यांचा झेंडा उभारणाऱ्या समाजवाद्यांनी साधनांच्या वाटपाकरता पूर्वापारप्रमाणेच तलवारच वापरली; थोडी वेगळ्या शैलीने आणि धाटणीने, एवढाच काय तो फरक!

चमत्कार असा की, या तलवारधारी क्रूरकर्म्यांचा डायनासॉरप्रमाणेच समूळ उच्छेद होण्याची वेळ आली आहे. ताकदवान असेल पण ते सुयोग्य साधन नाही. तलवारीने जगणारे समृद्ध झाले तर घाम गाळणाऱ्यांना काय उमेद राहील, त्यांनी धीर सोडला तर साधनांची विविधता जोपासली कशी जावी आणि साधनांचा उपयोग व्हावा कसा? आणि हे जमले नाही म्हणजे अर्थव्यवस्थेचा सारा डोलाराच कोसळून पडेल. अर्थशास्त्रातील तलवारीचे स्थान आता संपत आले आहे. तलवारीच्या आधाराने उभ्या राहिलेल्या धर्मसंस्था, राज्यसंस्था आता भुईसपाट होऊ लागल्या आहेत. विविधता तयार करणारा उत्पादक आणि त्याचा उपभोग घेणारा ग्राहक ही एकाच व्यक्तीची दोन अंगे आहेत. माणसाने उत्पादन करावे, ते जगासमोर ठेवावे, जगाच्या नजरेत त्याच्या या नजराण्याचे जे काही मोल असेल त्याप्रमाणे उत्पादकाला मोबदला मिळावा, यात कोणाचाच हस्तक्षेप असू नये अशी अर्थव्यवस्था 'स्वतंत्रतावाद'

मानतो. यात 'बळी तो कान पिळी' नाही; यात 'बळीराज्य' आहे.

सरकारी हस्तक्षेप नसावा खुली बाजारपेठ असावी, त्यातूनच सीमित साधनांचा असीम इच्छा आकांक्षांच्या पूर्तीसाठी कार्यक्षम प्रयोग होईल, हे 'स्वतंत्रतावादा'चे फक्त एक अंग आहे. अर्थकारण म्हणजे सगळे जीवन नाही. आयुष्यात भाकरीचे महत्त्व आहे, पण भाकरी म्हणजे आयुष्य नाही. माणसाच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहेत. आसपासचे जग न्याहाळावे; निसर्गाचा खेळ समजून घ्यावा अशी ज्ञानसंपादनाची त्याला ओढ आहे. आपल्यातील कमनशिबी गरीबगुरीबांना, अपंगांना साहाय्य करावे अशी करुणाबुद्धीही माणसात उपजू शकते. आपल्या मनातील विचार वाचेने, शब्दाने, कुंचल्याने, सरगमच्या साहाय्याने व्यक्त करावे यात त्याला परमानंद होतो. तलवारीने केवळ भाकरीचीच अर्थव्यवस्था नासवली असे नाही तर ज्ञान, करुणा, अभिव्यक्ती अशा सगळ्या क्षेत्रांचा खराबा करून टाकला. 'स्वतंत्रतावाद' म्हणजे केवळ स्पर्धेवर आधारित बाजारपेठेची व्यवस्था नाही. बाजारपेठ हे स्वतंत्रतावादाचे फक्त एक अंग आहे. येथे कोणाचेच राज्य नाही, येथे राज्य फक्त ग्राहकांचे, म्हणजे खरीखुरी लोकशाही. या भाकरीच्या क्षेत्रात, त्याखेरीजच्या प्रत्येक क्षेत्रात काही वेगळीवेगळी व्यवस्था स्वतंत्रतावाद मानतो. कायदा व सुव्यवस्था राखणारे समर्थ शासन असावे; दीनदुबळ्यांना, अपंगांना हात देणाऱ्या करुणेवर आधारलेल्या संस्था असाव्यात, कलावंतांची आपापली सरकारे असावीत, विद्वानांच्या सार्वभौम वेगळ्या पंडीतसभा असाव्यात. 'स्वतंत्रतावाद' हा विविधतेला मानणारा आहे.

**प्रवाह अडणारा नाही**

स्वतंत्रतावाद म्हणजे 'लेसे फेअर', थोडक्यात, 'मन:पूतम् समाचरेत्' अशी हेटाळणी करणाऱ्यांच्या मनात एक ठाम कल्पना रुजलेली असते. 'आपोआप कोणतीच गोष्ट सुरळीतपणे होत नाही. कोणी कर्ता असेल तर काहीतरी ठीक होण्याची शक्यता आहे, एरव्ही नाही. सगळे जग सुरळीतपणे चालले आहे, कारण वर आकाशात देव आहे' असे मानणाऱ्यांचीच ही शाळा. तप्त, लालबुंद झालेला ज्वालामुखी ओतणाऱ्या पृथ्वीच्या गोळ्यातून केवळ निसर्गक्रमाने मनुष्यप्राणी आपली संस्कृती उभी करू शकतो हा चमत्कार डोळ्यासमोर असतानाही निर्मिकाची परमेश्वरी कल्पना का मांडली जाते? प्रत्यक्ष कोणी निर्मिक असला तरी तो काही आपला दावा मांडायला

येणार नाही याची बालंबाल खात्री असल्याने निर्मिकाचे नाव सांगावे आणि आपल्याच हाती सत्ता घ्यावी असा हा डाव आहे.

उरलीसुरली शिवी म्हणजे 'स्वतंत्रतावादा'ला भांडवलवादी म्हणणे. भांडवलवाद ही मार्क्सवाद्यांनी शंभर वर्षे वापरलेली शिवी आहे. सरकारने अर्थव्यवस्था सांभाळावी, ती बाजारपेठेवर अवलंबून ठेवली तर उत्पादन थंडावते असले बाष्कळ अर्थशास्त्र समाजवाद्यांनी मांडले. शंभर वर्षे त्यांची सद्दी चालली. समाजवादाचा डोलारा कोसळला तरी भांडवलशाही हा शिवीशब्द जनसामन्यांच्या शब्दकोशातून दूर झालेला नाही.

वस्तुत:, 'स्वतंत्रतावाद' आणि 'भांडवलवाद' यात काही साम्य नाही; उलट 'भांडवलवाद' आणि 'समाजवाद' हे सख्खे नसले तरी चुलत, मावसभाऊ आहेत.

मनष्यप्राण्यांची पहिली संस्कृतीस्थाने उभी राहिली ती मोठ्या नद्यांच्या वळणावरील सुपीक गाळपेराच्या जमिनीत. सुपीक जमीन, मुबलक पाणी या निसर्गाच्या आधाराने सर्वात पहिल्या मानवी समाजाच्या रचना झाल्या.

त्यानंतर, कष्ट करणारा माणूस किंवा तलवार चालवणारा शिपाई; साधनांची मुबलकता वाढवण्यात अग्रेसर ठरले. श्रमसंस्कृती निसर्गदत्त मुबलकतेवर आधारलेल्या समाजावर मात करून गेल्या.

यानंतर, अन्नाच्या वरकड उत्पादनातून माणसाने साधने उत्पन्न केली आणि यंत्रसामुग्री, तंत्रज्ञान, भांडवल ही राष्ट-ांची शक्तिस्थाने ठरली. या कालखंडात खुल्या बाजारपेठेवर भांडवल उभारणी करणारे समाजही झाले आणि शासनाच्या हाती सर्व सत्ता देणाऱ्या समाजवादी व्यवस्थाही झाल्या.

'स्वतंत्रतावादा'चा पाया या तीन कालखंडांतील कोणत्याही संस्कृतीत नाही. 'स्वतंत्रतावादाचा' कालखंड आणि व्यवस्था आताशी कोठे क्षितीजावर उदय पावत आहे. स्वतंत्रतेच्या व्यवस्थेत महत्त्व पंचमहाभूतांना नाही; श्रमाला नाही; भांडवलाला नाही; महत्त्व आहे ते या सर्वांचा संयोग घडवून आणणाऱ्या उद्योजकाला, संशोधकांना, धडाडी दाखवून उद्योगव्यापार उभे करणाऱ्यांना. 'स्वतंत्रतावाद' 'भांडवलवादी' नाही; 'उद्योजकतावादी' आहे.

'स्वतंत्रतावाद' विलायती वाण नाही. डार्विनवादी, मन:पूतवादी, भांडवलवादी या साऱ्या परदेशी शिव्यांची खैरात त्याला लागूच पडत नाही.

# स्वतंत्रतेची मूल्ये - लेखांक ३

## आध्यात्मिक नव्हे, ऐहिक साधना

स्वतंत्रता कोणा एका देशाची जायदाद नाही; मन:पूतवाद व भांडवलवाद आणि स्वतंत्रतेच्या आकांक्षांचा काही संबंध नाही हे स्पष्ट झाल्यावरही आणखी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करायला पाहिजे – स्वातंत्र्याची आकांक्षा ही काही आध्यात्मिक चैतन्यवादी प्रेरणा नाही.

## स्वातंत्र्याचा अवधूती आविष्कार

देशासाठी किंवा अन्य ध्येयासाठी गजाआड तुरुंगात कोंडलेल्या कैद्यांनी अनेक काव्यांतून आपले मनोगत व्यक्त केले आहे. आमच्या शरीराला अडकवून ठेवाल, हातपाय बेड्यांनी जखडून ठेवाल; पण आमचा आत्मा, आमचे मन जगभर भराऱ्या घेण्यास मोकळे आहेत, ते तुरुंगाच्या भिंती ओलांडून विश्वसंचार करू शकतात इत्यादी इत्यादी.

शरीर बंधनात असले म्हणजे शरीर आणि मन यांच्यात काही द्वैत आहे असा आभास म्हणा, भास म्हणा, तयार होतो. अनेक तत्त्वज्ञांनी शरीर आणि आत्मा यांच्यातील भिन्नता आग्रहाने मांडली आहे. शरीर हे खोटे आहे, माया आहे, आभास आहे; शेंबडात माशी अडकून पडावी तसे आत्मा या मायाजालात अडकून पडला आहे; त्यातून सुटण्याची आत्म्याची धडपड आहे; एका जन्मात हे साध्य झाले नाही तर जन्मजन्माच्या तपश्चर्येने जडाच्या बंधनातून मुक्त व्हावे, मोक्ष मिळावा अशी आत्म्याची धडपड चालू असते. ही अशी अध्यात्मवादाची किंवा चैतन्यवादाची मांडणी सहस्रावधी वर्षे राहिली आहे.

आत्मा विशुद्ध स्वरूपात सर्वज्ञ आहे; त्यावरील जड शरीराच्या आवरणाने अज्ञान तयार झाले आहे. शरीररूपी छिद्रातून सत्याचा वेध घेण्याचा प्रयत्न विफल राहणार, तेव्हा काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षडि-पूंच्या तावडीतून शरीराची मुक्तता केली की मोक्ष प्राप्त झाला; या अशा स्वातंत्र्यासाठीची धडपड हा सगळ्या विश्वाच्या इतिहासाचा खराखुरा अन्वयार्थ आहे ही चैतन्यवादाची मांडणी आहे. मोक्षाची धडपड आणि स्वतंत्रतावादाची धडपड यात सरेआम गल्लत झाली आहे.

चांगले जगावे, चांगले खावे, चांगले प्यावे, मुलाबाळांचे कोडकौतुक

करावे, प्रियजनांचे आराधन करावे, त्यांची मने जिंकण्यासाठी निसर्गदत्त आणि स्वकष्टार्जित सारे वैभव त्यांच्या पायांशी घालावे; मुबलकता असावी, विपुलता असावी अशी सर्वसामान्य जनांची साहजिक इच्छा असते. पण संरक्षण, पोषण आणि प्रजोत्पादन यांकरिता जगणारी माणसे म्हणजे निव्वळ शेणातले किडे; मोहपाशात आकंठ बुडालेले; यांना स्वातंत्र्याची चव कोठून कळावी? सर्व संसाराचा त्याग करून भगवी छाटी गुंडाळून हिमालयात किंवा दुसऱ्या कोणत्यातरी रम्य जागी – जिथे कंदमुळे, फळे इत्यादींवर कष्ट न करता गुजारा होईल अशा जागी रहावे म्हणजे स्वातंत्र्याचे निर्वाणमोक्ष मिळते, ब्रह्मप्राप्ती होते, विश्वाचे गूढ उलगडते असे चैतन्यवाद्यांनी मांडले.

राजकीय, सामाजिक, आर्थिक वास्तव कसे का असेना, सन्यस्त वैराग्याला त्याचे काय देणे घेणे? खऱ्याखुऱ्या व्यक्तिगत स्वातंत्र्यमोक्षासाठी काही ऐहिक पाया आवश्यक आहे असे या अवधूतांना मान्यच नाही. नेवाशाच्या शेजारील देवगिरीच्या रामदेवरायाने काकाचा वध करून सत्ता मिळविली आणि दूरच्या दिल्लीश्वर अल्लाउद्दिनाने देवगिरीची वाताहत केली त्याचा 'योगियांच्या राजा'वर काहीसुद्धा परिणाम झाला नाही. पुणतांब्यांच्या चांगदेव महाराजांचे गर्वहरण करण्याइतकेसुद्धा महत्त्व अल्लाउद्दिनाच्या स्वारीला त्यांनी दिले नाही. 'नेवाशापरतें आळंदी बरें' एवढा व्यावहारिक निर्णय मात्र त्यांनी घेतला!

बहामनी राज्याच्या पुंडांनी वारंवार सारी गावे लुटून नेली, त्यात विक्राळ दुष्काळ पडला, तुकारामाची पहिली बायको अन्नान्न करीत मेली, पण मोक्षमार्गाच्या यात्रिकाची प्रतिक्रिया 'बाईल मेली, बरे झाले', विठोबाचे नाव घेण्यास आपण मोकळे झालो अशी होती.

अशा तऱ्हेने योगसिद्धी प्राप्त झालेल्यांनी, त्यांना काय सर्वज्ञान झाले आणि ब्रह्म आकळीले ते आम्हा संसारी जनांसाठी सांगून ठेवले नाही. आपणच मिळविलेले ज्ञान, आपणच त्याची द्वाही फिरवायची, आपणच पेटंट घ्यायचे आणि एक दिवस निघून जायचे असा हा स्वतंत्रतेचा अवधूती आविष्कार!

**सांसारिकांचा व्यवहारवाद**

असले अवधूती स्वातंत्र्य आपल्याला झेपणारे नाही, पचणारे नाही,

परवडणारे नाही हे संसारी जनांना स्पष्टच होते. म्हणून त्यांनी नागड्याउघड्या, घाणीत लोळणाऱ्या, वेड्यासारखे बडबडणाऱ्या अवलियांचे कौतुक केले, पण भक्तीची तहान भागविण्याचे एक साधन या पलीकडे व्यवहाराच्या कामी त्यांचा फारसा उपयोग नाही, किंबहुना त्यांची सगळी आराध्य दैवतेही अगदीच निकामी याची त्यांना पूर्ण जाणीवही होती. देव प्रसन्न झाला तर कमाल कमाल म्हणजे तो कबीराचे शेले विणतो, कुणाची धुणी धुवून देतो, भांडी घासून देतो, दळण दळून देतो; भूतदयेपोटी सरकारी गोदामे लुटू देणाऱ्या दामाजीसाठी बादशहापुढे जोहार घालतो. पण या असल्या चमत्कारांनी रोजची भूक भागत नाही हे संसारी जनांनी बरोबर ओळखले. त्यामुळे, अवलियांना साष्टांग दंडवत घालावे आणि एरवी सगळा वेळ संसाराच्या विवंचना निपटण्यात काढावा, तो क्रम चालत राहिला.

**स्वातंत्र्य-मोक्ष गल्लत**

स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान मांडणाऱ्यांनी मग आपल्या भूमिकेत थोडा कावेबाजपणा केला. 'जोडोनिया धन, उत्तम व्यवहारे' असे तुकासुद्धा म्हणाला. 'प्रपंच करावा नेटका' आणि पहिले धर्मकारण असले तरी दुसरे तरी राजकारण असावे हे रामदासांनी स्पष्ट केले. साऱ्या जगभरच्या विचारात एक मोठा बदल घडून आला. सुलतानशाहीच्या अरेरावीत माणसाने मनाचे स्वातंत्र्य प्राणपणाने जपून ठेवावे किती आणि कसे? फाटकी वस्त्रे नेसलेल्या आपल्या पत्नीच्या पदराशी लटकून पोरे भूकभूक करीत आहेत हे चित्र डोळ्यासमोर आले की 'मनस्वी पूंमान्'सुद्धा तोंडातून शब्द फुटत नसता 'देहि देहि' म्हणून भिक्षा मागायला तयार होतात. समाजातील रूढीच्या बंधनाने, आपल्या पोटच्या कोवळ्या वयातील मुलीचे कपाळ पांढरे झाल्यावर तिचे केस कापून तिला विद्रूप करून खाऊ मागण्याच्या वयातच उपासतापास करावयास लावणे भाग पडते हे टाळता येत नाही.

राजकीय, सामाजिक, आर्थिक बेड्या तोडून जंगलात जाणे आणि हिमालयात जाणे ही क्वचित् एखाद्याची खरीखुरी मोक्षसाधना असेल; पण त्यात पळपुट्या भेकडांची सोय अधिक आहे हे स्पष्ट होऊ लागले तसतसे राजकीय, आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्य या आध्यात्मिक स्वातंत्र्याच्या आणि मोक्षाच्या पायऱ्या आहेत, मुमुक्षूंनी या पायऱ्या ओलांडल्या पाहिजेत असे

आध्यात्मिकांनी म्हणायला सुरूवात केली. स्वातंत्र्य आंदोलनातील बॉम्ब खटल्यातील आरोपी अरविंद घोष मोक्षाचे खरे अधिकारी ठरतात; आणि गांधींसारखा महात्मा देशाच्या स्वातंत्र्यासाठी मिठाची चिमूट उचलण्याचा 'अव्यापारेषु व्यापार' करायला सरसावतो; शेवटी उद्दिष्ट तेच; धार्मिकांनी, अध्यात्मिकांनी मांडलेले; शरीराच्या तुरुंगातून आत्म्याला मुक्त करण्याचे. पण मोक्ष साधनेच्या मार्गातील प्राथमिक अडचणी म्हणजे राजकीय, सामाजिक, आर्थिक, अन्याय, जुलूम, गुलामगिरी, स्वातंत्र्याच्या आकांक्षेचा मूलाधार आध्यात्मिक मोक्ष आहे अशी सार्वत्रिक समजूत आहे. स्वतंत्र पक्षाचे संस्थापक चक्रवर्ती राजगोपालाचारी; त्यांचे निकटचे कन्हैयालाल मुन्शींसारखे सहकारी ही सर्व माणसे धार्मिक प्रवृत्तीची. याचा एक दुष्परिणाम असा झाला की स्वतंत्रतावादी तेवढे सारे पुराणमतवादी, उजव्या विचारांचे अशी एक पक्की समजूत होऊन बसली.

ऐहिक बेड्या तोडून मोक्ष साधना करणाऱ्या मुमुक्षूंनी सांसारिक गुलामगिरी तोडण्याचे प्रयत्न पूर्वअट म्हणून करावे आणि त्यांचे त्यांचे स्वतंत्रतेचे वेगळे तत्त्वज्ञान उभे करावे यात काही आपत्ती नाही; पण स्वतंत्रतेचे सर्व चाहते मोक्षमार्गीच असले पाहिजेत, किंबहुना मुमुक्षूंखेरीज स्वातंत्र्याची तहान दुसऱ्या कुणाला खऱ्या अर्थाने असू शकतच नाही; असे म्हणणे अतिरेकी होते. सर्वच स्वतंत्रतावादी 'मुमुक्षू' ही उपाधी सन्माननीय पदवी म्हणून स्वीकारणार नाहीत, काहींना तर ती अभद्र शिवीही वाटण्याची शक्यता आहे.

**आचरट अध्यात्म**

आत्मा म्हणजे काही चैतन्यमयी ज्योत आहे, ती शरीराच्या कपाटात कोंडलेली असते आणि जन्मापासून मृत्यूपर्यंत ती जशीच्या तशी राहते, तीत काहीच बदल होत नाहीत, काय बदल होतील ते शरीरात होतात आणि शरीर मृत्यू पावले की हे चैतन्य उडून पुन्हा दुसऱ्या देहाच्या पिंजऱ्यात जाऊन बसते हा आचरट अध्यात्म आहे. पूर्वासूरींच्या महामुनींनी प्रतिपादन केलेल्या सूत्रांचा हा भ्रष्ट आविष्कार आहे. कर्मकांडावर आपली दिनचर्या चालावी अशा सोयीने पोटभरू धर्मव्यावसायिकांनी हेतुपूर्वक घडवून आणलेला हा गोंधळ आहे. शुद्धस्वरूपी अध्यात्माचा अर्थ असा नाहीच.

पदार्थविज्ञान शाखेचा एक नियम असा आहे की कोणतीही वस्तू मुळातून नष्ट होत नाही, तिचे फक्त रूप बदलते. उष्णतेची आच लावली तर बर्फाचे पाणी बनते, पाण्याची वाफ बनते, वाफेलाही अधिक उष्णता दाब देता आला तर आणखी काही वेगळे रूपांतर होऊ शकेल. अवयवांना जाणवणारे रूप म्हणजे शरीर बदलले तरी अणुपरमाणू तेच राहिले. त्यांचा विस्फोट झाला तर प्रचंड संहारक शक्ती किंवा ऊर्जा प्रकट होते. अशा विस्फोटाची शक्यता बाजूला ठेवली तर अवकाश व्यापणारी वस्तू अमर असते. 'अविनाशी ते आहे, ज्याने हे सर्व व्यापले आहे' ही उपनिषदांतील आणि वेदांतील अनंत तत्त्वाची व्याख्या आहे. हे शुद्ध विज्ञान आहे. शरीराच्या कपाटात कोंडून ठेवलेल्या प्राणरूपी पक्ष्याच्या आचरट अध्यात्माला येथे काहीच वाव नाही.

**स्वातंत्र्य - कष्टप्रद यात्रा**

आत्मा म्हणजे मीपण. मी एका बाजूला आणि दुसरे एका बाजूला सारे विश्व अशी धारणा. असा आत्मा अणुरेणूंपासून सूर्यमालिकांच्या समुच्चयांपर्यंत सर्व वस्तूंच्या बांधणीत असतो आणि शरीर असणे हा मीपणाच्या जाणिवेचा गुणधर्म आहे. शरीराच्या विकासाबरोबर बुद्धीचा विकास होतो, वेगवेगळ्या पातळींवरील मनांचा विकास होतो आणि या सर्वांवर मी विरुद्ध विश्व या आत्मभावनेची देखरेख असते. सम्यक् सत्याचा साक्षात्कार मायेची बंधने दूर केली म्हणजे आपोआपच होतो या कल्पनेतील बाष्कळता आता स्पष्ट होईल. सम्यक् सत्य या क्षेत्राचा अधिकारी कोणी असेल किंवा नसेल हा वादाचा मुद्दा थोडा बाजूला ठेवावा. पण असा विश्वरूप पुरुष सोडल्यास आपण सर्व सीमीत क्षेत्रांचेच अधिकारी आहोत; आपल्याला इंद्रिये पाचसहाच, त्या इंद्रियांची झेप मर्यादित आणि त्यांचा मुख्य हेतू संरक्षण, पोषण, आणि प्रजनन; विश्वाचे अवगाहन हा नाही. देहाच्या धिक्काराने ज्ञान वाढत नाही. देहाचे सामर्थ्य आणि आवाका वाढवल्याने कदाचित् काही कणमात्र फरक पडण्याच्या संभावनेचा एक किरकोळ आशाकिरण असू शकतो. कणाकणाने, क्षणाक्षणाने ज्ञानकण जमवावेत, तर्काच्या कसोटीवर घासून पुसून त्यांचा काही अर्थ लावावा; काही अर्थ लागला तर आनंद मानावा. नवीन अनुभवातून जुन्या अर्थाचे अपुरेपण जाणवले म्हणजे पोटच्या पोराला उखळात घालून कांडण्यासारख्या वेदना सहन करून नव्याने काही अर्थ

लागतो काय ते शोधण्याच्या धडपडीस लागावे. भारंभार पुरावे असले तरी आपल्या सिद्धांतांबद्दल साशंक रहावे. किरकोळ पुराव्याच्या आधाराने निश्चित मते बनवून त्यासंबंधी अंधश्रद्धा तयार करण्याचा मोह टाळावा अशी ही कष्टप्रद यात्रा कोट्यवधी वर्षे चालली. कालच्यापेक्षा आज थोडे अधिक परिपूर्ण असे सत्याचे आकलन झाले आणि त्याबरोबरच आपल्या अपुरेपणाची अधिक परिपूर्ण जाणीव झाली याचे कौतुक मानावे असा हा वस्तऱ्याच्या धारेवर चालण्याचा खडतर ज्ञानमार्ग आहे. स्वातंत्र्याची आकांक्षा ही आपापल्या ज्ञानेंद्रियांच्या क्षेत्राचा संकोच दूर करून ते क्षेत्र थोडे अधिक व्यापक करणे यात आहे.

या स्वातंत्र्याच्या प्रेरणेला देहाचा तिटकारा नाही, संसाराचे आणि ऐहिकतेचे वावडे नाही. विश्वभराच्या अंधारात मिणमिणती पणती घेऊन पुढे चालणाऱ्या वाटसरूची एक साहजिक इच्छा असते; हातातील ज्योत थोडी मोठी असावी, भणभणत्या वाऱ्याच्या सोसाट्याने ती हेलकावू नये, विझू नये. निदान एक पावलाचा प्रदेश तरी एक पाऊल पुढे टाकण्यासाठी दिसावा ही स्वतंत्रतावादाची वस्तूवादी प्रेरणा आहे. कोण्या काल्पनिक मोक्षाची तेथे आस नाही. स्वतंत्रतावाद विलायती नाही, मन:पूतवादी नाही भांडवलवादी नाही तसाच तो अध्यात्मवादी चैतन्यवादीही नाही.

(६ ऑगस्ट १९९६)

# स्वतंत्रतेची मूल्ये - लेखांक ४
# स्वतंत्रतावाद : स्टेशन नव्हे, मार्ग

### बंधनांचे दास

स्वतंत्रतावादाची सुरुवात बंधने मोकळी करण्यापासून होते; स्वतंत्रतावादाची ही नकारात्मक कल्पनाच काय ती आजच्या माणसास पेलणारी आहे. आज माहीत नसलेल्या बंधनांचा बंदोबस्त कसा करायचा ते काम उद्याच्या पिढ्यांवर पडणार आहे. पाटीलकी, देशमुखी, सावकारकी या बेड्या एका काळी प्रेमळ वाटत असत. आजही निवडणुकीत संस्थानिकांचे पुत्र सिनेमा-नटनट्यांच्या बरोबरीने मते मिळवतात. सुरक्षिततेकरिता, पोषणाकरिता आणि प्रजोत्पादनाकरिता काही बंधने आवश्यक वाटतात, उपयोगी वाटतात; सोयीची वाटतात, एवढेच नव्हे तर सुखद वाटतात. काळाच्या प्रवाहाबरोबर ही बंधनेही जड वाटू लागतील; नकोशी होतील; जाचक आणि असह्य बनतील.

पण उद्याची बंधने सोडा, आजच जाचक आणि असह्य वाटणारी बंधनेसुद्धा तोडण्यास किंवा मोकळी करण्यास बहुतेकजण नाराज असतात. ''जग कसेही, कितीही बदलले तरी मुलीच्या जातीला शिस्त ही पाहिजेच'' असे म्हणणाऱ्या आया; मुले नाटकसिनेमास जाऊ लागली की बेचैन होणारे बाप; सिनेमात किंवा दूरदर्शनवर हिंसाचार सहज चालवून घेणारे पण प्रेमाचे प्रदर्शन पाहताच संतप्त होणारे प्रत्येक पिढीतील कृष्णराव मराठे सर्वत्रच आहेत. 'अश्लिल साहित्य' फार बोकाळले आहे; नवीन पिढीला काही धरबंध राहिलेला नाही; मुले विड्या, सिगरेटी, दारू पितात, वाटेल ती शृंगारिक गाणी गातात. मादक द्रव्यांचे सेवन करतात; यामुळे अनैतिकता बोकाळत आहे; आणि या सर्वांवर कायदा करून आणि त्याची कडक अंमलबजावणी करून शासनाने काही जबाबदारी पार पाडली पाहिजे असे बहुतेकांना वाटते.

स्वस्त लोकप्रियतेसाठी लेखक किंवा कलाकार जनसामान्यांच्या भक्तीविषयांवर आणि समाजनायकांवर चिखलफेक करतात. महात्मा ज्योतिबा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांच्या चारित्र्यात तर चुकून एक गालबोट म्हणण्याइतकासुद्धा दोष नाही. असे म्हणून, त्यांच्याबद्दल कुणी काही लिहिले तर शासनाने काही कार्यवाही करण्याची वाटसुद्धा न पाहता लोक हातात

डांबराचे डबे, दगड किंवा काठ्या घेऊन उभे राहतात. देवदेवतांच्या जीवनक्रमाविषयी मूळ ग्रंथांतील वचने उद्धृत करून कोणी दोष काढले तरी त्यांच्या जीवाची शाश्वती राहत नाही. नैतिक आणि वैचारिक क्षेत्रात काही शिस्त पाहिजे, काही बंधने पाळली पाहिजेत असे सर्वांनाच वाटते. यापेक्षा वेगळे बोलणारे कुचेष्टेचा विषय होतात.

धार्मिक, सामाजिक नीतिनियम घालून, रूढी पाडून त्यांची सामाजिक बहिष्कार, दंड अशा हत्यारांनी अंमलबजावणी करून नैतिक वैचारिक प्रथा चालू ठेवण्याचे जबरदस्त प्रयत्न पिढ्यानपिढ्या झाले, रूढी संपल्या; दुराचार बोकाळला तर सर्व समाज नष्ट होईल अशी धास्ती पदोपदी घालणारे धर्ममार्तंडही संपले. कायद्याने सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न तर शेकडो वर्षे चालू आहेत. कोणाला संमति-वयाचा प्रश्न महत्त्वाचा वाटतो; कुणाला द्विभार्या प्रतिबंधन; कुणाला सुलभ घटस्फोट; कुणाला हुंडाबळी; कुणाला दारुबंदी. जो तो आपल्या आवडीचा घोडा घेऊन विधिमंडळ किंवा लोकसभेमार्फत या विषयांवर कायदा करतो आणि कायदा संमत झाला की आपले जीविताचे सार्थक झाले असे मानतो. कायदे रूढीपरंपरांइतकेच निष्फळ आणि अकार्यक्षम ठरले आहेत. पण तरीही बंधने आवश्यक आहेत ह्या विश्वासास कोठे तडा गेलेला नाही.

कायदेकानूंनी आणि रूढींनी एक गोष्ट साध्य होते; जे होऊ नये आणि ज्याचा प्रतिबंध व्हावा याकरिता हा सारा खटाटोप, ते थांबत तर नाहीच, उलट काही प्रमाणात आकर्षक बनते आणि त्याहीपेक्षा किफायतशीर बनते. दारू हे गरीब देशात अनर्थ घडवून आणणारे व्यसन आहे; दारूने शरीराचा ऱ्हास होतो हे सर्वांना ठाऊक आहे; पण तरीही लोक पितात. दारुबंदी झाली म्हणजे काहीजण चोरून पितात, काहीजण प्रतिष्ठेचा विषय करून पितात; आणि हातभट्टीवाल्यांपासून ते अगदी विलायती मद्ये उपलब्ध करून देणाऱ्यांपर्यंत सर्वांचा धंदा जोरदार चालतो. या एका चोरट्या धंद्यावरच लोक लखपती, करोडपती बनतात. म्हणजे, बंधनांनी आणि कायद्यांनी इच्छित हेतू साध्य होत नाही, इतकेच नाही तर जे टाळायचे तेच अधिक भरभक्कम होऊन बसते. हा सार्वत्रिक सर्वकालीन अनुभव आहे. तरी लोक बंधनांचा आग्रह धरतात.

**बंधनवाद्यांची नैतिकता**

कायद्याने किंवा कृत्रिम बंधनांनी सुधारणा घडत नाहीत असे स्वतंत्रतावादी मानतात; कायदा केल्याचे दु:ख नाही पण त्यामुळे कायदा मोडणारेही सबळ बनतात आणि सरकारशाहीदेखील फोफावते असे मानतात. त्यामुळे स्वतंत्रतावाद्यांना बंधने नकोत; ते उच्छृंखलतेला उत्तेजन देतात; थोडक्यात, स्वतंत्रतावाद म्हणजे अनैतिकतेला पाचारण अशी अनेकांची समजूत आहे.

जीवाची सुरुवात गर्भाशयात होते. गर्भावस्थेत आईचे सगळे शरीर गर्भाची जोपासना करण्यात लागलेले असते. आई उपाशी राहिली तरी गर्भ उपाशी रहात नाही. पोषणासाठी गर्भाशयातील ते छोटेसे बाळ काहीच प्रयत्न करत नसेल असे नाही; त्याच्या जीवाच्या मानाने ते आकांतही करत असेल. जन्माची वेळ झाली म्हणजे बाळ मोठ्या अनिच्छेने गर्भाशयाच्या बाहेर पडते. आईच्या शरीराबाहेरची सारीच परिस्थिती गर्भाशयातील सुखद उबदार सुरक्षित अवस्थेपेक्षा अगदी उलट. बहुधा या कारणानेच असावे, सर्व माणसांच्या मनात पुन्हा एकदा गर्भावस्थेचा अनुभव घेण्याची सुप्त पण प्रबळ इच्छा कायम राहात असावी. गर्भावस्थेत सगळे काही न मागता मिळाले; शैशव आईबापांच्या लाडाकोडात संपले; बालपणात गुरुजनांनी शरीराबरोबर बुद्धीचीही जोपासना करण्यात मदत केली. तारुण्य आले की गर्भावस्था संपली, आता आपण स्वतंत्रपणे आयुष्याचा अनुभव घ्यायचा आहे ही आकांक्षा बहुतेकांच्या मनात तयारच होत नाही. काही आईवडिलांच्याच छायेत वावरतात; काहींना पराक्रम गाजवण्याची इच्छा असते, पण त्यासाठी कुटुंब, जात, धर्म, राष्ट- यांच्या प्रतिष्ठेचा आधार लागतो. कुटुंबाकरिता जगणेमरणे, राष्ट-ाकरिता जगणेमरणे यांतील उदात्तता पिढ्यांनी मान्य केली आहे. सर्व देशातील सर्व भाषांतील सावरकरादि प्रतिभाशाली कवींनी या भावनेला सर्व प्रभावी शब्दांत गुंफले आहे. कुटुंबापासून राष्ट-ापर्यंत समुदायभक्तीमध्ये एक मोठी सोय आहे. पराक्रमाच्या उर्मीला वाव तर मिळावा पण जीवनाचा अर्थ काय, आयुष्य कशासाठी या त्रासदायक प्रश्नांची उत्तरे देण्याची जबाबदारी पडू नये अशी यात दुहेरी सोय आहे.

याच प्रेरणेतून बंधनवाद्यांची नैतिकता उद्भवते. नीति म्हणजे काय?

नैतिकता ती काय? या प्रश्नांची उत्तरे शोधायला लागले की सारेच निरर्थक निष्फळ वाटू लागते. अशा विफलतेत जाण्यापेक्षा पूर्वजांनी घालून दिलेले नीतिनियम आणि परंपरेने चालत आलेल्या रूढी प्राणपणाने जपाव्यात आणि सुदृढ कराव्यात अशी बंधनवाद्यांची परिस्थिती असते.

स्वतंत्रतावाद्यांचा विचार थोडा वेगळा आहे. बंधने घालून कायदे करून रोग परवडला पण औषध नको अशी परिस्थिती तयार होते. दारूने, मादक द्रव्यांनी किंवा इतर दुराचारांनी फक्त दुराचाऱ्यांचे आणि त्यांच्या कुटुंबाचेच नुकसान होते; बंदी घातल्याने सारा समाज उद्ध्वस्त होतो, ही स्वतंत्रतावादाची धारणा आहे. बंधने उठवल्याने तोटा तर होत नाही, अनेकदा फायदाच होतो. माणसाला मोकळे सोडले म्हणजे त्याची प्रवृत्ती दुराचाराकडेच वळण्याची असते ही बंधनवाद्यांची धारणा खरी नाही. कधीतरी सिनेमातले एखादे अश्लील गाणे ऐकण्यात मजा वाटते, एखादे बिभत्स अश्लिल पुस्तक वाचण्यात किंवा 'खटियावादी' नाटकसिनेमे पाहण्यात गंमत वाटते याचे कारण म्हणजे हे अनुभव दुर्मिळ आहेत. त्यातील दुर्मिळता काढून टाकली आणि चोरटेपणाचे आकर्षण संपवले तर सारीच माणसे दुष्प्रवृत्तच होतील असे मानणे म्हणजे अभिजात साहित्याचा अपमान करणे आहे. कालीदास ही काही कृत्रिमरीत्या लादलेली रुचि नाही. त्याच्या साहित्यामध्ये मनुष्याच्या अत्यंत खोल भावनांना आणि प्रवृत्तींना प्रगाढ प्रतिसाद मिळतो, जो स्वस्त साहित्याच्या आवाक्याबाहेर आहे. पूर्वी स्वीडनमध्ये अश्लिल साहित्यावर बंदी होती आणि साऱ्या बाजारपेठा अश्लिल साहित्याने भरून गेल्या होत्या. कायदा रद्द झाला आणि काही काळ हे साहित्य आणखी फोफावते आहे अशी धास्ती वाटू लागली; पण थोड्याच काळात ही बाजारपेठ उद्ध्वस्त झाली. लोक त्याकडे बघेनासे झाले; अश्लिल साहित्यावर बंदी घालावी अशी जोरदार मागणी अश्लिल साहित्याचे लेखक आणि प्रकाशकच करू लागले.

**स्वतंत्रतावाद 'ननैतिक'**

इंग्रजीत 'Immoral' आणि 'Amoral' असे दोन वेगळे शब्द आहेत. माझ्या माहितीत मराठीत हा अर्थ श्लेष साधणारे दोन वेगळे शब्द नाहीत. नीतिमत्तेच्या रूढ कल्पनांविरुद्ध जे वागतात ते अनैतिक. पण, जे अनैतिक नाहीत पण समाजातील रूढ नैतिकतेला काही मोठे अधिष्ठान आहे असे

मानतही नाहीत; थोडक्यात, जे वर्तनाने नैतिक आहेत पण नैतिकतेच्या संकल्पनांना मानत नाहीत अशांसाठी मराठी सुयोग्य शब्द नाही. अशांना आपण 'ननैतिक' म्हणू. 'अनैतिकता' आणि 'ननैतिकता' यात घोटाळा होता कामा नये.

स्वतंत्रतावाद 'अनैतिक' नाही, पण 'ननैतिक' आहे. सर्वकाळी सर्वस्थळी लागू पडेल अशी कोणतीही नैतिकता नाही. एकच नैतिक खरे – व्यक्तीच्या विकासाआड कोणतीच बंधने येऊ नयेत. फक्त, स्वातंत्र्याच्या शोधात दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर थोडेही अतिक्रमण होऊ नये ही एकच खरी नैतिकता. वयात आलेल्या दोन माणसांनी परस्परसंमतीने खाजगीत काय करावे हा समाजधारणेचा विषय नाही. नैतिकता कोणा परमेश्वराने किंवा प्रेषिताने लिहून ठेवलेली घट्ट चौकट नाही, स्वातंत्र्याप्रमाणेच नैतिकता हा देखील प्रवास आहे, स्टेशन नाही.

**करुणा व कायदा – गल्लत**

बंधने असावीत अशी मागणी सनातनी करतात; अनैतिकतेचा व्यावसायिक फायदा उठवणारे करतात. अनीतिमानांना नरकयातनांची धास्ती घालून पाहिली, कायद्याने शिक्षा देऊन पाहिली, काही साध्य झाले नाही. आता करुणावादी पुढे सरसावले आहेत. दारू पिणाऱ्यांना, मादक द्रव्य सेवन करणाऱ्यांना सहानुभूति आणि उपचारांची गरज आहे; अशा भूतदयावादी विचाराने अनेकांनी जागोजाग मोठी चांगली कामे सुरू केली आहेत. भूतदया ही समाजाची एक महत्त्वाची प्रेरणा आहे. असे काम करणाऱ्यांचे कौतुकच व्हायला पाहिजे. मादक द्रव्यांच्या सेवनाने लोळपोळ झालेल्यांची सेवाशुश्रुषा करणे हे मोठे कौतुकास्पद काम आहे; पण रुग्णांची संख्या कमी व्हावी यासाठी ही थोर मंडळी बंदीच्या कायद्याचा पुरस्कार करतात ही मोठी विचित्र गोष्ट आहे. करुणा दाखवणाऱ्यांनी करुणेच्या क्षेत्रात काम करावे. करुणेचे विषय जितके दिशाहीन, भरकटलेले, विवेकशून्य तितका त्यांचा करुणेवरचा आणि भूतदयेवरचा अधिकार जास्त. करुणावाद्यांनी कायद्याने बंदीची मागणी करणे म्हणजे दोन वेगळ्या प्रश्नांची गल्लत करणे आहे.

शैशवात, बालपणात पूर्वापार चालत आलेले, गुरुजनांनी सांगितलेले नियम आचरावेत; शिस्त पाळावी; शरीराला संयमाचा व्यायाम द्यावा; आणि

ही सर्व बौद्धिक, मानसिक तयारी खुलेपणे जीवनाचे प्रयोग करण्यात वापरावी. हे प्रयोग करताना, तसे प्रयोग करणाऱ्या दुसऱ्या कुणाच्या पावलाआड आपले पाऊल पडणार नाही याची काळजी घ्यावी; हा स्वतंत्रतावाद आहे. त्यात 'अनैतिकते'ला प्रोत्साहन नाही, 'ननैतिकते'च्या यात्रेचे निमंत्रण आहे.

**बंधनमुक्ती – पहिली पायरी**

खुली अर्थव्यवस्था ही स्वतंत्रतेची एक प्राथमिक पायरी आहे. बाजारेपठेची व्यवस्था म्हणजे स्वतंत्रता नाही. पण ज्या समाजात माणसाला मालमत्तेचा अधिकार नाही आणि हरघडीच्या उत्पादनात, व्यापारात आणि इतर आर्थिक घडामोडीत शासनाचा कसाही वेडवाकडा हस्तक्षेप होण्याची भीति आहे तेथे स्वातंत्र्य उपजावेच कुठून?

बाजारपेठेच्या व्यवस्थेचा एक अपरिहार्य परिणाम आहे; बाजारपेठ लोकांच्या गरजा आणि त्यांची उत्पादन-शक्ती यांचा मेळ घालून देते. सतत विस्तारणाऱ्या गरजांच्या क्षितिजांत एक एक गरजेची निकड कमी करणे; त्यासाठी लागणारे उत्पादन घटती उत्पादकता देणाऱ्या कृपण निसर्गाकडून काढून घेणे आणि निसर्गाची कृपणता ओलांडून जाण्याकरिता नवनवीन तंत्रज्ञानाचा विकास करणे, ऐतखाऊंना नाउमेद करणे हे बाजारपेठेचे अंगभूत गुणधर्म आहेत. अमेरिकन धाटणीच्या भांडवलवादी व्यवस्थेत बाजारपेठेत थोडा कुठे खुलेपणा आला तर तेथील व्यापारी पेठा विविध तऱ्हांच्या मालांनी गजबजून गेल्या, उपभोग्य वस्तूंची रेलचेल झाली आणि फेरीवाल्यांपासून ते महाकाय कंपन्यांपर्यंत सारेच ग्राहकराजापुढे नाकदुऱ्या काढीत आमचा माल घ्या, आमचा माल घ्या अशा जाहिराती, विनवण्या करू लागले.

नेमकी याउलटी परिस्थिती नियंत्रित अर्थव्यवस्थांत झाली. भांडवलदारी व्यवस्थेत फायद्याच्या अमिषाने गुंतवणुकीचे निर्णय होतात ते व्यक्तीच्या फायद्याचे असतील, पण समाजाच्या फायद्याचे कसे असणार? असा प्रश्न उभा करून, समाजाच्या फायद्याकरिता गुंतवणुकीचे निर्णय नियोजन मंडळातील ढुढ्ढाचार्यांनी करणे आवश्यक आहे आणि त्याकरिता सर्वच संपत्ती, मालमत्ता सरकारी मालकीची असली पाहिजे असे म्हणणाऱ्या समाजवादी देशात नेमके विपरीत तेच घडले. गुंतवणुकीचे निर्णय चुकीचे

झाले. गरजेच्या वस्तूंचीदेखील आबदा झाली. पाव, अंडी, दूध, फळे, मांस या चैनीच्या वस्तू झाल्या. भांडवलवादात समाजाच्या उत्पादक शक्तींचा पुरेपूर वापर होत नाही या सबबीखाली उभ्या राहिलेल्या नियंत्रित व्यवस्थेत उत्पादनाचाच पार बट्ट्याबोळ झाला.

**कोरड्या पाषाणांचे ब्रह्मज्ञान**

शाळेत मुलामुलांची वादावादी होते आणि रोडकी, खुजी मुले उंच सुदृढ बांध्याच्या सवंगड्यांचीच 'पहिलवान हिरो' म्हणून कुचेष्टा करू लागतात; तसा काहीसा प्रकार बाजारपेठवादी आणि नियोजनवादी यांच्यात घडला आहे. खुरटलेल्या खुज्या वाढीचे नियोजनवादी स्वतंत्रतेच्या चाहत्यांची 'चंगळवादी' म्हणून कुचेष्टा, उपहास करू लागले आहेत.

खुली व्यवस्था म्हणजे निव्वळ उत्पादन, कार्यक्षमता, स्पर्धा; साऱ्यांची धावपळ अधिक मिळकत कमावण्यासाठी, सारे काही बाजारपेठेसाठी; मनुष्याच्या जीवनात उपभोगाखेरीज इतरही काही महत्त्वाची मूल्ये आहेत, ती स्वतंत्रतावादी मानायलाच तयार नाहीत; केवळ उपभोगावर आधारलेली 'चंगळवादी' व्यवस्था नीतिमूल्ये बिघडवील, पर्यावरणाचा नाश करतील इत्यादि इत्यादि आरोप नियोजनवादी स्वतंत्रतावाद्यांवर करीत आहेत.

गंमत अशी की हे आरोप करणाऱ्यात कोणी अध्यात्मवादी, गांधीवादी फारसे नाहीत. देशातील मायबहिणींना अंगभर नेसायला वस्त्र नाही म्हणून पंचा नेसणाऱ्या कोण्या महात्म्याने 'चंगळवाद' म्हणून टीका केली असती तर समजले असते. पण आधुनिक पेहराव करणारे, वीज वापरणारे, टेलिव्हिजन पाहणारे, टेलिव्हिजनच नव्हे तर पेजर आणि सेल्युलरही वापरणारे, सदानकदा गाड्यांनी धावणारे; विमानाने उडणारे, पंचतारांकित सभागृहात बसून चंगळवादी म्हणून स्वतंत्रतावाद्यांची कुचेष्टा करू लागले की मोठा विनोदच म्हणायचा! यांचा खरा विरोध उपभोगाला नाही; यांना सारे उपभोग हवे आहेत. पण ते सर्वसामान्य लोकांपर्यंत पोचले तर आपले महत्त्व संपून जाईल याची त्यांना धास्ती पडली आहे. उपभोगाच्या विविध वस्तू ज्यांच्या अथक परिश्रमाने तयार झाल्या; रोगराई, आजार यांच्यावर रामबाण उपाय ज्यांनी कठोर तपस्येने शोधून काढले त्यांच्याबद्दल अनादर बाळगून आणि त्यांना गुरुदक्षिणाही न देता उपभोगांची लयलूट आपल्या दारी उभी रहावी अशी ही

भामटी भूमिका आहे.

पूर्वाश्रमीच्या समाजवाद्यांना आणि साम्यवाद्यांना आता चंगळवादाचा एकदम तिटकारा आला आहे. उत्पादनवाढीचा महामार्ग खोलण्याची बढाई मारणाऱ्या मार्क्सवादाचे आपण टाळकरी आहोत हे ते विसरून जातात. संगमरवरी रेल्वे स्टेशने, लोखंडपोलादाचे प्रचंड कारखाने, शस्त्रास्त्रांची प्रचंड निर्मिती करणारी व्यवस्था दर घरटी दोन अंडी पोचवू शकत नाही याची त्यांना शरम, चिंता नाही. 'चंगळवादा'च्या विरोधाचा तो मोठा विजय झाला असे ते मानतात!

**कर्म अटळ, उपभोगही अटळ**

'चंगळवाद' हा आरोप आहे तरी काय? माणसाने खा खा करू नये, मी भोगीन भोगीन अशा लालसेचा अतिरेक करू नये. कोणत्याही वस्तूचा आस्वाद हा योग्य मर्यादेत उपभोग घेतल्यानेच होतो. अतिरेक झाला तर अमृतसमान दूधसुद्धा विषप्राय होऊन जाते हे कोणीच नाकारत नाहीत. अतिरेकी उपभोगाचा सतत पाठपुरावा करणारा मूर्खच म्हटला पाहिजे. जीवनाच्या ताटात विविध चवीच्या, रुचीच्या, स्वादाच्या पदार्थांची रेलचेल आहे, त्यात मी फक्त गोड पक्वान्नच खाईन असे म्हणणारा करंटाच समजायचा, दुसरे काय?

असे अतिरेकी प्रकार सोडले तर उपभोग कमी कसा करता येईल. भारतीय कर्मवादात एक मोठा चलाखीचा युक्तिवाद आहे. कर्म टळतच नाही. तुमची इच्छा असो, नसो, तुम्ही कर्म करीतच राहता. निदान श्वास चालू राहतो आणि शरीराचे इतर चलनवलनही चालू राहते. तेव्हा, कर्माचा संन्यास शक्य नाही असा हा युक्तिवाद आहे. उपभोगाबद्दलही तसाच युक्तिवाद करता येईल. प्रत्येक कर्म हा एक उपभोगच असतो. काही न करता एका जागी सन्यस्त वृत्तीने बसलेला तपस्वीदेखील भगव्या छाटीचातरी उपभोग घेत असतो; बैठकीचे स्थान, व्याघ्रजीन, कमंडलू, झाडाची सावली यांचातरी उपभोग घेत असतोच; हवेचा पाण्याचा आस्वाद घेत असतो आणि काही नाही तरी निदान नग्न निरुपभोगाचा आस्वाद घेत असतो. उपभोग अटळ आहे तो कुणालाच सुटलेला नाही.

**उपभोगातील विविधतेसाठी**

पण बाजारपेठेच्या व्यवस्थेत उत्पादन वाढ करून उपभोग वाढवण्यासाठी धडपड चालू असते ही कल्पनाच मुळात चुकीची आहे. धडपड उपभोग वाढवण्याची नाही. धडपड विविधता आणि विपुलता वाढवण्याची आहे. तिचा हेतू लोकांना निवडीचे अधिकाधिक स्वातंत्र्य देण्याचा आहे. क्षणोक्षणी उपभोग तर अपरिहार्यच आहे, हे जनावरांच्या बाबतीतही खरे, माणसांच्या बाबतीतही खरे. जनावरात आणि माणसात फरक काय? जनावरे निसर्गाने लादलेल्या अटी निमूटपणे मान्य करतात. निसर्गाने त्यांच्यासमोर जी विविधता ठेवली असेल त्यातूनच निवड करतात. माणूस निसर्गापलीकडे विविधता तयार करतो. निवडीची संधी जास्तीत जास्त वेळा मिळावी, प्रत्येक निवडीत अधिकाधिक पर्याय समोर मिळावेत, त्या पर्यायांचे क्षेत्र अधिकाधिक व्यापक असावे, यासाठी ही धडपड आहे. उत्पादनवाढ उपभोग वाढवण्यासाठी नाही, जो काही उपभोग घ्यायचा त्याची गुणवत्ता वाढवण्यासाठी आहे.

'चंगळवादी' याबरोबर 'पर्यावरणविनाशी' अशीही एक शिवी स्वतंत्रतावादाला त्याचे विरोधक देत असतात. समाजवादी रशियाच्या पतनानंतर समाजवादी व्यवस्थाच पर्यावरणाला किती घातक ठरली, आख्खे समुद्र प्रदुषणाने कसे खलास झाले, त्याविरुद्ध बोलण्याची कोणाची हिम्मत न झाल्याने निसर्गाचा कसा विनाश नियोजकांनी केला याचे नवे नवे पुरावे हररोज उपलब्ध होत आहेत. पर्यावरणाचे संरक्षण ही सर्वांचीच चिंता आहे. या विषयावर बोलणारे फार, पण निसर्गाचे संरक्षण नेमके कशाने होते याबद्दल नेमके शास्त्र काहीच नाही. प्रगतीला विरोध, विकासाला विरोध करणारे स्वत:चाच पर्यावरणवादी म्हणून उदेउदे करून घेतात. निसर्गाच्या रक्षणाकरिता जागरुक जनमत हे एकच साधन आजतरी आशेचा किरण दाखवते आणि जागृत जनमत स्वतंत्र व्यवस्थेतच शक्य आहे. स्टॅलिनच्या राजवटीत जागृत जनमत कुठून यावे?

**उपोद्घात –**

स्वतंत्रतावाद शेतकरी संघटनेच्या विचारसरणीचा आरंभापासून पाया राहिला आहे. नियोजन व्यवस्थेचे सर्वात क्रूर बळी शेतकरी, स्वतंत्रतावादाचा झेंडा सरसावून बाहेर पडले. जगभर त्याच्या 'बळीराज्या'ची द्वाही फिरत आहे.

भारतातमात्र अजूनही स्वकर्तृत्वावर उभे राहण्याची हिम्मत नसलेले आणि सरकारी दक्षिणांना चटावलेले त्याला विरोध करू पहात आहेत. स्वतंत्रतावाद हे परदेशी वाण आहे, स्वतंत्रतावाद म्हणजे भांडवलशाही, स्वतंत्रतावाद म्हणजे चैतन्यवाद, नैतिक स्वैराचाराचा पुरस्कार आणि चंगळवादाला उत्तेजन अशा बेफाट टीका 'बळीराज्या'चे विरोधक करत आहेत. त्यांना उत्तर देण्याची जबाबदारी संघटनेच्या कार्यकर्त्यांवर हरघडी येत आहे. सुशिक्षित आंग्लभाषी प्रचारकांनी असले युक्तिवाद केले म्हणजे सामान्य शेतकरी कार्यकर्ता गोंधळून जातो. त्याच्या स्वत:च्या मनातील गोंधळ संपावा आणि स्वतंत्रतावाद आणि 'बळीराज्य' यांच्या विरोधकांना मुद्देसूद आणि चोख उत्तर त्याला देता यावे यासाठी विचारांच्या वेगवेगळ्या बारकाव्यात जाऊन ही मांडणी केली; स्वतंत्रतावादाच्या पाईकांना त्याचा थोडाफार तरी उपयोग होईल अशा आशेने.

(२१ ऑगस्ट १९९६)

# परिशिष्ट २
# व्यक्तिविकास इदम् न अलम्?

**श्री. अशोकराव निरफराके यास,**

**सप्रेम नमस्कार,**

आपला माझा परिचय नाही, आपण कोण कुठले, वय काय हेही मला माहिती नाही. 'संवाद' नावाच्या कोणा मासिक पत्रिकेच्या संपादकाने जानेवारी १९९७ चा 'युवा' विशेषांक पाठवला. अशी प्रकाशने झटकन चाळून दूर केली जातात. कविता तर सहसा वाचण्याच्या भानगडीतच मी पडत नाही. आपल्या कवितेच्या आकृतिबंधावरून ते मुक्तकाव्य वा गद्यकाव्य नसून मात्रांची शिस्त पाळणाऱ्या वृत्तांचे आहे. हे दुर्मिळ लक्षात आले, त्यामुळे काही कुतुहल वाटले. त्यात 'ततः किम्?' असे मोठे आकर्षक संस्कृत शीर्षक पाहून अधिकच उत्सुकता वाटली. कविता वाचली, दोनतीनदा वाचली. इतरांना वाचून दाखवली. काहींना वाचायला दिली आणि आज तुम्हाला हे पत्र लिहिण्यास बसलो आहे.

एवढे कुतुहल जागृत करण्याची आपल्या कवितेची ताकद आहे, हेही दुर्मिळ. त्याबद्दलच प्रथम आपले अभिनंदन केले पाहिजे.

कवितेचा थाट सावरकरी आणि भाषेचा प्रवाह रामदासी आहे. असे लिहिणे प्रचितीशिवाय होत नाही. कवितेच्या नायकाची कर्तबगारी हे कवीचे स्वप्नरंजन नाही हे स्पष्ट आहे. स्वातंत्र्यवीरांच्या कवितेत जसा स्वत:च्या बृद्धिविषयी, धडाडीविषयी, शौर्याविषयी, राष्ट-प्रेमाविषयी अहंकार दिसतो पण टोचत नाही; तसेच आपल्या कवितेतही आहे. आत्मगौरवाची जाणीव मोठी सुखकारक असते!

मी सातवीआठवीत असतांनाचा एक अनुभव. एक दिवस कोण्या निमित्ताने कोण जाणे, मनात विचार आला. केवढे आपण भाग्यवान! या साऱ्या अनंत विश्वात परमेश्वराचा कोणता लाडका ग्रह असेल तर तो म्हणजे पृथ्वी हे नि:संशय. या पृथ्वीतलावर भारतवर्षासारखी सुजलाम् सुफलाम् नरवीरांची खाण, नारीदेवतांचे पूज्यस्थान अशी पुण्यभूमी दुसरी नाही. या भारतभूमीत महाराष्ट- नि:संशय सर्वश्रेष्ठ. कारण ज्ञानेश्वरांसारखे संत आणि

शिवरायांसारखे महाप्रतापी वीर येथे होऊन गेले. १९५७ चे समर गाजवणारे नानासाहेब, तात्यासाहेब, राणी लक्ष्मीबाई महाराष्ट-ाच्याच कुशीतल्या. या महाराष्ट-ाची सर्वश्रेष्ठ जात कोणती असेल तर ती वर्णश्रेष्ठ ब्राह्मण हेही तितकेच उघड आहे. अशा ब्राह्मण कुळात आपल्या आईबापांसारखा श्रेष्ठचरितांच्या पोटी आपण जन्मलो. या अतिविशिष्ट जन्माचे भाग्य मोठे असाधारण आहे, या विचाराने काही काळ धन्य धन्य वाटले. विरासतीत मिळालेल्या या भाग्याचा सदुपयोग करण्याची जड जबाबदारी आपल्यावर असल्याचीही जाणीव झाली. या ऋणाचे उतराई कसे व्हावे, हेच समजेना. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात काही काळ गेला.

एक दिवस सहज मनांत प्रश्न आला, ही सगळी जन्माच्या भाग्याची उतरंड कितपत खरी आहे? एकामागोमाग एक प्रश्न मनांत येऊ लागले. पृथ्वी सर्वश्रेष्ठ ग्रह असे मानायला काय आधार आहे? इतर ग्रहांविषयी आपल्याला काहीच माहिती नाही. एवढ्या विश्वाच्या अवकाशात याहीपेक्षा मोठे, याहीपेक्षा सुंदर, माणसापेक्षा प्रबुद्ध आणि उन्नत प्राणी अंगाखांद्यावर खेळवणारे ग्रह नसतील कशावरून? पृथ्वीवर म्हटले तरी, भारतवर्षात काय आहे की जे इतर कोणत्याच देशात नाही? निसर्ग जास्त करून दरिद्री, संपन्नता पहावी तर सर्वात गरीब, निरक्षर, भुकेल्यांचा हा देश. इतर देशांमध्ये शूरवीर आणि कर्तबगार रमण्या झाल्या नाहीत असे थोडेच आहे? महाराष्ट-तर बोलून चालून काटेरी झाडांचा आणि दगडाधोंड्यांचा दुष्काळी प्रदेश. आणि ब्राह्मणवर्गाचे श्रेष्ठत्व ते कोणते? त्यांनी तयार केलेली संस्कृती जेव्हा जेव्हा दुसऱ्या कोणाच्याही संपर्कात आली तेव्हा पराभूत झाली. आपल्याच समाजातील बहुसंख्यांना विद्येचा, धर्मग्रंथवाचनाचा, मंदिरात प्रवेश करण्याचा अधिकार नाकारणारी ही वर्णसंस्कृती, यात शरम वाटण्यासारखे काही नसेल, पण विशेष अभिमान बाळगण्याचीही काही गरज दिसत नाही.

मग भाग्याच्या उतरंडीचा हा विचार मनात आलाच का? डोक्यात प्रकाश पडला, जन्माच्या अपघाताने जे जे मिळते तेच पवित्र, तेच उदंड, तेच थोर; त्याचाच अभिमान बाळगावा असे वाटणे ही प्राणीमात्राची साहजिक प्रवृत्ति आहे. जन्माच्या अपघाताने मिळालेल्या वारशाचा कोणतेही प्रश्न न विचारता अभिमान बाळगणे हे इतरांच्या वारशाविषयीच्या अज्ञानातूनच

निघते. कोणी हिंदुत्वाचा अभिमान सांगू लागला तर त्याची दखल गंभीरपणे घेण्याची गरज नाही. जन्माच्या अपघाताने न मिळालेल्या एखाद्या गोष्टीचे कोणी कौतुक केले तर ते विशेष मानावे. परधार्जिणेपणा हा काही गुण नाही तो दोषच, पण हा दोष क्षुद्र स्वाभिमानाच्या दोषाच्या तुलनेने तसा विरळा!

या जाणीवांनी मी अस्वस्थ झालो. आणि तेव्हापासून सगळ्या विश्वाच्या आणि माझ्या स्वत:च्या उत्पत्तिलयाच्या रहस्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहे. त्या लहान वयातही मी एक मोठा अकटोविकट प्रयत्न केला. जन्माच्या अपघाताने मिळालेली अभिमान स्थळे खऱ्याखुऱ्या विचाराची सुरवातच होऊ देत नाहीत. अभिमान रुजले असले की सगळा विचार या अभिमान-स्थळांची नवी-नवी समर्थने शोधण्याच्या कामातच अडकून गुरफटून जातो. याला उपाय काय? त्याकाळी श्रीमद् भगवद्गीता, श्रीमद् आद्य शंकराचार्य आणि आर्य चाणक्य ही माझी अभिमानस्थळे होती. यांचा उल्लेख करायचा झाला तर पहिल्या उपपदाऐवजी एखादा खास अभद्र शब्द वापरायचा व जन्माच्या वारशाने मिळालेल्या बौद्धिक मानसिक गुलामगिरीतून सुटका करून घ्यायची असा हा प्रयोग. जात तर जात नाही पण वृथा धर्माभिमान टाळण्याकरिता काही काळ दरवर्षी धर्मांतर करून एक नवा धर्म अभ्यासपूर्ण स्वीकारण्याचा मी बेत केला होता, तो हातून पार पडला नाही ही गोष्ट वेगळी.

तुमची कविता वाचल्यानंतर थोडी आशा वाटली. मला पडलेले आणि न सोडवता आलेले प्रश्न ज्याने अल्पवयातच सोडवले आहे, अशा कोणाचे दर्शन होते काय अशी आशा वाटली. म्हणून आपल्याला हे पत्र लिहीत आहे. आपला कुलीनाघरी जन्म झाला, त्या कुलाचे नेमके श्रेष्ठत्व काय? एव्हरेस्ट सर करणारे, दक्षिण ध्रुवावर पोचणारे, नोबेल पारितोषिक विजेते कोणी शास्त्रज्ञ कोणी संशोधक, किंवा कोणी उत्तुंग राष्ट-सेवा घडविलेले कोणी निरफराके माझ्यातरी ऐकिवात नाही.

अभिमान बाळगण्यासारखे गोमटे रूप आपणास मिळाले, पुण्याच्या चित्पावनी संस्कृतीत कोणी थोडे गोरे असले की त्याला सुंदर किंवा रुबाबदार मानले जाते. आपण त्यापलीकडे सुस्वरूप असणार अशी माझी खात्री आहे.

कुशाग्र बुद्धी मिळाली याची प्रचिती आपणास केव्हा आली? आणि आपण ज्याला सुविख्यात शाळा म्हणतात तिने आपल्या राष्ट-ास ललामभूम

अशी कामगिरी बजावल्याचेही काही माहिती नाही. कुल, रूप, बुद्धी यांच्याबद्दलची ही स्वकौतुकी आहे का वास्तविकता आहे?

परीक्षेत गुण मिळवले आणि सध्याच्या समाजाच्या मापदंडाने वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी प्रवेश मिळवला म्हणजे आपण सारे गड जिंकलो, आता आपल्या स्वत:च्या बुद्धिमत्तेचे कौतुक करावे तरी किती याची चिंता पडलेला एक अविनाश धर्माधिकारी मी पाहिलेला आहे. तुमची गत त्याच्यासारखी तर नाही!

खेळ, कला, वक्तृत्व, लेखन, विदेश-यात्रा, मोठा पगार, पुढारीपण या सगळ्यात काही नाव कमावले याबद्दल आपण खरंच अभिनंदनास पात्र आहात. आणि यानंतर ततः किम्? या गोष्टीचे काय कौतुक आहे. यापलीकडे राष्ट-सेवा घडली पाहिजे अशी आपली दुर्दम्य आकांक्षा आहे याचे तर विशेष नवल वाटले!

आता राष्ट-सेवा म्हणजे आपण काय करू इच्छिता हे मात्र काही लक्षात येईना. या देशातील कोट्यानुकोटी लोक दैन्यात आहेत ते दैन्य दूर करण्यासाठी काही पौरुषाची प्रतिज्ञा आपण करू इच्छिता? हे नेमके पौरुष कोणते? त्याचे रूप काय? त्याचा मार्ग काय? हे जर स्पष्ट नसले तर पौरुषाची ही पूजा निर्माल्य होऊन कोणत्यातरी जातीयवादी गटारगंगेस मिळण्याचा मोठा धोका असतो.

अभ्यास, खेळ, कला, लेखन, द्रव्यार्जन ही सारी क्षेत्रे वेगळी. यात कितीही नैपुण्य मिळवले, प्राविण्य मिळवले, कीर्ती मिळवली तर 'ततः किम्?' या क्षेत्राच्या बाहेर राष्ट-सेवेचे असे काही वेगळे क्षेत्र आहे, आणि त्यात पौरुष गाजवायचे आहे, ते हे पौरुषाचे क्षेत्र कोणते?

तुमच्या कुशाग्र बुद्धीचा तुम्ही जागतिक कीर्तिमानपात्र वापर केला (म्हणजे परीक्षेत प्रश्नांची सोडत घेऊन उच्चांक मिळवण्याकरिता नव्हे) तर ती राष्ट-सेवा आहे का नाही? जगभरात आज संशोधनाचा रथ प्रचंड वेगाने चालला आहे. इलेक्ट-ॉनिक्स, जेनेटिक्स या क्षेत्रांत तर अद्‌भूत अवतरत आहे. या सगळ्या संशोधनात कोणी भारतीय सामील झाला तेव्हा काही घडले. जयंत नारळीकर पुण्यास परतले आणि निष्प्रभ झाले. ही जी तुम्ही राष्ट-सेवा राष्ट-सेवा म्हणतात ती विज्ञान, वैद्यकीय, यांत्रिकी, अर्थशास्त्र, समाजशास्त्र

अशा वेगवेगळ्या क्षेत्रात काही ज्ञानकण जोडून दिल्याने होणार नाही का?

गेल्या ऑलिम्पिकमध्ये भारताची दुर्दशा आपण पाहिली. एरवीही भारतीय पुरुषांचे उच्चांक जागतिक महिलांच्या उच्चांकाच्या खालचे असतात. आपण कबड्डी, खो-खो, फुटबॉल, टेनिस यांतील गल्लीपातळीवरील प्राविण्याचा 'ततः किम्' म्हणून उपहास करण्यापेक्षा हे प्राविण्य अभ्यासाने कसोशीने, तपस्येने, आंतरराष्ट-ीय पातळीवर उच्चांक फडकवणारे व्हावे असे जोपासले तर ती राष्ट-सेवा होणार नाही काय?

विद्या, कला, क्रीडा, नेतृत्व, वक्तृत्व या सगळ्याच क्षेत्रात परिस्थिती अशी की आमची राष्ट-ीय शिखरे जगाच्या तुलनेत खुजी वारूळे दिसू लागावी. मागासलेल्या देशात सारीच चणचण असली तरी महात्म्यांची वाण नसते. जन जितके अध:पतित् तितके त्यांचा उद्धार करण्याचा डौल मिरवणारे 'थोर' लोक अधिक संख्येने उपलब्ध, त्यांचा मानही मोठा. सारा देश दैन्यावस्थेतला. पण दैवी गुणांच्या महात्म्यांचा उदे उदे प्रचंड! मग कुवतीची तरुण मुले आईन्स्टाईन होऊ पहात नाहीत. एफेल होण्याची धडपड करत नाहीत, वॅनगॉग होऊ पहात नाहीत, बिल गेटस्, पिट सॅम्प्रस होण्याचे स्वप्न बाळगत नाही, उलट असल्या सगळ्या कर्तबगारीचा 'ततः किम्' म्हणून उपहास करतात. आणि काही शाब्दिक वाचाळपणा करण्याच्या कामाला राष्ट-सेवा म्हणतात. आपणही तसंच करणार काय? कुंपणापर्यंत कशीबशी पोच असलेले, कुंपण ओलांडण्याऐवजी राष्ट-सेवेची पोकळ बतावणी सुरू करतात काय?

शब्दांच्या, भाषेच्या थाटावरून आपण ज्ञानप्रबोधिनीच्या पठडीतले आहात हे उघड आहे. वेदान्तात पिंड व ब्रह्म यांचे अद्वैत मानले आहे. पिंडाचा दृष्टिकोण आणि ब्रह्मज्ञान यांत काही तफावत नाही. 'पिंड आपल्या प्रेरणेने पुढे जात जातच ब्रह्मांडाचा हेतू सफल करतो.' असा विचार आहे. वेदान्त व्यक्तिवादी आहे, हिंदु तत्त्वज्ञानाची ती सर्वोच्च परंपरा आहे. मुसलमान आणि युरोपीय आक्रमणांपुढे हतबल झालेल्या समाजाने घाबरून व्यक्ती आणि विश्व यांचे अद्वैत संबंध जोडणारी ही विचारधारा सोडली आणि जेत्यांच्या कल्पनांतील सामूहिक पूजा, प्रार्थना, राष्ट-ाचे श्रेष्ठत्व, व्यक्तीचे दुय्यमत्व अशा कल्पना स्वीकारल्या आणि पराभवामुळे खचलेल्या समाजाची विवेकानंद, हेडगेवार आणि बाळ ठाकरे अशी दैवते बनली. व्यक्ती हे

अनुभवाचे, विचाराचे, चिंतनाचे एकक आहे. आपल्या शोधाच्या प्रवाहात स्वत:च्या सोयीसाठी तो कुटुंब, वाडी, टोळी, गाव, जात, धर्म, राष्ट- अशा वाढत्या व्यापकतेच्या समूहांचा घटक बनण्याचे स्वीकारतो. समूहाचे सदस्यत्व काही बंधने घालते. पण स्वातंत्र्याच्या अनेक कक्षा मोकळ्या करून देते. राष्ट- ही व्यक्तींची एका विशिष्ट कालखंडातील गरज असते. युद्धप्रसंगी व्यक्तीने राष्ट-ाकरिता स्वत:चा बळी देण्याची तयारी दाखवावी हे समजण्यासारखे आहे. अन्यथा व्यक्तींकरिता राष्ट- हेच योग्य.

व्यक्तिमत्वाच्या परिपोषातून राष्ट-ाचे कल्याण साधत नसेल तर राष्ट- ही काही मायावी राक्षसी गोष्ट आहे, असे मानावे लागेल. आपण विविध क्षेत्रात निपुण आहात. त्यातील कोणतेही एक क्षेत्र निवडा. आम्हा सर्वांना अभिमान वाटेल अशी काही कामगिरी करून दाखवा. राष्ट-सेवा अशा व्याख्याशून्य निरर्थक कल्पनांच्या हव्यासात आपली भाग्याची उतरंड विफल करू नका एवढीच विनंती. मनांत आले ते लिहिले, पत्रोत्तराची अपेक्षा तर नाही. कधीतरी भेट होऊ शकली तर आम्हाला आनंद वाटेल.

आपला,

**शरद जोशी**

(२१ फेब्रुवारी १९९७)

'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश' या लेखसंग्रहात शरद जोशींनी नेहरूवादी आर्थिक नीतीच्या दारुण अपयशाचा समाचार घेतला होता आणि लोकशाही समाजवादाच्या नावाने सरकारने राबवलेल्या शेतकरी-उद्योजकविरोधी धोरणाचे पितळ उघडे पाडले होते. त्यानंतर येणारा हा लेखसंग्रह एकविसाव्या शतकातील जागतिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप खुलेपणाने मांडून, भावी काळात उत्पादक-उद्योजक यांना उपलब्ध होणाऱ्या उत्कर्षाच्या वाटा अधोरेखित करतो.

जनशक्ती वाचक चळवळ

किंमत : १९०/-